म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ७११.

भारत-गौरव ग्रंथमाला

# भारत-मातेची श्रेष्ठता

अर्थात्

## मिस् मेयोला उत्तर

लेखक—

द. ग. सारोळकर.

REFBK-0003570

पुष्प ७८ वें.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
नि. नं.
ता.
ठाणे.

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे,

मराठी ग्रंथ संग्रहालय,
नं.
ता.
ठाणे

भारत-गौरव-ग्रंथमाला-पुष्प ७८ वें.

# भारत-मातेची श्रेष्ठता

अर्थात्

## मेयोच्या असत्य विधानांचें खंडन.

REFBK-0003570

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

—भगवान् श्रीकृष्ण.

३५६०

लेखक

दत्तात्रेय गणेश सारोळकर,

संपादक-मौज.

साधी बांधणी रु. १-४-० ] १९२८ [ कापडी रु. १-८-०

प्रकाशक,

**एम्. एन्. कुळकर्णी,**

मालक,

**भारत-गौरव-ग्रंथमाला,**

३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

मुद्रक,

**मंगेश नारायण कुळकर्णी,**

कर्नाटक प्रेस, ३१८ ए,

ठाकुरद्वार, मुंबई.

# चरणसेवेसी.

भारत-मातेची श्रेष्ठता अखिल विश्वाला पटवून देऊन
भारतभूमीच्या उन्नतीकरतां ज्या राष्ट्रसंतांनीं
अलौकिक स्वार्थत्याग केला, जे करीत
आहेत व करतील त्यांच्या
'चरण कमलीं'
हें पुष्प प्रेमभावानें व निरपेक्ष-
बुद्धीनें वाहिलें आहे.

# मधु कर्तव्य.

मिस् मेयोच्या "भारत-माता" पुस्तकांतील असत्य व विपर्यस्त विधानांचें सप्रमाण खंडन करून "**भारतमातेची श्रेष्ठता**" वर्णिलेली आहे. या ग्रंथ-लेखनाच्या वेळीं मला श्री. **दत्तोपंत निमकर**, श्री. **पांडुरंग महादेव भागवत**, बी. ए., एलएल. बी., श्री. **अनंतराव खरे**, B. A., B. SC., श्री. **मोरोपंत दांडेकर**, श्री. **भाऊ नारायण पाटील**, **श्री. न. रा. जोशी** या सद्गृहस्थांनीं आपलेपणानें अनुपमेय सहाय्य केलें आहे; तसेंच कर्नाटक प्रेसचे मालक श्री. **मंगेशराव कुळकर्णी** यांनींही ग्रंथमुद्रणाच्या बाबतींत मला ऋणी करून ठेवलें आहे. वरील सुहृदांची मदत व प्रोत्साहन हेंच या ग्रंथलेखनाला सर्वस्वी कारणीभूत झालेलें आहे. या सर्वांचे तसेच सौ. **सत्यभामाबाई पुरंदरे** यांचे आभार मानणें हें माझें मधु कर्तव्यच आहे.

लेखक.

ॐ तत्सत्

# भारत-मातेची श्रेष्ठता.

## ' खंडनापूर्वी '

एका काळीं आपल्या वैभवानें, तेजानें, स्वातंत्र्यलक्ष्मीनें सर्व जगाची सम्राज्ञी शोभणारी भारतमाता सर्व विश्वाला वंद्य व पूज्य झाली होती. सामाजिक, तात्त्विक, धार्मिक, औद्योगिक सर्व बाबतींत तिनें उन्नतीचें उत्तुंग शिखर गांठलें होतें. आपल्या वैभवांत तळपणारी भारतमाता, आपल्या श्रेष्ठतेनें इतर देशांना लाजवीत होती. संस्कृतीच्या उज्ज्वलतेनें सर्व राष्ट्रांना तिनें निस्तेज करून टाकलें होतें. अशी ही सर्वश्रेष्ठ सम्राज्ञी कालाच्या तडाख्यांत सांपडून तिची ' स्वातंत्र्यलक्ष्मी ' परक्यानें हरण केली. परक्यांच्या हातीं सत्तेचीं सर्व सूत्रें आल्यावर जित राष्ट्रांची जी असहाय्य अवस्था होते तीच अवस्था आमच्या प्याऱ्या भारतमातेची झाली. तिची गजान्त लक्ष्मी नाहींशी होऊं लागली, तिच्या उज्ज्वल संस्कृतीवर परक्या संस्कृतीचे वज्रप्रहार होऊं लागले, तिच्या उज्ज्वलतेवर बेजबाबदारपणानें निंदेचे विषारी फूत्कार नानाविध परके लोक करूं लागले.

एका काळीं वैभवाच्या अढळ सिंहासनावर अधीष्ठित असलेली ' सुजलां सुफलां ' अशी आमची **'भारत माता'** परक्यांच्या पाशांत अडकून तिची स्थिति हृदयविदारक झाली. कांहीं परक्या निंदकांच्या विषारी दृष्टीला तिची उज्ज्वलता निस्तेज वाटूं लागली. तिची संस्कृती रानटी भासूं लागली. तिचें वैभव रंकाचें वैभव दिसूं लागलें. स्वातंत्र्याला पारख्या झालेल्या राष्ट्राची मानखंडना करण्याच्या पाशवी वृत्तीला जित राष्ट्रांचें गत वैभव जसें डोळे असूनही दिसत नाहीं, तसेंच **' भारत मातेची श्रेष्ठता '** जेत्यांना, त्यांच्या जातिबांधवांना, साम्राज्यशाहीची मदिरा पिऊन बेहोष झालेल्यांना पटेनाशी झाली. त्यांनीं आपल्या हस्तकांतर्फे भारत मातेची श्रेष्ठता जाणून बुजून दृष्टीआड करविली. व तिच्यावर, महामंगल आर्यजननीवर निंदेचे वज्रप्रहार करविले. प्रथमतः असले प्रयत्न ख्रिस्ती धर्मांचा प्रसार

करण्याकरितां आलेल्या मिशनऱ्यांकडून झाले. मिशनऱ्यांनीं आपला ख्रिस्त धर्म प्रसृत करण्याकरतां हिंदु धर्मावर नाना तऱ्हेचें असत्य व विपर्यास करणारें शरसंधान केलें.

ख्रिस्ती मिशनऱ्यांचा हा '**निंदा नाच**' चालू असतां हिंदुस्थानांतल्या धर्मसमाजांनीं त्यांच्या असत्य विधानांना जागच्या जागीं रोखठोक जबाब देऊन, त्यांचीं विधानें कशीं खोटीं आहेत, अर्धवट ज्ञानानें त्यांचीं हीं शरसंधानें सज्ज झालेलीं आहेत हें पटवून दिलें. हा परक्या निंदेचा वज्रप्रहार तेथेंच थांबला असें नव्हे! तर दिवसें दिवस त्याचीं निरनिराळीं स्वरूपें होऊन चहूं बाजूंनीं भारत मातेच्या श्रेष्ठतेवर चौफेर हल्ले चढविले गेले.

मिशनऱ्यांनीं व इतर परक्या लोकांनीं भारत मातेच्या श्रेष्ठतेवर जे हल्ले चढविले ते विवक्षित हेतू उराशीं बाळगूनच चढविले आहेत व चढवीत आहेत. तो हेतू म्हणजे अखिल जगावर गौर जातीचें प्रभुत्व असावें, सर्व राष्ट्रें गौर साम्राज्यशाहीच्या छत्राखालीं यावीं हा होय. विल्यम ऑर्चर या आंग्ल पुंगवानें हिंदुस्थान असंस्कृत आहे हें हिंदुस्थानची बदनामी करणारें पुस्तक लिहिलें. त्याला 'हिंदुस्थान संस्कृत आहे काय?' (Is India civilized?) हें पुस्तक लिहून सर जॉन वुड्राफ यांनीं झणझणीत उत्तर दिलें. अशीं अनंत लिखाणें मिशनऱ्यांनीं, हिंदुस्थानच्या हितशत्रूंनीं व गौर साम्राज्यशाहीच्या पुरस्कर्त्यांनीं लिहिलेलीं आहेत.

या लोकांनीं पुस्तकें लिहूनच भारत मातेची मानखंडना केली आहे असें नव्हे तर अन्य प्रकारांनीं त्यांनीं मानखंडना करण्याचे पाशवी प्रयत्न केलेले आहेत. सन १९२६ मध्यें बर्लीन येथें जें एक प्रदर्शन गोऱ्या लोकांनीं भरविलें होतें, त्यांत तामील मुलांना व गुजराथी अर्भकांना 'अजब जनावरें' म्हणून ठेविलें होतें. ही तयारी श्वेतवर्णाच्या लोकांनीं एवढ्याच करतां केली होती कीं, हिंदी लोक म्हणजे जगांतील अत्यंत अडाणी आणि रानटी आहेत असें आपल्या जातभाईंना दाखवून हिंदी जनतेच्याविषयीं त्यांची दिशाभूल व्हावी.

अशाच प्रकारचा दुसरा एक प्रकार सन १९२६ च्या जून महिन्यांत पॅरिस येथें करण्यांत आला. सुमारें दीडशें खेडवळ, अडाणी व रानटी हिंदी लोक—ज्यांची वस्ती नेहमीं अरण्यांत असते—असे मुद्दाम शोधून काढून त्यांचें प्रदर्शन पॅरीसच्या प्रदर्शनांत केलें होतें. असाच आणखी एक प्रकार चिकागोच्या प्रदर्शनांत झालेला आहे. हिंदूधर्मावरील तात्त्विक व्याख्यानानें हिंदू संस्कृतीची

उज्ज्वलता व भारतमातेची श्रेष्ठता अमेरिकन लोकांस पटवून देणाऱ्या स्वामी विवेकानंदांच्या व्याख्यानांस पश्चिम युरोपमध्यें वाव मिळूं दिला नाहीं हेंही वरील मनोवृत्तीचेंच द्योतक आहे.

आपल्या परमपूज्य, प्रात:स्मरणीय हिंदभूमीची मानखंडना होऊं नये म्हणून दिव्य व रम्य उष:काल जागृतीनें हिंदी जनता खडबडून जागी झाली व तिनें एकमतानें, एकदिलानें, स्वातंत्र्याची लढत लढण्यास सुरवात केली. हिंदिस्थान स्वतंत्र झाल्याशिवाय या दूषकांची नांगी मोडणार नाहीं, यांच्या लांब जिभा त्यांच्या घशांत जाणार नाहींत असें वाटून हिंदी जनतेनें विसाव्या शतकाच्या सुरवातीस स्वातंत्र्ययुद्ध पुकारलें. हिंदी जनता भारतमातेच्या पदकमलीं स्वातंत्र्याचें परमसुवासिक पुष्प वाहण्याकरतां बद्धपरिकर झाली. ही तिची निश्चिती साम्राज्यशाहीला, गौरवर्ण–वर्चस्व–अभिलाष बुद्धीला असह्य होऊन तिनें भारतमातेच्या अयोग्यतेबद्दल, धर्मांधतेबद्दल, असंस्कृतपणाबद्दल, युरोप अमेरिकादि गौर राष्ट्रांत डांगोरा पिटण्यास सुरवात केली.

युरोप व अमेरिका या दोन खंडांतील धनिकांच्या आर्थिक मलिद्यावर चरणाऱ्या मिशनऱ्यांनीं मातेची मानखंडना केल्यावर त्यांच्या कुटिलपणाची री कांहीं गोऱ्या लोकांनीं ओढण्यास सुरवात केली. हिंदुस्थानावर गौर वर्णियांचें विशेषत: इंग्रजांचें राज्य राहणें न्यायोचित आहे या भावनेनें कित्येकांनीं प्रयत्न चालविलेले होते, सध्यां चालू आहेत व पुढेंही चालतीलच !

हा मूळ हेतू उराशीं बाळगून गोऱ्या लोकांच्या हितकर्त्यांनीं हिंदुस्थान हा देश धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक या बाबतींत अध:पतित आहे, इतकेंच नव्हे तर, हिंदी जनता रानटी होती, रानटी आहे व रानटीच राहणार ! अशीं आपल्या हेतूस पोषक होणारीं व काल्पनिक विधानें या निंदकांनीं केलेलीं आहेत, व करीत आहेत. त्या निंदकांचें असें म्हणणें आहे कीं, हिंदुस्थान हें एक राष्ट्र नाहीं, त्याचा एक धर्म नाहीं, त्याची एक भाषा नाहीं; हें आपला राज्यकारभार पाहण्यास, स्वयंशासनास अयोग्य आहे. हिंदुस्थानच्या हितशत्रूंना असें वाटतें कीं जर इंग्रज हिंदुस्थानांतून जातील तर त्यांच्यांत सामाजिक व राजकीय कलह होऊन त्यांची स्थिति अत्यंत वाईट होईल.

ही विचारसरणी ज्या हितशत्रूंची आहे त्यांना हिंदुस्थानविषयीं काडीचीही काळजी नसून त्यांना जी कळकळ आहे ती इंग्रजांचें राज्य, श्वेतवर्णाचें वर्चस्व हिंदु-

स्थानवर रहावें म्हणूनच आहे. या हितशत्रूंचे असे मानभावी प्रलाप आहेत कीं जोंपर्यंत रानटी भारतवर्ष सुधारणार नाहीं, सुसंस्कृत होणार नाहीं तोंपर्यंत त्यांना सुधारण्यासाठीं, सुसंस्कृत करण्यासाठीं आमच्या सत्तेची आवश्यकता आहे. जसा कांहीं सुसंस्कृतीचा झरा हिंदुस्थानांत वहातच नाहीं आणि म्हणून संरक्षणाचा मक्ता यांच्याकडे राहिलाच पाहिजे.

हिंदुस्थान आपल्या पंजांत रहावा म्हणून गौरवर्णीयांनीं आतांपर्यंत नानाप्रकारें युक्त्याप्रयुक्त्या केल्या, अनेक ग्रंथ लिहविले, आपलें राज्य हिंदुस्थानवर रहावें म्हणून हिंदुस्थान सुसंस्कृत असूनही त्याला रानटी ठरविण्याचा असत्य व स्वार्थी प्रयत्न त्यांनीं केला, व करीतही आहेत.

हिंदु जनतेला हा गौर वर्णियांचा मतलबी कावा समजला व तिनें खडबडून जागे होऊन 'स्वराज्या'चा मार्ग चोखाळण्यास सुरवात केली. हिंदी जनतेनें स्वराज्याची जागृति आसेतुहिमाचलापर्यंत केलेली पाहतांच व ऐन वेळीं विश्वयुद्धाचा पेंच पडतांच या हितशत्रूंनीं मूळ हेतु न सोडतां हिंदी जनतेच्या पदरांत घटोत्कचाच्या मायावी बाजारांतील सुधारणेचा एक तुकडा टाकला. हा तुकडा टाकतांना इंग्रजांनीं असें मधुर भाषेनें म्हटलें कीं, हा तुकडा तुम्हांला जर पचला, तुम्हांला पचवितां आला, त्यानें तुम्हांला अजीर्ण झालें नाहीं, तर मग दुसरा तुकडा तुम्हांला देऊन तुमची 'क्षुधा' शांत करूं. परंतु पहिलाच तुकडा अपुरा, असमाधानकारक आहे असें हिंदी जनतेनें बजाविलें. त्याचबरोबर तिनें या तुकड्यांत अर्थ नाहीं, यावर समाधान मानून बसण्यांत अर्थ नाहीं, असें समजून स्वातंत्र्याची चळवळ नेटानें सुरू केली. स्वातंत्र्य हा हिंदुस्थानचा हक्क आहे आणि तो आपण मिळविणारच असा निर्धार झाला.

हा निर्धार ऐकतांच नोकरशाहीनें, गौरवर्णाचें हिंदुस्थानवर वर्चस्व असावें असें मानणाऱ्या हिंदुस्थानच्या हितशत्रूनें निराळाच डाव खेळण्यास सुरवात केली. तो डाव म्हणजे हिंदुस्थान स्वातंत्र्याला नालायक आहे हा प्रवाद होय. या प्रवादाचें प्रत्यंतर म्हणजेच मिस् मेयोचें, 'मदर इंडिया' हें गलिच्छ, असत्य विधानांनीं, निरर्गल प्रलापांनीं भरलेलें लिखाण होय.

हें लिखाण म्हणजे असत्य विधानांनीं भरलेलें एक हिंदुस्थानचें अपमान करणारें चोपडें होय. हें लिखाण म्हणजे भारत मातेची अप्रतिष्ठा करणारें निंद्य पुस्तक होय. हें पुस्तक म्हणजे, महात्मा गांधी म्हणतात त्याप्रमाणें एका 'गटार इन्स्पे-

क्टरचा' रिपोर्ट होय. हें पुस्तक ज्या दृष्टीनें लिहिलें आहे ती दृष्टि दूषित आहे. हिंदुस्थान सुधारावा, म्हणून हें पुस्तक लिहिलेलें नसून ही लेखिका लिहिते कीं, "माझ्या अमेरिकन बंधुभगिनींना हिंदुस्थानची माहिती असावी म्हणूनच मी हें पुस्तक लिहिलें आहे. हिंदुस्थानविषयीं अमेरिकन लोक अज्ञ राहूं नयेत, त्यांना हिंदुस्थानची स्थिति कळावी, म्हणून मी हें पुस्तक लिहिलें आहे." मिस मेयोच्या हेतूकडे पाहिलें तर तिनें हिंदुस्थानविषयीं कोणत्या तऱ्हेचें पुस्तक लिहावें ! तिच्या पुस्तकावरून असें दिसतें कीं, तिला हिंदुस्थानची वाईट तेवढी बाजू दिसली. हिंदुस्थानला चांगली बाजू नाहींच काय ? या दृष्टीनें हिचें लिखाण पहातां तिनें ज्या मार्गांचें अवलंबन केलें, ज्यांची मदत घेतली त्यांच्या मदतीवर व मार्गदर्शकत्वावर ज्या अर्थी ती खात्रीनें विसंबून राहिली त्यावरून बाईच्या लिखाणाचा हेतु विवक्षितच असल्याचें सिद्ध होत आहे. तिचा जर हेतु शुद्ध असता तर तिनें वरील तऱ्हेचें अवलंबन केलें नसतें. हिंदुस्थानाला नालायक ठरविण्याकरतांच हिंदुस्थानच्या हितशत्रूंच्या कळपांत ती शिरली व यामुळेंच तिनें ग्रंथ लिहिण्याचा जो उद्देश लिहिला आहे तसा तिचा उद्देश नव्हता हें सिद्ध होत आहे. याच लेखिकेनें असाच एक अव्यापारेषु व्यापार केला होता. तो म्हणजे दोन वर्षांपूर्वी फिलीपाईन लोकांना स्वातंत्र्य द्यावें किंवा नाहीं हा प्रश्न उपस्थित झाला तेव्हां फिलीपाईन लोकांची बदनामी करण्याच्या उद्देशानें 'The Isles of Fear' 'भयानक बेटें' हें घाणेरडें चोपडें लिहिलें आणि आतां हिंदुस्थानांत 'स्टॅटयुटरी कमिशन' येण्यापूर्वी 'भारतमाता' या नांवाचें एक अत्यंत गलिच्छ असें पुस्तक लिहिलें. यावरून या बाईचा उद्देश चटकन् कळून येतो.

अमेरिकेला अथवा पाश्चात्य राष्ट्रांना हिंदुस्थानची स्थिति कशी होती व आहे हें दाखविण्याकरितां मेगॅस्थिनीस, बर्नियर, मॅक्स मुल्लर वगैरे विद्वानांनीं पुस्तकें लिहिलेलीं आहेत. परंतु या बाईनें जी एक विवक्षित दृष्टि हें पुस्तक लिहितांना ठेविली होती ती उपरिनिर्दिष्ट लेखकांची नव्हती; इतकेंच काय पण 'Jesting Pilate' या नांवाचें Aldous Huxley यांनीं जें हिंदुस्थानविषयक पुस्तक लिहिलें आहे त्यांत जी त्यांनीं आपली दृष्टि ठेवून सत्यतेचें दिग्दर्शन केलेलें आहे, त्याच्या उलट या पुस्तकांत लिहिलेलें आहे.

हक्स्ले यांचा हेतु निंदा करण्याचा नसून हिंदुस्थानांत सुधारलेल्या राष्ट्रांप्रमाणें सुधारणा असाव्या असा होता. त्यांचा ग्रंथही वरच्याच दृष्टीनें लिहिला गेला पण

मेयोच्या पुस्तकाप्रमाणें त्यांनीं घाण तेवढीच उपसली नाहीं. 'भारतमाता' हें पुस्तक मेयोनें अशाकरतांच लिहिलें आहे कीं:—(१) सर्वसाधारण वाचकांना हिंदुस्थानच्या चाली रीती वाईट भासाव्या, (२) समाजसुधारकांना त्यांत कांहीं तरी विचार करण्यासारखें आहे असें भासावें आणि (३) हिंदुस्थानच्या हित-शत्रूंना हिंदुस्थानला तुमच्याशिवाय त्राता नाहीं असें पटवावें.

हें पुस्तक लिहितांना तिनें जरी 'मी हें पुस्तक माझ्या देशबांधवांच्याकरतांच लिहिलें आहे; मी कोणाच्या प्रेरणेनें व चिथावणीनें, मोबदला घेऊन लिहिलेलें नसून स्वयंस्फूर्तीनें व स्वयसेवक बुद्धीनेंच लिहिलें आहे' असा मानभावीपणाचा कबुली जबाब दिला आहे, तरी पुस्तकाचें अथपासून इतिपर्यंत परीक्षण व मनन करतां ठिकठिकाणच्या असत्य विधानांवरून असें आढळून येतें कीं हें पुस्तक तिनें हिंदुस्थानची अप्रतिष्ठा करण्याकरितांच लिहिलेलें आहे.

या पुस्तकांत एकंदर तीस प्रकरणें असून त्याचे पांच भाग केलेले आहेत. भागाचीं शीर्षकें व त्यांत आलेला मजकूर म्हणजे 'यमुना व कावेरी' यांचा संगम (!) होय. शीर्षकें निराळीं व त्यांतील लेखनहेतू भलताच, हें प्रत्यंतर पुढील परीक्षणावरून येऊन तिच्या विवक्षित हेतूबद्दल वाचकांची खात्री पटेल.

---

## घाणेरडे आरोप.

बाईनें 'मदर इंडिया' पुस्तकांत हिंदुस्थानावर पुढील आरोप लादलेले आहेत:—

**पहिला आरोपः—आचरणहीनता व इंद्रियसंबंधीं अतिशयता.**

(१) प्रचलित हिंदूधर्म कोणत्याही विषयांत आत्मसंयमन करण्यास शिकवीत नाहीं. पतिपत्नींच्या व्यवहारांत तर मुळींच नाहीं.

(२) पिता आपल्या कन्येला एवढ्याचकरितां घरांत ठेवीत नाहीं, कीं ज्या घरांत भाऊ, भाचे, चुलते, पुतणे वगैरे असल्यामुळें मुलीचें शील भ्रष्ट होऊं नये.

(३) शेतकरी स्त्री आपल्या लहान मुलीला एक पळभर विसरत नाहीं याचें कारण असें कीं आपली मुलगी कोणी तरी भ्रष्ट करील अशी तिला भीति वाटत असते.

(४) ज्या हिंदु पत्नीला मूलबाळ होत नाहीं तिला तिचा पती सर्व तयारीनिशीं यात्रेला पाठवितो व ती पत्नी रात्रभर देवळांत राहून नंतर घरीं येते.

(५) मंदिरांतले पुजारी सुंदर मुलांचा स्त्रियांसारखा उपयोग करतात.

(६) प्रायः सर्व तरुण नपुंसक व जननेंद्रियांच्या विकारानें पछाडलेले असतात.

(७) भारतवर्षाच्या अनेक दिशांकडील देवळांत आईबाप आपलीं सुंदर मुलें व मुली व्यभिचाराकरतां ठेवतात व त्याबद्दल त्यांना कांहींच वाटत नाहीं.

## दुसरा आरोपः—पती आणि पत्नी, पिता आणि माता, मुलें आणि मुली यांचा अमानुष संबंध.

(१) स्त्रियांना मरेपर्यंत पडद्यांत ठेवण्यांत येतें.

(२) बाळंतपणांत मुलीला ठार मारतात व त्यांना निर्दयतेनें वागवितात.

(३) पत्नीला एकत्र कुटुंबांत रहावें लागतें व त्यामुळें तिची अत्यंत दुर्दशा होते.

(४) मुलीला जर संतती झाली नाहीं तर तिचें आयुष्य कष्टतर जाईल अशा रीतीनें तिला वागविण्यांत येतें.

(५) हिंदू समाजांत स्त्रिया म्हणजे संतती निर्माण करण्याचेंच साधन होय.

(६) हिंदू स्त्रीनें आपल्या पतीकरतां एकेक पुत्र जन्माला घातलाच पाहिजे.

(७) पतीच्या मृत्यूनंतर स्त्री एवढ्याचकरतां सती जात असे कीं, पतीच्या मृत्यूनंतर तिला भोगावयास लागणाऱ्या हालअपेष्टा तिला भोगाव्या लागूं नयेत.

## तिसरा आरोपः—धार्मिक अयोग्यता.

(१) हिंदुस्थानांतले लोक खोटें बोलणारे आहेत.

(२) हे लोक गोमूत्र पितात, शेण खातात, गलिच्छ नदींत स्नान करतात, देवळांत हत्या करतात.

(३) जननेंद्रियांचें शिक्षण यांना लहानपणापासून देण्यांत येतें. शिवाची पिंडी व वैष्णवांची मुद्रा याचकरतां आहेत.

( ४ ) गोरक्षण हा जरी त्यांचा धर्म असला तरी गाईंना कसायाच्या हातांत देणें याबद्दल हिंदूंना कांहींच वाटत नाहीं.

( ५ ) यांचा धर्म आत्मसंयमन मुळींच शिकवीत नाहीं.

### चवथा आरोपः—राजनैतिक अयोग्यता.

( १ ) जोंपर्यंत मोठमोठ्या हुद्यांच्या जागांवर इंग्रज अधिकारी होते तोंपर्यंत हिंदुस्थानांत शांतता व न्याय होता; परंतु सुधारणांमुळें, या सुधारणाच्याद्वारें ज्यांना ज्यांना अधिकाराच्या जागा दिल्या त्यांनीं त्यांनीं आपल्या कामाचा घोंटाळा करून ठेवला.

( २ ) हिंदू-मुसलमानांत अनेक झगडे झाले.

( ३ ) ज्या ज्या खात्यांवर हिंदुस्थानवासी दिवाण नेमले आहेत तीं खातीं चांगलीं चालत नाहींत.

( ४ ) हिंदुस्थानांतले हिंदी न्यायाधीश व अधिकारी लांच खाणारे आहेत. ते वादी प्रतिवादींकडून पैसे खातात.

( ५ ) न्यायाधीश हिंदू असला तर तो हिंदूंचा पक्ष घेऊन त्यांना न्याय देतो व मुसलमान असला म्हणजे मुसलमानांचा पक्ष घेऊन मुसलमानांना न्याय देतो.

( ६ ) हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरतां झगडणारे पुढारी दुटप्पी आहेत. त्यांच्या मनांत असतें एक आणि बोलतात दुसरेंच.

( ७ ) या लोकांच्या हातीं राजसत्ता दिली तर गृहकलह होऊन ते नष्ट होतील. त्यांच्यांत अनेक भांडणें होतील.

( ८ ) व या भांडणांचा असा परिणाम होईल कीं अफगाणिस्थान किंवा रशिया या लोकांवर राज्य करून त्यांना आपली गुलामगिरी करावयाला लावील.

याप्रमाणें या बाईनें हिंदी जनतेवर, चालीरीतींवर, धार्मिक भावनेवर, स्त्रियांवर कुत्सित, असत्य, गलिच्छ आरोप केलेले आहेत. या आरोपांचें खंडन साधार व प्रमाणबद्ध पुढील प्रकरणांत करूं.

[stamp]

## भाग १ ला.

या भागाला Bus to Mandalay ( बसमधून मंडाले ) असा मथळा मिस मेयोनें दिला आहे. असा मथळा देण्याचा उद्देश काय हें प्रथम दर्शनीं लक्षांत येत नाहीं. याचें कारण लेखिकेनें पुढील वर्णन कलकत्ता शहराचें व तेथील लोकांमध्यें शिरलेल्या इंग्रजी सुधारणेचें दिलें आहे. त्यानंतर तिची दृष्टी दुसरीकडे न जातां बंगाली तरुणांकडे गेली. बंगाली तरुण अशक्त, पंडुरोगी, छाती आंत गेलेले, डोळे खोल गेलेले व गल्लोगल्लीं बोल्शेव्हिक व राज्यक्रांतीचें वाङ्मयवाचनांत गढून गेलेले असतात असें तिला दिसलें. ताबडतोब तिनें आपली नजर काली मातेच्या मंदिरावर फेंकली. तिथें तिला फक्त मातेपुढें बकऱ्यांचें बलिदान चाललें असून, त्यांचें रक्त ज्यांना मुलें होत नाहींत अशा स्त्रिया आपल्या जिभेनें चाटीत असलेल्या दिसल्या. हें रक्त चाटण्याचें कारण असें कीं आपल्याला संतती व्हावी. पुढें तिनें गंगावलोकन केलें; तेथें व तीर्थोदकांत तिला गलिच्छ घाणच दिसली. कालीच्या देवळांत जाऊन जो प्रकार पाहिला त्यासंबंधानें लिहितांना बाई असें म्हणते कीं, मला एका इंग्लिश थिऑसफिस्टानें सांगितलें कीं, कालीचे भक्त व तिला बळी देणारे यांची संख्या अगदीं कमी व खालच्या जातींतील अगदीं अडाणी लोकांत आहे; म्हणजे हिंदुस्थानांत ती नाहीं म्हटलें तरी चालेल; पण हें इंग्लिश थिऑसफिस्टाचें म्हणणें खोटें आहे असें एका ब्राह्मणानें सांगितलें. तो म्हणतो कीं, विष्णूपेक्षां कालीची पूजा करणारेच लोक हिंदुस्थानांत जास्त आहेत. याचें कारण असें कीं उच्च वर्गांतील हिंदूंना मद्यमांस खाणें व पिणें हें धर्मबाह्य वाटतें, तरी पण कालीमातेच्या भक्तांत उच्च कुळांतील सुशिक्षित, सर्व जातीचे व मताचे लोक आढळतात.

सदर भागांतील पहिलें प्रकरण ' The Argument ' ' मुद्दा ' या नांवानें लिहिलें आहे. यांत पुढीलप्रमाणें मुद्दे आहेत. मिस मेयो म्हणते कीं " मी हें पुस्तक एवढयाच करतां लिहितें कीं माझ्या देशबांधवांना हिंदुस्थानची खरी माहिती व्हावी. ही माहिती पूर्वी कांहीं विवक्षित लोकांनीं, विवक्षित ध्येय ठेवून, कादंबरीच्या द्वारें, प्रवासवर्णनामधून, धार्मिक हेतूनें व अशाच कांहीं अन्य प्रकारानें दिलेली असल्यामुळें माझ्या देशबांधवांना इतकेंच माहीत आहे कीं, **हिंदुस्थानांत महात्मा गांधी व सिंह, वाघ वगैरे जनावरें राहतात.** आजपर्यंत जे प्रवाशी, ग्रंथकार हिंदुस्थानांत येऊन त्यांनीं आपलीं लिखाणें लिहिलीं,

त्यांच्या दृष्टीपेक्षां मी आपली दृष्टी सत्यकथनाकडे ठेवून, स्वयंसेवक बुद्धीनें, हें पुस्तक लिहिलें आहे. तें लिहितांना मी त्यांच्या धार्मिक, राजकीय, किंवा कलेसंबंधानें विवेचन केलें नसून फक्त समाजस्थितीचें निरीक्षण केलें आहे. ही माहिती मिळविण्यासाठीं मी इंडिआ ऑफिसमध्येंही गेलें होतें.

त्याचप्रमाणें अशी माहिती मिळवितांना मी इंग्रजी व देशी आरोग्य-खात्यांच्या अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या, दवाखाने तपासले, डॉक्टर वैद्यांच्या मुलाखती घेतल्या, रोग्यांच्या स्थितीचें अवलोकन केलें, कधीं कधीं जिल्हा कलेक्टर बरोबर, तर कधीं कधीं खेड्यांतल्या शेतकऱ्यांबरोबर फिरलें, भिन्न भिन्न जातींच्या व दर्जांच्या लोकांत मिळून मिसळून त्यांची विचारपूसही केली. शाळेंत गेलें, विद्यार्थी व अध्यापक यांच्याजवळ चौकशी केली, प्रसिद्ध संस्थानिकांकडे गेलें, राजकीय, धार्मिक, सामाजिक पुढाऱ्यांच्याही भेटी घेतल्या. एका ब्रिटिश स्पष्टवक्त्यानें मला असें बजाविलें कीं, एवढया मोठ्या प्रचंड देशांत, मद्रास, कलकत्ता, मुंबई अशा दूरदूरच्या प्रांतांतील चालीरीतींवरून सर्वसाधारण मत बनविणें चुकीचें होईल याची तू अवश्य काळजी घे म्हणजे तुझ्यावर कसलाही आरोप राहणार नाहीं. त्याच्या स्पष्टवक्तेपणावरून मला हिंदुस्थानच्या मानसिक व शारीरिक स्थितीसंबंधानें जी माहिती मिळाली तीच माझ्या लेखनास अत्यंत उपयुक्त झाली. मी तेवढयाकरतां दक्षिण, उत्तर, पूर्व व पश्चिम या चारी दिशांना प्रवास केला, त्यावरून मला असें अनुमान काढतां आलें कीं, असे कांहीं विवक्षित चालीरीतींचे प्रकार आहेत कीं ते सर्व हिंदुस्थानाला सरसहा लागू पडतील! असें असूनही कांहीं आधुनिक विचारसरणीचे लोक असा प्रश्न विचारतात कीं, "आमच्यावर इतकीं वर्षें ब्रिटिशांचा अंमल असून आम्ही चालीरीतींच्या बाबतींत अज्ञानी व दरिद्री कां राहिलों? तसेंच आमच्या देशांत मृत्युसंख्येचें प्रमाण जास्त कां असावें? आमचे हक्क, राजकीय ज्ञान, आर्थिक परिस्थिति व सुखकर जीवित हें आम्हांस कां मिळूं नये?" सर चिमणलाल सेटलवाड असें म्हणतात कीं, माझ्या मतें "याचें कारण या देशांत उद्योगहीनता, चिकाटीचा अभाव, धाडसाची उणीव व उत्साहहीनता असल्यामुळेंच ही स्थिति प्राप्त झाली आहे." महात्मा गांधी म्हणतात, "**आमची अशी स्थिति होण्याचें कारण इंग्रजी सत्ताच होय!** आम्ही इतके निरुत्साही कां झालों? आमच्यांतील भ्रातृभाव कां कमी झाला? आमच्यांतील मर्दपणा कां कमी झाला? आम्ही लौकर कां थकतों व कां मरतों याचें कारण आमच्यांतील आध्यात्मिक शक्ति जखमी झालेली आहे व तिच्यांतून

रक्त वाहात आहे, आमचीं अंतःकरणें परक्यांच्या आततायीपणानें दूषित झालेलीं आहेत, व याचमुळें हिंमत खचून गेली आहे. ही स्थिती चालवावयाची असेल तर आमच्यावरील जुलमी राज्यपद्धति दूर केल्याशिवाय आम्हाला स्वातंत्र्याचें सौख्य लाभणार नाहीं व आमच्यांतील बारीकसारीक दोषांकडे लक्ष पुरवितां येऊन आम्हाला भारतमातेची सेवा करतां येणार नाहीं." या सर्व गोष्टींचा विचार करूनच, पीडित झालेल्या भारतवासियांकडे मी सहानुभूतीनें पाहून "भारत माता" हें पुस्तक लिहिण्याचें धाडस करण्यास प्रवृत्त झालें."

हिंदुस्थानच्या वरील स्थितीशीं इंग्रज राज्यकर्त्यांचा चांगुलपणा, उदासीनता, बेपर्वाई, वगैरे गोष्टींचा कांहीं एक संबंध येत नाहीं. आळस, उत्साहहीनता, जीवनशक्तीचा ऱ्हास, धडाडीचा अभाव हे दुर्गुण भारतवासीयांच्या हाडींमाशीं खिळलेले आहेत. हे हल्लींचे नसून पूर्वीपासूनच जडलेले आहेत. दिवसेंदिवस ते कमी न होतां, हिंदी लोक जोंपर्यंत आपले दोष कमी करणार नाहींत तोंपर्यंत वाढतच जातील. त्यांचीं शरिरें व आत्मा, दास्यशृंखलेनें बद्ध झालेलीं असून, अजूनदेखील ते तिला जोराजोरानें आवळूनच धरीत आहेत. ही त्यांची स्थिती दुसऱ्यांच्या कोणत्याही भावनांनीं दूर होणार नाहीं. पूर्वीं, आतां व पुढें आलेलीं व येणारीं परकी तत्वें यांची दिशाभूल करणारीं असून त्यांना चिकटून बसल्यानें ते आपली मुक्तता करून घेण्याचा काळ दूर लोटीत आहेत. एका बारा वर्षांच्या मुलीकडे पहा, तिचें दुबळें शरीर पहा, ती अशिक्षित, अज्ञान, आरोग्याची माहिती नसलेली, तिच्यावर मातृपदाचा बोजा लादलेला, तिचीं मुलें मानसिक अधःपतनानें पछाडलेलीं, तिला व्यायामाला परवानगी नाहीं, इतकेंच काय पण ती अशाच परिस्थितींत वाढते कीं, तिशी उलटते न उलटते तोंच ती तारुण्यहीन व जख्खड झालेली अशी दिसते ! असें असतांना तिची शारीरिक व मानसिक शक्ती कोठें गेली हें विचारण्याचें दुसरें कोणतें कारण असणार ? सर्व साधारण लोकांकडे पाहिलें तर त्यांच्यांत खेडवळपणा, अशिक्षितता, अज्ञानीपणा यावरच प्रेम करणारे लोक जास्ती आढळतात. असें असून, हिंदी जनता दारिद्र्याचे गर्तेंत खितपत कां पडली आहे ? हिंदुस्थानांत मृत्यूचें प्रमाण अधिक कां ? अशी कां पृच्छा होते ? हिंदुस्थानावर इंग्रज, रशियन अथवा जपानी, कोणीही राज्य करोत, भारतीय नरेश आपसांत शासनपद्धति वांटून घेवोत व आहे त्यापेक्षां उत्तम राज्यपद्धति अमलांत येवो ! पण एवढी गोष्ट खरी कीं, हिंदी लोकांनीं स्वातंत्र्यास प्रवृत्त होतांना, आपली शक्ती अजमावावी, दुसऱ्यांना दोष देत बसूं नये. तात्पर्य

हें कीं, एकंदर मानवी समाजापैकीं एक अष्टमांश असणाऱ्या हिंदी जनतेच्या वर्तमान व भावी आयुष्याशीं महत्वाचा संबंध असलेल्या बाबी सारांशानें वर दिलेल्या आहेत. हिंदी आयुष्यक्रमाच्या निरनिराळ्या चित्रांत यांचाच विस्तारपूर्वक विचार पुढील प्रकरणांतून झालेला आहे. तरीसुद्धां त्या बाबींचें वर्चस्व त्यांच्या बहुविध आयुष्यक्रमाला सोडून जाऊं शकत नसल्याचें दिसणार आहे.

दुसरें प्रकरण "**दौर्बल्याची मानसिक गुलामगिरी**" या मथळ्यानें सुरू झालेलें आहे. यांत असें लिहिलें आहे कीं, इंग्रज सरकार हिंदुस्थानची उन्नति करण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न करीत असून ती न होण्याचें कारण भारतवासीयांचाच दोष आहे. ते जर इंग्रज सरकारच्या हिंदी उन्नतीच्या मार्गांत विघ्न व विरोध करणार नाहींत तरच हिंदुस्थानची उन्नति होईल. अमेरिकेसारखी या देशाची उन्नति न होण्याचें कारण या देशांतील शिक्षित लोक खऱ्या कर्तव्याच्या कार्याकडे अंतः-करणापासून व परिश्रमपूर्वक प्रयत्न करीत नाहींत. पुढाऱ्यांना जनतेची मुळींच काळजी नाहीं. जी शक्ती भारतमातेची सेवा करीत आहे तिचा उत्साहभंग हे लोक करीत असतात. हिंदुस्थानची लोकसंख्या ३१,९०,००,००० आहे. त्यांतील संस्थानिकांच्या हद्दींतील लोकसंख्या वजा करतां ब्रिटिश भारताची लोकसंख्या २४,७०,००,००० आहे. त्यांत ६७,४३६ इंग्रज लोक आहेत. या मुठभर लोकांवर, हिंदी जनता आपल्यावर मानसिक गुलामगिरी लादण्याचा दोषारोप करीत असते. पण ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं इंग्रज हिंदुस्थानांत येण्यापूर्वीं हीच स्थिति होती. मध्यएशियांतून हिंदुस्थानावर वारंवार हल्ले झाले होते व त्या वेळींहि हिंदू चूपचाप बसले होते.

भारताचें अधःपतन—मग तें राजकीय अगर धार्मिक वगैरे कोणतेंही असो—होण्याचें कारण त्यांचा संसार, गृहव्यवस्था व गृहजीवन व रीतीभाती हेंच आहे. भारतकन्यकेला ऋतु प्राप्त झाल्याबरोबर नऊ महिन्यांतच मातृत्व येतें. या वेळीं तिचें वय आठ तेचौदा वर्षांचें असतें. बाळपणांतच विवाह करणें, दोषपूर्ण रीति-रिवाज, पूर्वापार चालत आलेली रूढी याच गोष्टी शारीरिक आरोग्य कमजोर करीत असतात. ती अशिक्षित असते, तिला आपल्या घरांतील देवदेवता, भुतें-खेतें व पती म्हणजे परमेश्वर आहे ही धार्मिक भावना, त्यांची सेवा करणें याच गोष्टींचें फक्त ज्ञान असतें. तिचा नवरा एक पोर तरी असतो किंवा वृद्ध तरी असतो. त्यामुळें त्याच्याजवळून फारच थोडें वीर्य तिला मिळत असतें व त्यामुळें

गर्भधारण घातुक व त्रासदायक होतें. जर कदाचित् मुलगा झालाच तर तो अशक्त, दुर्बळ, व रोगी असा असतो. त्याचें लालनपालन, आरोग्य म्हणजे काय याची माहिती नसलेल्या शिशुमातेला करावें लागतें. हिंदु स्त्री उच्च कुळांतली असो किंवा नीच कुळांतील असो, तिला प्रजोत्पादन हीच गोष्ट माहीत असते, असें समाजस्थितीवरून म्हणतां येतें. मुलांमुलींना लहानपणापासूनच त्यांच्या लिंगविशेष देहाची जाणीव करून देणाऱ्या संवयी लावण्यांत येतात. आपल्या नजरेखालीं आलेल्या मुलांमुलींवर वरील संवयीचे वाईट परिणाम झालेले निदर्शनास आले असल्याचें बरेच डॉक्टर सांगतात. शिवाय पिंडी लिंगाच्या आकाराची असून वैष्णवचिन्ह रतिनिदर्शक आहे. प्राचीन धर्मग्रंथांत बालविवाहाला मान्यता नाहीं या गोष्टींच्या वाटाघाटींत वचनांचे आधार दाखवितां येतात. या बाबीबद्दल पंडितांत एकवाक्यता नाहीं. तें कांहीं जरी असलें तरी या वाटाघाटींत एक गोष्ट खरी आहे आणि ती म्हणजे सद्यःस्थिति. या सद्यःस्थितीप्रमाणें हिंदु गृहस्थाचें वांच्छित म्हणजे शक्य तितक्या लवकर पुत्रप्राप्ति होणें होय. हा पुत्र कशासाठीं तर आपल्या मृत्यूनंतर करावयाचा धार्मिकविधि त्यानें करावा व आपल्याला ( म्हणजे आईबापाला ) मुक्ती मिळवून द्यावी. हें कारण व लहानपणापासून त्याला जडलेली संवय यांमुळें वयाच्या योग्यकालापूर्वींच तो कामव्यवहार करूं लागतो. भारतवर्षांत उत्तर दक्षिणेकडील अनेक ठिकाणीं लहान लहान मुलें जर तीं दिसण्यांत सुंदर असतील तर त्यांचा उपयोग मोठ्या माणसांचें वैषयिक समाधान करण्यापलीकडे किंवा देवळांत 'पुरुषवेश्याव्यवसाय' करण्याकडे ( In the capacity of Prostitute ) करतात.

पाश्चात्य प्रभावामुळें बालविवाहाच्या प्रश्नावर बराच वादविवाद झाला व होत आहे. परंतु याला बरेच धार्मिक बुद्धीचे लोक विरोध करीत आहेत. प्रचलित स्थितींत स्त्रीपुरुषांच्या बाबतींत आत्मसंयमन नाहीं. या देशांतील पुरुष वीस वर्षांतच वृद्ध होतात. शेंकडा ८०, ९० पुरुष नपुंसक असतात. यामुळें एका बॅरिस्टरानें आपल्या भावी जांवयाच्या पुरुषार्थाची परीक्षा एका डॉक्टरकडून करविली.

जर एकाद्या स्त्रीला पुत्रप्राप्ति होत नसेल तर हिंदु गृहस्थ तिला तेवढ्याकरतां सर्व सिद्धता करून देऊन यात्रेला पाठवीत असतो. कधीं कधीं तर लग्न झाल्याबरोबर पहिल्याच रात्रीं पाठविण्यांत येत असते. मंदिरांत गेल्यावर दिवसा ही

स्त्री देवाजवळ पुत्रदान मागते व रात्रीं तेथेंच झोंपते. सकाळच्या प्रहरीं देवळांतला पुजारी रात्रीं काय प्रकार घडला हें सांगतो. नंतर ती स्त्री घरीं परत जाते. या करतां पुजारी तरुणबांड ठेविलेले असतात. सर्वांना या गोष्टी समजतात, परंतु धार्मिक श्रद्धेमुळें त्यांचें मन दुर्बल झालेलें असतें. हिंदुस्थानच्या या मानसिक गुलामगिरीवरून आढळून येईल कीं या देशांत खरे पुढारी कां आढळून येत नाहींत. लोक फक्त वरवर पहात असतात. पण मुळाकडे त्यांचें लक्षच जात नाहीं. याला ते कर्मांचा हवाला देऊन स्वस्थ बसतात! मुंबईचा एक ब्राम्हण असें म्हणतो कीं, हिंदुस्थानच्या अधःपतनाचें कारण विषयातिरेक व त्यामुळें होणारा शारीरिक ऱ्हास होय. सारांश, या गोष्टीवरून असें अनुमान काढतां येतें कीं, संसारांत शिरण्यापूर्वी ज्यांचीं गात्रें शिथिल झालेलीं आहेत, अशा निर्बलांपासून संतती झाल्यास ती दिवसें दिवस अधिक अशक्त होत जाते. व तीच त्याच्या नाशाला कारणीभूत होत असते. ज्या वयांत इंग्लिश पुरुष ऐन ज्वानींत येतो, त्या वयांत हिंदी मनुष्य अशक्त, साहसहीन, व चिडखोर होतो.

जोंपर्यंत ही स्थिती सुधारणार नाहीं तोंपर्यंत हिंदी जनता राजकारण पहाण्यास अगदीं निरुपयोगी आहे.

तिसऱ्या प्रकरणाला **"पोरखेळ"** असें नांव आहे. यांत या बाईनें संमतीवयाच्या कायद्यापासून सुरवात करून डॉ. गौर यांच्या मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा वाढविण्याच्या बिलापर्यंत चर्चा केली आहे. ही चर्चा करतांना तिनें आमच्या समाजाच्या पुढारी लोकांना सर्वस्वी दोषी ठरविलें असून, राज्यकर्त्यांची बाजू या बाबतींत सांवरून धरली आहे. या बिलाचा संबंध, धार्मिक गोष्टींशीं येत असल्यामुळें सरकारला या बाबतींत हट्टानें एकादा कायदा करतां येत नाहीं. कारण अशा तऱ्हेचा कायदा पास केला तर त्याची अंमलबजावणी करणें अशक्य होईल. ही धर्मांची बाब असल्यामुळें प्रजेंत असंतोष माजेल व त्याचा शेवट रक्तपातांत होईल. इ. स. १८९१ मध्यें संमतिवयाचा कायदा पास करून मुलीच्या लग्नाची वयोमर्यादा दहा ते बारापर्यंत वाढविली. त्यानंतर या बाबतींत बिलें आणलीं गेलीं, परंतु कट्टर हिंदु धर्माभिमान्यांनीं विरोध केल्यामुळें तीं तशींच राहिलीं.

यासंबंधांत दोन पक्षांच्या भाषणांचा गोषवारा दिलेला आहे. गोषवाऱ्यासंबंधानें तिचें असें म्हणणें आहे कीं अशा महत्वाच्या प्रश्नाचा विचार पुढारी म्हणविणारे मोठमोठे लोक–जे कौन्सिल व असेंब्लीमध्यें आहेत–तेसुद्धां इतक्या

महत्त्वाच्या प्रश्नाला कांहीं एक किंमत देत नाहींत. म्हणजे कौन्सिल व असेंब्ली मधील आमदार खासदारांचीं भाषणें म्हणजे लगोरीचा पोरखेळच होय ! हें मि. आचार्य यांच्या भाषणांतील उताऱ्यांचें शीर्षक देऊन दर्शविलें आहे.

या म्हणण्याला पोषक म्हणून या बाईनें आमदार खासदारांच्या भाषणांतील पुढीलप्रमाणें मुद्दे दिलेले आहेतः—

( १ ) स्त्री पुरुषांच्या लग्नांत वयाचें निरनिराळें प्रमाण असावें, पण कायद्यानें कांहीं एक काम होणार नसून तें कार्य शिक्षणाचा अधिक प्रसार झाला म्हणजेच होईल.

( २ ) बालवयी विवाह हा दुष्परिणामकारक नसून या संबंधाचा प्रश्न धार्मिक व सामाजिक संस्थांवर सोंपवावा हें बरें.

( ३ ) प्रत्येक स्त्रीचा विवाह ऋतुदर्शनाच्या नंतर होत असतो व संबंधही त्यानंतर होतो असें शिरगणतीच्या सरकारी रिपोर्टावरून कळतें.

( ४ ) नऊ व दहा वर्षांच्या मुलीला माता म्हणणें ही शरमेची गोष्ट आहे. हिंदुस्थानच्या प्रजेंत पुरुषार्थ व स्त्रीत्व कांहीं नाहीं !

( ५ ) लौकर लग्न आणि लौकर मृत्यू हा हिंदुस्थानचा बाणाच आहे ! देवदासींसंबंधानें देखील तिनें कांहीं वरीलप्रमाणेंच मुद्दे दिलेले आहेत. मद्रास व ओरिसा प्रांतांत पुत्रप्राप्तीकरतां देवाला नवस करून देव नवसास पावल्यावर मुलीला देवदासी करण्यांत येते. ती गाऊन नाचून देवाची व आल्या गेल्याची सेवा करते. कधीं कधीं ही मुलगी पांच वर्षांची असते पुजारी व ही यांचा शरीरसंबंध असतो. ही पद्धत वरिष्ठ वर्गांत आहे. देवदासीच्या पद्धतीला धर्मांची सहानुभूति आहे.

पांचव्या म्हणजे या भागांतील शेवटच्या प्रकरणाला "Spades are Spades" 'समाजाचें अधःपतन' असें नांव देऊन हिनें बालमातांच्या संबंधानें असें म्हटलें आहे कीं बालमाता ह्या उपदंशादि विकारानें पछाडलेल्या असतात. त्यांना प्रसूतीच्या वेळीं अत्यंत त्रास होतो. ती म्हणते—मला एका आंग्ल स्त्रीडॉक्टरनें असें सांगितलें कीं उपदंश रोगानें पछाडलेले विद्यार्थी व विद्यार्थिनी माझ्या दवाखान्यांत आहेत. या देशांतील मुलांमुलींना लग्नाच्या पूर्वीच कामव्यवहाराची माहिती तिचे आईबाप देत असतात. एका मद्रासी डॉक्टरचा उतारा

देऊन ती म्हणते कीं, ज्या डॉक्टरनें हजारों स्त्रियांना औषधें दिलीं त्याचें असें म्हणणें आहे कीं त्या साऱ्या स्त्रियांत अशी एकही स्त्री नव्हती कीं जिला उपदंश-जन्य रोग ( Venereal ) नाहीं. हें आणखी एक उदादरण देऊन तिनें असें लिहिलें आहे कीं स्त्री-पुरुषांचे रोज दोन चार वेळां संबंध होतात. बालवयी विवाहाचा दुष्परिणाम म्हणजे बालपत्नी व तिची संतती यांचा शारीरिक व मानसिक ऱ्हास होय.

---

## आरोपांचें खंडन.

या पंचप्रकरणात्मक भागाचा सारांश असा आहे:—विशेष चालीरीतीच्या वैवाहिक आयुष्यक्रमामुळें हिंदूंच्या हिंदुस्थानचा शारीरिक व मानसिक ऱ्हास होत असून या आयुष्यक्रमाच्या मुळाशीं धर्म व धार्मिक भावना असल्यामुळें स्वराज्यानें राजकीय उन्नति करून घेण्यास ‘ बसमधून मंडालेचा प्रवास ’ जसा अशक्य तसा हिंदुस्थान असमर्थ असल्याचें बाईनें या भागाला सूचक मथळा देऊन ध्वनित केलेलें आहे. नुसता ध्वनीच नव्हे तर ती स्पष्ट शब्दांत म्हणते कीं, “ The whole Pyramid of the Indian's woes–material and spiritual—rests upon a rock–bottom physical base. This base is, simply, his manner of getting into the world and his sex–life thenceforward ” ( P. 29 ). “हिंदूंची भौतिक व आध्यात्मिक अवनती त्यांच्या शरीररूपी पायावरच असून तो पाया म्हणजे व्यक्तीचें जगांत जन्मास येणें व नंतरचें तिचें कामविषयक जीवन होय.” परंतु आमच्या सामाजिक जीवनक्रमांतील हें वैशिष्ट्य व आमची सद्यःस्थिति यांचा कार्यकारणभावाचा संबंध येतो कसा हेंच समजत नाहीं !

लग्न अथवा स्त्री-पुरुषसंबंधाचा बाई दर्शवीत असलेला व्यवहार हिंदूंच्या सामाजिक आयुष्यक्रमांत आज नव्यानेंच आहे असें नाहीं. बालविवाह अत्यंत प्राचीन आहे. उपनिषदें व सूत्र ग्रंथांच्या वचनांवरून त्यांच्या कालापर्यंत मागें जात आहे. त्याचप्रमाणें लग्नाला असलेल्या धार्मिक विधींचें स्वरूपही तितकेंच किंबहुना जास्त प्राचीनतम आहे. पत्नीधर्म–पतीला देव मानावयास शिकविणारा आदर्श पत्नीधर्म तितकाच जुना आहे. बाईचें म्हणणें मान्य केलें तर इतिहासाच्या

या गतकालांत हिंदूंच्या हिंदुस्थानचा उत्कर्षच व्हावयास नको होता. एवढेंच नव्हे तर आज निरनिराळ्या शास्त्रांचा विकास करण्यास कारणीभुत होणारें ज्ञान—ज्या ज्ञानाच्या पायावर यूरोपच्या भौतिक उन्नतीस कारणीभूत झालेल्या शोधांची इमारत उभारलेली आहे तें ज्ञान—धार्मिक अंधश्रद्धेला कवटाळणाऱ्या हिंदूंच्या बुद्धिक्षेत्रांतून बाहेर आलेंच नसतें. बाई ज्या आपल्या आरोग्यशास्त्राची महती गाते तें आरोग्यशास्त्र मूळचें कोठलें ? हा सरळ सवाल बाईनें लिहिण्यापूर्वी आपल्या सदसद्विवेक बुद्धीला केला होता काय ? योग्य निष्ठावान पत्नीधर्माच्या अभावीं यूरोपीय संसाराची होत असलेली धुळदाण बाईला दिसत नाहीं काय ? तरतम भावाच्या दृष्टीनें निरीक्षण केल्यास हिंदू पति-पत्नीचें कुटुंब, कौटुंबिक दिनचर्येच्या दृष्टीनें युरोपीयन् पतिपत्नीपेक्षां हिणकस आहे असें बाई खात्रीनें सांगू शकेल काय ? तें जर सांगतां येईल तर वाढते घटस्फोट कशाचे द्योतक आहेत ? अशा वस्तुस्थितीमुळें वरील तुलनात्मक विचार करण्याच्या भरीस बाई पडलेली नाहीं. आंगावर येणारी ही बाजू टाळून बाई दुसऱ्या बाजूनें हिंदू स्त्रीवर्गाबाबत बरळत सुटली आहे. ही बाजू म्हणजे प्रजावृद्धीशीं असलेला स्त्रीपुरुषसंबंध, त्याचें वयोमान, आणि शरीरमानाच्या सुदृढतेशीं त्यांचा घातलेला संबंध हे प्रश्न शास्त्रीय आहेत. ते तसे असल्यामुळें या शास्त्रांची माहिती असणाऱ्यांचे या बाबतींतील विचार, बाईच्या खरेपणाच्या सोंगाचा विचार करतां तिनें घ्यावयास पाहिजे होते. परंतु तसें करणें विवक्षित हेतूच्या दृष्टीनें इष्ट नसल्यामुळें तिला मुद्दाम टाळावें लागलें असं या बाबतींतील हॅवलॉकएलिस वगैरे शास्त्रज्ञांच्या लेखांवरून दिसणारें आहे.

स्त्रीदेहाची पूर्ण वाढ सरासरीनें वीस ते बावीसच्या दरम्यान व पुरुषाची वाढ त्याच्या वयाच्या पंचवीस ते तीसच्या दरम्यान होते. या वाढीशीं वंशभिन्नत्वाचा संबंध आहे. म्हणजे निग्रोंची पूर्ण वाढ होण्यास साधारणपणें जो काळ लागतो तो काळ चिनी जपानी वंशाच्या बाबतींत लागू पडत नाहीं. प्रजोत्पत्ति हें स्त्रीपुरुष देहाच्या भिन्नत्वाचें निसर्गदत्त कारण आहे. ऋतुप्राप्तीनें गर्भधारणा करण्यास स्त्रीदेह योग्य झाला असल्याचें निसर्ग दाखवितो. ऋतुप्राप्तीचें हें वय पृथ्वीवर वावरणाऱ्या असंख्य स्त्रीसमाजांत एकच असत नाहीं. लॅपलँडच्या बाजूला या वयाचें प्रमाण १८ व २० याच्या दरम्यान पडतें तर भूमध्य समुद्राच्या कांठच्या कांहीं जातींच्या स्त्रियांत ते ८ व ९ याच्या दरम्यान असतें.

ऋतुप्राप्तीबरोबर काम आपला प्रभाव स्त्रीदेहांत दाखवूं लागतो. स्त्रीच्या आयुष्यक्रमांत हा संक्रमणावस्थेचा काल महत्त्वाचा असतो. बालवयांत नसणाऱ्या

अननुभूत कल्पना तिच्या डोक्यांत खेळूं लागतात व या बाबतींत पाश्चात्य निरीक्षकांनीं जमविलेल्या माहितीवरून पुरुषाकडे त्या कामुक भावनेनें बघूं लागतात, व इष्ट निर्बंधांचें कुंपण नसल्यास प्रसंगीं त्यांचा नैतिक अधःपात होत असतो.

या अधःपाताचें वयोमान व हिंदू पत्नीला मातृत्वाचा मान मिळवून देणारें वयोमान जवळ जवळ एकच येतें. **फरक एवढाच कीं विवाहाच्या नैतिक बंधनांनीं एक आपलें मातृपद सजविते तर दुसरी समाजनिंद्य व्यभिचारानें चोरटी माता होते.** अनाथालयांत बापाचा पत्ता नसलेल्या मुलांची पाश्चात्य समाजांतील वाढती संख्या याचें द्योतक आहे. बालवयी मातेच्या व तिच्या संततीच्या शरीर व मनाच्या ऱ्हासाच्या बाईनें रंगविलेल्या चित्राकडे पाहिल्यास तें वस्तुस्थितीचा विपर्यासच करणारें दिसतें ! बाईचें तत्व मान्य केलें तर आमच्या सामाजिक आयुष्यक्रमांत कर्तृत्व दाखविणारे नरपुंगव आढळलेच नसते. परंतु ते आढळतात आणि ज्या अर्थी ते आढळतात त्या अर्थी, शरीर मनाच्या दौर्बल्याचें बालमातांच्या पदरांत बाई टाकीत असलेलें पाप भ्रामक ठरतें.

वर्तमानकाल सोडून शंभर दीडशें वर्षांच्या मागच्या काळाकडे पाहिल्यास बाईचें म्हणणें खोटें आहे असेंच दिसतें. रघोजी भोसले, यशवंतराव होळकर, यांच्यासारखे रणधुरंधर सेनानी आपल्या सेनेसह एक एक दिवसांत ऐशीं मैलांचा पल्ला गांठीत असल्याचें इंग्रज इतिहासकार सांगत आहेत. एवढेंच नव्हे तर मद्रास येथील ईस्ट इंडियाच्या सरकारास व त्याचप्रमाणें पांडेचरीच्या फ्रेंच कंपनी सरकारास यांची भरारी येते अशी बातमी लागतांच आपलें चंबू गवाळें जहाजांत टाकून रहावें लागत असल्याचें तेच इतिहासकार नमूद करीत आहेत.

वरील सरदारांच्या लढाईच्या धुमश्चक्रींत इंग्रज सेनापतींनीं पळ काढून त्यांच्या व आपल्यामध्यें ८० मैलांचें अंतर ठेवण्याची योग्य दक्षता दाखविली असल्याचें इतिहासांत आढळतें. वरील सेनानी व त्यांचें सैन्यही आमच्या बालवयी विवाहाचीच प्रजा होती. बाईचें म्हणणें सिद्धांत म्हणून मान्य केलें तर रोजीं ८० मैलांची दौड करणाऱ्या या हिंदूंची शारीरिक अवनती झाली होती हें सिद्ध होत आहे काय ?

त्याचप्रमाणें, प्रौढवयाच्या आईबापांच्या पोटीं जन्मास आलेल्या मद्रास पांडेचरीच्या बाईच्या सशक्त व सुदृढ जातभाईंस यांची दहशत व भीति वाटून समुद्रांत दूरवर जाऊन लपून बसण्याची जरूर कां वाटावी ? नुकत्याच यूरोपांत

झालेल्या लढाईंत जर्मनांची आघाडी थोपवून धरणारें हिंदू सैन्य बालमातांचीच संतती आहेना ? हें सैन्य पाश्चात्य रणांगणावर उतरविलें नसतें तर लढाईचा सर्वच डाव जर्मनीच्या कल्पनेप्रमाणें झाला असता. या युद्धाच्या वेळीं इंग्लंडांत नवीन सैन्यभरती करतांना लढाईला योग्य अशांचें प्रमाण शेंकडा तेहतीस पडलें व अमेरिकेंत शेंकडा साठ जें पडतें तें कां ? या दोन्ही देशांत प्रौढविवाह रूढ असतां वरील प्रमाण कां पडतें, याचा बाईनें विचार करण्यासारखाच आहे.

वर्तमानकाळांत हिंदू प्रजेच्या शारीरिक संपत्तीचा ऱ्हास झालेला दिसतो; पण त्याचें कारण बालविवाह हें नसून जीवनकलहाची तीव्रता व शरीरपोषणास अत्यावश्य असणाऱ्या वस्तूंचें दुर्भिक्ष्य हें आहे. ब्रिटीश कालापासून हिंदुस्थानांत जास्ती जमीन लागवडीस आली आहे. त्यामुळें पिकांची संख्याही वाढलेली आहे, परंतु शरीरपोषण व त्यासाठीं लागणारें अन्न या दृष्टीनें या पिकांकडे पाहिल्यास इष्ट परिस्थितीऐवजीं अनिष्टच परिस्थिती दिसते. वाढत्या पिकांत अन्नांत समावेश न होणाऱ्या पिकांची......फाजील वाढ झालेली आहे. पूर्वीच्या कालापेक्षां ब्रिटिश कालांत कापसाचें पीक वाढलेलें दिसतें. कापूस खाऊन कांहीं पोट भरत नाहीं. त्याचप्रमाणें गळिताचीं धान्यें व या धान्यांपासून निघणारें तेल कर्तुमकर्तुम ब्रिटीशांना मनुष्याचें प्रधान अन्न बनवितां येत नाहीं. पूर्वीच्या काळीं असणाऱ्या धान्याची निर्गत अल्प होती. परंतु ब्रिटिशांचा प्रजाहितदक्षतेचा काल सुरू झाल्यापासून हा निर्गतीचा आंकडा सारखा वाढत चालला आहे. महायुद्धाच्या सुरवातीच्या तीन वर्षांत हा आंकडा गव्हाच्या बाबतींत इतका फुगला कीं, हिंदुस्थानांतील पांच वर्षांची या पिकाची निर्गत तीन वर्षांतच करण्यांत आली. म्हणजे शिलकी असलेलें धान्यही नाहींसें झालें.

वऱ्हाडसारख्या उत्तम शेतीच्या प्रांतांत जोंधळ्याचें पीक पेवांत सांठवून ठेवण्यांत येत असे. कारण दुष्काळादि आपत्तीच्या कालीं त्याचा उपयोग व्हावा. परंतु वऱ्हाडी शेतकऱ्यांच्या या पिढींतील मुलांस पेंव हा शब्द जवळ जवळ माहीत नसल्यासारखी स्थिती आज उत्पन्न झालेली आहे. जोंधळ्याचें अन्नाचें पीक जाऊन आज तेथें कापसाचें पीक प्रामुख्यानें लोकप्रिय होऊन बसलें आहे. ज्या वऱ्हाडांतून जोंधळा पेवांत ठेवण्यास जागा नसल्यामुळें बाहेरदेशीं जात असे, त्याच वऱ्हाडांत आज तेथील ढोरांसाठीं जोंधळ्याचा कडबा व मनुष्यासाठीं जोंधळा बाहेरून आणावा लागत आहे.

हिंदुस्थानांतील माणशीं उत्पन्नाचें प्रमाण दादाभाई नौरोजी, लॉर्ड कर्झन यांच्या सारख्या निरनिराळ्या पेशांतील माणसांनीं दिलेलें आहे. त्यावरून हिंदुस्थानांतील हिंदूच्या उपासमारीची चांगलीच कल्पना करतां येते. जेथें अशी परिस्थिती आहे, दारिद्र्याचा नंगा नाच जेथें आपलें तांडव करीत आहे, तेहतीस कोटी प्रजेपैकीं पोटाला अन्न नसल्यामुळें अर्धी अधिक प्रजा एकवेळच्या अन्नाला महाग झालेली आहे, असें असल्यामुळें या दारिद्र्याचा परिणाम शारीरिक -हासावर झालेला आहे. शारीरिक दुर्बलतेचें येथें हें खरें कारण असतां बाई म्हणते कीं, याला कारण बालमातृत्त्वच आहे. यावरून या बाबतींत बाईनें केलेलें विधान असत्य व दिशाभूल करणारें असून बालविवाहाविरुद्ध आमच्याकडे उत्पन्न झालेल्या नवमतवादी लोकांस उचलून धरणारें आहे. हा नवमतवादीवर्ग आधुनिक सुशिक्षितांचा आहे. समाजसुधारणेच्या बाजूनें तो प्रामुख्यानें असतो आणि या समाजसुधारणेंत बालविवाह, बालमातृत्व यांचा समावेश होतो. बाईचें पुस्तक बाहेर येण्यापूर्वी या बाबतींत बऱ्याच चळवळी झालेल्या आहेत. वरील बाबी अनिष्ट, आमच्या उन्नतीस अडथळा करणाऱ्या असें वरील लोकांचें प्रामाणिक मत आहे. मिस मेयोच्या 'मदर इंडियास' उत्तर म्हणून मि. रंगा अय्यर यांनीं 'फादर इंडिया' पुस्तक लिहिलें आहे. रंगा अय्यर हे वर्तमानपत्राचे संपादक म्हणून प्रसिद्ध आहेत. वर्तमान असेंब्लीचे ते सभासदही आहेत. या पुस्तकांत बालमातृत्व व समाजहित यांच्यासंबंधाची कार्यकारणात्मक चर्चा हिंदू दृष्टीनें त्यांच्याकडून व्हावी तशी झालेली दिसत नाहीं. पर्यायानें बालमातृत्व अनिष्ट या बाईच्या विधानास त्यांनीं आपल्या पुस्तकाच्या तिसऱ्या प्रकरणांत मान्यता दिलेली आहे. आमच्या मतें याचें कारण एवढेंच कीं लेखक मजकुरांस हिंदू, त्यांचा धर्म व हिंदुत्व याचें रहस्य उकलेलें नाहीं. आणि म्हणून "Early marriage is not a part of Indian culture P. P. 21" "बालविवाह हा हिंदु संस्कृतीचा भाग नव्हे" असें हिंदुत्वविरोधी विधान त्यांच्या पुस्तकांत आलेलें दिसतें. प्रश्न एवढाच कीं, बालविवाहाचें हिंदु संस्कृतीला चिकटलेलें बांडगूळ कोणत्या संस्कृतीचें ! याचें उत्तर लेखक मजकुरांच्या ग्रंथांत आलेलें दिसत नाहीं. एवढेंच नव्हे तर त्यांचेंच म्हणणें खोडून काढणारीं विधानें मात्र याच भागांत सांपडतात.

हिंदुसंस्कृतीच्या समाजरचनेंतील महत्वाचा समाज ब्राह्मणांचा आहे. याच समाजांत आणि त्यांतल्यात्यांत मद्रास प्रांतांतील ब्राह्मणांत बालविवाहाची चाल

निष्ठुरपणें पाळण्यांत येते असा ते कबुलीजबाब देतात. संस्कृतीचा भर ज्या वर्गावर त्या वर्गांत असलेली ही चाल पाहातांच ती बांडगुळासारखी आमच्याकडे आलेली आहे, हें म्हणणेंच फोल ठरतें. शिवाय ती जर दुसरीकडून आलेली असती तर हिंदुस्थानासारखें तिचें अस्तित्व वर्तमान जगांत दुसरीकडे आढळलें असतें.

हिंदू, बौद्ध, इस्लामी, व ख्रिश्चन हे चार धर्म वर्तमान जगांत प्रामुख्यानें आढळतात. हिंदूंशिवाय इतरांची व्याप्ति जगाच्या अनेक भागांवर आहे. हिंदू मात्र हिंदुस्तानांतच आहे. हिंदूंशिवाय इतर धर्मांत बालविवाह नाहीं. हिंदू धर्मांची उत्पत्ती हिंदुस्थानांतच झालेली आहे. बौद्ध धर्माची उत्पत्ती हिंदुस्थानांतच झाली असून नंतर तो बाहेर पसरलेला आहे.

हिंदुस्थानच्या इतिहासांत त्याचा परकी असणाऱ्या इस्लाम, ख्रिश्चन इ० धर्मांशीं संबंध आलेला आहे. या धर्मांत बालविवाह मान्य नसतां तो त्यांच्या संबंधामुळें हिंदुस्थाननें त्यांच्या जवळून घेतला असलें हें म्हणणें संभवत नाहीं.

वर्तमान हिंदुधर्म म्हणजे आमचा जुना सनातनधर्म होय. याच सनातन धर्मांशीं कांहीं बाबतींत मतभेद दर्शविणारा बुद्धधर्म आहे. त्याचें स्वरूप ऐहिक जीवनक्रमाशीं संबंध असणाऱ्या लग्नविषयक बाबतींत मतभेदाचें नव्हतें, यामुळें बौद्ध धर्माला बालविवाह मान्य का अमान्य हा प्रश्नच उद्भवत नाहीं ! या ऐतिहासिक दृष्टीवरून, बालविवाह हिंदू संस्कृतीचा भाग नव्हे हें मि. अय्यरचें विधान सपशेल खोटें ठरतें व तो हिंदु संस्कृतीचा भाग आहे या वस्तुस्थितीस जास्त बळकटी येते.

इतर धर्मास व संस्कृतीस मान्य नसणारा बालविवाह हिंदू धर्माला व संस्कृतीला मान्य कां असावा ? व स्त्रीपुरुषसंबंधकारक लग्नाचा व त्याच्या घटनेच्या इतिहासाचा विचार करतां प्रौढवयी विवाहांतून हिंदुधर्मानें बालवयी विवाहाकडे आपला मार्ग कां आक्रमावा ? दोन्ही प्रकारच्या विवाहानें उत्पन्न होणारी परिस्थिती व तिचें इष्टानिष्टत्व यांचा विचार केल्यास वरील प्रश्नांचें उत्तर मिळणारें आहे. भेद प्रधान स्त्रीपुरुष देहाची उत्पत्ती निसर्गानें वंशवृद्धीच्या कार्यासाठीं केलेली आहे, ही गोष्ट कोणालाही नाकारतां येणार नाहीं. शरीर, मन व बुद्धिविषयक या दोघांचे मनुष्य जातीच्या आजपर्यंतच्या इतिहासांतील व्यवहार पाहिल्यास वरील गोष्टींची सत्यता पटणारी आहे. या व्यवहाराची लालसा, जाणीव तारुण्यांत होत असते. यामुळें तारुण्यांत विवाह करणें श्रेयस्कर असें सर्व साधारण मनुष्यबुद्धीस वाटणें युक्त आहे. हिंद्वेतर समाजांत प्रौढ विवाह आहेत. या

समाजांत वर्तमान काळांतील सुधारलेले व दऱ्याखोऱ्यांत राहणारे जंगली व रानटी असे दोन्ही प्रकारचे समाज मोडतात. प्रौढ विवाह व कर्तृत्व आणि संस्कृती यांचा बाई ध्वनीत करीत असलेला अन्योन्य संबंध लक्षांत घेतां जंगलांत राहणाऱ्या जंगली लोकांचा आज जगाच्या पाठीवर उदय झालेला कां दिसूं नये ? व त्याच प्रमाणें आमचा आचारधर्म चांगला असें सांगण्यास पाश्चात्य समाजाप्रमाणें त्यांनीं आपला मोर्चा हिंदुस्थानाकडे कां वळवूं नये ? असो.

हिंदुस्थानांत एके काळीं प्रौढ विवाह रूढ होता, व तो चारी वर्णांच्या प्रजेला सर्वसाधारणपणें मान्यही होता. आमच्या धर्मांत सांगितलेल्या अष्टविध विवाहाच्या प्रकारांपैकीं कांहींवरून ही गोष्ट सिद्ध होणारी आहे. मनुष्यस्वभावाचा—आणि त्यांतल्यात्यांत त्यांच्यांतील समाजनेत्या ज्ञात्या बुद्धीचा विचार करितां—प्रौढविवाहाची चांगली बाब सोडून अप्रबुद्ध वयांतील बालवयी विवाहाकडे या नेत्यांच्या ज्ञात्या बुद्धीनें कां वळावें ? नुसतें वळावें इतकेंच नव्हे तर प्रौढविवाहावर अमान्यतेचा, अधर्मांचा शिक्का मारून त्याला कायमची मूठमाती देण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून कां व्हावा ?

बाईचें पुस्तक वर्तमान वस्तुस्थितीचें वर्णन करणारें असल्यामुळें या मुद्याचा ऊहापोह तिच्या पुस्तकांत न होणें संभवतें. परंतु हिंदुस्थानची उन्नति करण्याच्या सद्धेतूनें प्रेरित झालेल्या समाजसुधारक समाजसेवकाकडून—यांतच कौन्सिलांतील मेंबरांचा समावेश होतो—त्याचा ऊहापोह न होणें तितकेंच कार्यप्राप्तव्याच्या दृष्टीनें अनिष्ट व अप्रयोजक ठरतें. ना. आचार्य यांच्या भाषणांतील ( Marbles and Tops ) हे शब्द घेऊन या बाबतींतील कौन्सिलमधील लोकनियुक्त सभासदांच्या भाषणास ' **पोर खेळ** ' ठरविणारें शीर्षक बाईनें आपल्या ग्रंथांत मागें दिलेलें आहे, तें योग्य असल्याचें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. हीं भाषणें संमतिवयाच्या कायद्याच्या बाबतींत झालेलीं आहेत. बालविवाहामुळें ऋतुप्राप्तीबरोबर स्त्री-पुरुषांचा संबंध येऊं लागतो व तो अनिष्ट म्हणून या बाबतींत कायद्याची आवश्यकता असल्याचें एका पक्षाचें म्हणणें, तर अशा तऱ्हेचा कायदा झाल्यास तो आमच्या धार्मिक आचारांत ढवळाढवळ करणारा होईल म्हणून दुसऱ्या पक्षाचा त्याला विरोध ! असें या भाषणांचें साधारण स्वरूप आहे. या भाषणांत कामभावना व तज्जन्य स्त्री-पुरुषांच्या देहधर्मांचें विज्ञानात्मक विवेचन कोठेंच आढळत नाहीं. त्याचप्रमाणें एक पक्ष वर्तमान सुधारलेल्या समाजाच्या

आचारधर्मांकडे, व दुसरा धर्मप्रणीत वचनांकडे नुसता बोट दाखवीत असलेला दिसतो. एकाचे ते आचारधर्म व दुसऱ्याचीं तीं धर्मवचनें इष्ट किंवा अनिष्ट याचा विचार केला गेला असता, तर हिंदूंच्या बालवयी विवाहाचें कोडें उकललें असतें. वर्तमान सुधारलेल्या समाजांत बालवयी विवाह होत नाहींत ही गोष्ट खरी आहे. परंतु तेवढयावरून या समाजाचा जगांतील बोलबाला व बालविवाह यांचा बादरायणी संबंध कसा जुळतो हें समजत नाहीं. विवाहाचें निसर्गदत्त कार्य वंशवृद्धि हें आहे. तें तसें असल्यामुळें विवाहाचा विचार करतांना हें कार्य दृष्टीपुढें ठेवूनच मनुष्यानें त्याचा विचार केला पाहिजे. बालवयांत कामभावनेचें उद्दीपन नसतें तर तें तारुण्यांत होत असल्यामुळें ज्याला प्रौढ विवाह म्हणण्यांत येतो, तो म्हणजे कामव्यापी तारुण्यांतील प्रौढविवाह होय. तारुण्याचें कार्य स्त्रीपुरुषांत कामभावना जागृत करून कामशांतीसाठीं त्यांना परस्परांकडे आकर्षण करण्याचें व त्याचें फळ वंशवृद्धीनें घेण्याचें असतें. वंशवृद्धीबाबत निसर्गाचें काम जसें ठरलेलें आहे, तसेंच या वंशवृद्धीशीं संलग्न असणाऱ्या गुणधर्मांच्या आनुवंशिकत्वाचेंही तें ठरलेलें आहे. समाज व त्याचा जीवनक्रम यांचा संबंध या आनुवंशिकत्वाच्या दृष्टीनें समाजहिताशीं निगडित झालेला आहे. व्यक्तींचा समाज होतो. तरी या मर्त्य व्यक्तींच्या समाजास खरा जीवंतपणा लाभवून देणें या आनुवंशिकत्वाच्या धर्मांच्या हातीं असतें. निसर्ग धर्मांचीं कोडीं उकलणारें विज्ञानाचें ज्ञान व मानवसमाजांतील असंख्य समाजांचा आजपर्यंतचा इतिहास, आणि त्यावरून प्रगट होणारें समाजाच्या जीवनक्रमाचें शास्त्र, या धर्मांचें महत्त्व पटवून देत असल्यामुळें समाजाच्या खऱ्या हितासाठीं आमच्या विवाहशास्त्राशीं संबंध असलेल्या बालविवाह, बालमातृत्व वगैरे बाबींचा विचार करतांना हा धर्म व भिन्नदेही स्त्रीपुरुषांचे व्यवहार आणि त्यांचें शास्त्रीय ज्ञान याची दृष्टि सदैव जागृत ठेविली पाहिजे. या दृष्टीनें कौन्सिलांतील वादाचा व बाईच्या लिखाणाचा विषय असलेल्या प्रश्नाचा विचार केल्यास आमच्या धर्मशास्त्रकारांनीं त्यांचा योग्य विचार केला आहे असेंच म्हणणें प्राप्त होतें.

ऋतुप्राप्तीनंतर स्त्रीदेहांत कामभावना संचारू लागते. तिची पुढची पायरी म्हणजे स्त्रीपुरुषांचा शरीरसंबंध होय. या संबंधास नैतिक मान्यता दर्शविण्यासाठींच मनुष्यानें विवाहाची योजना केलेली आहे. बाल्य व तारुण्याचें वय या भेदाच्या दृष्टीनें स्त्रीपुरुषसंबंध व विवाह यांचा विचार केल्यास तारुण्यांतील प्रौढवयी विवाह रूढ असलेल्या समाजांत स्त्रीचा नैतिक अधःपात होत नाहीं, असें

म्हणतां येईल काय ? रिव्होल्ट ऑफ यूथ–" तारुण्यांतील उच्छृंखलपणा," Unmarried mother अविवाहितमाता, White slave traffic गौरकायी वेश्याव्यवसाय, Marriage Revolt लग्नाचें बंड, The Female offender, The, Question of English Divorce आणि Why American Marriages fail, किंवा अशाच तऱ्हेच्या या विषयाशीं संबंध असणाऱ्या अनेक ग्रंथांकडे पाहिल्यास, ऋतुप्राप्ति व कामभोगलालसा यांचा निसर्गानें स्त्रीदेहविकासाशीं निकट संबंध ठेविला असल्याचें स्पष्ट दिसतें. **निसर्गाचा हा धर्म दृष्टीआड नेल्यामुळें होत असलेल्या नैतिक अधःपाताचें भयानक चित्र याच ग्रंथांत पहावयास मिळतें.** नीतिशुद्धता एवढयाच दृष्टीनें तें अनिष्ट असें कोणीही नीतिशास्त्रज्ञ म्हणेल, परंतु एवढयानें शंकिताचें समाधान होणारें नाहीं. नीतीची कल्पना मनुष्यनिर्मीतच आहे का ? या त्याच्या प्रश्नास उत्तर देऊन आणि कामविषयक नीति अनीतीचा संबंध खऱ्या समाजहिताशीं जोडला गेलेला आहे हें सप्रमाण त्याला पटवून दिल्याशिवाय त्याचें समाधान होणारें नाहीं आणि बालविवाहाची योग्यताही सिद्ध होणारी नाहीं.

या नीतीचा संबंध व्यभिचाराशीं घातलेला आहे; आणि **व्यभिचार म्हणजे पतीशिवाय स्त्रीचा इतर पुरुषाशीं होणारा शरीरमनाचा संभोगी संबंध होय.** अर्वाचीन लेखक आपल्या लेखांत Damaged goods हा शब्दप्रयोग वापरतात. नीतीच्या दृष्टीनें या शब्दप्रयोगाकडे पाहिल्यास विवाहबंधनापूर्वी देहदान करणारी स्त्री त्यांतच मोडते असें म्हणावयास हरकत नाहीं.

घटस्फोट व बहुपतित्व वगैरे स्त्रीच्या कामप्रधान आयुष्यक्रमाशीं संबंध असणाऱ्या चालीरीती आमच्या मतें यांतच मोडतात. या सर्व दृष्टीनें विचार करतां देहपावित्र्याची अट स्त्रियांच्या बाबतींत इतक्या निष्ठुरपणानें, नीतिबंधनाचे कडे उभारून घालण्यांत कां आली असावी हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. जगांतील कोणत्याही धर्मांकडे व समाजाकडे पाहिलें तर, या स्त्रीदेहपावित्र्याचें महत्व कमी अधिक प्रमाणानें त्यांनीं मान्य केलें असल्याचेंच दिसतें. त्याच्या या सर्वमान्यतेमुळें मानवी बुद्धीला तें इष्ट व श्रेयस्कर वाटत असल्यामुळें, त्याला महत्व आलें असावें, असा बुद्धिवाद करून त्याचें कोडें उकलण्याचा प्रयत्न आजपर्यंत बराच झालेला आहे. मत्सर, श्रेष्ठपणा वगैरे मनोभावनांमुळें त्याला मानवी समाजांत महत्त्वाचें स्थान मिळालेलें आहे, असेंही कित्येकांचें म्हणणें आहे. परंतु या मुद्द्यानें

तो प्रश्न सुटून त्याचें समर्पक उत्तर मिळतें असें नाहीं. कारण या पावित्र्याशीं निगडित असलेल्या ज्या बाबी आहेत त्या बाबींचा संबंध वंशवृद्धीच्या निसर्ग-कार्याशीं आनुवंशिकत्वाच्या तत्वानें येत असल्यामुळें आणि या निसर्ग कार्यांचा शिष्टसंमत मार्ग मोकळा करून देण्याचें मनुष्यनिर्मित साधन विवाहसंस्था हें अस-ल्यामुळें, कार्यावरून कारण शोधण्याच्या मार्गाचा अवलंब केल्याशिवाय त्याचें समर्पक उत्तर आमच्या मतें मिळणारें नाहीं. A wife becomes ino-culated so to say with husband's qualities ( पतीचे गुणधर्म पत्नींत उतरतात.) असें निसबेट म्हणतो. आनुवंशिकत्वाशीं संबंध अस-णाऱ्या स्त्रीदेहाच्या प्रजननकार्यदृष्टीचें हें त्यांचें म्हणणें आहे व विज्ञानांचा त्याला पाठिंबा आहे. स्त्रीच्या या विशेष देहधर्मांचें महत्त्व लक्षांत घेतां, तिचें देहपावित्र्य व तेवढ्यासाठीं असणारें नीतिबंधन यांचें कार्यकारणात्मक गूढ महत्त्व स्पष्ट होत आहे. तारुण्यांतील कौमार्यावस्था जर देहपावित्र्य टिकविण्यास सर्वस्वी असमर्थ आहे, तर स्त्रीसाठीं बालवयी विवाहाची योजना झाली असल्यास, त्यांत अनिष्ट व गौण काय? विवाह हा संस्कार असून धर्मशास्त्राच्या दृष्टीनें संस्काराचा आचार सांगण्याचें कार्य गृह्यसूत्रांनीं केलें आहे. कांहीं स्मृतींतही त्याचें दिग्दर्शन आहे. भावी वधूच्या बाबतींत कन्या, कुमारी, नग्निका वगैरे अर्थ-सूचक शब्द सूत्रग्रंथांत वापरलेले आहेत. '**अनन्य पूर्वायाम्**' हा शब्द स्मृतींत योजिला आहे. हे शब्द बालवयी विवाहाचाच पुरस्कार करणारे आहेत. शरीर-पावित्र्याच्या दृष्टीनें जशी त्यांची योग्यता आहे तशीच ती मनपावित्र्याच्या दृष्टी-नेंही आहे. **संकरयुक्त प्रजावृद्धि होऊं न देणें हें आमच्या विवाहाचें महत्वाचें अंग आहे.** स्त्रीचा विशेष देहधर्म लक्षांत घेतां संकरहीन प्रजावृद्धी-साठीं गृहस्थाश्रमाची प्राप्ति करून देणाऱ्या विवाहसंस्कारांत पत्नीच्या बालविवाहा-कडे, आधुनिक पाश्चात्यांतील स्त्रीवर्गाकडे पाहतां, आमच्या धर्मशास्त्रकारांची दृष्टि वळल्यास ती अयोग्य असें म्हणतां येत नाहीं.

संकरयुक्त व संकरहीन प्रजेचें समाजाच्या आयुष्यक्रमांत महत्त्व काय? प्राचीन इतिहासाकडे पाहतां त्यांत कांहीं समाज, त्यांचीं राष्ट्रें व त्यांच्या संस्कृति यांचा अल्पकाल बोलबाला होऊनही अखेर अधःपात किंबहुना सर्वस्वी नाश झालेला दिसतो. ज्या लोकांनीं कर्तृत्व दाखवावें त्यांचेच वंशज त्या कर्तृत्वाच्या बाबतींत नामर्द ठरावे असें कां? कांहीं समाजाच्या बाबतींत तर असें दृष्टोत्प-त्तीस येतें कीं हे समाज सुधारलेले असतां, त्यांचें वैभव हिरावून घेण्याचें कार्य

त्यांच्यापेक्षां अडाणी व रानटी असलेल्या समाजाकडून झालेलें आहे. विशेष आचारविचारांनीं नटणारा आयुष्यक्रम म्हणजे सुधारणा, व त्या सुधारणेचा मनमुराद आस्वाद घेणारा समाज रानटी व अडाणी समाजाच्या चढाईच्या धोरणापुढें कर्तृत्वाच्या दृष्टीनें नेभळट व नामर्द कां ठरावा ? प्राचीन रोमन समाज हा असा एक समाज असून याचें राष्ट्र म्हणजे तत्कालिन रोमन साम्राज्य व आचार-विचारानें नटणारा आयुष्यक्रम म्हणजे तत्कालिन रोमनसंस्कृतींतील आयुष्यक्रम असून या समाजापेक्षां राष्ट्र व संस्कृतीच्या बाबतींत अगदींच खालच्या पायरीवर असलेल्या गॉल्स् लोकांकडून त्यांचें साम्राज्य, त्यांचें वैभव व त्या वैभवास नटविणारी संस्कृति यांचा धुव्वा उडवून दिल्याचें इतिहास सांगतो. असे अनेक ऐतिहासिक दाखले देऊन सुधारलेले समाज रानटी व अडाणी समाजाच्या चढाई पुढें हतबल ठरल्याचें दाखवितां येईल. या सर्व ऐतिहासिक दाखल्यांवरून निघणारा सिद्धांत आपल्या विषयाच्या दृष्टीनें जितका उद्बोधक तितकाच खरा मार्गदर्शक आहे. या सर्व समाजांत बालविवाह नव्हता. बालमातृत्वानें जन्मास येणारी दुर्बळ प्रजा, त्यांची समाजघटक नव्हती. इतकें जरी होतें तरी अखेर त्यांना अधःपाताचा प्रसंग, आणि तोही अडाणी व रानटी समाजाकडून पाहावा लागला तो लागलाच. आमच्या नवमतवादी लोकांस किंवा मिस् मेयोसारख्या लेखिकेस आवडणारा व प्रशस्त वाटणारा समाजहितकारी आधुनिक पाश्चात्यांतील प्रौढविवाह या सर्व प्राचीन समाजांत होता, ही गोष्ट बालविवाहावर लिहिणाऱ्या व बोलणाऱ्या लोकांनीं लक्षांत घेण्यासारखी आहे. आपत्तीच्या वेळीं त्यांना प्रौढविवाह रक्षण करूं शकला नाहीं, हेंही तितकेंच महत्त्वाचें आहे. याच दृष्टीनें हिंदूंच्या हिंदुस्थानाकडे व त्यांच्या इतिहासाकडे पाहिल्यास काय दिसतें ? उपनिषद् कालापर्यंत बालविवाह, त्याच्या आढळणाऱ्या उल्लेखावरून मागें जात असल्यामुळें, या पाश्चात्य लेखकांच्या अडीच तीन हजार वर्षांच्या कालांत बालमातृत्वाची निर्बल, निर्वीर्य, निस्तेज प्रजा हिंदुस्थानांत दर पिढीगणिक होत असतां परकीयांच्या चढाईच्या धोरणापुढें आमचा हिंदु षंढ व कर्तृत्वहीन ठरल्याचें कोणताही इतिहासशास्त्रज्ञ दाखवूं शकेल काय ? शाळेंतील क्रमिक पुस्तकांबाहेर वाचन नसणाऱ्या आमच्या सुशिक्षित (!) वर्गांस माहित असणाऱ्या मॅसिडोनियाच्या अलेक्झांडरच्या स्वारीपासून आपण ऐतिहासिक सिंहावलोकन घेऊं. पोरसशीं झालेल्या लढाईनंतर जगज्जेतृत्वासाठीं बाहेर पडलेल्या या रणधुरंधर सेनानीच्या विजयी सैन्यानें त्याला हिंदुस्थान जिंकण्याचें त्याचें वांछित पुरें होऊं न देतां मागें फिरावयास कां लाविलें ? हा

बालमातृत्वाचा बलहीन संततींतून सैनिक बनणाऱ्या सैन्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. पोरसाशीं झालेल्या लढाईंत हिंदुशौर्यामुळें घायकुतीस आलेलें त्याचें सुदृढ सैन्यबल त्यावेळीं प्रबळ असलेल्या नंदसत्तेच्या सैन्यापुढें उभें राहण्यास तयार नव्हतें. म्हणून शिकंदरास नामोहरम होऊन आपला पाय मागें घ्यावा लागला. या नंतरच्या इतिहासाकडे योग्य दृष्टीनें पाहिल्यास तेथेंही बालमातृत्वामुळें उत्पन्न झालेल्या हिंदू प्रजेंतील सैनिक शौर्यधैर्याच्या बाबतींत हिणकस असल्याचें दिसत नाहीं. अशा स्थितींत बालवयीमातृत्व व शारीरिक दौर्बल्य यांची बादरायणीसंबंधाची सांगड वस्तुस्थितीनें जशी घालतां येत नाहीं तशी शास्त्राच्या दृष्टीनें ती बसवितांही येत नाहीं. त्याचप्रमाणें नैतिक अधःपाताचा नसता आरोपही त्या बालविवाहाच्या माथीं लादतां येत नाहीं; आणि त्याचा पुरस्कार करणाऱ्या हिंदुधर्माला दोष देतां येत नाहीं.

आतां अन्य विधानांचा विचार करूं. पहिल्या भागांत बाई लिहिते कीं, बंगाली तरुण दिवसाढवळ्या बोल्शेव्हिक व राज्यक्रांतिकारक वाङ्मय वाचतांना दिसतात. हें बाईचें विधान ज्यांना पोलिसची दक्षता माहीत आहे त्यांना तरी किती असत्य आहे हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. जें पोलिसखातें देशभक्तावर नजर ठेवितें, इंग्रजी राज्यकारभाराची वर्तमानपत्रांत चर्चा केली जात असतां, व्याख्यानांत वक्ता काय बोलतो हें लघुलिपीनें ताबडतोब उतरून घेऊन रिपोर्ट करितें तें पोलिसखातें शांतता व शिस्त ठेवण्याकरितांच अवतरलेलें आहे. त्यांना त्या गोष्टी कळत नाहींत कीं काय? दिवसाढवळ्याच काय पण रात्रींअपरात्रींही असें वाङ्मय वाचणारे जर कोणी असतील तेदेखील पोलिसच्या काळ्या यादींत नमूद केलेलेच असतात. पोलिसखात्याला जर असे लोक दिसले, नुसता सुगावा लागला तर तें स्वस्थ कसें बसेल? ज्या अर्थी पोलिसची अशी तक्रार नाहीं, त्या अर्थी या बाईनें हें दृश्य स्वप्नांत पाहिलें कीं, कोणत्या तरी संजयानें हिच्या कानांत सांगितलें? सरकारवाड्यांतून बाहेर पडतांच वरील प्रकार तिला दिसला. यावरून त्या प्रकारचा चमत्कार कळून येतो. बोलशेव्हिक वाङ्मयदर्शनावरून बाईला कालीच्या मंदिरांतील रक्तदर्शनच तेवढें झालें. याचा संबंध बाईचा विवक्षित हेतू दर्शवीत आहे. हीं विधानें करण्यापूर्वीं बाई जेव्हां इंडिया ऑफिसचा उंबरठा चढली तेव्हां तिला रौलेट रिपोर्ट प्रथम दिसला कीं काय? रौलेट रिपोर्टांत बंगाली तरुणांवर जे निरर्थक शिंतोडे उडविले आहेत त्यांचाच अनुवाद निराळ्या शब्दांत बाईनें प्रारंभीं केला आहे. काली मातेच्या देवळांत **ज्या स्त्रियांना संतति होत नाहीं, त्या स्त्रिया**

**संतति व्हावी ह्मणून जिभेनें रक्त चाटतात** असें एक विधान या बाईनें केलें आहे. वस्तुतः शाक्त पंथाच्या लोकांत देवीला नवस करून अजापुत्राचें बलिदान करण्याची पद्धत आहे. परंतु संततीकरितां रक्तप्राशन करण्याची कोठेंही पद्धत नाहीं. ही पद्धत जरा निराळ्या तऱ्हेनें हल्लींच्या सुधारलेल्या अमेरिकेंत 'लिंचिंग' (Lynching) द्वारें मात्र दृष्टीस पडते. नवस करून बकऱ्याचें बलिदान बाईला भयंकर वाटतें. परंतु काळ्या लोकांचा जगांतून नायनाट व्हावा म्हणून अस्तित्वांत आलेला अमेरिकेंतील **नर बलिदानाचा** म्हणजे लिंचिंगचा प्रकार बाईला सौम्य व निर्दोषी वाटतो कीं काय? असला अमानुष प्रकार करण्याकरितां सुसंघटित होऊन अमेरिकेंत Ku-klux-klan ही नरहत्याप्रवृत्तक संस्था इलिजाबेथ टायलर हिच्या नेतृत्वाखालीं चालू आहे. हिचा विचार बाईनें करायला नको होता कीं काय? किंवा संस्थेचे जे आज बाईच्या जातीचे स्त्रीपुरुष सभासद आहेत त्यांना वाईट वाटेल म्हणून बाईनें त्या अमानुष संस्थेकडे दुर्लक्ष केलें! सरकारला अनिष्ट वाटणारें वाङ्मय सरकार हिंदुस्थानांत येऊं न देण्याची दक्षता घेत असतां बाईला दिसलेलें वाङ्मय हिंदुस्थानांत येणें शक्य आहे काय? शिवाय मोघम नांवानें या वाङ्मयाचा उल्लेख करण्याऐवजीं त्या वाङ्मय ग्रंथांची नांवनिशी बाईनें दिली असती, तर बाईच्या म्हणण्यास पुराव्याचा दुजोरा आला असता. परंतु ज्या अर्थीं तसें झालेलें नाहीं, त्या अर्थीं कलकत्त्याच्या बंगाली तरुणांवर निरर्थक शिंतोडा उडविण्याचा बाईचा हेतू दिसतो. बंगालमध्यें राज्यक्रांति नाहीं असे प्रामाणिक व सत्य उद्गार कांहीं इंग्लिश लोकांनीं काढलेले आहेत, ही गोष्ट बाईला कोणत्याही 'हलधरा'नें सांगितलेली नाहीं कीं काय? बंगालच्या तरुणांचें जें वर्णन बाईनें केलेलें आहे, तें लक्षांत घेतां त्या पाप्यांच्या पितरांकडून राज्यक्रांतिकारक वाङ्मय वाचलें जाऊन ते बॉंब पिस्तुलें घेऊन राज्यक्रांतीला उद्युक्त झाले आहेत असा बाईच्या लिहिण्याचा गर्भित हेतू आहे. बाई इंडियन पोलिसखात्याची अधिकारीण होती कीं काय? शिवाय असेंही गृहीत धरिलें कीं, बंगाली तरुण तसलें वाङ्मय वाचीत असले तरी जेथें बंगालची नोकरशाही चौकशीशिवाय अटकबंदी करूं शकते! सुभाषबाबूसारख्या नगराध्यक्षाला क्षयरोग होईपर्यंत तुरुंगांत डांबून ठेविते ती असल्या खप्पड तरुणांना—क्रांतिकारक बंगाली बाबूंना कशी मोकळें सोडील? विषयातिरेकाचा बंगाली तरुणांवर आरोप करून त्या आरोपाच्या जोडीला बोल्शेव्हिक वाङ्मयवाचनाचा खोटा पुरावा जोडून बाईनें बंगाली तरुणांवर निरर्थक कुचाळपणें आरोप केला आहे. हा आरोप करतांना रशिया व

तेथील लोकांचा पूर्वीचा विषयातिरेक याची सांगड घालण्याची ही बाईची हातचलाखी नाहीं ना ? हा प्रकार म्हणजे Give a dog a bad name and hang it अशा प्रकारासारखाच आहे.

भारतमाता पुस्तक बाईनें आपल्या अमेरिकन बंधुभगिनींच्या माहितीकरितां लिहिलें. तें लिहिण्याकरितां बाईनें १९२५ च्या आक्टोबरमध्यें इंडिया ऑफिस गांठलें. हिंदुस्थानची खरी माहिती आपल्या देशबंधुभगिनींना द्यावी हा देशप्रेमाचा पान्हा बाईला फुटला व स्वयंसेवकवृत्तीनें तिनें सदरहू पुस्तक लिहिलें. हिंदुस्थानची माहिती देणारीं पुस्तकें अनेक असतां ती माहिती चुकीची किंवा अपुरी वाटल्यामुळेंच बाईनें हें पुस्तक लिहिण्याचें धाडस केलें असावें असें म्हणावें तर वरील ग्रह करून घेण्यास बाईला हिंदुस्थानाबद्दल कोणत्याही तऱ्हेची माहिती नव्हती हें तिच्याच पुढील वाक्यावरून सिद्ध होत आहे ! ( Therefore in early October 1925 I went to London, called at India Office, and as a complete stranger stated my plan ) म्हणून मी सन १९२५ च्या आक्टोबरमध्यें लंडन एथील इंडिया ऑफिसमध्यें गेलें व हिंदुस्थानच्या बाबतींत अपरिचित व्यक्तीप्रमाणें माझी कल्पना निवेदन केली. बाईला जर हिंदुस्थानच्या वस्तुस्थितीचें चित्र रेखाटून आपल्या देशबंधु भगिनींच्या पुढें ठेवावयाचें होतें तर तिनें इंडिया ऑफिसमध्यें जाण्याचें तरी काय कारण होतें ? इंडिया ऑफिसमधून मिळविलेली माहिती हिंदुस्थानच्या सामाजिक व धार्मिक स्थितीची सत्यता पटविणारी नाहीं हें बाईला समजावयास पाहिजे होतें. इंडिया ऑफिसमधील माहिती ही एक तर्फीच असणार ! बाईचा हा प्रयत्न म्हणजे हिंदुस्थानांतल्या एखाद्या लेखकानें 'फिलिपाइन' देशाच्या सद्यस्थितीवर ग्रंथाची तयारी अमेरिकन सरकारच्या दप्तरांतून गोळा करण्याच्या प्रयत्नासारखी एकतर्फी व एकांगीच आहे.

हिंदुस्थानची आज जी शारीरिक, मानसिक अवनति झालेली आहे तिचें कारण बाई आमच्या चालीरिती व सामाजिक आणि धार्मिकबंधनें होत असें लिहीत आहे. परंतु त्याचें कारण महात्माजी म्हणतात (We rightly charge the English rulers for our helplessness and lack of initiative and originality; Young India, March 25, 1926). आमचें धाडस, चिकाटी वगैरेंना शैथिल्य येण्याला इंग्रजी सत्ताच कारण आहे.

हिंदुस्थानचा पूर्व इतिहास आणि आधुनिक भारत यांचा विचार करतां महात्माजींचें म्हणणें किती सत्य आहे, हें हिंदुस्थानच्या हिंदी जनतेला कळून चुकलें आहे. इंग्रजांचा हिंदुस्थानाशीं संबंध आल्यापासून बाईनें लिहिलेल्या ग्रंथकालापर्यंत अशा किती व कोणत्या उन्नतीच्या गोष्टी इंग्रजांनीं हिंदुस्थानच्या बाबत केलेल्या आहेत हें नमूद न करितां महात्माजींचें अवतरण घेऊन बाईनें मखलाशी केलेली आहे. जित राष्ट्राविषयीं जेत्यांना किती व कशी काळजी असते, यांचीं अनेक उदाहरणें जगाच्या इतिहासांतून देतां येतील. हिंदुस्थानची उन्नति इंग्रजांनीं केली—नव्हे ती व्हावी म्हणून पराकाष्ठेचे प्रयत्न चालू आहेत, असें बाई म्हणते. पण बाईच्या राज्यकर्त्यांनीं फिलिपाइन लोकांची जितकी उन्नति केली—केली नाहींच.—पण असें गृहीत धरलें—तितकी जर हिंदुस्थानची झाली असती तर बाईवर ‘ भारतमाता ’ हें सेन्सेशनल पुस्तक लिहिण्याची पाळीच आली नसती.

शिक्षणाच्या बाबतींतदेखील हीच रड आहे. हल्लींची शिक्षणपद्धति अत्यंत सदोष असल्याचे प्रवाद अनेक वेळां निरनिराळ्या विद्वानांनीं काढलेले आहेत. हल्लींच्या शाळा व महाविद्यालयें, विश्वविद्यालयें म्हणजे कारकून व हेडकारकून तयार करण्याचे कारखाने आहेत, हें स्वामी विवेकानंदांचें म्हणणें सार्थपूर्ण आहे. इंग्रजांनीं आपली शिक्षणपद्धति अशाच खुबीनें ठेविली आहे कीं, **हिंदुस्थानांतला विद्यार्थि नोकरीकरितांच तयार झाला पाहिजे.** त्यानें ज्ञानाकरितां ज्ञान संपादन न करितां नोकरी करून भाकरी मिळविण्याकरितांच पदव्या पटकाविल्या पाहिजेत. ही पद्धत म्हणजे उन्नतीची पराकाष्ठाच काय ? इंग्रज सरकार हिंदुस्थानची उन्नति करण्याची पराकाष्ठा करीत असून ती न होण्याचें कारण भारतवासीयांचाच दोष होय. बाईनें असले प्रलाप कां काढिले, याचें इंगित इंडिया ऑफिसमधील पहिल्याच सलामींत सांपडतें. इंग्रज सरकार हिंदुस्थानची उन्नति करीत आहे हें बाईला कोठें समजलें ? इंडिया ऑफिसमध्येंच ना ? वस्तुस्थिति अशी आहे कीं, इंग्रजांचा जीव हिंदुस्थानाकरितां जो तिळतिळ तुटतो आहे, तो हिंदुस्थान ही सुवर्णभूमि आहे, हिंदुस्थान हें केशराचें शेत आहे म्हणून तुटतो आहे. हिंदुस्थानची उन्नति व्हावी असें जर खरोखरच इंग्रज सरकारला वाटत असतें तर मग बाईचें म्हणणें बरोबर होतें. परंतु गेल्या दीडशें वर्षांचा आंग्लराज्यसत्तेचा इतिहास ही गोष्ट स्पष्ट दाखवीत आहे कीं, जर हिंदुस्थानामुळें कोणाची उन्नति झाली असेल, तर ती इंग्रजांचीच होय—हिंदूंची नव्हे. हिंदुस्थानची इंग्रजांनीं जर उन्नति केलीच असेल तर ती दारिद्र्याची समृद्धिच होय. पूर्वींची सुखी भारत माता

आज दरिद्री, दुर्दैवी व दुःखी झालेली आहे हीच उन्नति आहे कीं काय ? स्वयंसेवक वृत्तीला, कोणत्याही हेतूनें प्रेरित न झालेल्या या अमेरिकन प्रवासी कुमारीच्या कोशांत दुर्दैवालाच जर उन्नति असा पारिभाषिक शब्द असेल तर मात्र भारतमातेची उन्नति झाली आहे हें खरेंच म्हणावें लागेल. बाई पुढें असें विधान करिते कीं, हिंदुस्थानचे लोक आपलें मानसिक अधःपतन बदलण्याचा आरोप इंग्रजांवर करीत आहेत. पण पूर्वी देखील या लोकांची हीच स्थिति होती. बाई वस्तुस्थिति निवेदन करून तिचें वाढप अमेरिकन लोकांच्या ताटांत वाढण्यास आली असा तिनें कबुलीजबाब दिला आहे. परंतु हें विधान आम्ही म्हणतों त्याप्रमाणें तिच्या विवक्षित हेतूला पोषकच आहे. हिंदुस्थानची मानसिक अवनति पूर्वीही होती अस जें बाई म्हणत आहे तें अजीबाद खोटें आहे. बाईनें या बाबतींत प्रो. मॅक्समुल्लर यांचें "हिंदुस्थानापासून आपण काय शिकावें" हें पुस्तक वाचावें व नंतर मग आपलें विधान धडधडीत खोटें आहे कीं खरें आहे याचा पडताळा घ्यावा.

विद्यावागीश प्रो. मॅक्समुल्लर विश्व संस्कृति आणि हिंदुस्थान याविषयीं लिहितांना लिहितात कीं, 'संपत्ति, शक्ति आणि नैसर्गिक सौंदर्याची विपुलता असलेला सृष्टीवरील स्वर्ग असलेला असा जर एखादा देश मला कोणी शोधून काढावयास सांगेल तर मी हिंदुस्थानाकडेच अंगुलीनिर्देश करीन. सर्व जगांत बुद्धीचा विकास कोठें झालेला आहे, असें जर कोणी मला विचाराल तरीदेखील मला हिंदुस्थानचेंच नांव घ्यावें लागेल. सर्व जगांच्या संस्कृतींत हिंदु संस्कृतीचें स्थान अत्यंत वरच्या दर्जाचें आहे यांत शंका नाहीं. युरोपखंडाला हिंदुस्थानापासून बऱ्याच गोष्टी शिकल्याच पाहिजेत.'

बाई असें एक विधान करते कीं, भारतकन्यकेला ऋतु प्राप्त झाल्याबरोबर नऊ महिन्यांतच मातृत्व येतें. त्यावेळीं तिचें वय आठपासून चौदा असतें. हें विधान खोडसाळपणाचें व असत्य आहे. आठ वर्षांच्या हिंदू कन्येला ऋतुप्राप्ति झालेली आहे, असें उदाहरण अपवादात्मक कां होईना द्यावयास पाहिजे होतें. परंतु तें दिलेलें नाहीं. या विधानाचें खंडन करितांना डॉ. मिस बॉल्फर, एम्. बी. या विदुषी असें म्हणतात कीं, मुंबईच्या रुग्णालयांत ज्या हिंदू माता आपल्या पहिल्या बाळंतपणाकरितां आल्या होत्या त्यांचें वयोमान १८·७ असें होतें. त्यांत शेंकडा ८५·६ यांचें वय १७ वर्षांच्या वर होतें. सर्वांत शेवटचें वय म्हणजे १४ होतें,

पण अशा ३०४ हिंदू मातांत ३ च माता होत्या. मद्रास सूतिकागृहाचा सन १९२२ ते २४ चा अहवाल असें दाखवितो कीं, २३१२ हिंदू स्त्रिया बाळंतपणाकरितां आलेल्या होत्या. त्यांचें वय १९·४ असें होतें. शेंकडा ८६·७ यांचें वय १७ च्या वर होतें. यावरून आठव्या वर्षीच माता झालेल्या एकाद्या हिंदी मातेचें उदाहरण त्यांना देतां आलें नाहीं. यावरून वरील विधान असत्य आहे हें सिद्धच होत आहे.

दुसरें विधान असें कीं, हिंदू स्त्रियांना प्रजोत्पादन हीच एक गोष्ट माहीत असते. व प्रत्येक आई आपल्या मुलीला व मुलाला मातृत्व पितृत्व लाभावें अशा प्रकारचें बाळकडू पाजीत असते. हिंदू माता आपला आदर्श मातृत्व समजतात, ही गोष्ट सत्य आहे. उत्तम माता व्हावें ही शिकवण हिंदुधर्माची आहे. पण बाई विधान करिते तसा त्याचा अर्थ नाहीं. आपला मुलगा आदश पिता व्हावा व मुलगी आदर्श माता व्हावी, अशी हिंदुमाता काळजी घेत असते. परंतु बाई म्हणते त्याप्रमाणें त्यांचा उद्देश नसतो. बालवयीं लग्न झालें तरी पण मुलीला ऋतु प्राप्त होईपर्यंत मातृत्व येणें शक्य नाहीं. हिंदुशास्त्राप्रमाणें जेव्हां गर्भधारण विधि होतो, तेव्हांच हिंदुसमाजांत स्त्रीपुरुष संबंध होतो हें बाईला समजावयास हवें होतें ! बाईनें जागजागीं वेदांच्या ऋचा न देतां अनुमान धपक्यानें आपल्याला अनुकूल होतील अशींच विधानें श्रुतिस्मृतींतून काढून घेतलीं आहेत. याचा उद्देश स्पष्ट असा दिसतो कीं, वेदकालीन उज्ज्वल संस्कृतीची मानखंडना करून, ज्यावेळीं सर्व जग रानटी होतें त्यावेळीं हिंदु संस्कृति उच्च स्थितीला पोहोंचून जगाला आदर्शभूत झाली होती याचें बाईला खंडन करावयाचें होतें आणि म्हणूनच तिनें हिंदु रानटी होते, रानटी आहेत व राहातील असें सिद्ध करण्याकरितांच पुस्तक लिहिलें आहे.

मॅक्समुल्लर म्हणतात, विश्वाच्या उषःकालांत जेव्हां सर्व विश्व रानटी स्थितींत होतें, तेव्हां हिंदुस्थानच अभ्युदयाच्या, संस्कृतीच्या, सामाजिक सुस्थितीच्या पूर्णावस्थेच्या उत्तुंग शिखरावर होतें. अशा उन्नतीच्या कालीं, अतिप्राचीनकाळीं आर्यस्त्रिया आपला पति कुलशीलाचा विचार करून आपल्या पालकांच्या संमतीनें निवडीत असत. परंतु युरोपांतील स्त्रीपुरुष आपल्या उच्छृंखल जीवनांत मूल म्हणजे एक विघ्न समजतात. यांतून श्रेष्ठ कोण ? हिंदी माता कीं अमेरिकन माता ? हिंदू मुलांमुलींना लहानपणींच मातृत्व पितृत्वाचें शिक्षण मिळतें हें खरें. पण युरोपांतील मुलांमुलींच्या समोर गलिच्छ विचारविनिमय होतो त्याची वाट काय ?

या बाबतींत डॉ. एलबर्ट मौल आपल्या " The sexual life of the Child " या ग्रंथांतील १६१ पानावर आपल्या देशांतील मुलांमुलींच्या बाबतींत लिहितांना सांगतात,

" While the child is to all appearance immersed in a book, while a girl is playing with her doll, the parents or some other adults carry on a conversation in the child's presence under the influence of an utterly false belief that the latter's occupation engrosses his or her entire attention.........but the danger is hereby less when the children have an opportunity of observing their own parents engaged in sexual acts or even mere preparation for such acts" सारांश, मुलगा पुस्तक वाचतांना व मुलगी आपल्या बाहुलीबरोबर खेळण्यांत मग्न झालेली असते असें समजून, मातापिता किंवा इतर तरुण त्यांच्या देखत वाईट-साईट गोष्टींची चर्चा करतात. इतकेंच नव्हे तर कधीं कधीं आईबाप कामुक व्यवहार मुलांच्या देखत करतात किंवा त्या तयारीला लागतात. अशी खुद्द अमेरिकेंत स्थिती असतांना बाईनें त्याकडे कानाडोळा करून हिंदू मातांच्या व संततीच्या नांवानें हाकाटी पिटली आहे!

अमेरिकेंतील मुलांमुलींचें नैतिक अधःपतन कसें झालें आहे व होत आहे याचें यथार्थ चित्र ज्युव्हेनल कोर्टांचे न्यायाधीश लिंडसे यांनीं आपल्या " Revolt of Modern Youth " " आधुनिक तरुणांचें बंड " या पुस्तकांत पुढीलप्रमाणें दिलेलें आहे. ते म्हणतात कीं, मी गेल्या पंचवीस वर्षांच्या कालांत जी माहिती मिळविली व प्रत्यक्ष पाहिली त्यावरून खालील गोष्टी माझ्या दृष्टोत्पत्तीस आल्या. शेंकडा ९० मुली व मुलगे समारंभ, नृत्य, सहल, सहभोजन वगैरे समारंभाकरतां एकत्र जमलीं असतांना एकमेकांना आंवळतात व मुके घेतात. मुली व मुलगे एकमेकांना कामुक गोष्टींत प्रोत्साहन देतात व याचा परिणाम असा होतो कीं, या मुलींना लौकर ऋतु प्राप्त होतो. लहानपणींच असा प्रकार होत असल्यामुळें त्यांना आपले मनोविकार दाबतां येत नाहींत. अशा पोरी उच्च कुलांतील असतात व त्यांचें शिक्षणही बरेंच झालेलें असतें. त्यांचें वयोमान १४

ते १६ च्या दरम्यान असतें. बाईला असें वाटेल कीं, मुलांमुलींनीं एकमेकांचें चुंबन घेणें किंवा एकमेकांना कडकडून भेटणें यांत दोष कसचा? परंतु या बाबतींत एका मुलीनें जबानींत सांगितलें कीं "चिकटून नाचण्यांत आम्हांला बरें वाटतें." अनोळखी पुरुषाबरोबर अगर तरुणाबरोबर नाचणें, चुंबन देणें घेणें, प्रेमाची कानगोष्ट सांगणें, यांत दोष नाहीं कीं काय? हिंदुस्थानांत असल्या गोष्टी निषिद्ध आहेत, पण अमेरिकेंत या धडधडीत चालत असून बाईला मात्र त्या दिसत नाहींत! आश्चर्य होय! न्यायाधीश लिंडसे पुढें असें म्हणणात कीं, या प्रकारामुळें शेंकडा ५० मुली वाईट मार्गाला लागतात व त्यामुळें त्यांचा मानसिक व शारीरिक ऱ्हास होत असतो. अशा फाजील स्वातंत्र्यानें राष्ट्रांत दुबळेपणा उत्पन्न होऊन राष्ट्राची भावी पिढी मानसिक, शारीरिक, व नैतिक अधःपतनाच्या गर्तेत पडते. ज्या बाईला आपल्या मातृदेशाबद्दल इतका अभिमान वाटतो, त्या देशाची अशी स्थिती असून बाई आमच्या देशांतील चालीरीतींना निंद्य ठरवून पाश्चात्य राष्ट्रांपुढें आमचें ओंगळ व घाणेरडें चित्र रंगविते हें सखेदाश्चर्य होय!

लिंडसे या बाबतींत एके ठिकाणीं लिहितात कीं, जर वरच्या व सुशिक्षित तरुणांत अशी स्थिती दिसते तर खालच्या अशिक्षितांत काय असेल ह्याची कल्पनाच करवत नाहीं!

बाई बालमाता व त्यांची संतती यांना दोष देते; पण तो देतांना तिच्या हें लक्षांत येत नाहीं कीं, आमच्या मुलांमुलींचे विवाह धर्मशास्त्राप्रमाणें पवित्र भावनेनें होतात व नंतर मात्र त्यांना संतती होते. परंतु अमेरिकेंत वैवाहिक कायदेशीर संबंध नसतांना अल्पवयी मुलींना संतती होते व अशी झालेली संतती गुप्त रीतीनें पाळण्याकरतां दुसऱ्याला देण्यांत येते. अशी संतती शाळेंत जाणाऱ्या मुलींना होते. शाळेंत जाणाऱ्या ४९३ मुलींच्या जबान्यांत असें दिसून आलें कीं त्यांच्याशीं जरी पुरुषसंबंध झालेला होता, तरी त्यांपैकीं २५ मुली गर्भार राहिल्या होत्या. कांहीं जणींनीं गर्भधारणा न व्हावी म्हणून उपाय केले होते. असे उपाय करण्याकडे अमेरिकन पोरींची प्रवृत्ति फार आहे. लिंडसे पुढें असें म्हणतात कीं, अशा शोचनीय स्थितींत—पापपंकांत—पडलेल्या कितीतरी मुली आहेत. पण त्यांपैकीं फारच थोड्या माझ्याकडे आल्या, याचें कारण त्यांनीं केलेलीं पापें त्यांना टोंचीत असावींत. अशा मुलींच्या संगतीनें किती मुली बिघडत असतील याचें गणितच करतां येणार नाहीं!

लिंडसे यांच्या पंचवीस वर्षांच्या संशोधनावरून मिस्. मेयोनें " भारतमाता " या पुस्तकांत केलेल्या अर्धवट व असत्य विधानांपेक्षां अमेरिकेंतच सत्य व संपूर्ण कामप्रचार चालतात हें पुराव्यानें सिद्ध होऊन या बाबतींत अमेरिकेचें कनिष्ठत्व व भारतमातेचें श्रेष्ठत्व सिद्ध होत नाहीं काय ?

सुंदर मुलींचा उपयोग वेश्येप्रमाणें करतात व त्यांना देवळांत ठेवतात असा एक मूर्खपणाचा आरोप बाईनें केला आहे. परंतु हा अत्यंत असत्य व अश्लील आहे. देवळांत सुंदर मुलें ठेवण्याची पद्धत इकडे नाहींच. हा आरोप करतांना कोठल्या देवळांत किती मुलें आहेत त्यांची आंकडेवारी बाईनें कां दिली नाहीं ? आमच्याकडे अशी पद्धतच नाहीं. परंतु मेयोच्या देशांतच अशी अनिष्ट चाल आहे. हॅवलाक्स आपल्या " Sexual Inversion " या ग्रंथांत लिहितात कीं " It has been stated by many observers—in America, in France, in Germany and in England—that homosexuality is increasing among women. 'I believe' writes a well informed American correspondent, 'that sexual inversion is increasing among Americans–both men and women.' " अनुसंधान करणाऱ्यांना असें कळलें आहे कीं, कामुकव्यवहार इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, फ्रान्स या देशांतील स्त्री पुरुषांत अत्यंत वाढलेला आहे. कामुकव्यवहाराची अनैतिक वाढ एकट्या अमेरिकेंत प्रमाणाबाहेर झालेली आहे. हेच लेखक याच ग्रंथांत पुढें असें लिहितात कीं, " The great prevalence of sexual inversion in American cities is shown by the wide knowledge of its existence. Ninety-nine normal men out of a hundred have been accosted on the streets by inverts, or have among their acquaintances men whom they know to be sexually inverted. Everyone has seen inverts and knows what they are !......The world of sexual inverts is indeed a large one in any American city, and it is a community distinctly organized, words, customs, traditions of its own, and every city has numerous meeting places, certain churches where

inverts congregate." सारांश असा कीं:-अमेरिकेंत विषयातिरेक फार भयंकर प्रमाणांत वाढला आहे. सर्वसाधारण १०० माणसांत ९९ माणसें अशी असतात. या करतां निवळ कामुकव्यवहार प्रवृत्तीची संघटित संस्था आहे. प्रत्येक शहरांत, देवळांत यांच्या मुलाखतीच्या जागा ठरलेल्या आहेत. आपल्या देशांत अशी स्थिती असतांना त्या स्थितीकडे दुर्लक्ष करून बाईनें तसेंच हिंदुस्थानांत आहे असें निर्लज्जपणानें म्हटलेलें आहे. हीच गोष्ट "हिंदू माता आपल्या मुलांमुलींना कसें निजावें हें शिकविते" या विधानाची आहे. हें विधान म्हणजे विपर्यास केलेलें असत्य व बाष्कळ विधान होय. हिंदुस्थानांतील माता असें कधींच करणार नाहींत व करीतही नाहीत. पण अमेरिकेंतल्या माता असा प्रकार चालला तर त्याकडे कानाडोळा करितात. याची साक्ष डॉ. मौल " The Sexual of the Child" या पुस्तकांत देतात. ते म्हणतात कीं, In many cases brothers and sisters arrange to satisfy one another's curiosity on this point. Elder brother, and younger, or brother and sister, will often seek to enlighten one another. कामवासनेनें उल्लू झालेल्या **अमेरिकन तरुण व तरुणी भावाभावांत व भाऊबहिणी यांच्यांत आपला काम शमवीत असतात.** असला प्रकार, रानटी लोकांतही होत नाहीं. पण तो अमेरिकेंत होतो. तरी पण अमेरिका श्रेष्ठच असें या महामायेला वाटतें.

बालवयी विवाहाच्या पद्धतीवर खापर फोडून बाईनें '**त्वरित लग्न म्हणजे त्वरित मृत्यू**' असा शेरा मारिला आहे. बालवयी विवाह चांगला कीं वाईट याचें विवेचन मागें केलेलें आहे. पण बालवयी विवाह व आज दिसणारे कांहीं लग्नांबाबतचे हिंदू रीतिरिवाज मागेंही व क्वचित् आतांही सुधारलेल्या पाश्चात्य समाजांत दिसत आहेत. बालवयी विवाहाच्या बाबतींत अमेरिका कांहीं कोरडी नाहीं. पूर्वी अमेरिकेंत ८ व्या वर्षी लग्नें झालेलींच आहेत. या प्रकरणावर प्रकाश पाडणारें Sex in Relation to Society हें पुस्तक असा पुरावा देतें कीं, "There has been during recent years, a wide limit of variation in the legislation of the different American States on this point, the difference of the two limits being as much as eight years, and in important States......eighteen is declared to be 'rape" सारांश असा

कीं, हल्लींच संमतिवयाच्या कायद्यांत अमेरिकेंत भिन्नता दिसत आहे. कित्येक ठिकाणीं आठ वय आहे तर कित्येक ठिकाणीं अठरा वयाच्या खालील सबंध गुन्ह्याच्या कक्षेंत येतो.

बालविवाहामुळें बालमाता लवकर मृत्युमुखीं पडतात असें बाई म्हणत आहे. व आपल्या बायकांस तें पटवून देण्यासाठीं असेंब्लीमधील वादविवादांत बाहेर आलेल्या आंकड्यांचा पुरावा तिनें पुढें केला आहे. हा पुरावा म्हणजे दर पिढींत प्रसूतिवेदनांमुळें होणारी तीन लक्ष वीस हजार हिंदी स्त्रियांची प्राणहानि होय. या संख्येंत सर्व जातींच्या स्त्रिया असल्या पाहिजेत. त्यांत हिंदू किती होत्या याचा बाईनें खुलासा केलेला नाहीं. त्याचप्रमाणें कांहीं जातींतील प्रौढ विवाह, पाट वगैरे प्रकारांनीं मातृपद घेणाऱ्या स्त्रियांचाही त्यांत समावेश झाला असला पाहिजे. या आंकड्यानें वाचकांची नजरबंदी करण्याचा बाईचा हेतू दिसतो. नुकत्याच युरोपांत झालेल्या महायुद्धांतील ब्रिटिश साम्राज्य, फ्रान्स, बेल्जम, इटली व अमेरिका इतक्या राष्ट्रांच्या झालेल्या मनुष्यहानीपेक्षां हा आंकडा मोठा आहे असें सांगून त्याचा भेसूरपणा बायकांस दाखविण्याची आततायी वृत्ति बाईनें स्वीकारलेली आहे. आमच्या मतें बाईनें एका पिढीऐवजीं दोन किंवा अधिक पिढ्यांतील अशा स्त्रीमृत्यूंची बेरीज केली असती तर सबंध मनुष्यजाती इतकी अशा मृत्यूंची संख्या बाईला श्रेणीनें दाखवितां आली असती. बाईनें दिलेल्या आंकड्यांवरून दरवर्षी हें प्रमाण दीडलाखाच्या घरांत जाणारें दिसतें. दयाळू सरकारच्या प्रजाहित दक्ष राज्यव्यवस्थेमुळें अर्धपोटीं राहाणाऱ्या ३२ कोटी हिंदुस्थानी प्रजेंत हें प्रमाण यापेक्षां अधिक गेलेलें नाहीं हें हिंदुस्थानचें सुदैवच म्हणावयाचें!

या मृत्यूचें कारण प्रसूतिवेदना होय असें बाईनें दिलें आहे. बालवयांतील गर्भधारणेशीं त्याचा संबंध येत नाहीं. कारण बालवयी मातृत्व व सुलभप्रसूति यांचा अन्योन्यसंबंध असल्याचें हॉवलॉक एलिसनें आपल्या पुस्तकांत दाखविलें आहे. एवढेंच नव्हे तर या विषयाकडे आपल्या पाश्चात्य शास्त्रज्ञांचें जावें तितकें लक्ष गेलें नाहीं असेंही तो म्हणत आहे. हें लक्षांत घेतलें म्हणजे बाईला प्रसूतिवेदनांमुळें येणाऱ्या मृत्यूची हिंदी स्त्रियांतील वाटणारी ही भयंकर मृत्युसंख्या व आमचें वाढतें दारिद्र्य यांचाच निकट संबंध असल्याचें स्पष्ट होत आहे. हें खरें कारण बाईनें पुढें मांडलें असतें तर तें तिच्या स्वयंसेवकवृत्तीस शोभलेंही असतें.

देवदासींसंबंधानें लिहिलेल्या बाईच्या विधानाचा विचार करून देवदासी व वेश्याव्यवसाय यांची सांगड बाईनें घातलेली आहे. देवदासी म्हणजे देवाला सेवे-

साठीं वाहिलेल्या मुली. देवसेवा म्हणजे वेश्याव्यवसाय नव्हे, हें बाईला समजावयास पाहिजे होतें. तनुविक्रयानें वेश्याव्यवसाय करणारा वर्ग इतरांप्रमाणें आमच्या समाजांत अतिप्राचीन कालापासून आहे. या वर्गांतील निरनिराळे प्रकार दर्शविणारे शब्दही आमच्या परंपरागत वाङ्मयांत आढळतात. बाईला आमचें वाङ्मय, धर्म, चालीरीति व आचारविचार यांची माहिती नसल्यामुळें, देवदासी व वेश्या यांचें एकीकरण करून बाईनें लहान तोंडी मोठा घांस घेण्याचें अक्षम्य मूर्खत्व दाखविलें आहे; व तें दाखवून हिंदुधर्माचें व त्यांच्या आचारविचारांचें काल्पनिक व चुकीचें चित्र रंगविलें आहे. देवदासींचा देवस्थानांशीं संबंध असलेल्या व्यक्तींशीं व यात्रेकरूंशीं संबंध येत असला तरी त्या संबंधाला वेश्याव्यवसायाच्या पायरीवर आणून बसवितां येत नाहीं. शिवाय अशा स्त्रियांना संतति उत्पन्न झाल्यास तिचा सामाजिक दर्जा कोणता असतो, याचाही बाईनें विचार केलेला दिसत नाहीं. ठराविक पुरुषांच्या विषयोपभोगाचें साधन, या दृष्टीनें देवदासी व त्यांचा सामाजिक दर्जा यांचा विचार केल्यास बाईच्या देशांत **लग्नबंधनाशिवाय वैवाहिक आयुष्यक्रमाचा उपभोग घेऊन समाजांत शिष्ट म्हणून वावरणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या सामाजिक व नैतिक दर्जापेक्षां त्यांचा दर्जा हिंदू समाज श्रेष्ठ समजत नाहीं** हें बाईनें ओळखावयास पाहिजे होतें. बाईच्या देशांत संपत्तीला आज देवाचें स्थान प्राप्त झालेलें आहे. ही आपली वस्तुस्थिति ओळखून तिनें आमच्या देवताविषयक धर्मभावना व देवदासींच्या आयुष्यक्रमाचा उल्लेख यांची नसती सांगड घालण्याचें धाष्टर्य केलें नसतें, तर तें तिच्या सद्धेतूचें निदर्शक ठरलें असतें. शिवाय एकाच हिंदु संस्कृतीनें व्यापलेल्या सर्व हिंदुस्थानांत देवदासींचा वर्ग नाहीं हेंही तिनें लक्षांत ठेवावयास पाहिजे होतें. देवदासींचा वर्ग अशिक्षित असतो. त्यांचा सामाजिक दर्जाही हिंदुस्त्रियांत खालचाच असतो. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन बाईच्या देशांत शिक्षणक्रमांत असलेला कुमारिका वर्ग व नाटकासारख्या धंद्यांत असणारा नटींचा वर्ग यांचा नैतिक आयुष्यक्रमाच्या दृष्टीचा सर्वसाधारण आयुष्यक्रम आणि या वर्गाला तिच्या समाजांत असलेलें स्थान यांचा विचार करितां बाईनें आपल्या नाकाला असलेला शेंबूड अगोदर काढावा असेंच तिला सुचविणें क्रमप्राप्त येतें.

खुद्द अमेरिकेंत वेश्याव्यवसाय कसा चालतो याचें विवेचन '**आज कालची अमेरिका**' या प्रकरणांत केलेलें आहे. देवदासी प्रथेबद्दल बाईनें केलेल्या विपर्यासापेक्षां तिच्या मातृभूमींत अनीतीचा व्यवसाय कसा चालतो याचें संक्षिप्त

विवेचन लक्षांत घेतल्यास देवदासींची पद्धत असलेल्या हिंदुस्थानापेक्षां अमेरिकेंतील तरुणींचा—**अविवाहित तरुणींचा—नैतिक अधःपात** फारच भयंकर आहे हें बाईला नाकबूल करून चालणार नाहीं.

अमेरिकेंत अनीतीचा कामुक व्यवहार व्यापारी दृष्टीनें भयंकर चालूं लागला तेव्हां सामाजिक स्वास्थ्याची काळजी बाळगणारें एक मंडळ स्थापन झालें. व यासंबंधीं त्या मंडळानें कधीं गुप्तपणानें तर कधीं जाहीरपणानें संशोधन करून आपले अहवाल प्रसिद्ध केलेले आहेत. हे सर्व अहवाल एकत्रित करून Prostitution in Europe या नांवाचें पुस्तक जॉन डी रॉकफेलर यानें व Commercialized Prostitution in New York City या नांवाचें पुस्तक जॉर्ज नीलँड यांनीं लिहिलेलें आहे. पुढें ही बाई असें विधान करिते कीं, हिंदु माता, विद्यार्थी व विद्यार्थिनी या उपदंश विकारांनीं पछाडलेल्या असतात. मगें इ. स. १९१६ सालीं उपदंशजन्य विकारांची चौकशी करण्याकरितां नेमण्यांत आलेल्या रॉयल कमिशनला देखील पुरी माहिती जमवितां आली नाहीं, ती बाईनें एकदोन दवाखाने आणि कांहीं वैद्य डॉक्टरांच्या गांठी घेऊन हिंदुस्थानांत शेंकडा नव्वद लोक या विकारानें पछाडलेले असतात असें अनुमान काढिलें. हें अनुमान काढतांना बाईनें फक्त या रोगानें पीडित झालेल्यांचीच माहिती जमविली. पण सर्व जनसमाजाची पाहाणी करून काय प्रमाण पडतें हें मुद्दाम टाळलेलें दिसतें. बाईच्या दृष्टीनें पाहातां सर्व जगांत हिंदुस्थानापेक्षां फारच भयंकर प्रकार आढळतो. न्यूयॉर्क, इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांत हिंदुस्थानापेक्षां या रोगानें पछाडलेले लोक अधिक आहेत. डॉक्टर ब्लौच आपल्या The Sexual Life of Our Times या पुस्तकांत लिहितात कीं, " From these we learn that Denmark, Germany, German Austria and Switzerland, show the most favourable conditions; Next come Belgium, France, Spain, Portugal, North and Middle Italy. Worst of all are the conditions in Southern Italy, Greece, Turkey, Russia and England." प्रजननसंबंधी रोगांचें वास्तव्य डेन्मार्क, जर्मनी, ऑस्ट्रियांत आहे. परंतु दक्षिण इटली, ग्रीस, टर्की, रशिया आणि इंग्लंड या देशांत फार आहे.

पुढें एका ठिकाणीं हेच लेखक असें म्हणतात कीं, "In these last ten years, for every 100 young men living, there have

been 119 infections during ten years; that is to say, on the average every one has been infected more than once. गेल्या दहा वर्षांत १०० माणसांत ११९ माणसांना हा रोग झालेला आहे. यांत असे कांहीं लोक आहेत कीं, त्यांना हा रोग दोनदोनदांही झालेला आहे. "It further appears that of the men who entered on marriage for the first time when above the age of 30 years, each had, on the average, had Gonorrhoea twice, and about one in four or five had been infected with Syphilis. तीस वर्षांनंतर ज्या पुरुषांचीं लग्नें झालीं, **त्यांना लग्नापूर्वी दोन दोन वेळां प्रमेहाचा विकार झालेला होता, व चारपांच जणांत एक दोन तरी उपदंशाच्या विकारानें पछाडलेले होते.**

अमेरिकेच्या बाबतींत लिहितांना एलिस आपल्या 'Analysis of the Sexual Impulse' या ग्रंथांत अवतरण देतांना लिहितात कीं, Walbarst Studying the prevalence of gonorrhoea among boys in New York States:—In my study of this subject there have been observed 3 cases of gonorrheal urethritis, in boys aged, respectively 4, 10, 12 years which were acquired in the usual manner, from girls ranging between 10 and 12 years of age. In each case, according to the story told by the victim, the girl made the first advances. बोलबार्स्ट अमेरिकन मुलांमुलींच्या उपदंशजन्य विकारांबद्दल लिहितांना लिहितात कीं, मला अशीं तीन मुलें आढळलीं कीं त्यांना प्रमेहाचा विकार होता. त्यांचीं वयें अनुक्रमें ४, १०, १२ अशीं होतीं. हा रोग त्या अल्पवयी मुलांना १० व १२ वयाच्या मुलींशीं कामव्यवहार केल्यामुळें झाला.

एलिस आपल्या Sex in Relation to Society या ग्रंथांत ३३६ पृष्ठावर निर्भीडपणें—Civilization ला Syphilization म्हणून लिहितात कीं, "In America a committee of the medical society of New York appointed to investigate the question,

reported as the result of exhaustive inquiry that in the city of New York no less than a quarter of a million of cases of venereal disease occurred every year, and a leading New York Dermatologist has stated that among the better class families he knows intimately at least one third of the sons have had syphilis. अमेरिकेच्या एका कमिटीनें असा अभिप्राय दिला आहे कीं, न्यूयॉर्क शहरांत दरवर्षी **अडीच लाख लोकांपेक्षां अधिक लोक उपदंशादि विकारांनीं पछाडले जातात.** त्वचारोगज्ञांचें असें म्हणणें आहे कीं, अमेरिकेंतील उच्च दर्जाच्या घराण्यांतील एक तृतीयांश मुलांना उपदंशाचा रोग असतो.

याचप्रमाणें जर्मनींत आठ लाख लोक दरसाल या रोगानें पछाडलेले असतात. भारतीय सैनिकांपेक्षां ब्रिटिश सैनिकांत हा रोग जास्त असतो, असें एलिस साहेबांचें म्हणणें आहे. स्ट्रीचसाहेबांनीं या बाबतींत असें म्हटलें आहे कीं, इंग्रज सरकारला गोऱ्या सैनिकांचे हे रोग दुरुस्त करण्यापायीं ७० लाख पौंड दरवर्षी खर्च येतो. या रोगानें सर्व पाश्चात्य समाज व्यापलेला आहे. बाईला हिंदुस्थानांतच हा रोग दिसतो, आणि खुद्द आपल्या देशांत काय स्थिति आहे हें कळत नाहीं की काय ? अमेरिकेसंबंधानें याच बाबतींत लिहितांना अमेरिकेचे डॉ. कॅलाग एम्. डी. Man the Master Piece यांत लिहितात कीं, आमच्या देशांत हा प्रकार इतका भयंकर आहे कीं, अपवाद एकाददुसराच असेल. आमच्या प्राथमिक शाळा म्हणजे दुर्गुणांचीं आगरेंच होत. घातुक संवयी शाळेपासूनच लागतात. **बारा वर्षांवरील मुलांना हमखास असले रोग जडलेले असतात.** मोठ्या मुलांची गोष्ट तर राहोच. पण मुलांना कडेवर घेऊन फिरणाऱ्या दाया लेंकरांनाही घातुक संवयींचें शिक्षण देतात. अमेरिकेंत एकंदर लोकसंख्येपकैीं, $\frac{1}{5}$ लोकांना हा विकार जडलेला असतो. prominent sanitary officer of one of our large cities affirms that not less than 1/5 of the entire population of the city is tainted with venereal disease in some form or other. हा अभिप्राय जरी जुना असला तरी आजकालची अमेरिका या बाबतींतही बरीच पुढें गेलेली आहे. हिंदुस्थानांतील हिंदी जनतेला उपदंश रोग आहे असें बरळणाऱ्या बाईला आपल्या पायांखालीं काय जळतें आहे हें समजायला हवें होतें.

पहिल्या भागांत केलेलीं असत्य विधानें म्हणजे हिंदुस्थानची बदनामी करण्याच्या उद्देशानें या गोऱ्या नागिणीनें सोडलेले हिंदुस्थान द्वेषाचे फूत्कार होत. तिनें आपलीं विधानें ठोकून देतांना ठिकठिकाणीं चलाखी केलेली आहे. हिंदुस्थानांत ज्या गोष्टी कधीं घडलेल्या नाहींत अशा गोष्टी आपल्या हेतूच्या पुरस्कारार्थ घेऊन त्यांची जुळणी केलेली आहे. बाईनें प्रारंभीं जरी साळसूदपणाचा आव आणून हें पुस्तक लिहिण्यांत माझा कांहीं एक विवक्षित हेतू नाहीं असें म्हटलें आहे तरी या भागांत तिनें जीं विधानें केलेलीं आहेत तीं तिचा विवक्षित हेतू होता किंवा नाहीं हें स्पष्ट दर्शवीत आहेत. या भागांत ज्यांच्या ज्यांच्या तिनें भेटी व मुलाखती घेतल्या त्यांचीं त्यांचीं नांवें न देतां अमका तमका असें म्हणाला असें सांगून पळवाट काढलेली आहे. या भागांतील विधानें किती निरर्गल, अर्धवट व असत्य आहेत याची वाचकांना कल्पना येईलच.

---

## भाग २ रा.

दुसऱ्या भागाला सुरवात करतांना " The Grand Trunk Road " " मोठा राजरस्ता " असा मथळा देऊन, त्यांत ज्या ठिकाणीं पाश्चात्य संस्कृति नाहीं त्या ठिकाणचे लोक लुटारू, गळेकापू, अन्नाला महाग, आपआपसांत झगडणारे असे असतात, असें वर्णन केलें आहे. हें वर्णन म्हणजे, खैबरघाट व त्याच्या आसपासच्या अफगाणिस्तानादि मुलूख याचें वर्णन होय. हिंदुस्थानचें चित्र रेखाटतां रेखाटतां बाईची नजर अफगाणिस्थानच्या बाजूला गेली व तेथील भडक वर्णन करून तिनें असा मतितार्थ काढला आहे कीं, या मुलुखावर इंग्रजांची सत्ता नसल्यामुळें त्यांची वरीलप्रमाणें स्थिती झालेली आहे.

आजकालचा अफगाणिस्थान कसा आहे याचें जर कोणी निःपक्षपात बुद्धीनें चित्र रंगविलें तर तो असेंच रंगवील कीं हल्लींचें अफगाणिस्थान फारच सुधारलेलें आहे. त्या ठिकाणीं पाश्चात्य संस्कृति पोंचलेली नसली तरी हल्लींच्या अमीर साहेबांनीं आपलें संस्थान उत्तम प्रकारें प्रगतिपर असें चालविलेलें आहे. अफगाणिस्थानांत हा हिंदू व हा मुसलमान असा भेदभाव अगर भेदनीति नाहीं. खैबर घाटांतील कांहीं डोंगराळ जाती अशा आहेत कीं, त्यांच्यांत शिक्षण कमी व

त्यांची उपजीविका लूट करणें हीच होय. खैबरघाटांतले लोक बोलून चालून अडाणी, त्यांना त्यांच्या संस्कृतीचेंही असावें तसें शिक्षण नाहीं. पण ज्या अमेरिकेंत सर्वप्रकारचें शिक्षण मिळतें, जी अमेरिका सर्वांगीण सुधारलेली आहे, जेथें पाश्चात्य संस्कृतीचा पूर्ण पगडा बसलेला आहे, तेथील सर्व स्त्रीपुरुष सुशिक्षित, सुसंस्कृत आणि उन्नतीच्या उत्तुंग शिखरावर आरोहण केलेले असे आहेतना! मग आजकालच्या अमेरिकेंत अगणित व अनन्वित अत्याचार कां होतात?

डॉक्टर फ्रेडरिक हेम्पटन या अमेरिकन विद्वानाचें असें म्हणणें आहे कीं हल्लीं पापाचें तुफान सर्व अमेरिकेवर उठलेलें आहे. गेल्या चोवीस वर्षांपेक्षां हत्येचें प्रमाण दुप्पट झालेलें आहे. नुकत्याच संपलेल्या महायुद्धांत चाळीस हजार अमेरिकन मृत्युमुखीं पडले, पण इ. स. १९२५ सालअखेर ४० हजारांपेक्षां अधिक हत्या झालेल्या आहेत. दरवर्षी अमेरिकेंत सुमारें **अकरा हजार पाशवी अत्याचार** होतात. डॉक्टर हॉफमेन यांचाही असाच अभिप्राय आहे कीं "आज अशी भीति वाटत आहे कीं चाललेल्या अत्याचारांमुळें अमेरिका सुरक्षित राहील किंवा नाहीं हेंच सांगणें कठीण झालें आहे. अत्याचार पुरुषच करतात असें नाहीं तर स्त्रियाही पिस्तुलें घेऊन बँका लुटीत असतात. दरोडे व चोऱ्या यांना तर ऊतच आलेला आहे. पोस्टाचीं पार्सलें सुरक्षित जाईनात म्हणून पोस्ट खात्यानें आपल्या पोस्टल-गाड्या रात्रीच्या न चालविण्याचा निर्धार केलेला आहे."

वुइल्यम बर्न यांनीं एका बँकर्सच्या सभेंत असें सांगितलें कीं, चोरीमुळें अमेरिकन बँकर्स असोशिएशनला ३६,७३,४६७ डॉलर नुकसान आलें. ही बँकेची स्थिती आहे. मग इतर ठिकाणची काय असेल हें सांगणेंच नको! अमेरिकेंत कशा प्रकारचे अत्याचार चालतात याचें संक्षिप्त वर्णन **"आजकालची अमेरिका"** या प्रकरणांत दिलेलेंच आहे.

अशी स्थिति बाईच्या जन्मभूमींत असतां तिनें "भारतमाता" या पुस्तकांत खैबरघाटांत जाऊन—गेली असेल असें आम्हांस वाटत नाहीं—दुसऱ्या भागाच्या सुरवातीलाच आपली मनोवृत्ति दर्शविलेली आहे. खुद्द सुशिक्षित अमेरिकेंत वरील प्रकारचे अत्याचार होत असतांना बाईला खैबरघाटांतील रानट्यांचे अत्याचार दिसतात व त्यांच्यावर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव पडला नाहीं, त्यांच्यावर इंग्रज सरकारचें राज्य नाहीं, म्हणून त्यांची अशी स्थिति झाली आहे असें बाई म्हणते. पण खुद्द अमेरिकेंत काय चाललें आहे याचा तिनें विचार नको कां करावयाला?

अमेरिका तर पुढारलेली, सुशिक्षित आणि प्रगतिप्रिय, मग तेथें कां असे अनन्वित अत्याचार होतात ? या बाबतींत आपला तो 'जॉन बुल' आणि दुसऱ्याचा तो कुत्ता असाच प्रकार बाईनें जाणूनबुजून केलेला आहे.

दुसऱ्या भागांतल्या सहाव्या प्रकरणाला "The earthly God" "पृथ्वीवरील परमेश्वर" म्हणजे पति असें शीर्षक दिलेलें आहे. त्यांत सुरवातीपासून उच्च वर्णांच्या—ब्राह्मणांच्या—चालीरीती, गृहव्यवस्था व विवाह-पद्धति यांचें वस्तुस्थितीचा विपर्यास करणारें व किळस आणणारें असें ओंगळ चित्र रेखाटलेलें आहे. हें रेखाटण्याचा उद्देश दुसरा तिसरा कांहीं नसून, बालविवाहाचे दुष्परिणाम व आपत्ति हेंच पुन्हां पण निराळ्या रीतीनें, अधिक घाणेरड्या पद्धतीनें, उदाहरणें देऊन सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. बाई लिहिते कीं, मला एका मोठ्या पण म्हाताऱ्या जमिनदारानें सांगितलें कीं, मला एकंदर बारा मुलें झालीं. त्यांत दहा पोरी झाल्या, पण त्या जिवंत राहिल्या नाहींत. त्यांचा खर्च तरी कसा करावा, म्हणून मी दोन मुलगे मात्र वांचविण्याची खटपट केली व ते वांचले ! दुसऱ्या एका राजाश्रित महामहोपाध्यायाला बाई भेटली, व तिनें त्याला त्याच्या कन्येबद्दल विचारलें कीं, 'तुम्ही आपल्या मुलीचें लग्न केव्हां करणार ?' ते म्हणाले "मुलीच्या पांचव्या, सातव्या अगर नवव्या वर्षी !" पण जर तुम्ही असें केलें नाहीं तर काय होईल ? असा बाईनें उलट त्यांना प्रश्न केला; तेव्हां महामहोपाध्याय म्हणाले कीं, "सर्व जात मला वाळींत टाकील, माझ्यावर धार्मिक बहिष्कार घालतील, माझ्या मुलाला कोणीही आपली मुलगी देणार नाहीं, माझ्या यात्रेला कोणीं येणार नाहीं; सारांश मला जगांतून उठल्यासारखें होईल." महामहोपाध्याय महाशयांचें उत्तर ऐकल्यावर बाईला कळवळा आला व तिनें "मुलीचें पुढें काय होईल ?" हें विचारलें.

"आमच्या धर्मशास्त्राप्रमाणें मला तिला घरांतून बाहेर काढावें लागेल, व तिला अरण्यांत पाठवावी लागेल. तिच्याशीं माझा कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाहीं. इतकेंच नव्हे तर तिला जर कोणीं अन्न दिलें तर त्यालाही वाळींत पडावें लागेल." या विधानांत बाईला असें सिद्ध करावयाचें आहे कीं, हिंदी मुलींना हिंदुस्थानांत निष्काळजीपणानें वागविण्यांत येतें, इतकेंच नव्हे तर त्या मराव्या असें हिंदी लोकांना वाटत असतें. याला पोषक म्हणून जालियनवाला बागेमुळें प्रसिद्धीस आलेल्या ओडवायर साहेबांच्या "India As I Knew

It" या पुस्तकाचा आधार दिला आहे. या आधाराचा सारांश असा कीं एका दोनशें वर्षांच्या जुन्या संस्थानच्या अकरा पिढ्या झाल्या; या अकरा पिढ्या दत्तक घेण्याची पाळी कधींच आली नाहीं. अशा एका संस्थानचा राजा अज्ञान असतांना त्याच्या बहिणीचें लग्न ठरलें. त्याकरतां ६ पासून ८ लाख रुपयांची मागणी करण्यांत आली. पोलिटिकल एजंट यांनीं मागील पुरावा काढा—असें विचारतांच एका वृद्ध दिवाणांनीं असें सांगितलें कीं इतक्या वर्षांत मुलीच्या लग्नाचा प्रसंगच संस्थानावर आला नाहीं ! त्यावर एजंटनीं विचारलें 'मग काय या संस्थानिकांना आजपर्यंत एकही मुलगी झालेली नाहीं ?' वृद्ध दिवाण म्हणाले 'साहेब, आमच्या चालीरिती तुम्हांला माहीतच आहेत ! अर्थात् कारणही ठाऊकच असलें पाहिजे. मुली झाल्या होत्या पण या पिढीपर्यंत सौभाग्यकांक्षिणी शिवाय कोणतीही जगली नाहीं.'

वरील दोन्ही धडधडीत खोट्या गोष्टींवरून बाईनें असा सिद्धांत काढला आहे कीं, "The parents look after the Son and God looks after the daughter" "आईबाप पुत्राची काळजी घेतात आणि मुलीची काळजी परमेश्वर वहातो."

तिसरें एक पतीच्या पशूपणाचें गलिच्छ उदाहरण बाईनें दिलेलें आहे. तें म्हणजे एका बंगाली बाबूचें होय. एका बंगाली बाबूची पांच वर्षांची मुलगी विहिरींत पडून तिला दुखापत झालेली होती. तिच्या आईनें औषधोपचाराकरितां तिला दवाखान्यांत नेलें. तेथें तिचा नवरा येऊन डॉक्टरला म्हणाला कीं, मी माझ्या पत्नीला न्यावयास आलों आहें. डॉक्टर म्हणाले पोर फार आजारी आहे, ती आईशिवाय राहणार नाहीं. स्त्रीनेंही बरीच विनंती केली. त्या बंगाली बाबूनें आपल्या पत्नीला सांगितलें कीं तूं आतां येथें राहूं नको. मला तुला भेटून बरेच दिवस झालेले आहेत. आतां मी तुला नेण्यास आलों आहे, तो माझ्या कामाकरितां होय (for my proper marital use). हें उदाहरण देऊन बंगाली तरुणांत विषयातिरेक असतो असें आरंभीं केलेलें वर्णन तिला सिद्ध करावयाचें आहे, व पुरुषाला पोरींची किंमत नसून स्त्रीची किंमत आणि ती कामव्यवहारापुरतीच आहे असें सांगावयाचें आहे.

संस्थानिकांचें उदाहरण देण्यांत, जमीनदारांचें वर्णन करण्यांत, बंगाली तरुणांचें भासचित्र रंगविण्यांत, मुलींच्याबद्दल हिंदू लोक किती निष्काळजी असतात

अमेरिका तर पुढारलेली, सुशिक्षित आणि प्रगतिप्रिय, मग तेथें कां असे अनन्वित अत्याचार होतात ? या बाबतींत आपला तो 'जॉन बुल' आणि दुसऱ्याचा तो कुत्ता असाच प्रकार बाईनें जाणूनबुजून केलेला आहे.

दुसऱ्या भागांतल्या सहाव्या प्रकरणाला " The earthly God " " पृथ्वीवरील परमेश्वर " म्हणजे पति असें शीर्षक दिलेलें आहे. त्यांत सुरवातीपासून उच्च वर्णाच्या—ब्राह्मणांच्या—चालीरीती, गृहव्यवस्था व विवाह-पद्धति यांचें वस्तुस्थितीचा विपर्यास करणारें व किळस आणणारें असें ओंगळ चित्र रेखाटलेलें आहे. हें रेखाटण्याचा उद्देश दुसरा तिसरा कांहीं नसून, बालविवाहाचे दुष्परिणाम व आपत्ति हेंच पुन्हां पण निराळ्या रीतीनें, अधिक घाणेरड्या पद्धतीनें, उदाहरणें देऊन सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. बाई लिहिते कीं, मला एका मोठ्या पण म्हाताऱ्या जमिनदारानें सांगितलें कीं, मला एकंदर बारा मुलें झालीं. त्यांत दहा पोरी झाल्या, पण त्या जिवंत राहिल्या नाहींत. त्यांचा खर्च तरी कसा करावा, म्हणून मी दोन मुलगे मात्र वांचविण्याची खटपट केली व ते वांचले ! दुसऱ्या एका राजाश्रित महामहोपाध्यायाला बाई भेटली, व तिनें त्याला त्याच्या कन्येबद्दल विचारलें कीं, 'तुम्ही आपल्या मुलीचें लग्न केव्हां करणार ?' ते म्हणाले "मुलीच्या पांचव्या, सातव्या अगर नवव्या वर्षी !" पण जर तुम्ही असें केलें नाहीं तर काय होईल ? असा बाईनें उलट त्यांना प्रश्न केला; तेव्हां महामहोपाध्याय म्हणाले कीं, "सर्व जात मला वाळींत टाकील, माझ्यावर धार्मिक बहिष्कार घालतील, माझ्या मुलाला कोणीही आपली मुलगी देणार नाहीं, माझ्या यात्रेला कोणीं येणार नाहीं; सारांश मला जगांतून उठल्यासारखें होईल." महामहोपाध्याय महाशयांचें उत्तर ऐकल्यावर बाईला कळवळा आला व तिनें " मुलीचें पुढें काय होईल ? " हें विचारलें.

" आमच्या धर्मशास्त्राप्रमाणें मला तिला घरांतून बाहेर काढावें लागेल, व तिला अरण्यांत पाठवावी लागेल. तिच्याशीं माझा कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाहीं. इतकेंच नव्हे तर तिला जर कोणीं अन्न दिलें तर त्यालाही वाळींत पडावें लागेल." या विधानांत बाईला असें सिद्ध करावयाचें आहे कीं, हिंदी मुलींना हिंदुस्थानांत निष्काळजीपणानें वागविण्यांत येतें, इतकेंच नव्हे तर त्या मराव्या असें हिंदी लोकांना वाटत असतें. याला पोषक म्हणून जालियनवाला बागेमुळें प्रसिद्धीस आलेल्या ओडवायर साहेबांच्या " India As I Knew

It" या पुस्तकाचा आधार दिला आहे. या आधाराचा सारांश असा कीं एका दोनशें वर्षांच्या जुन्या संस्थानच्या अकरा पिढ्या झाल्या; या अकरा पिढ्या दत्तक घेण्याची पाळी कधींच आली नाहीं. अशा एका संस्थानचा राजा अज्ञान असतांना त्याच्या बहिणीचें लग्न ठरलें. त्याकरतां ६ पासून ८ लाख रुपयांची मागणी करण्यांत आली. पोलिटिकल एजंट यांनीं मागील पुरावा काढा—असें विचारतांच एका वृद्ध दिवाणांनीं असें सांगितलें कीं इतक्या वर्षांत मुलीच्या लग्नाचा प्रसंगच संस्थानावर आला नाहीं ! त्यावर एजंटनीं विचारलें 'मग काय या संस्थानिकांना आजपर्यंत एकही मुलगी झालेली नाहीं ?' वृद्ध दिवाण म्हणाले 'साहेब, आमच्या चालीरिती तुम्हांला माहीतच आहेत ! अर्थात् कारणही ठाऊकच असलें पाहिजे. मुली झाल्या होत्या पण या पिढीपर्यंत सौभाग्यकांक्षिणी शिवाय कोणतीही जगली नाहीं.'

वरील दोन्ही धडधडीत खोट्या गोष्टींवरून बाईनें असा सिद्धांत काढला आहे कीं, "The parents look after the Son and God looks after the daughter" "आईबाप पुत्राची काळजी घेतात आणि मुलीची काळजी परमेश्वर वहातो."

तिसरें एक पतीच्या पशूपणाचें गलिच्छ उदाहरण बाईनें दिलेलें आहे. तें म्हणजे एका बंगाली बाबूचें होय. एका बंगाली बाबूची पांच वर्षांची मुलगी विहिरींत पडून तिला दुखापत झालेली होती. तिच्या आईनें औषधोपचाराकरितां तिला दवाखान्यांत नेलें. तेथें तिचा नवरा येऊन डॉक्टरला म्हणाला कीं, मी माझ्या पत्नीला न्यावयास आलों आहें. डॉक्टर म्हणाले पोर फार आजारी आहे, ती आईशिवाय राहणार नाहीं. स्त्रीनेंही बरीच विनंती केली. त्या बंगाली बाबूनें आपल्या पत्नीला सांगितलें कीं तूं आतां येथें राहूं नको. मला तुला भेटून बरेच दिवस झालेले आहेत. आतां मी तुला नेण्यास आलों आहे, तो माझ्या कामाकरितां होय (for my proper marital use). हें उदाहरण देऊन बंगाली तरुणांत विषयातिरेक असतो असें आरंभीं केलेलें वर्णन तिला सिद्ध करावयाचें आहे, व पुरुषाला पोरींची किंमत नसून स्त्रीची किंमत आणि ती कामव्यवहारापुरतीच आहे असें सांगावयाचें आहे.

संस्थानिकांचें उदाहरण देण्यांत, जमीनदारांचें वर्णन करण्यांत, बंगाली तरुणांचें भासचित्र रंगविण्यांत, मुलींच्याबद्दल हिंदू लोक किती निष्काळजी असतात

असेंच तिला दाखवावयाचें आहे. ज्या संस्थानिकाची माहिती दिलेली आहे ती विचारांत घेतां व खरी आहे असें गृहीत धरतां असेंच म्हणावें लागेल कीं, हिंदुस्थानच्या लोकसंख्येंत पुरुष फार असून स्त्रिया फारच थोड्या, किंबहुना नाहींतच ! कारण मुलींची काळजी न घेतल्यामुळें, मुलींची मृत्युसंख्या वाढून कांहीं दिवसांनीं हिंदुस्थानांत त्या मुळींच दिसणार नाहींत. पण ज्या अर्थी त्या दिसत आहेत त्या अर्थी बाईनें केलेलें विधान अत्यंत नालस्ती करणारें व निरर्गल आहे.

पांचपासून सात वर्षांच्या बालवयी कन्येचें लग्न जर झालें नाहीं तर समाज आपल्याला वाळींत टाकील असें एक अवतरण नांव न घेतां बाईनें देऊन बालविवाहाचें विकृत स्वरूप चित्रित केलें आहे. पांच किंवा सात या वर्षी हिंदुस्थानांत बाईनें किती लग्नें झालीं याचें सत्यदृष्टीनें, आंकडेवारीनें दिग्दर्शन केलेलें नाहीं. मुलीचें लग्न जर पांच ते सातच्या दरम्यान झालें नाहीं तर मुलीला अरण्यांत सोडावी लागते असा एक सिद्धांत बाईनें खोटा संवाद देऊन काढला आहे. पांच ते सात वयाच्या मुलीचा विवाह न झाला तर अशा एकाद्या तरी मुलीला अरण्यांत टाकून मुलीचें लग्न न झाल्यामुळें अरण्यरुदन करणारा बाप बाईनें दाखवावयास नको काय ? तीच स्थिति बंगाली बाबूंची होय. आपल्या आंतड्याची पोर मृत्युपंथाला लागलेली असतांना कोणत्या मुलीचा बाप आपल्या काम व्यवहाराकरितां तिच्या मातेला फरफटत नेईल बरें ! हिंदुस्थानची नालस्तीच करायची होती तर बाईला याहीपेक्षां खोट्या नाट्या गोष्टी तिखट मीठ लावून लिहितां आल्या असत्या. पण आव भलताच आणि कावा गनिमी असा प्रकार आद्योपांत केलेला आहे.

एकादा बंगाली बाबू उल्लू बनून डॉक्टरपुढें आपण आपल्या पत्नीला संभोगाकरितां नेतों असें सांगेल, हें संभवतच नाहीं. एकादा मनुष्य कितीही कामातुर झाला अगर असला तरी तो दवाखान्यांत जाऊन बाई लिहिते त्याप्रमाणें बोलेल हें निखालस खोटेंच वाटतें. हिंदुस्थानांतील पवित्र असलेला पतिपत्नीसंबंध जाणूनबुजून खोडसाळपणानें रंगविला आहे. परंतु पाश्चात्य देशांत वैवाहिक संबंध किती अधःपतित झाला आहे हें आतां हिंदुस्थानांतल्या लोकांना कळून चुकलें आहे. वैषयिक स्वरूपाचा अमेरिकेंत चाललेला धांगडधिंगा सर्वश्रुतच आहे. अमेरिकेंतील वैवाहिकपतन Why American Marriages Fail या पुस्तकांत विशद केलेलें आहे. हिंदूंची लग्नपद्धति व कौटुंबिक प्रणालि अत्यंत

उच्च दर्जाची असून अमेरिकादि राष्ट्रांत ती घसरणीला लागलेली आहे. याचीं जरी अनेक कारणें असलीं तरी देखील **वैवाहिक पावित्र्याच्या बाबतींत हिंदुस्थानच अधिक श्रेष्ठ आहे** हें अनेक उदाहरणांनीं सिद्ध करून देतां येईल. हिंदुस्थानांतले पुरुष अत्यंत विषयप्रिय आहेत असें बाई लिहिते. परंतु अमेरिकेंत हें वैषयिक बंड अगदीं लहानपणापासून मुलांमुलींत उत्पन्न होत असतें हें बाई कसें विसरते ?

आमचा धर्म व आमची संस्कृति मातांना आदर्श मातेची शिकवण शिकविते आणि अमेरिकेंतील माता पोरांची परवड न लागावी, स्वच्छंदानें व चैनीनें आमोदप्रमोद करितां यावा म्हणून सकाळीं एकाशीं शुभ मंगल तर दुपारींच त्याच्याशीं घटस्फोट उरकून सायंकाळीं तिसऱ्याचीच मिसेस होते.

आमचे विवाह—संस्कार किती पवित्र आहेत याचें वर्णन करतांना डॉ. बिझंट लिहितात कीं, Nowhere in the whole world, Nowhere in any religion, a nobler, a beautiful, a more perfect ideal of Marriage than you can find in the early writings of the Hindus. पृथ्वीवरील कोणत्याही देशांत, जगांतल्या कोणत्याही जातींत, कोणत्याही धर्मांत, हिंदूंची आदर्शविवाहपद्धति पवित्र व श्रेष्ठ आहे. स्त्रीपुरुषांचें संबंध किती नियमित असतात यांचीं शेंकडों उदाहरणें आमच्या ग्रंथांत आहेत. पत्नीसंबंधानें पतीचें मत काय असावें याचें वर्णन पुढील सूक्तांत आहे.

**देवदत्तां पतिर्भार्यां विन्दते नेच्छयात्मनः ।**
**तां साध्वीं बिभृयान्नित्यं देवानां प्रियमाचरन् ॥**

हिंदू दांपत्याचा संबंध धार्मिक सूक्तानें बांधलेला असतो. हिंदू विवाह करितात तो पितृऋणांतून मुक्त होण्याकरितां; विषयवासनेच्या तृप्तीकरितां हिंदू विवाह करीत नाहींत. पशूंप्रमाणें मन मानेल तेव्हां विषयवासना तृप्त करणें हा हिंदूंच्या वैवाहिक पद्धतीचा आदर्श नाहीं. हिंदू विवाहाचा असा अभिप्राय आहे कीं:—

**प्रजनार्थं स्त्रियः सृष्टाः संतानार्थं च मानवाः ।**
**तस्मात्साधारणो धर्मः श्रुतिः पत्न्या सहोदितः**

मनुष्यमात्राची सामाजिक उन्नति व्हावी हाच पतिपत्नींच्या विवाहाचा हिंदूंच्या दृष्टीनें विशेष उद्देश आहे. वेदांत पुरुषाला '**भ्रावन्तोऽन्ययः**' आणि स्त्रीला

‘**विरश्मयः**’ अशा उदात्त उपमा दिलेल्या आहेत. स्त्री आणि पुरुष हे एकाच योग्यतेचे असल्याबद्दल आमच्या धार्मिक व तात्विक ग्रंथांत अनेक वेळां दाखले देऊन वर्णिलेलें आहे. स्त्रियांना फक्त धार्मिक व सामाजिक बाबतींत बरोबरीचें महत्व होतें असें नसून राजकीय बाबतींत देखील त्यांचें पुरुषांबरोबरच महत्त्व होतें. In the age of splendid achievements and lofty spirituality, women were equals of men trained and cultured and educated to the highest point. बाई सिद्ध करण्याचा खटाटोप करते कीं, हिंदुस्थानांतले लोक मुलींच्या बाबतींत निष्काळजी असतात. पण ही गोष्ट पूर्वींही कधीं घडलेली नाहीं व हल्लींही अस्तित्वांत नाहीं. मुली आणि मुलगे यांची सारखीच काळजी हिंदू लोक बाळगतात, व ती तशी त्यांनीं बाळगावी म्हणून ‘**कन्याऽप्येवं पालनीया शिक्षणीयाऽतियत्नतः**’ मुलीला मुलाप्रमाणें शिक्षण देऊन तिचें लालनपालन केलें पाहिजे, अशी धर्मशास्त्राची कडक आज्ञा आहे. स्त्रिया केवळ भोगविलासाकरितांच आहेत असें लिहून बाईनें आमच्या आर्यस्त्रियांचा अपमान केलेला आहे. स्त्रियांचा दर्जा आमच्या समाजांत किती श्रेष्ठ आहे व पवित्र आहे याची बाईला कल्पनाच नसावी. अमेरिकेंत वैवाहिक बंधनांत कसें गलिच्छ स्वरूप येत चाललेलें आहे याचें वर्णन घटस्फोटाच्या उग्र स्वरूपांत सांपडतें. विवाह म्हणजे कामवासना शमविण्याचें साधन असें बाई आमच्या विवाहबंधनाबद्दल म्हणते. परंतु अमेरिकेचे एक न्यायाधीश असें म्हणतात कीं, आमच्या अमेरिकेंतील सध्यांची विवाहपद्धति म्हणजे—legal prostitution कायदेशीर व्यभिचारच होत. ‘The law of marriage and divorce as it prevails here is nothing less than legalized concubinage; या न्यायाधिशाच्या अभिप्रायावरून अमेरिकेंतील लग्नसंस्थांचें स्वरूप कसें हिडिस आहे हें दिसून येतें.

विवाहानंतर जेव्हां सून घरीं येते तेव्हां तिला एकाद्या दासीप्रमाणें वागविण्यांत येतें असें एक असत्य विधान बाईनें केलेलें आहे. परंतु सुनेला आपल्या मुलीप्रमाणें हिंदुस्थानांतल्या सास्वा वागवीत असतात. घरीं लग्नापूर्वी मुलीची माता व लग्नानंतर सासू पत्नीला उत्तम रीतीनें वागविते. पाश्चात्य समाजांत विभक्त कुटुंबपद्धति असल्यामुळें सासू म्हणजे काय पदार्थ आहे याची कल्पनाच नसते. सासरीं सुनेला वाईट तऱ्हेनें वागवितात असें विधान ठोकून देण्यांत बाईला एकत्रित कुटुंबपद्धतीवर ताशेरा झोडावयाचा होता. एकत्र कुटुंबपद्धति

जोंपर्यंत आमच्या समाजांत अस्तित्वांत होती तोंपर्यंत सर्व गोष्टी सुरळित चालत होत्या. परंतु पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळें कांहीं ठिकाणीं विभक्त कुटुंबपद्धति अमलांत येऊं लागल्यामुळें समाजाची स्थिति कौटुंबिक दृष्टीनें खालावत चाललेली आहे. नवरा राजा आणि नवरी राणी अशा स्वच्छंदामुळें कौटुंबिक पवित्रबंधनें शिथिल होत चाललेलीं आहेत. ज्या ज्या ठिकाणीं एकत्र कुटुंबपद्धति अस्तित्वांत आहे, तेथें तेथें सौख्याचें नंदनवनच आहे. लग्नापूर्वीं मुलीला आई आदर्शशिक्षण देते व तेंच शिक्षण सासू वाढविते. आईचा व सासूचा उद्देश आपली मुलगी व सून आदर्श गृहलक्ष्मी व्हावी असाच असतो. आतां एवढें खरें कीं, बाईच्या अमेरिकन मातांप्रमाणें आमच्या माता आपल्या मुलींना इतर मुलांबरोबर चुंबन घेण्यास व नाचण्यास शिकवीत नाहींत. आमच्या मुलीबाळींना जें शिक्षण मिळतें तें उत्तम गृहव्यवस्थेचें मिळतें. अमेरिकेंत उत्तम गृहलक्ष्मी व्हावी म्हणून हल्लीं गृहशिक्षणाच्या शाळा निघत आहेत. पण आमच्याकडे लहानपणींच हें शिक्षण दिलें जातें. यामुळें आमची गृहव्यवस्था पाश्चात्य गृहव्यवस्थेपेक्षां पवित्र असते. **पाश्चात्य स्त्रिया पैशाला पति समजतात, तर हिंदू स्त्रिया पतीलाच परमेश्वर समजतात.** भूमीवरील परमेश्वर म्हणून पतीची थट्टा करणाऱ्या अमेरिकन कुमारिकेला आम्ही असें विचारितों कीं, **पैसा पति समजणाऱ्या ज्या स्त्रिया आहेत त्यांना आम्ही पण्यांगना समजतों.** पण तुझ्या अमेरिकेंत त्या मोठ्या कुलवधू समजल्या जातात. पतीला परमेश्वर मानणें हा भारतमातेच्या संस्कृतीचा विशेष आहे. असें असतांना कोणत्या स्त्रिया श्रेष्ठ ? पतीला नोकर समजणाऱ्या कीं परमेश्वर समजणाऱ्या ?

हिंदुमातांची निंदा करणाऱ्या या बाईनें आपल्या अमेरिकन मातांच्या अधःपतनाकडे नको का दृष्टिक्षेप करायला ? आमच्या पत्नीधर्मासंबंधीं भगिनी निवेदिता लिहितात कीं, Wifehood is thought great in India in proportion to its giving, not receiving. बागेला जसा माळी त्याप्रमाणें कोमल अंतःकरणाला पवित्र वळण लावणारी माता होय. या मातेच्या उद्देशाप्रमाणें हिंदुस्थानांतल्या माता असतात. यांना आपल्यावरील जबाबदारी कळते. परंतु अमेरिकेंतील मातांना ही जबाबदारी कळत नाहीं असें मिस ॲना रॉजर्स ही विदुषी लिहिते. ती म्हणते कीं,— Any system of education that fails to impress upon our girls the immense civil value of motherhood, its

imposing dignity, its grave responsibilities to the state itself, fails of its purpose. (Why American Mothers Fail, p. 71) बाई आणखी एक असें विधान करिते कीं—She has not the vaguest conception how to feed him or develop him. Her idea of a sufficient meal is to tie a string bursts. भारतीय मातांना आपल्या मुलांना कसें भरवावें व त्यांचें कसें संगोपन करावें हें माहीत नसतें. लहान मुलांच्या पोटाला एक दोरी बांधून ती आपोआप तुटेपर्यंत त्याला भरवणें म्हणजेच मुलाचें पोट भरलें असें ती समजते. बाईच्या दृष्टीला हा प्रकार कोठें पडला हेंच आश्चर्य आहे. शिशुसंगोपनाची माहिती लहानपणापासून मुलींना त्यांची आई व घरांतील वृद्ध आजीबाई करून देते. परंतु पोटाला दोरी बांधून ती तुटेपर्यंत मुलाला जेवण घालण्याची तऱ्हा कदाचित् बाईच्याच देशांत असेल. आमच्याकडे तरी खास नाहीं. मुलांमुलींची कशी काळजी घ्यावी याचें शिक्षण पूर्वीपासून आमच्याकडे आहे. बाईनें वर दाखविलेलें अज्ञानजन्य उदाहरण बाईच्या हिंदुस्थानविषयक अज्ञानाचें स्पष्ट दिग्दर्शन करीत आहे.

सातव्या प्रकरणाला Wages of Sin पापाचा मोबदला असें शीर्षक देऊन त्यांत विधवांची दुर्दशा नेहमींच्या पद्धतीनें वर्णिलेली आहे. हें वर्णन करतांना बाई लिहिते कीं, हिंदुस्थानांतले लोक बालविधवांच्या पुनर्विवाहाला विरोध करून त्यांच्याशीं व्यभिचार करितात. हिंदूंचा असा समज आहे कीं, स्त्रीला वैधव्यदशा येणें म्हणजे पूर्वजन्मींच्या पापाचें फळ होय. विधवेला मरेपर्यंत भयंकर कष्ट सहन करावे लागतात. पतीच्या मृत्यूनंतर हिंदुसमाज विधवेकडे तुच्छतेनें व निर्दयतेनें पाहातो. तिला सासरीं नाहीं नाहीं तीं कामें करावीं लागतात. तिचें केशवपन करून तिला विचित्र करितात. विधवा म्हणजे अपशकुन असें मानण्यांत येतें. विधवांसंबंधीं एका हिंदूनें बाईला असें सांगितलें कीं, We husbands so often make our wives unhappy that we might well fear that they would poison us. Therefore did our wise ancestors make the penalty of widowhood so frightful in order that the women may not be tempted. आम्ही पति आमच्या स्त्रियांना एवढ्याचकरितां दुःखी ठेवितों कीं, त्या आम्हांला विष घालणार नाहींत आणि

३५६०५१

म्हणूनच आमच्या बुद्धिमान् पूर्वजांनीं वैधव्याची इतकी दुर्दशा केली आहे कीं, त्यांना हें पाहून तरी आपल्या पतीला विष देण्याचा लोभ होऊं नये. विधवांची हिंदुस्थानांत अत्यंत दुर्दशा असून त्या आपल्या पोटाकरितां तीर्थस्थानांत मूठभर तांदुळाकरितां आपलें पावित्र्य नष्ट करितात. कट्टर हिंदू विधवाविवाहाला विरोध करीत असतात. बाई विधवांचा अपमान करण्याच्याच बुद्धीनें लिहिते कीं:—Hindu widows are a source of corruption and dangerous infection to Society. बाईनें आपल्या वर्णनाच्या समर्थनार्थ Miss Cornelia Sorabji या बाईच्या Between the Twilights या पुस्तकाचा आधार घेतला आहे. सारांश, बाईनें या प्रकरणांत विधवांचें भडकचित्र रंगवून हिंदु समाजाला दूषणें दिलेलीं आहेत. बाई म्हणते, आज हिंदुस्थानांत सुमारें २६८३४८३८ इतक्या विधवा आहेत.

बाई म्हणते, हिंदुस्थानांतल्या विधवा म्हणजे समाजाला भ्रष्ट करणाऱ्या स्पर्शजन्य रोगाप्रमाणें आहेत. समाजांत ज्या स्त्रिया आपल्या पतीशिवाय किंवा आजन्म कुमारी राहातात त्यांना दूषणें देणें म्हणजे बाईच्या समाजांतील 'नन्सना' दोष देऊन आपल्या मनाचा अत्यंत नीचपणा प्रकट करणें होय. नन्स वर्गांत देखील एकादी बाई वाईट वर्तनाची निघते. यावरून सर्वच नन्स बदफैली असतात असें जर कोणीं विधान केलें तर तें जसें मूर्खपणाचें ठरेल, तसेंच आमच्या सच्छील विधवांना दूषणें देणें मूर्खपणाचें ठरेल. पाश्चात्य समाजांत ज्याप्रमाणें पवित्र स्थितींत नन्स राहातात त्याप्रमाणें त्यांच्यापेक्षांही अधिक पवित्र स्थितींत आमच्या देशांतील विधवा आपलें उर्वरित आयुष्य कंठीत असतात. ज्या बाईचा उतारा आपल्या असत्य विधानांच्या समर्थनार्थ या लेखिकेनें घेतला आहे ती बाई पूर्व जातीची पारशी असून धर्मानें ख्रिश्चन आहे. हिंदुस्थानांत विधवांना अत्यंत वाईट रीतीनें वागविलें जातें असें बाईनें केलेलें विधान जर तिनें वस्तुस्थिति समक्ष डोळ्यांनीं पाहून केलें असतें, तर तिच्या लेखणींतून असलें घाणेरडें विधान उतरलेंच नसतें. हिंदु समाजांत विधवांना अत्यंत सदयतेनें, सहिष्णुत्वानें आणि प्रेमळपणानें वागविण्यांत येत असतें. एक वेळ आपल्या मुलीकडे किंवा बहिणीकडे दुर्लक्ष केलें जाईल, परंतु गतभर्तृका सुनेकडे सहानुभूतिपूर्वक लक्ष देण्यांत येतें. हिंदु समाज विधवांना जर एक प्रकारचा बोजा समजत असेल ( कारण त्यांचें पुनर्लग्न होत नसल्यामुळें ) तर बाईच्या विधानाप्रमाणें पाश्चात्य समाजांत ज्या कुमारिकांना पति मिळत नाहींत त्याही त्यांच्या आईबापांना बोजाच वाटत असेल !

स्त्री किंवा पुरुष विवाहित किंवा अविवाहित असो, त्याला कोणत्याही परिस्थितीशीं झगडावें लागतेंच. ज्यांना लहानपणापासून उत्तम शिक्षण मिळालेलें असतें, ते विवाहित असोत, वा अविवाहित असोत ते समाजहिततत्पर असतात. विधवांच्या पुनर्विवाहाला कांहीं ब्राह्मण जातींशिवाय सर्वांस परवानगी आहे. परंतु हिंदुस्थानाच्या लोकसंख्येच्या दृष्टीनें पाहातां जो समाज विधवांच्या पुनर्विवाहास विरोध करितो तो फारच थोडा आहे. किंबहुना तो नाहींच म्हटला तरी चालेल. हल्लीं ब्राह्मण समाजांतही पुनर्विवाह प्रचलित आहेत. आमच्या सामाजिक चळवळीचा इतिहास पाहिला तर असें आढळून येईल कीं, पुनर्विवाहाची चाल आतां उच्च वर्णांच्या जातींतही रूढ होत चाललेली आहे. खालच्या जातींत तर ती पूर्वींपासून आहेच. विधवांच्यासंबंधीं आर्यसमाज, ब्रह्मोसमाज, प्रार्थनासमाज, समाजसुधारणामंडळें, प्रो. कर्वे वगैरे लोक अत्यंत काळजी घेत असून त्यांची स्थिति सुधारीत आहेत. अनाथ विधवांना शिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनवीत आहेत. हिंदु समाजांतील ज्या विधवांना पुनर्लग्नें करावयाचीं नसतील त्यांना शिक्षण देऊन त्यांनीं आपला योगक्षेम चालवावा अशा प्रकारचे यशस्वी प्रयत्न फारां वर्षांपासून हिंदुस्थानांत चालू आहेत. विधवांना समाजांत बाई म्हणते त्या प्रमाणें जर किंमत नसती तर अशा प्रकारचे प्रयत्न हिंदुस्थानांत झाले नसते.

विधवांना पोटाला मिळत नाहीं, त्यांचें शील भ्रष्ट होतें, वगैरे आरोप बाईनें केलेले आहेत. विधवांना पोटाला मिळत नाहीं हा त्यांचा गुन्हा नसून हिंदुस्थानच्या दारिद्र्याचा प्रभाव आहे. एकाद्या विधवेनें कोणाच्या तरी मोहांत भडकून आपलें शील भ्रष्ट केलें असेल म्हणून सर्वच विधवा शीलभ्रष्ट असतात असा मूर्खपणाचा शेरा मारणें म्हणजे शुद्ध कुत्सितपणा होय. आमच्या विधवा धर्माप्रमाणें तापसीवृत्तीनें राहातात, परंतु पाश्चात्य देशांतील स्त्रिया पति जिवंत असतां त्याच्याशीं काडी मोडून दुसऱ्याशीं शुभमंगल करण्यांत सार्थकता मानतात. पतीला परमेश्वर मानणारी आमची आर्यस्त्री, पतिनिधनानंतर मरेपर्यंत त्याच भावनेनें राहते, पण बाईच्या देशांतील विधवा वय, कुलशील वगैरेचा विचार न करतां, वाटेल त्याच्याशीं 'कोर्टिंग' करते. दैवी आपत्तीचे आघात तापसीवृत्तीनें आत्मसंयमनानें सोसणारी आर्यविधवा कोणीकडे व पति जिवंत असतां त्याच्या छाताडावर काडीमोडीचा तुकडा फेंकून तिसऱ्याशीं रममाण होण्यांत स्वतंत्रता आहे असें मानणारी अनेक पतींची सौभाग्यवती कोठें ! आमच्या विधवांना पावित्र्य आणि सात्त्विकता आहे तर बाईच्या देशांतील वरील प्रकारच्या सौभाग्यवतींत अपवित्रता व अतिविषयता आहे.

हिंदुस्थानांत विधवांना अत्यंत सहानुभूतीनें वागविण्यांत येतें हें वर लिहिलेलेंच आहे. विधवाविवाहाला आतां बऱ्याच प्रमाणांत संमति मिळत चाललेली आहे. परंतु विधवाविवाह हा वेदकालीन होता याला अनुकूल अशीं स्मृतींत अनेक वचनें आहेत, हें पुढील विवेचनावरून स्पष्ट होणारें आहे.

विधवाविवाहपद्धति आमच्या भारतवर्षांत वेदकालापासून चालू आहे. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलांतील चाळीसाव्या सूक्तांतील पांचवा मंत्र या म्हणण्याची सत्यता पटवीत आहे. **"को वां शत्रुया विधवेव देवरं। मर्यं न योषा कृणुते सधस्थ आ ॥"** सायणाचार्यांनीं आपल्या सायणभाष्यांत—निरुक्तांत—वरील मंत्रांतील शब्दांचें स्पष्टीकरण करतांना असें म्हटलें आहे कीं, **'देवरः कस्माद् द्वितीयो वर उच्यते।'** निरुक्ताचार्य ऋषींनीं 'देवर' याचा अर्थ द्वितीय वर असा केला आहे इतकेंच नव्हे तर सायणाचार्यांनींही तसाच केलेला आहे. स्त्रियांनीं—विधवांनीं—पुनर्विवाह करावा असा आदेश ऋग्वेदांतच वरील मंडळांत आढळतो.

**'अघोरचक्षुरपतिघ्न्योधि शिवा पशुभ्यः सुमनः सुवर्चाः।**
**वीरसूर्देवृकामा स्योना शं नो भव द्विपदे शं चतुष्पदे ॥**

ऋग्वेद मंडल १०; सूक्त ८५ मंडल ४४

वरील मंत्रांतील देवृकामा हा अशा अर्थाचा सूचक आहे कीं, जरूर पडली तर स्त्रीनें पुनर्विवाह करावा. याला पोषक असाच एक मंत्र अथर्ववेदांत आहे.

**'अदेवृघ्न्य पतिघ्नी हैधि शिवा पशुभ्यः सुयमा सुवर्या।**
**प्रजावती वीरसूर्देवृकामा स्वोनेममग्निं गार्हपत्यं समर्थ ॥**

अथर्ववेद का. १४; सूक्त २; मंत्र १८

तैत्तेरिय आरण्यकांत पुनर्विवाह झालेल्या स्त्रीचें वर्णन उत्तम तऱ्हेनें दिलेलें आहे.

**"इयं नारी पतिलोकं वृणाना। निपद्यत उपत्वा मर्त्य प्रेतम्।**
**विश्वं पुराणमनुपालयंती। तस्यै प्रजां द्रविणं चेह धेहि ॥"**

तैत्तिरिय आ. ६, १, १३.

विधवांच्या पुनर्विवाहाला ज्याप्रमाणें आमच्या ऋषिमहर्षींनीं पूर्वींच संमति देऊन ठेविलेली आहे, त्याचप्रमाणें पुनर्विवाह झाल्यावर तिनें कसें पवित्र आचरण करावें याचीही पुढीलप्रमाणें आज्ञा केलेली आहे.

"या पूर्वं पतिं वित्त्वाथान्यं विन्दते परम् ।
पञ्चौदनं च तावजं ददातो न वियोषतः ॥"

अथर्ववेद कांड ९ अनुवाक ३ सूक्त ५ मंत्र २७.

पाराशरस्मृतींत कोणत्या स्त्रियांनीं पुनर्विवाह करावा अशाबद्दल पुढील उल्लेख आढळतोः—

नष्टे मृते परिव्रजते, क्लीबे च पतिते पतौ ।
पंचस्वापत्सु नारीणां, पतिरन्यो विधीयते ॥

नारदस्मृतींत पुनर्विवाहाला संमति सांपडते—

कन्यैवाक्षतयोनिर्वा पाणिग्रहणदूषिता ।
पुनर्भूः प्रथमा प्रोक्ता पुनः संस्कारमर्हति ॥

नारद अ. १२ श्लोक ४६.

वसिष्ठस्मृतींत देखील बालविधवाविवाहाला संमति दिलेली आहे.

पाणिग्रहे मृते बाला केवलं मंत्रसंस्कृता ।
सा चेदक्षतयोनिः स्यात् पुनः संस्कारमर्हति ॥

वेद, स्मृति, पुराणें या आमच्या धर्मग्रंथांत विधवा पुनर्विवाहाला पूर्णपणें संमति असून असे विवाह झालेले आहेत व होतही आहेत. आमच्या विवाह-संस्कारांत मग तो पहिला असो अगर दुसरा असो पावित्र्याचें कडक बंधन असतें. पाश्चात्य देशांतील लग्नबंधनाप्रमाणें त्यांत शिथिलता नाहीं. आमच्या विधवांना आमचा समाज उत्तम रीतीनें वागवीत असतांना, त्यांच्या उन्नतीकरतां नाना तऱ्हेच्या संस्था असतांना, बाई त्यांकडे दुर्लक्ष करून, नाहीं नाहीं ते आरोप व विकृत पर्यवसान करीत आहे.

बाई लिहिते कीं, हिंदुस्थानांतले लोक स्त्रियांना अत्यंत वाईट रीतीनें वागवितात, त्यांना काडीचेंही महत्व नसतें. बाईचें हें विधान आमच्या आर्यमहिलांचा अपमान करणारें आहे. आर्यस्त्रियांची योग्यता किती आहे व त्यांना किती मानानें आमचा समाज पूर्वीपासून वागवीत आला आहे, याची पाश्चात्य लेखकांनीं पुढीलप्रमाणें प्रशंसा केलेली आहे. Forbes आपल्या Oriental Memories नांवाच्या पुस्तकांत लिहितो कीं, The virtues and graces in their train form a delightful union of chastity, beauty, elegance, and intelligence. आर्यमहिलांच्या वेषांत साधुत्व आणि सौंदर्य यांचें

एकीकरण असून, सतीत्व, कांती, उत्कृष्टता व बुद्धि यांच्या मिश्रणाचें प्रतिबिंब स्पष्ट दिसतें. फ्रेंच लेखक Dubois एके ठिकाणीं लिहितो कीं, I would even go so far as to say that Hindu women are more virtuous than the women of more civilized countries. सुधारलेल्या देशांतील स्त्रियांपेक्षां हिंदुस्थानांतील स्त्रिया अधिक धर्मपरायण व शुद्ध आचरणाच्या असतात. डब्ल्यू. टेलर नांवाचे गृहस्थ आपल्या 'The thirty-eight years in India' या पुस्तकांतील पहिल्या भागांत ५१५ पानावर असें लिहितात कीं, I venture in short to say that in bearing character and refinement, the Lady of India is in all respects on an equality with her sisterhood in England and if we look beyoud the outward form and semblance, we seek to guage the higher qualities of the sex, we have only to refer to the records of a recent history and read the pages of Kaye and Malleson. The glorious achievements and noble bearing which on so many occasions and under such appalling dangers, so widely characterised the "Women of India" संक्षिप्तपणें मी असें म्हणण्याचें धाडस करतों कीं, हिंदुस्थानांतल्या स्त्रिया आचरणांत आणि सभ्यतेंत सर्व बाजूंनीं व दृष्टींनीं इंग्लंडांतील स्त्रियांच्या बरोबरीच्या आहेत. 'पण जेव्हां आम्ही बाह्य आकृति व सादृश्य याच्या पलीकडे जाऊन विचार करतों तेव्हां त्यांच्यांतील उच्चतर गुणांची ओळख पटते. इतिहासकार की आणि मॅलिसन यांचे हिंदुस्थानचे इतिहास याची साक्ष देत आहेत. यांचे इतिहास ज्योतिर्मय, वीरतापूर्ण कार्यें आणि उत्कृष्ट आचरण या सुरस स्त्रीकथांनीं भरलेले आहेत. भयानक स्थितींत स्त्रियांनीं दाखविलेला पराक्रम अवर्णनीयच आहे.

हिंदुसमाजाच्या आचारविचाराबद्दल देखील मोठमोठ्या विद्वानांनीं प्रशंसोद्गार काढलेले आहेत. वॉरन हेस्टिंग्सच्या चौकशीच्या वेळीं प्रसिद्ध वक्ता बर्क असें म्हणाला होता कीं 'The multitude of men does not consist of an object and barbarous population...........( they are) a people far ages civilized and cultivated; cultivated by all of polished life. :हिंदुस्थानांतील लोक रानटी नाहींत.

ते सुसंस्कृत आणि व्युत्पन्न बुद्धीचे आहेत. त्यांची........जीवनकला प्रबुद्ध आणि उन्नत आहे.

भारत-मातेच्या श्रेष्ठपणाबद्दल विद्वान परदेशस्थांचीं गौरवसूक्तें कितीतरी आहेत. तीं सर्व दिलीं असतीं परंतु स्थलसंकोचास्तव व पृष्ठांच्या मर्यादेस्तव देतां येत नाहींत याबद्दल दिलगिरी वाटत आहे.

बाई Mother India नांवाच्या प्रकरणांत अशीं असत्य व कुत्सित विधानें करीत आहे कीं, हिंदू स्त्रिया बाळंतपणांत अज्ञ आहेत. बाळंतपणाच्या पद्धति अत्यंत घाणेरड्या व तिरस्करणीय आहेत. दायांना हे लोक अस्पृश्य समजतात. दायांचा जो वर्ग आहे तो अस्पृश्य आहे. शिशुसंगोपन व प्रसूतिशास्त्र यांची हिंदूलोकांना मुळींच माहिती नाहीं. यामुळें हिंदुस्थानांत शिशूंची मृत्युसंख्या वाढत्या प्रमाणांत आहे. वंशागत रोग, ओलेंकोरडें जेवण, बालवयी विवाह, लहानपणींच कामुक व्यवहार यामुळें गर्भाशय वाईट होऊन मुलें रोडकीं व अशक्त जन्मतात. अशाच अर्थाचीं–जीं लिहिण्यासही लज्जा वाटेल अशीं अत्यंत खोडसाळ विधानें बाईनें केलेलीं आहेत.

आमचा धर्म व आयुर्वेदांतील सन्मान्य ग्रंथ यांच्यांत यासंबंधीं अनेक प्रकारचे उल्लेख आहेत. आमचें आयुर्वेदशास्त्र इतक्या उन्नतीला गेलेलें आहे कीं, आज त्याचाच अनुवाद परभाषेंत होऊन त्याच्या आधारें नवीन नवीन वैद्यकीय शोध लावण्याचा पाश्चात्यांचा खटाटोप चालू आहे. आयुर्वेदाबद्दल मोठमोठ्या 'वैद्यशास्त्रविशारदांनीं' प्रशंसापर उद्गार काढलेले आहेत. बाळंतपणाचें व गर्भधारणस्थितीचें जें हिडिस वर्णन बाईनें केलेलें आहे तें असत्य आणि अपमानकारक आहे. चरक, सुश्रुत, आणि वाग्भट या महत्वाच्या वैद्यक ग्रंथांत यासंबंधानें अत्यंत उपयुक्त सूचना व मंत्र आहेत. आमच्या स्त्रिया प्रसूतिशास्त्रांत अतिशय हुषार आहेत. वैद्यक शास्त्राच्या आधारें घरांतील अनुभवी बाई मातांचें बाळंतपण यशस्वी रीतीनें करीत असते. दायांच्या संबंधानें बाईनें जें लिहिलेलें आहे, तें खोडसाळपणाचें आहे. पाश्चात्य समाजांत दायांचें बंड फार आहे. आमच्या समाजांत नाहीं. आपलें सौंदर्य कमी होऊं नये म्हणून आपल्या पोटचा गोळा दाईच्या दुधावर पोसण्याची कल्पना व पद्धत अत्यंत वाईट आहे. दाईच्या दुधावर पोसली जाणारी संतति आनुवंशिक संस्कारांच्या दृष्टीनें संस्कृतिदृष्ट्या व पावित्र्यदृष्ट्या कमअस्सल होते अशी कितीतरी सुप्रजाजननशास्त्रज्ञांनीं सोदाहरण मीमांसा केलेली आहे.

बाळंतपणासंबंधींच्या हिंदूंच्या कल्पना विचित्र आहेत, असें बाई लिहिते. आमच्या प्राचीन समाजशास्त्रवेत्त्यांनीं केलेली समाजव्यवस्था, आश्रमांची उभारणी वगैरे गोष्टी इतक्या चांगल्या आहेत कीं यासंबंधानें बाईच्याच देशांतील ब्रह्मनिष्ठ थोरोच्या उद्गारांचा पुरावा बाईचे डोळे उघडल्याशिवाय राहणार नाहीं. हिंदुस्थानांतल्या माता गलिच्छ असतात असें बाई बरळते पण यासंबंधानें Forbes आपल्या Oriental Memories नांवाच्या ग्रंथांत लिहितो कीं No women can be more attentive to cleanliness than the Hindus स्वच्छतेकडे लक्ष देण्याच्या बाबतींत हिंदु स्त्रियांपेक्षां कोणत्याही स्त्रिया अधिक नाहींत.

बाई याच प्रकरणांत म्हणते कीं, हिंदुस्थानांत जी संतति उत्पन्न होते त्यांपैकीं दरवर्षीं वीसलाख मृत्युमुखीं पडते. जन्मानंतर एक महिन्यांत मरणाऱ्या मुलांची संख्या शेंकडा साठ असते. याशिवाय कित्येक मुलें मेलेलींच जन्मतात. या सर्वांचें कारण उपदंश रोग होय. हिंदुस्थानांत लहान मुलांची वाढती मृत्युसंख्या कां आहे याचें कारण बाईनें दिलेलें आहे तें शुद्ध मूर्खपणाचें आहे. मुलांची मृत्युसंख्या अधिक जर होत असेल तर ती दारिद्र्यामुळेंच होय. हिंदुस्थानांत पाश्चात्य देशांपेक्षां अविवाहित लोक कमी आहेत. विवाह अधिक होत असल्यामुळें जन्ममरणाचे आंकडेही अधिकच आहेत. परंतु मृत्यूचें कारण हें मात्र दारिद्र्यच आहे. इंग्लंडांत शेंकडा ४७ स्त्रिया विवाहित असतात; जर्मनींतल्या सवातीन कोटि स्त्रियांत ९८ लाख विवाहिता असतात व हिंदुस्थानांत चौदा कोटींपैकीं सात कोटी विवाहित असतात. संततिनिर्माणाचें प्रमाण पाहिलें तर असें दिसतें कीं, इंग्लंडांत एक हजार स्त्रिया २३४ मुलें प्रसवतात व हिंदुस्थानांत २७२ मुलें जन्माला येतात.

दारिद्र्यामुळें हिंदुस्थानांतील मुलें मरतात याचें दिग्दर्शन बऱ्याच लोकांनीं आपल्या ग्रंथांतून केलेलें आहे. आईबापांना आपलें पोट भरण्याची जेथें पंचाईत पडते, त्या देशांत अर्भकांच्या मृत्यूचें प्रमाण अधिकच सांपडतें. हिंदुस्थानची दरिद्री अवस्था कशी आहे हें लिहितांना डॉ. हंटर लिहितात कीं, 'The remaining 40 millions go through life on insufficient food.' चार कोटी लोक पोटभर अन्नाशिवाय कसें तरी आपलें आयुष्य वेंचीत असतात. हिंदुस्थानच्या पैशावर दुसरे लोक पोसत असल्यामुळें हिंदुस्थान दारिद्र्याच्या गर्तेत पडलेलें आहे. प. वा. वाच्छा लिहितात कीं, "That the costly foreign agency absorbs a large portion of

the revenue.' परदेशांतील तुरुंगांत असलेल्या कैद्यांना जें व जितकें अन्न मिळतें तितकें देखील हिंदुस्थानांतील लोकांना मिळत नाहीं. पाश्चात्य देशांतील कैद्यांत व हिंदुस्थानांतील स्वतंत्र लोकांत—खाण्याच्या दृष्टीनें—तीन पौंड तीन शिलिंग इतका फरक आहे. मग कोणत्या लोकांचें शारीरिक अधःपतन होईल बरें ! परदेशांत सत्तावन्न रुपये प्रत्येक माणूस खर्च करितो. तर दुर्दैवी हिंदू लोकांना ९॥ रुपयांत आपल्या एका वर्षाची गुजराण करावी लागते, आणि याचमुळें मृत्युसंख्येचें प्रमाण पुढीलप्रमाणें अधिक पडत आहे. एक हजारांत इ. स. १९०४, १९०५, १९०६, १९०७ मध्यें हिंदूप्रजेचें अनुक्रमें ३३·०५, ३६·१४, ३४·७३, ३७·१८ असें पडलें; व परदेशांतील कैद्यांचें वरील सालांचें मृत्यूचें प्रमाण दर हजारीं १८, १९, १९, १८ असें पडलें. हिंदुस्थानची सध्यांची प्रजा अत्यंत कंगाल स्थितींत आहे. British people who are living in extreme poverty....... at one hundred millions. जगप्रसिद्ध मेडिकल जनल लेन्सेट ( The Lancet, June 1901 ) लिहितो कीं, गेल्या दहा वर्षांत १९०००००० लोक अन्नावांचून व दहा लाख प्लेगामुळें मृत्युमुखीं पडले. एका ब्रिटिश कनलनें असें लिहिलें आहे कीं, ' मीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं असें पाहिलें आहे कीं, पोटाला अन्न न मिळाल्यामुळें लोकांनीं एक प्रकारच्या ठिसूळ दगडाची पूड करून आपली क्षुधा शमन केली. " अशी स्थिति ज्या हिंदुस्थानांत आहे, त्या हिंदुस्थानांत मृत्युसंख्या अधिक असणार नाहीं काय ? ज्या देशांतील लोक सुखी आहेत त्या देशांतील मृत्युसंख्या कशी कमी आहे हें पुढील प्रमाणावरून आढळून येईलच.

| दुदवी हिंदुस्थानांतील प्रांत | | सुखी देशांतील प्रांत | |
|---|---|---|---|
| १ बंगाल | २७·३७ | १ न्यूझीलंड | १०·५ |
| २ संयुक्त प्रांत | २९·५ | २ आस्ट्रेलिया | ११·३ |
| ३ पंजाब | ३०·७ | ३ स्वीडन | १४·१ |
| ४ मध्यप्रांत | ३९·९५ | ४ इंग्लंड | १४·९ |
| ५ मुंबई | ३३·३२ | ५ अमेरिका | १३·५ |
| ६ मद्रास | २१·९ | ६ क्वीन्सलंड | ८·१५ |
| ७ बिहार ओरिसा | ३२·८ | ७ टासमानिया | १०·७२ |
| ८ आसाम | २८·६९ | ८ व्हिक्टोरिया | १२·६ |
| ९ सर्व हिंदुस्थान | २९·१० | ९ डेन्मार्क | १३·५ |

मृत्यूचें कारण बाईनें उपदंशजन्य रोग असें दिलेलें आहे; पण या बाबतींत मागील प्रकरणांत लिहिलें असल्यामुळें द्विरुक्ति करण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानांत ज्या वेळीं स्वातंत्र्य होतें त्यावेळीं शारीरिक उन्नती होती. आज तें स्वातंत्र्य गेलें, ती शारीरिक उन्नति गेली. इंग्रजी सत्ता जेथें जेथें आहे तेथें तेथें मूळ रहिवाशांची संख्या घटलेलीच दिसते. या म्हणण्याच्या पुष्टीकरितां मि. मुकर्जी यांच्या ' A Dying Race ' या ग्रंथांतील पुढील उदाहरणच पुरे आहे. इंग्रजांची वसाहत असलेलें पॅसिफिक महासागरांत एक न्यूझीलंड नांवाचें बेट आहे. त्या बेटांतील रहिवाशांना ' माउरीज ' असें म्हणतात. या वसाहतींतील मूळ रहिवाशांची संख्या कमी होत चालली असून कांहीं दिवसांनीं मूळ जातच शिल्लक राहणार नाहीं असें वाटतें. मूळ प्रचंड लोकसंख्येपैकीं आज ४० हजारच लोक शिल्लक आहेत; व इंग्रजांची लोकसंख्या या वसाहतींत आठ लाख झालेली आहे. असें एकच इंग्रजी सत्तेचें उदाहरण आहे असें नाहीं, तर सर्वच जित राष्ट्रांची अशीच अवस्था आहे. स्पेन लोकांनीं ( Spaniards ) जेव्हां बेटांतील लोकांना जिंकून त्या ठिकाणीं आपली वसाहत केली केव्हां थोडक्याच दिवसांत बेटवासियांची संख्या एक चतुर्थांशदेखील राहिली नाहीं. अमेरिकेंत मूळ रहिवाशांची ( Red Indians ) संख्या मोठ्या मुष्कीलीनें दोन लाख राहिलेली आहे, व गोऱ्यांची सात लाख आहे. हेंच प्रमाण आफ्रिकेंतही आहे. जेते जितांची काळजी घेत नसल्यामुळें हें सर्व घडतें. जीं राष्ट्रें स्वतंत्र आहेत त्या राष्ट्रांकडे पाहिलें आणि परतंत्र राष्ट्रांकडे, जातींकडे, तिच्या सांपत्तिक स्थितीकडे, आरोग्याकडे पाहिलें म्हणजे आम्ही म्हणतों त्याचप्रमाणें दृष्टोत्पत्तीस आल्याशिवाय राहणार नाहीं. मार्शल म्हणतो कीं, ' The production of wealth is but a means to the sustenance of man, to the satisfaction of his wants, and to the development of his activities, physical, mental and moral.' संपत्तीचें उत्पादन हेंच मनुष्याचें उपजीवन, त्याची जरूरी भागविण्याचें साधन, शारीरिक, मानसिक व नैतिक उन्नतीचें साधन होय. हिंदुस्थानची आज जी शारीरिक, मानसिक स्थिति थोडीशी खालावलेली आहे तिचें कारण, धर्म, समाजरीति, बालविवाह वगैरे कांहीं नसून दारिद्र्य ! दारिद्र्य ! दारिद्र्य हेंच आहे. या प्रकरणाला बाई **पापाचा मोबदला** म्हणते परंतु आम्ही या प्रकरणाला **दारिद्र्याचा परिणाम** होय असेंच उत्तर देतों !

नववें प्रकरण 'गोषांत' Behind the veil या नांवानें लिहिलें असून त्यांत बाईनें हिंदुस्थानांत असलेल्या पडदा चालीवर खूपच टीका केलेली आहे. गोषाची ऊर्फ पडद्याची पद्धति हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं सर्व वरिष्ठ व कनिष्ठ जातींत आहे असें बाईनें विधान केलेलें आहे. पडद्यांत असणाऱ्या स्त्रिया पंडु-रोगी, अशक्त, बाहेरच्या जगाची कांहींच माहिती नसलेल्या अशा असतात. या पडदा पद्धतीमुळें स्त्रियांत क्षयरोग फैलावतो. यामुळें हिंदुस्थानांत शेंकडा चाळीस स्त्रिया मृत्युमुखीं पडतात. अखिल हिंदुस्थानांत सध्यां हिंदू व मुसलमान मिळून चार कोटी स्त्रिया पडद्यांत आहेत. लग्नानंतर स्त्री जी पडद्यांत जाते ती मेल्या-नंतरच पडद्याच्या बाहेर येते. अशा पडदानशीन स्त्रियांची संख्या ११२५०००० पासून १७२९०००० पर्यंत आहे. पडद्यांत असलेल्या स्त्रिया निर्बल व रोगी असतात. पडद्याची पद्धत सर्वथैव वाईट आहे यांत शंकाच नाहीं. ही पद्धत आमच्या भारतवर्षांत पूर्वीपासून नव्हती. परंतु जेव्हां मुसलमानांची रियासत सुरू झाली, त्यावेळीं ह्या पद्धतीचा जन्म झाला. पडद्याची पद्धत मुसलमान समा-जांतच अधिक आहे. पडद्यांच्या संबंधानें बाईनें जी कारणपरंपरा दाखविली आहे ती मात्र अत्यंत खोडसाळपणाची आहे. पडदा पद्धत म्हणजे स्त्रियांवर एक प्रका-रची पुरुषी जबरदस्ती आहे असें बाई विधान करते. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. यासंबंधानें हॉउस ऑफ लॉर्डस्‌मध्यें वॉरन हेस्टिंगच्या वेळीं प्रसिद्ध वक्ता शेरिडन म्हणाला होता कीं, "It is not the thin veil alone that hides them, but in the inmost recess of their zanana they are kept from public view by those reverenced and protected walls which, as Mr. Hasting and Sir Elijah Impey, admit are held sacred even by the ruffian hand of warfare, or the more uncourteous hand of the law. But, in this situation they are not confined by a mean and selfish policy of man, or from a coarse or sensual jealousy. Enshrined, rather than immured, habitation and retreat is a sanctuary, not a prison, their jealousy is their own—a jealousy of their own honour, that leads them to regard liberty as a degra-dation, and the gaze of even admiring eyes on expia-

ble pollution to purity of their fame and the sanctity of their honor. स्त्रिया या पडद्यांत बुरख्यांत असतात असें नव्हे. त्या आपल्या जनानखान्यांतील चार भिंतींच्या आंत असतात याचें कारण त्यांना कोणीं पाहूं नये. हेस्टिंग व सर एलिजा इम्पे म्हणतात कीं, या चार भिंती म्हणजे शत्रूची मलिन प्रवृत्ति व कायद्यांचीं कठीण विधानें यांची पवित्रता होय. पडद्यांत स्त्रिया, पुरुषांच्या स्वार्थी व नीच हेतूच्या परिपूर्णतेकरतां प्रणयमात्सर्यानें कैद केल्या जात नाहींत, त्यांचें घर म्हणजे कैदखाना नसून अत्यंत पवित्र असें स्थान असतें. पडद्यांत त्या आनंदानें राहातात. त्यांत त्यांना प्रतिष्ठा वाटते. सारांश बाई लिहिते कीं, पडदा म्हणजे कैदखाना, विषयविलासाचें स्थान होय. पडदापद्धत बऱ्याच लोकांना आवडत नाहीं. पडद्याची पद्धत असावी असें कोणीही नवमतवादी माणूस म्हणणार नाहीं. पडद्याची पद्धत जरी वाईट असली तरी बाई म्हणते त्याप्रमाणें पडदा म्हणजे कैदखाना होय हें मात्र खोटें होय. आमच्या इकडच्या स्त्रिया बाईच्या देशांतील स्त्रियांपेक्षां विनयशील असतात. परक्या पुरुषाबरोबर नाचणें, त्यांच्याबरोबर सहल करणें वगैरे प्रकार आमच्या समाजांत अनीतीचे समजले जातात. ज्या ज्या समाजांत ही पडदापद्धत आहे त्या त्या समाजांतूनही ही चाल बंद करण्याचे जोराचे प्रयत्न चालू आहेत. कांहीं मुसलमान लोकांनीं या बाबतींत पुढाकार घेतला आहे. ज्या ज्या ठिकाणीं स्त्रियांच्या परिषदा भरल्या त्या त्या परिषदेंत पडद्याची पद्धत बंद करण्याचे ठराव मांडण्यांत येऊन त्या ठरावाची अंमलबजावणी चालू आहे.

दहावें प्रकरण अविवाहित मुली (Women the spinsters) असें आहे. या प्रकरणांत बाई असें लिहिते कीं, हिंदुस्थानांत सुशिक्षित स्त्रिया फार कमी आहेत. शिक्षणाचें प्रमाण शेंकडा एक पेक्षांही कमी पडतें. इ. स. १९२१ मध्यें सुशिक्षित स्त्रियांचें प्रमाण हजारांत अठरा असें होतें. व सन १९११ सालीं हजारांत दहा असें होतें. इंग्लंडच्या विश्वविद्यालयांतून विद्यासंपन्न होऊन आलेला हिंदी विद्यार्थी हिंदुस्थानच्या तरुणीशीं विवाह करावयास कबूल नसतो. त्याच्या मतानें हिंदुस्थानांतील स्त्रिया ह्या दहाव्या शतकांतील स्त्रिया होत. पाश्चात्य संस्कृतीच्या तेजानें दिव्य दृष्टि आलेला हिंदुस्थानांतील विद्यार्थी कधीं कधीं आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या स्त्रीशीं विवाह करतो. मुंबई प्रांतांत स्त्रीशिक्षण इतर प्रांतांपेक्षां अधिक आहे. या प्रांताच्या अहवालांत असें म्हटलें आहे कीं, सुशिक्षित तरुण सुशिक्षित तरुणीशीं विवाह करूं इच्छितो. आपल्या मुलीला तो ह्याच दृष्टीनें शिक्षण देण्यास

प्रवृत्त होतो पण हेंच शिक्षण विवाहानंतर बंद होतें. आसामचा सरकारी अहवाल असें सांगतो कीं, आईबाप आपल्या मुलीला एवढयाच करतां शिक्षण देतात कीं तिला उत्तम पति मिळावा. असा पति लाभल्यानंतरही तिच्या नशिबाचा पडदा चुकत नाहीं. या लग्नाकरतां अतिशय खर्च होऊन मुलीचा बाप कर्जबाजारी बनतो. कलकत्ता विश्वविद्यालयाचे सदस्य हरिनाथ घोस असें लिहितात कीं, हिंदुस्थानांतले लोक मुलांच्या शिक्षणाची फार काळजी घेतात. याचें कारण असें कीं आपल्या वृद्धावस्थेंत आपलें जीवन सुखकर जावें. मुलींना जास्त शिक्षण न देण्याचें कारण असें कीं मुली या विवाहानंतर दुसऱ्याच्या घरीं जातात. विवाहानंतरच्या शिक्षणाचा विचार करतां ही गोष्ट सध्याच्या भारतकालीन परिस्थितींत असंभवनीय आहे. बालपत्नीचें लग्न होऊन ती सासरीं गेली म्हणजे तिच्यावर सासु सासरा, नणंददीर व घरांतील देवदेवता यांच्या सेवेचा बोजा पडतो. ती त्वरित गर्भवती होऊन तिची शक्ति क्षीण होते. इतकेंही करून जर तिला शिक्षण संपादन करण्याची इच्छा झाली तर हें कार्य स्त्रियाच करतात. याचमुळें शिक्षकिणींची हिंदुस्थानांत अडचण असून ज्या ज्या ठिकाणीं स्त्रियांचीं विद्यालयें आहेत, त्या त्या ठिकाणीं अध्यापिका मिळावयास फार परिश्रम पडतात. विद्यालयांत जें शिक्षण मिळविलें जातें त्या शिक्षणाचा लग्नानंतर मुळींच उपयोग होत नाहीं. अशा स्त्रियांना क्रांतिकारक परिस्थितीशीं झगडावें लागतें. मुलीचें सासरघर म्हणजे जुन्या आचारविचारांचें घर असतें. अशा घरांतील मुलें निर्बल, अपरिवर्तनशील, दुबळ्या मनाचीं अशीं असतात. मि. मुकर्जी असें म्हणतात कीं, हिंदुस्थानांतील सामाजिक प्रणाली अशी आहे कीं, मुलींचा विवाह बारा वर्षांनंतर होत असल्यानें तिच्या शिक्षणाला मिळावा तसा अवसर मिळत नाहीं. बहुधा शंभरांत त्र्याहात्तर मुली अक्षराचें पुरेसें ज्ञान होण्यापूर्वी त्यांना शाळा सोडावी लागते, आणि म्हणूनच शंभरांत एक स्त्रीला प्राथमिक शिक्षणापुढें मजल गांठतां येते. शैक्षणिक उन्नति जी थोडीशी हिंदुस्थानांत दिसून येत आहे तिचें सर्व श्रेय, इंग्रज सरकार, अमेरिकन मिशनरी व प्रागतिक मताचे मूठभर लोक यांच्याकडेच आहे. परंतु यांना देखील बऱ्याच लोकांचा विरोध सहन करावा लागतो. या विरोधामुळें शंभरांत बारा मुलींना प्राथमिक शिक्षण द्यावयाचें असेल तर अजून जवळ जवळ एक शतकाचा काळ ओलांडला पाहिजे. हिंदुस्थानांत शिक्षण घेण्यालायक पंधरा लक्ष मुली असून फक्त ३० हजार मुलीच शाळेंत जातात. मुंबई प्रांतांत सन १९२४।२५ मध्यें स्त्रीसंख्येंत शेंकडा २·१४ हें प्रमाण पडलें. सर्व हिंदुस्थानांत हिंदूंमध्यें नऊ दशांश व

मुसलमानांत १·४ हें मुलींच्या शिक्षण घेण्याचें प्रमाण आहे. याला कारण पडद्याची पद्धत, घरांतील जुन्या चालीरीती आणि स्त्रीशिक्षणाला विरोध व बालविवाह हे होत. स्वर्गांमधील देवाची व पृथ्वीवरील देवतांची सेवा करणें हेंच हिंदुस्थानांतील स्त्रियांचें ध्येय असल्यामुळें हिंदुस्थानांत अशिक्षित स्त्रियांची संख्या अधिक आहे.

मिस मेयोच्या म्हणण्याचें तात्पर्य असें कीं, हिंदुस्थानांत शिक्षणाकरतां अविवाहित राहणाऱ्या मुली मुळींच नाहींत व विवाह झाल्यावर शिक्षण घेणें त्यांना अशक्य असतें. आमच्या स्त्रीशिक्षणाचा असा आदर्श आहे कीं, मुलगी ही आदर्श गृहिणी व्हावी. पाश्चात्य स्त्रियांप्रमाणें शिक्षण घेऊन दुकानांत, कारखान्यांत अशा निरनिराळ्या ठिकाणीं नोकऱ्या करण्याकरतां त्यांना शिक्षण देण्यांत येत नाहीं. पाश्चात्य स्त्रीशिक्षणांत व आमच्या स्त्रीशिक्षणांत हाच फरक आहे. बाई लिहिते कीं, आज जें थोडेंबहुत शिक्षण मिळत आहे तें इंग्रज सरकार व मिशनरी यांच्यामुळेंच होय. याचा अर्थ असा कीं, हिंदुस्थानांत इंग्रज सरकार व अमेरिकन मिशनरी येण्यापूर्वी आमच्या स्त्रिया अशिक्षित होत्या. गार्गी, मैत्रेयी, अरुंधति वगैरे ऋषिपत्नि तत्त्वज्ञानांत किती प्रवीण होत्या याचें ज्ञान बाईला नाहीं, ही आश्चर्याची गोष्ट नव्हे. कारण बाईला आपल्या अमेरिकन बंधुभगिनींपुढें आमच्या वाईट गोष्टीच मांडावयाच्या होत्या. इतकेंच नव्हे तर चांगल्या गोष्टीही तिनें विपर्यस्त स्वरूपांत मांडून हिंदुस्तानची नालस्तीच तिला करावयाची होती.

हिंदुस्थानांत इंग्रज सरकार स्थापन होण्यापूर्वी हिंदुस्थान सर्व दृष्टींनीं उन्नत होता. मि. हेवेल यासंबंधानें आपल्या—“ Ideals of Indian Art ” या पुस्तकांत लिहितो कीं “It was about the beginning of Christian era that the great universities of northern India in which many schools of philosophy were combined with schools of painting and sculpture provided Asiatic Art once and for ever with a philosophic basis and created Indian divine ideal in art ” याचा अर्थ असा कीं, ख्रिस्ती युगाच्या सुरुवातीपासून उत्तर भारतांत मोठमोठीं तत्त्वज्ञानाचीं विश्वविद्यालयें होतीं. त्यांना जोडूनच चित्रकला व खोदकला याही शिकण्याच्या शाळा होत्या. या संयुक्त शिक्षणपद्धतीमुळें आशिया खंडांतील

कला, अर्थात् शिक्षण तत्त्वज्ञानावरच अवलंबून होतें हें सिद्ध होत आहे. पूर्वी जें आमचें शैक्षणिक ध्येय होतें, तेंच आजही आमच्या डोळ्यांपुढें आहे. सध्यां शिक्षणाचें जें ध्येय आहे, तें सर्वस्वी पाश्चात्य असून असल्या ध्येयापासून आमच्या चालत आलेल्या पवित्र शैक्षणिक संस्कृतीचें अधःपतन होत चाललें आहे. हल्लींची स्त्रीशिक्षणाची दिशा हिंदू संस्कृतीच्या दृष्टीनें दूषणीय आहे.

सुधारलेल्या राष्ट्रांत जी स्त्रीशिक्षणपद्धति आहे त्या पद्धतीमुळें तिकडील स्त्रियांचें शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक व नैतिक अधःपतन होत आहे. बाईच्या देशांतील स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत मिस् ॲना ए. रॉजर्स आपल्या 'Why American Marriages Fail या पुस्तकांत लिहिते कीं, "The Education that neglects to emphasize frugality, perseverance, honesty, reliability, consideration, uprightness, for the sake of a purity intellectual training because of the supposed necessity of the latter to the earning of a livelihood is a cruel mistake" याचा अर्थ असा कीं, ज्या शिक्षणानें मनावर सांसारिक काटकसर, चिकाटी, प्रामाणिकपणा, सचोटी, प्रगल्भ विचार, सरळपणा, इत्यादि गोष्टींचा संस्कार होत नाहीं तें शिक्षण निरुपयोगी होय, इतकेंच नव्हे तर तें घातुकही आहे. हल्लींचें अमेरिकेंतील स्त्रीशिक्षण शीलसंवर्धनाचे बाबतींत कुचकामाचें आहे. पाश्चात्य देशांतील स्त्रीशिक्षणपद्धति कशी वाईट आहे व त्यामुळें पाश्चात्य राष्ट्राचें कसें अधःपतन होत चाललें आहे, या विषयींचें वर्णन एका बाईनें नुकतेंच केलेलें आहे. ती स्पष्टपणें म्हणते कीं, 'प्रचलित स्त्रीशिक्षणपद्धति स्त्रियांच्या व समाजाच्या दृष्टीनें अत्यंत विध्वंसक अशी आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींपैकीं बऱ्याच मुली क्षयानें पछाडलेल्या असतात. स्त्रीशिक्षणपद्धतीनें नैतिक, आध्यात्मिक व कौटुंबिक अधःपतन होत असून याचा परिणाम राष्ट्राला भोगावा लागत आहे. हल्लीं पाश्चात्य देशांत मुलींना जें शिक्षण देण्यांत येतें तें, 'नोकरी करण्याला तयार' अशा प्रकारचें असतें. यामुळें पाश्चात्यांचें सांसारिक जीवन उतरणीला लागत आहे. स्त्रियांच्या चळवळी देखील याच दृष्टीनें चालत असल्यामुळें पाश्चात्य समाजापुढें एक मोठा थोरला प्रश्नच येऊन पडलेला आहे. सर्व बाबतींत पुरुषांचेंच अनुकरण करावयाचें हें एकच ध्येय सध्यांच्या स्त्रीशिक्षणाचें व चळवळीचें आहे. आपण स्त्रीत्व टाकून पुरुष व्हावें ही मोहिनी सध्यां पाश्चात्य स्त्रियांच्या मनावर पडलेली आहे. स्त्री व पुरुष यांच्यांत नैसर्गिक भेद आहेत, या निसर्गदत्त गोष्टींची

पाश्चात्य देशांतील स्त्रियांना भुरळ पडलेली आहे. स्त्रियांना पुरुषी शिक्षण देणें सर्व बाजूंनीं घातुकच आहे, असें निरनिराळ्या पाश्चात्य मानसशास्त्रवेत्त्यांचें म्हणणें आहे. युरोपांतील पुरुषी शिक्षणपद्धतीनें व पुरुषी राहणीनें स्त्रियांचें पुरुषीकरण ( Masculinazation ) होत आहे. ही गोष्ट अत्यंत वाईट आहे.

ज्या शिक्षणानें स्त्रीस्वभावविशेषाचा परिपोष होत नाहीं, असें जर कोणतें शिक्षण असेल तर प्रचलित पाश्चात्य स्त्रीशिक्षण होय. स्त्रीपुरुषांचीं कार्यक्षेत्रें निराळीं आहेत. स्त्रीपुरुष हीं गुणांनीं व स्वभावविशेषांनीं परस्परांना पोषक आहेत. स्त्रियांचें कर्तव्य गृह व कुटुंबरक्षण हें आहे; आणि पुरुषांचें आपल्यावर अवलंबून असलेल्या बायकामुलांचा ,चरितार्थ, उद्योगधंदा करून चालविणें असें आहे. समतावाद व उपयुक्ततावाद या तत्त्वज्ञानानें पाश्चात्य देशांतील, विशेषतः इग्लंडांतील, विद्यालयें म्हणजे नोकर व हमाल बनविण्याचे कारखाने आहेत, असें मेरिक ब्रुथ यानें स्पष्ट म्हटलेलें आहे.

सध्यांच्या विद्यार्थिनींबद्दल लिहितांना डॉ. ऑशबेला केनली या विदुषी आपल्या ( Feminism and Sex Extinction ) या ग्रंथांत लिहितात कीं, सध्यांच्या इंग्लंडांतील शाळा व कॉलेजें ह्यांतील अभ्यासाच्या बोजानें स्त्रियांची संचित शक्ति क्षीण केली जाते, व वंशरक्षणाचीं कार्यें करतांना या शक्तीचा जो उपयोग व्हावयाचा तो होत नाहीं. ह्यामुळेंच शिकलेल्या स्त्रियांत माता होण्याची पात्रता व लायकी कमी होत चालली आहे. अमेरिकेंतील प्रसिद्ध गायनाकॉलजिस्ट डॉ. गेलर्ड थॉम्स तर असें म्हणतो कीं, '**अमेरिकेंत सध्यां शेंकडा चारच स्त्रिया माता होण्यास लायक असतात.** दुसरा एक अमेरिकेंतीलच प्रो. स्टॅन्ले हॉल म्हणतो कीं, अँग्लो सॅक्सन वंशांतील स्त्रिया मातृपदाची जबाबदारी स्वीकारण्यास दिवसेंदिवस अधिक नालायक होत चालल्या आहेत. याचें मुख्य कारण म्हणजे सध्यांची स्त्रीशिक्षणपद्धति हेंच होय.

प्रो. सी. जे. इंगलमन याच बाबतींत लिहितात कीं, सध्यां अमेरिकेंतील पुरुषी शिक्षण, पुरुषी रहाणी व पुरुषी जीवन यांमुळें स्त्रियांच्या स्नायूंची रचना फार वाढत असते व या वाढीचे दुष्परिणाम त्यांना बाळंतपण व शिशुसंगोपन करते वेळीं सोसावे लागतात. हॅवलॉक एलीस आपल्या ग्रंथांत कडक भाषेंत लिहितो कीं, " देशाचें आरोग्य व सामर्थ्य या दोन गोष्टींशीं स्त्रियांचीं कर्तव्यें त्यांच्याकडून नीट होणें व स्त्रियांचें समाजांतील कार्य यांचा अत्यंत निकट संबंध आहे.

स्त्रियांच्यापुढें पुरुषी ध्येय उत्पन्न करून त्यांचें जर पुरुषीकरण झालें तर त्याचा वाईट परिणाम त्यांच्यावर व त्यांच्या संततीवर झाल्यावांचून रहात नाहीं." सध्यां पाश्चात्य देशांत स्त्रियांना आदर्श बनविण्याच्या शाळा नाहींतच, असें म्हटलें तरी चालेल. विलायतेंतील आंकडेशास्त्रज्ञ असें सिद्ध करतात कीं, कॉलेजांत शिकणाऱ्या १०० मुलींस पन्नासच मुलें होतात. वंशरक्षणाच्या दृष्टीनें हें प्रमाण ३०० असें पडावयास पाहिजे आहे. हल्लींच्या स्त्रीशिक्षणाचें पर्यवसान वंशवृद्धींत होण्याऐवजीं वंशक्षयांतच होत असतें. एक लेखक तर असें म्हणतो कीं, "सध्यांच्या पाश्चात्य देशांतील स्त्रीशिक्षणाच्या पद्धतीचा असा परिणाम झाला आहे कीं, त्या माता बनण्याऐवजीं नोकर होतात. यामुळें गृहसंवर्धन व कुटुंब-रक्षण होण्याऐवजीं हॉटेलसंवर्धन व कुटुंबनाश होत असतो. अशा प्रकारची स्त्रीशिक्षणाची पद्धति वाईट असल्यामुळें पाश्चात्य देशांतील शिक्षणवेत्ते असें म्हणत आहेत, "कीं स्त्रियांना गृहोपयोगी शिक्षण ( Domestic science ) अवश्य दिलें पाहिजे व तेंदेखील वयाच्या १९ वर्षांच्या आंत."

वरील विचार आमच्यांत रूढ आहेत आणि पाश्चात्य देशांत त्यांचा नुकताच निनाद सुरू झाला आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. बाई म्हणते, हिंदु स्त्रियांना व्यायाम करण्याची बंदी असते. वस्तुतः स्त्रियांना जीं गृहकृत्यें करावयाचीं अस-तात त्यामुळें त्यांना पुरेसा व्यायाम मिळतो. पाश्चात्य देशांत भलते सलते व्यायाम घेऊन स्त्रियांची काय स्थिति झाली आहे याचें दिग्दर्शन अनेक शरीर-शास्त्रवेत्त्यांनीं केलेलेंच आहे. यासंबंधीं हॅवलॉक एलीस लिहितो—स्त्रियांना व्यायाम पाहिजे ही गोष्ट खरी आहे; परंतु फूटबॉल, क्रिकेट, अधिक प्रमाणांत टेनिस, सायक्लिंग, पोलो वगैरे खेळ त्यांना मुळींच उपयोगी नाहींत. हे मर्दानी खेळ स्त्रियांच्या पुरुषीकरणाला पोषक होतात. वरील खेळांची आवड असलेल्या स्त्रियांच्या शरिरावर फारच भयंकर परिणाम झालेले आढळतात व हे परिणाम त्यांच्या संततीला भोगावे लागतात.

बाईच्या म्हणण्याचा मथितार्थ असा कीं, शिक्षण संपादन करावयाचें असेल तर अविवाहित राहणें अवश्य आहे. विवाहानंतर शिक्षण संपादन करणें ही संभव-नीय गोष्ट नाहीं. पण शिक्षणासाठीं अविवाहित राहून, संसाराला निरुपयोगी शिक्षण मिळविण्यापेक्षां विवाहित होऊन संसारक्षम शिक्षण मिळविण्यांतच अधिक फायदा आहे असें आम्ही समजतों. अविवाहित स्थितींत शिक्षण संपादन करतांना तरुणीचें नैतिक अधःपतन कसें होतें व त्यामुळें शिक्षण संपादून संसारांत पडल्या-

वर कौटुंबिक सौख्य पतिपत्नींना कसें मिळत नाहीं ! ह्यासंबंधीं खुद्द अमेरिकेंतील लेखकांनीं अनेक ठिकाणीं लिहून ठेविलें आहे. वॉल्टर कॅल्वी यानें आपल्या The Great Unmarried या पुस्तकांत Hundreds of women remained single in our destroyed civilisation because they have never been asked for असे स्पष्ट उद्गार काढले आहेत. अमेरिकेंतील सुधारणा इतक्या भिकार स्थितीपर्यंत पोंचली आहे कीं त्या समाजांतील हजारों स्त्रियांना पति मिळणें कठीण होऊन बसलें आहे. याचें कारण उघड असें कीं, त्या संसार करावयास नालायक असतात. अमेरिकेंत ज्या अविवाहित स्त्रिया आहेत त्यासंबंधानें Olivesch Neing लिहितो "Side by side with the parasatic women seeking only increased pleasure and from her relation with a man याचा तात्पर्यार्थ असा कीं, **अमेरिकेंतील अविवाहित स्त्रिया उनाड मैना असतात. सुखोपभोग आणि चैन करण्यासाठीं नवे नवे पुरुष गांठण्याकडेच त्यांचें लक्ष असतें.** हल्लींच्या अमेरिकन शिक्षणपद्धतीनें समाजाचें होत असलेलें अधःपतन पाहून तें टाळण्याकरतां ज्या ज्या लोकांनीं उपाययोजना सुचविल्या आहेत त्यांपैकीं एकाची अशी जोराची मागणी आहे कीं, Girls should be educated for marriage कौटुंबिक सौख्य ज्यानें मिळेल असेंच शिक्षण मुलींना देण्यांत आलें पाहिजे. आमच्या भारतवर्षांत याच पद्धतीचें शिक्षण देण्यांत येत असे व हल्लींही तशाच पद्धतीनें देण्यांत यावें अशा प्रकारची चळवळ इकडील प्रागतिक लोक करीत आहेत. या बाबतींत चालू शतकांत बाईच्या देशांतील समाजशास्त्रज्ञांचें लक्ष लागलें आहे. आज अमेरिकेंत जें नैतिक अधःपतन चालू आहे, त्या अधःपतनाला आळा बसावा म्हणून लग्नें लवकर करण्यांत यावीं असें तिकडील समाजधुरीण स्पष्टपणें म्हणू लागले आहेत, हें बाईनें लक्षांत ठेवावें. अविवाहित राहिलेल्या पाश्चात्य देशांतील स्त्रिया किती अनीतिमान असतात हें पुढील आंकड्यांवरून वाचकांच्या लक्षांत येईल. विवाहापूर्वीं झालेल्या संततीचें प्रमाण पुढें दिलें आहे.

| सन | | सन | |
|---|---|---|---|
| १९१४ | ३७३२९ | १९१७ | ३७०१० |
| १९१५ | ५४२६३ | १९१८ | ४१४५२ |
| १९१६ | ३७६७९ | १९१९ | ४१८७६ |

वरील प्रमाणावरून पाश्चात्य देशांतील स्त्रिया किती बहकलेल्या असतात, हें आढळून येईल. आधुनिक पाश्चात्य संस्कृतीप्रमाणें शिक्षणाकरतां अविवाहित राहून समाज अधोगतीला नेण्यापेक्षां आमच्या श्रेष्ठ संस्कृतिप्रमाणें विवाहापूर्वी जरुरीचें सुगृहिणी बनविणारें शिक्षण संपादून विवाह करणें यांतच भारतमातेचें श्रेष्ठत्व आहे.

आर्य स्त्रियांना हिंदुस्थानांत मुळींच किंमत नाहीं, हें बाईचें असत्य विधान व तिनें आतांपर्यंत केलेली त्यांची नालस्ती याही प्रकरणांत तिनें केलेली आहे. भारतवर्षांत आर्यमहिलांना अत्यंत श्रेष्ठ मानलें जातें. इतकेंच नव्हे तर त्यांचा दर्जाही इतर कोणत्याही देशांतील स्त्रियांपेक्षां फारच मोठा आहे. याचें वर्णन विद्यावागीश ज्ञाननिधि डॉ. भांडारकर यांनीं आपल्या Social History of India या ऐतिहासिक ग्रंथांत उत्तम रीतीनें केलेलें आहे. प्रो. विल्सन यानें असे उद्गार काढलेले आहेत कीं, In no nation of antiquity were women held in so much esteem as amongst the Hindus. अत्यंत प्राचीन कालीं कोणत्याही राष्ट्रांत स्त्रियांना मान मिळत नसे अशा कालापासूनच भारतभूमींतच आर्यस्त्रियांना मानमरातबानें व श्रेष्ठ भावनेनें वागविण्यांत येत असे व आहे. परंतु पाश्चात्यसमाजांत पूर्वी स्त्रियांची अत्यंत वाईटच स्थिति होती.*

ग्रीक संस्कृतीचा इतिहास असें सांगतो कीं पत्नी म्हणजे नवऱ्यानें पैशानें ( Mudium ) खरेदी केलेली एक स्त्री होय. ग्रीक स्त्रियांची स्थिति सर्व साधारणपणें अत्यंत कनिष्ठ अशी होती. स्त्रीला मरेपर्यंत परावलंबीच रहावें लागत असे. स्त्रीला स्वतंत्रता असतां कामा नये असा ग्रीक लोकांचा करडा कटाक्ष होता. विवाह म्हणजे संतति निर्माण करण्याचें साधन होय, असें हे लोक मानीत असत. पति घरांत नसतांना जर एकादा पाहुणा घरीं आला तर त्याच्याशीं तिला बोलण्याची सक्त मनाई होती. स्त्री म्हणजे भोग्य वस्तु होय अशी समजूत ग्रीक संस्कृतीला पूर्णपणें मान्य असल्याचें लॉर्ड केम्स यांनीं आपल्या Progress of the Female Sex या ग्रंथांत लिहिलेलें आहे. आमच्या समाजांत वेश्यागमन अत्यंत निंद्य व अनीतिजनक मानलें आहे परंतु याच काळीं वेश्यागमन म्हणजे धार्मिक भावना होय असें इतिहासकार लॅकी यानें आपल्या History

---

* ‘ पाश्चात्यसमाज व स्त्रिया ’ ‘ गृहलक्ष्मी ’ अंक ३ रा पान ५१ वरील माझा लेख पहा.

of European Morals या ग्रंथाच्या दुसऱ्या भागांतील २९१ व्या पानावर स्पष्टपणें म्हटलेलें आहे. ग्रीक स्त्रियांच्यापेक्षां वेश्यांनाच अधिक मानानें वागविण्यांत येत असे असें 'झोनाफोन' नें आपल्या आठवणींत व दुसऱ्या एका ग्रंथकारानें The Position of Women या ग्रंथांत लिहिलेलें आहे. जी ग्रीक संस्कृतीची स्थिति तीच रोमन संस्कृतीची स्थिति होती. स्त्रियांच्या बाबतींत इतर कोणत्याही संस्कृतीपेक्षां आमच्या संस्कृतींत स्त्रियांना श्रेष्ठ मानलें जात असे व जातें. मि. ओटो रॅाथफील्ड आपल्या Women of India या ग्रंथांत लिहितात कीं 'Their very aloofness, their seclusion, gives them half their charm and they know it; not for them, for instance, the dismal methods of American schools where mixed class and common playground, rub away all the attraction of the sexes and make their pupils duly kin like brother and sister' बाईनें ज्या फ्रेंच मिशनऱ्याच्या ग्रंथांतून अवतरणें घेऊन हिंदुसमाजाची नालस्ती करण्याचा जागोजागीं प्रयत्न केला आहे तोच ग्रंथकार आपल्या ग्रंथांत आमच्या विवाहित स्त्रियांच्याबद्दल काय म्हणतो तें पहा !

'The authority of married women within their houses is chiefly exerted in prescribing good order and peace among the persons who compose their families and a great many among them discharge this important duty with a prudence and a discretion, which have scarcely a parallel in Europe.'

वरील विवेचनावरून हें स्पष्टपणें सिद्ध होत आहे कीं पाश्चात्य देशांतील स्त्रियांपेक्षां भारतीय महिलांची योग्यता अधिक आहे.

---

## भाग ३ रा.

तिसरा भाग " **ब्राह्मण** " या नांवानें सुरू झालेला आहे. या भागांत बाईच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें एकंदर सहा प्रकरणें आहेत. तीं म्हणजे,— Less than men—( १ ) मनुष्यप्राण्यापेक्षां कमी दर्जाचे; Behold a light ( २ ) प्रकाशांत; Give me office or give me death ( ३ ) बेकारी; We both meant well ( ४ ) दोघांचा सदूहेतू; Why is light denied? ( ५ ) अज्ञानांत कां ठेविलें? Counsel of Perfection ( ६ ) पूर्ण उपदेश.

या भागाला " **ब्राह्मण** " असें नांव देऊन सहा प्रकरणांत भडक रंगांत चित्र रेखाटतांना बाईनें ब्राह्मण समाजावर हवें तसें तोंडसुख घेतलेलें आहे. प्रारंभींच एका ब्राह्मणेतराकडून ब्राह्मणाचें चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केलेला आहे. ' एका ब्राह्मणेतराचे ब्राह्मणांविषयींचे विचार मी देत आहें ' असा इशारा देण्याची खबरदारी बाईनें घेतलेली आहे. हें चित्र रेखाटून त्यापासून पुढील निष्कर्ष काढलेला आहे. ' प्राचीनकालीं जेव्हां सर्व लोक आपआपल्या मर्जीप्रमाणें आपआपलें जीवन व्यतीत करीत होते त्या वेळीं ब्राह्मणवर्ग अध्ययन व अध्यापनाचें कार्य करीत असे. हा वर्ग फारच चतुर असा होता. विद्याध्ययन या वर्गाच्या हातांत असल्यामुळें त्यांनीं आपल्याला पोषक असें धर्मशास्त्र लिहिलें व सर्व वर्णांत आपण श्रेष्ठ असा डांगोरा पिटण्यास सुरवात केली. खोट्यानाट्या धर्मशास्त्राच्या गोष्टी सांगून, ती विद्या दुसऱ्याला न शिकवून या वर्णानें आपलें श्रेष्ठत्व प्रस्थापित केलें. यामुळें इतर वर्ण या वर्णाला पृथ्वीवरील परमेश्वर—**भूदेव**—( Earthly God ) असें समजून त्यांचें पूजन करूं लागले. व याला श्रेष्ठत्व देऊं लागले.

या जातीनें अखिल हिंदुस्थानावर आपलें जातिविशिष्ट वर्चस्व बसविलें. जोंपर्यंत सर्व जातींच्या लोकांकरतां इंग्रजांनीं शाळा काढल्या नव्हत्या तोंपर्यंत कोणीही, केव्हांही या जातीच्या विरुद्ध गेलें नव्हतें. हिंदुस्थानांतील प्रत्येक हिंदूला या वर्णाला सरकारपेक्षां अधिक करभार द्यावा लागतो. कोणताही मंगल अगर अमंगल प्रसंग असो त्या त्या प्रसंगीं यांना दक्षिणा द्यावीच लागते. या वर्गाचें असें म्हणणें आहे कीं सर्व प्रकारचे संस्कार करण्याचा आम्हांलाच तेवढा अधि-

कार आहे. याला शास्त्राची संमति आहे. सारांश, 'The Brahmin is indolent, produces nothing, and takes to no calling but that of lawyer or Government officer.' ब्राह्मणवर्ग आळशी आहे, त्याला कोणताही धंदा करावयास नको, तो ऐतोबा आहे, जर त्यानें कदाचित् धंदा केलाच तर वकिली किंवा सरकारी नोकरी हाच होय.

या भागाला 'ब्राह्मण' असें शीर्षक देण्यांत व पुढील प्रकरणें देण्यांत बाईचा असा स्पष्ट दुष्ट हेतु आहे कीं, ब्राह्मण जातीनेंच इतर वर्णांना, अस्पृश्य, अशिक्षित, रानटी, मानवी प्राण्यांपेक्षां कमी दर्जाचें ठेविलें, इतकेंच नव्हे तर आपलें वर्चस्व रहावें म्हणून याच वर्णानें इतरांना अज्ञानपंकांत ठेविलें. वर्णाश्रमधर्मव्यवस्थादेखील अशा प्रतारणा बुद्धीनें मुद्दाम करण्यांत आली. अस्पृश्यता राखण्याला हाच वर्ण सर्वस्वीं कारणीभूत झाला. ब्राह्मणांवर भलतेसलते आरोप लादण्यांत व शिंतोडे उडविण्यांत बाईचा विवक्षित हेतू स्पष्ट दिसत आहे. सध्यांच्या ब्राह्मण ब्राह्मणेतर चळवळीचा फायदा घेऊन भेदनीतीचें प्रतिबिंब आपल्या चोपड्यांत पाडण्याचा बाईचा कलही हेतु आहे.

या असत्य विधानांचा पूर्णपणें विचार करतांना प्राचीन कालाकडे दृष्टिक्षेप केल्याशिवाय भागणार नाहीं. हजारों वर्षांपूर्वी म्हणजे जगाच्या अंधकारयुगाच्या कालांत (In the dark ages) जेव्हां सर्व राष्ट्रें अडाणी, अज्ञानी व असंस्कृत होतीं, त्या काळीं मूठभर आर्य लोक हिंदुस्थानांत आले. त्या वेळीं हिंदुस्थानची लोकसंख्या अत्यंत मोठी होती. म्हणजे रशिया सोडून राहिलेल्या यूरोप खंडाच्या लोकसंख्ये इतकी होती. लोकसंख्या जरी प्रचंड होती तरी ती अज्ञानी व रानटी होती. राजकीय तत्त्व असें आहे कीं, एकादा देश जिंकून त्यावर आपलें आधिपत्य प्रस्थापित करावयाचें असेल तर असंस्कृत लोक तरवारीच्या आसुरी जोरावर व सुसंस्कृत लोक बुद्धीच्या सामर्थ्यावर व शीलाच्या पावित्र्यावर संपादन करतात. (To conquer a savage, one must either be a greater savage or a saint) या तत्वाप्रमाणें आर्य लोक अतिशय सुसंस्कृत व बुद्धिवंत असल्यामुळें त्यांनीं वरील रानटी लोकांना आपल्या सात्विक बलानें व पवित्र आचारविचारानें जिंकलें. जगाचा नियम असा आहे कीं नैतिक निष्ठावंतांचा प्रभाव कोणत्याही लोकांवर पडतो. या सर्वसाधारण नियमानें पाहतां आलेल्या आर्य लोकांचें वर्चस्व मूळच्या अनार्य लोकांवर साहजिकच प्रस्थापित झालें.

म्हणजे नवागत आर्यांच्या आचारविचारांच्या नैतिक व पवित्र तेजाचा प्रभाव अनार्यांच्या मनावर पूर्णपणें प्रतिबिंबित झाला. प्रचंड लोकसंख्येला सुसंघटित करण्याकरितां त्यांना उपाययोजना करणें भाग पडलें, म्हणून त्यांनीं अनेक उपाययोजना अस्तित्वांत आणल्या. त्याच उपाययोजनेंत वर्णाश्रमधर्मांची प्रामुख्यानें गणना होते. ही व्यवस्था ज्या कालीं करण्यांत आली तो काल म्हणजे ख्रिस्ती शकापूर्वी पंधरा हजार वर्षांचा काल होय. यालाच आम्ही वैदिक काल असें म्हणतों. बाईनें या कालाला पुराणकाल (Pauranic Age) असें म्हणून आपलें अज्ञानत्व प्रकट केलें आहे. पुराणकालाचें उदाहरण देण्यांत बाईचा दुष्ट हेतु सिद्ध होत आहे. बाईला असें भासवावयाचें आहे कीं वर्णाश्रमधर्मपद्धति वेदकालीन नसून ती पुराणकालापासून हिंदुस्थानांत ब्राह्मणांनीं स्वार्थीपणानें घुसडून दिलेली आहे.

आर्य लोकांनीं वर्णाश्रमधर्माची रचना तात्विक विचारानेंच केली. ती करण्यांत त्यांचा स्वार्थ नसून दूरदर्शीपणा व सद्धेतूच होता. प्रारंभीं अनार्यांच्या स्थितीचा त्यांनीं विचार केला. जे शूर धाडसी होते त्यांच्याकडे राष्ट्रसंरक्षणाचें कार्य सोंपविलें व त्यांना क्षत्रिय असें नांव दिलें. व्यापार, कला, कौशल्य, उद्योग, व आर्थिक घडामोडींकडे ज्यांचें कार्यक्षमत्व होतें त्यांच्याकडे व्यापारधंद्याचें कार्य सोंपविलें. यांना 'वैश्य' असें नामाभिधान प्राप्त झालें. ज्यांचा शेतकीकडे कल होता व जे शेतकी करण्याला सर्वस्वीं योग्य होते त्यांना तेंच कार्य दिलें. हा वर्ग म्हणजे 'शूद्रवर्ग' होय. प्रारंभीं हे तीन वर्ण व्यवसायभिन्नत्वामुळें अस्तित्वांत आले. याशिवाय जे अनार्य राहिले ते अत्यंत घाणेरडे, अडाणी, समजूत न पटणारे असे होते. त्यांचा व्यवसाय अत्यंत घाणेरडा असा होता. अर्थात् त्यांचा वरील चार वर्णांत व्यवसायाच्या दृष्टीनें समावेश झाला नाहीं. यामुळें त्यांची स्थिति होती तशीच राहिली. यांना 'अतिशूद्र' असें नांव देण्यांत आलें.

ब्राह्मणवर्गाकडे धार्मिक, शैक्षणिक, नैतिक, राजकीय बाबी आल्या. ज्याप्रमाणें आजकाल हिंदुस्थानांत सनदी नोकर (Civil Servants) उच्च दर्जावर नेमण्यांत येतात त्याप्रमाणें पूर्व कालीं अशाच उच्च जागीं ब्राह्मणवर्गांतील लोकांची निवड होत असे. यामुळें त्यांना क्षत्रियांप्रमाणें शिक्षण न मिळतां, वेद, ज्योतिष, साहित्य, राजकारण, वैद्यक वगैरेचें शिक्षण देण्यांत येत असे. क्षत्रियांवर राष्ट्राचे

संरक्षणाची जबाबदारी असल्यामुळें त्यांना वीरोचित लष्करी शिक्षण(Military Education) देण्यांत येत असे. वैश्यवर्ण म्हणजे व्यापार-धंदा करणारा वर्ग होय. याचा दर्जा हल्लींच्या यूरोपखंडांतील व्यापाऱ्यांप्रमाणें होता. म्हणजे हा वर्ग जरी सरकारी नोकरींत नसे तरी त्यांचा दर्जा राज्यकारभाराच्या बाबतींत आजकालच्या लोकनियुक्त प्रतिनिधींप्रमाणें होता. शूद्रांकडे जो व्यवसाय होता त्याप्रमाणें त्यांना त्याच बाबतींत शिक्षण देण्यांत येत असे. याच वर्गांतून नोकरवर्ग (Menial Servants) निर्माण झाला. क्षत्रिय, वैश्य व शूद्र या तिन्ही वर्णांत रोटीबेटीव्यवहार होत असत. आर्य लोकांचा वरील तिन्ही वर्णांशीं रोटी व्यवहारच होता, पण बेटीव्यवहार मात्र आर्यांआर्यांत म्हणजे ब्राह्मणाब्राह्मणांत होत असे. म्हणजे आजकाल ज्याप्रमाणें राज्यकर्ते व हिंदी लोक यांच्यांत बेटीव्यवहार होत नाहीं त्याचप्रमाणें पूर्वींही होत नसे. याचें कारण राजकीय आहे.

ही वर्णाश्रमधर्म व्यवस्था वेदकालापासून पुराणकालापर्यंत उत्तम रीतीनें व मूळ हेतूला धरून चालत आली होती. आर्यांनीं वरील व्यवस्था जरी केली होती तरी त्या व्यवस्थेंत अनार्यांचा द्वेष किंवा उच्चनीच भाव नव्हता. तर शुद्ध प्रेमच होतें. याबद्दल वेदांत अनेक ऋचा आहेत. एकमेक भिन्न व्यवसायी वर्ण एकमेकांच्याकडे मित्रदृष्टीनें पहात असत. यजुर्वेदांत मित्रदृष्टीबद्दल कडक अनुशासन आहे.

**'दृते दृहं मा मित्रस्य मा चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षन्ताम् । मित्रस्याहं चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षे मित्रस्य चक्षुषा समीक्षामहे ॥'** (वा. यजुर्वेद ३६।१८) तिन्ही वर्णांचा व्यवसाय जरी भिन्न होता तरी राष्ट्रसंरक्षणाकरतां ते सर्व एकच होते. इतकेंच नव्हे तर असत. ऋग्वेद मंडळ ६।८।६ मध्यें असें स्पष्ट म्हटलें आहे कीं 'आमच्या समाजांतील पैसेवाल्या श्रीमान् लोकांमध्यें असें उत्तम शौर्ययुक्त क्षात्रतेज स्थापन कर कीं जें कधीं दबलें जाणार नाहीं व कधींही क्षीण होणार नाहीं. परमेश्वरा! तुझ्या संरक्षणांनीं सुरक्षित झालेले आम्ही शेंकडों व हजारों सैनिकांना बरोबर घेऊन आमच्यावर हल्ला करणाऱ्या शत्रूंचा आम्ही सहजच पाडाव करूं.' यावरून एका वर्णानें तेवढें शक्तिसंपन्न असावें व बाकीच्या वर्णांनीं त्याचें आधिपत्य व शक्तिसामर्थ्य कबूल करावें असा प्रकार पूर्वीं नव्हता.

चातुर्वर्ण्यजातिसंस्थेची उत्पत्ति जी झाली ती ब्राह्मणांनीं आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याकरतां केलेली नाहीं, हें अनेक संशोधकांच्या संशोधित ऐतिहासिक

कागदपत्रांवरून सिद्ध झालेलें आहे. चातुवर्ण्याची कल्पना जी निघाली ती पुढील-प्रमाणें निघाली. अमेरिकन वसाहतवाले किंवा सध्यां आफ्रिकेंत वसाहत करणारे इंग्रजलोक यांना ज्याप्रमाणें भयंकर परिस्थितीशीं झगडावें लागलें त्याप्रमाणें पूर्वी भीषण व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशीं आर्यांना झगडावें लागलें आणि याचमुळें संघीकरण व सहकार्य या दोन तत्त्वांच्या अनुरोधानें पूर्व कालीन समाजरचना अस्तित्वांत आली. असें एक समाजतत्व आहे कीं, जेथें जेथें भिन्नसंस्कृतींच्या थरांचा आणि परस्पर विषम असे समाज अगर वंश यांचा निकट संबंध येतो तेथें तेथें समाजरचना व त्याचा विकास वरील तत्वानुरोधानेंच होतो. अशा समाजांत व्यक्तिस्वातंत्र्याचें तत्व जिवंत रहातच नाहीं. आर्यावर्तांत आत्म-संरक्षण, विकास व स्थैर्य यांकरतां संघ करून व परस्पर सहकार्य करून आर्यांना निर्वाहन करावें लागलें. आर्याप्रमाणें अनार्यही प्रतिपक्षाशीं झुंजण्याकरतां संघ करून राहूं लागले, अर्थात् प्रारंभीं सर्वच आर्यावर्तांत संघ (Corporations) स्थापन झाले. ही संघीकरणाची संवय लोकांच्या हाडींमाशीं खिळली. धर्म, व्यापार धंदा वगैरे तत्कालीन संसाराच्या सर्व बाबींत तिचें प्राबल्य वाढत गेलें. तेव्हां आर्येतर संघांपासून आपले संघ पूर्णपणें ओळखतां यावे म्हणून व त्यांचें एकीकरण करावें म्हणून चातुवर्ण्याची कल्पना निघाली.

हिंदुस्थानांतील निसर्गदेवता सर्वसंपन्न असल्यामुळें हव्या त्या टोळीनें येथें यावें, आपला योगक्षेम चालवावा, फार काय पण वसाहतदेखील करावी, आश्र-यस्थानाकरतां टोळया टोळ्यांनीं झगडे करावे, व नंतर वसाहत झाल्यावर सहच-र्यानें व गुण्यागोविंदानें रहावें. याप्रकारची संवय विविध टोळ्यांना लागत गेली आणि याच संवयीचें परिवर्तन प्रथम लोकसंस्थेंत व नंतर जातिसंस्थेंत झालें. आर्यांनीं या जातिसंस्थेला शास्त्रीय पद्धतशीर स्वरूप देऊन ती तत्कालीन समा-जास अधिक उपकारक व कार्यक्षम केली. यामुळें समाजांत परस्पर सहकार्याचें तत्व रूढ झालें, यामुळें तत्कालीन समाजाचा उत्कर्षच झाला, हें त्यावेळच्या सन्मान्य ग्रंथांवरून दृष्टोत्पत्तीस येत आहे.

अशा प्रकारच्या उत्तम व पवित्र समाजरचनेला—वर्णात्मक ज्ञातिसंस्थेला—अनिष्ट स्वरूप जें आलें तें बुद्धक्रांतीमुळें. याची जबाबदारी आर्यांवर किंवा ब्राह्म-णांवर नाहीं. बुद्धक्रांतिकारकच या अरिष्टाला सर्वस्वी कारण झाले. यांत आर्यांची एकच चूक झाली आणि ती म्हणजे फाजील परमतसहिष्णुता. हल्लींचा यूरोपि-

यन समाज ज्याप्रमाणें अत्यंत जागृतीनें व न्यायनिष्ठुरतेनें आपल्या समाजाची वंशवृद्धि व सांस्कृतिक वैशिष्ट्य कायम ठेवण्याकरितां अविश्रांत श्रम करीत आहे, त्याप्रमाणें त्रैवर्णिक आर्यांनीं केलें असतें तर बुद्धक्रांतीमुळें लोकसंस्थेला व जातिसंस्थेला आलेलें अनिष्ट स्वरूप खात्रीनें आलें नसतें. तें त्यांनीं केलें नाहीं म्हणूनच आर्यांचा वर्ण, स्वभाव व संस्कृति यांस भयावह असें विकृत स्वरूप प्राप्त झालें आणि असें झाल्यामुळें मूळस्वरूपांत भयंकर परिवर्तन झालें. अशी भयंकर स्थिति प्राप्त झाल्यावर ब्राह्मणक्षत्रियादि उच्च वर्णांनीं बुद्धक्रांतीच्या उत्पातानंतर असवर्ण विवाहास बंदी करून जातिसंस्थेला रोटीबेटीव्यवहाराचे निर्बंध घातले.

अनार्यांना आर्य करून सोडण्यासाठीं अनुलोम विवाहाची व संततीच्या बाबतींत पितृसावर्ण्याची चाल जी आर्यांनीं सुरू केली तिचें पर्यवसान आर्येतरांना आर्य बनविण्यांत होण्यापेक्षां आर्यांनाच अनार्य बनविण्यांत झाल्याचें दिसूं लागलें. तेव्हां ही आपत्ति टाळून आर्य जात पवित्रपणानें राखावी म्हणून त्या क्रियेला प्रतिबंध करणें भाग पडलें. तसा जर प्रतिबंध केला नसता तर आर्यांची उच्च संस्कृति नामशेषच झाली असती. संस्कृति संरक्षणाचें पवित्र कार्य कोणत्याही देशांत बुद्धिसंपन्न वर्गच करीत असतो. अशा वर्गाला संस्कृति संरक्षणाकरतां, क्वचित् प्रसंगीं आजूबाजूच्या परिस्थितीचा विचार करून न्यायनिष्ठुरतेनें आणि राष्ट्रीय व धार्मिक दृष्टीनें निर्बंधाचें बंधन घालावेंच लागतें. वरिष्ठांनीं कनिष्ठांना उच्च तत्वाला नेऊन पोंचविणें समाजशास्त्राच्या दृष्टीनें श्रेयस्कर आहे, परंतु जर एकाद्या क्रियेंत वरिष्ठच कनिष्ठ स्थितीला पोंचूं लागले तर तो प्रयोग अगर कृति मानवी व समाज उन्नतीस अपायकारक होत असते. असें जातिसंस्थेच्या उत्पत्तीचें वर दिलेलें संक्षिप्त स्वरूप आहे.

बाईनें या भागांतील सर्व प्रकरणांत ब्राह्मणांना दोष देऊन त्यांच्यावर निरर्थक व बेजबाबदारपणें आरोप केलेले आहेत. ब्राह्मणांवर हल्लींच्या काळीं ज्याचा त्याचा कटाक्ष असलेला पाहून वाहत्या ब्राह्मणनिंदेच्या गटारांत आपणही आपले गोरे हात धुवून घ्यावे असें बाईला वाटून तिनें अनेक ठिकाणचा बादरायण संबंध ब्राह्मणांशीं जोडून आपला ब्राह्मणद्वेष जाहीर केलेला आहे. ब्राह्मण वर्गाबद्दल बाईचें अज्ञान जागजागीं दृष्टीला पडत आहे. एका ब्राह्मणेतराकडून ब्राह्मणाचें चित्र रेखाटतांना बुद्धिप्रधान बाईनें आपलें अज्ञान मात्र प्रगट करण्याचा अट्टाहास केला आहे. ब्राह्मणवर्ग ज्याला ( Intellectual Class ) बुद्धिवंताचा वर्ग असें म्हणतात त्या वर्गासंबंधींचा पूर्वेतिहास बाईच्या असत्य विधा-

नांवर प्रकाश पाडणारा असल्यामुळें त्याचा थोडक्यांत विचार करणें कर्तव्याच्या दृष्टीनें प्राप्त होत आहे.

ब्राह्मणांची पूर्वपरंपरा सुमारें साडेपांच हजार वर्षांपूर्वींची आहे. आर्यांचें मूल वसतिस्थान मध्य एशियाच्या पश्चिम भागालगत जो कॅस्पिअन समुद्र आहे तें होय. त्या मूल स्थानाहून आर्यांच्या अनेक टोळ्या दक्षिणेच्या बाजूला उतरल्या. त्या टोळ्यांत असुर आणि देव असे भेद पडले. या दोघांत अनेक वेळां युद्धें झालीं. तेव्हां असुर इराणच्या बाजूला स्थिर झाले व देवांनीं दक्षिणेकडे आपला मोर्चा वळविला. कांहीं संशोधकांचीं मतें सत्य व ग्राह्य धरलीं तर देव म्हणजे ब्राह्मण होत असें ठरतें, पुढें देव जातींत क्षत्रियांचाही समावेश झाला. याबद्दल ऋग्वेदांत अनेक ऋचा आढळतात. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे सर्व आर्य वंशांतलेच लोक असून वैदिक कालाच्या प्रारंभीं त्यांच्यांत मुळींच भेदभाव नव्हता; परंतु कांहीं कालानंतर ब्राह्मण, क्षत्रिय हे भेद धंदा व मनःप्रवृत्ति यांतील भिन्नत्वामुळें झाले. बराच काळ लोटल्यावर याच आर्यांनीं उत्तरकुल, उत्तरमद्र, व पंजाब या ठिकाणीं वसाहती केल्या. या वसाहतवाल्या आर्यांतूनच कृषि, गोरक्षण व व्यापार वगैरे धनोत्पादन करणारा वर्ग निर्माण झाला. तो वर्ण म्हणजे वैश्य वर्ण होय. याच वसाहतकालीं ज्या अनार्यांचा आर्यांशीं निकट संबंध आला त्यांतून चौथा वर्ण अस्तित्वांत आला. अशारीतीनें चातुवर्ण्यांची संस्थापना झाली. चातुर्वर्ण्य संस्थापनेंत ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य या सर्वांचेच श्रम व बुद्धि कारणीभूत झालेली आहे. विशेषतः ब्राह्मण व क्षत्रिय यांनींच या चातुर्वण्याची मुहूर्तमेढ रोवली असें अनेक ग्रंथांवरून सिद्ध झालेलें आहे.

प्रारंभीं क्षत्रिय व ब्राह्मण हे आपल्या टोळ्यांचें रक्षण करीत; त्यांच्या स्वास्थ्याची, इष्टानिष्ट गोष्टींची काळजी घेत असत. समाज जसजसा विस्तृत होऊं लागला तसतसा वरील दोन्ही वर्णांचा व्यवसाय निरनिराळा झाला. समाजाच्या नियमनाकरतां क्षत्रिय **भूपाल** बनले व ब्राह्मण **भूदेव** बनले. या दोन्हीही गोष्टीं परस्परांच्या सहकार्यांनें व संमतीनें आणि श्रमविभागाच्या दृष्टीनें घडून आल्या, हें येथें लक्षांत ठेविलें पाहिजे. सर्व आर्यावर्तांत क्षत्रिय आणि ब्राह्मण मिळून प्रचंड वसाहती केल्या. हें महत्त्वाचें कार्य वरील दोन्ही भिन्न व्यवसायी वर्णांनीं ऋग्वेदापासून रामायणाच्या काळापर्यंत केलें. हा काळ म्हणजे इ. स. पूर्वीचा चार पांच हजार वर्षांचा काळ होय. वसाहतीचें कठीण कार्य ब्राह्मण क्षत्रियांनीं केलें व आर्यांच्या भौतिक व अध्यात्मिक सुखाचीं साधनें भूदेवांनींच आपल्या

कल्पक बुद्धीनें निर्माण केलीं. बंगालचे प्रसिद्ध अर्वाचीन पंडित प्रो. अविनाशचंद्र दास आपल्या The Rigvedic culture या ग्रंथांत लिहितात कीं:— It was the Rishi or sagepriests, the mighty wise thinkers of old, the brainiest among the people, who led the van of progress in the early and subsequent stages of Aryan development. It was they, who domesticated the cattle, discovered the use of fire, invented the plough, learnt and thought the art of agriculture, invented and manufactured various implements, made chariots and wagons, discovered the intimate relations of the cosmic powers with human welfare, instituted fire worship.

याप्रमाणें भौतिक साधनांची उत्पत्ति करून हा वर्ग स्वस्थ बसला नाहीं तर त्यांनीं अध्यात्मिक बाबतींतही पराकाष्ठेची उन्नति केली. आणखी एका जागीं वरील पंडित लिहितात कीं:—

'It was these great minds that in early Rigvedic times fused the disjoined and discordant elements into one homogeneous whole, and united the scattered villages into one confederacy under the supremacy of one vigorous and powerful clan whom they guided by their sage counsels to the attainment of the blessed goal of one united people. It was through their noble and selfless exertions that there came into being in Rigvedic times the people, known as the five tribes.'

वरील महत्वाचे दोन उतारे देण्याचें कारण इतकेंच कीं आर्यांच्या उज्वल संस्कृतीचा उगम ब्राह्मणांच्या बौद्धिक व शारीरिक प्रयत्नांमुळेंच झाला आहे. याच्या विवरणार्थ या विकासाच्या कामीं क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांचीही अत्यंत महत्वाची मदत झालेली आहे. क्षत्रियांना स्वराष्ट्र संरक्षण करण्याच्या कामीं विशिष्ट पद्धतीनें

वीरविद्येचें शिक्षण ब्राह्मणांनींच या कालीं त्यांना दिलेलें आहे. पंडित शामशास्त्री आपल्या 'The Origin of the Kshatriyas' या महत्वाच्या ग्रंथांत लिहितात. ब्राह्मणांनीं क्षत्रियांना लष्करी शिक्षण दिलें व वेळप्रसंगीं स्वराष्ट्राचें व स्वसंस्कृतीचें संरक्षण व्हावें म्हणून आपण लष्करी शिक्षण घेऊन आपल्या स्त्रियांनाही त्याचें बाळकडू पाजिलें. There were lady Rishis in Rigvedic times who composed verses, performed sacrifice, offered hymns to the Gods and won honourable places in the galaxy of the noble singers and occupied glorious riches in the Temple of fame. स्त्रीपुरुषांनीं सारख्या योग्यतेप्रमाणें स्वराष्ट्र व स्वसंस्कृति यांचें रक्षण केलें पाहिजे असा आर्यांचा कटाक्ष होता.

ब्राह्मण आणि क्षत्रिय यांनीं वसाहतीच्या वाढीला सारखी मदत केली. त्या वाढलेल्या वसाहतींतून कृषी वगैरे गोष्टी वैश्यांनीं आपल्या आंगावर घेऊन आर्थिक वाढ केली. हे सर्व वर्ण एकाच ध्येयानें प्रेरित होऊन समतेच्या तत्वावर वागत असत. वसाहतीची बेसुमार वाढ झाल्यावर आर्यांचा व्याप बेहद्द वाढला. तेव्हां शासनसंस्थांची सुटसुटीत व्यवस्था त्यांना करावी लागली. या व्यवस्थेंत ब्राह्मणांनीं पुढाकार घेऊन शासनशास्त्र तयार केलें. अर्थात् तें तयार करतांना त्यांची दृष्टि ऐहिक व पारमार्थिक उन्नति हें जें आर्यांचें उज्वल ध्येय त्याकडेच राहिली. आर्यांच्या शासनसंस्थेचें ध्येय सात्विक असल्यामुळें कायदेकानू, राजनीतिशास्त्र व समाजशास्त्र त्याच ध्येयाला पोषक असें करणें भाग पडलें. राजावर प्रजेची ऐहिक व पारमार्थिक जबाबदारी याच विशिष्ट ध्येयामुळें पडली. ही दुहेरी जबाबदारी राजावर असल्यामुळें धर्मशास्त्र व समाजशास्त्र व त्याच्या जोडीला राजनीतिशास्त्र यांची सांगड घालणें प्राप्तच झालें. चातुवर्ण्यांत चढत्या उतरत्या पायऱ्यांमुळें विषमता उत्पन्न होऊं नये म्हणून **आश्रमधर्म** अमलांत आणणें भाग पडलें. आश्रमधर्म सर्व वर्णांना सारखेच लागू केले होते, हें विसरून चालणार नाहीं. बाबू बिपिनचंद्र पाल यांनीं 'The Soul of India' या ग्रंथांत यासंबंधीं फारच सुंदर मीमांसा केलेली आहे. वसाहतींचा व्याप वाढल्यावर ब्राह्मणांना अनेक कार्यें करावीं लागलीं. यासंबंधानें विद्वान् पुंगव 'जसवाल' आपल्या Hindu Poilty या ग्रंथांत लिहितातः—"The Brahmin versed equally in धर्म and अर्थ, sacred knowledge and science

of Politics, is a constant figure. The Brihaspati and Koutilya class was not merely concerned with systimatezing theories of state; they made the politics of their country an object of their immediate concern ............Vashistha and Vamdeo typify the figures who would turn up at the court and advise the king, point out the weakness in his administration............ The Brahmin reminded the people again and again that the bases of civilization of the race are rooted in polity, that the sword protects the people is the womb of civilization. He idealised and idealised the country of the Aryas as much politically and religiously (Part II, Page 109 to 111).

क्षत्रियांच्या उन्नतीला ब्राह्मणच कारणीभूत झालेले आहेत. ब्राह्मणांनीं राजे निर्माण करण्याचें कार्य केल्याचें पूर्वींचा इतिहास अनेक उदाहरणांनीं दाखविण्यास सिद्धच आहे. राज्यकारभाराचें कार्य क्षत्रियांकडे सोंपवून निस्पृहपणें कायद्यांच्या स्पष्टीकरणाचें कार्य ब्राह्मणांकडे राहिलें. राजा अनियंत्रित व जुलमी होऊन त्यानें प्रजेचा छळ करूं नये म्हणून धर्मशास्त्राची जोड राजनीतिशास्त्राला देण्यांत आली. असलें बंधन जर घातलें नसतें तर फार भयंकर परिस्थिति झाली असती. राजाची सत्ता वाढत असतां प्रजेचे हक्क व तिचें संरक्षण करण्याकरतां आर्यांनीं वरील नियमन घातलें व त्या नियमान्वयें प्रजेचें संरक्षण केलें. आर्यांनीं न्याय व अंमलबजावणी हीं खातीं निस्पृह अशाच ब्राह्मणांकडे सोंपविलीं. हें कार्य त्यांनीं प्रामाणिकपणानें व निःस्वार्थ बुद्धीनें कोणाशींही प्रतारणा न करतां केलें आहे, असा मोठमोठ्या विद्वानांचा अभिप्राय आहे.--" The administration of justice under Hindu monarchy always remained separate from executive in form and spirit the reason being lawyers being appointed judges and lawyers as a rule were from amongst the Brahmins" असें पंडित जसवाल आपल्या ग्रंथांत लिहितात. तैत्तिरीय ब्राह्मणांत पुरोहिताची सत्ता व राजाची सत्ता याच जबाबदारीमुळें समसमान मानलेली आहे. शतपथ ब्राह्मणांत

ब्राह्मण म्हणजे बुद्धिमत्ता, क्षत्रिय म्हणजे इच्छाशक्ति असा अभिप्राय दिलेला आहे आणि म्हणूनच क्षत्रियांचा " राष्ट्रगोप " असा गौरव धर्मानें केलेला आहे. राजशासनांतील प्रेरक शक्ति ब्राह्मणच असत. " The Brahmin is the main spring of the activities of क्षत्रिय " अशा प्रकारचे ब्राह्मण व क्षत्रिय यांचे संबंध आहेत.

बाईला निनांवी भेटलेला ब्राह्मणेतर असें सांगतो कीं ब्राह्मणांना आम्हांला पोसावें लागत आहे. तो वर्ग म्हणजे पुरोहित—भिक्षुकवर्ग—होय. या भिक्षुक वर्गाला आजकालच काय पण पूर्वीपासून क्षत्रियांना पोसावें लागत असे. पुरोहित वर्गाचें महत्व व सत्ता यासंबंधानें बाबू नरेंद्रनाथ लॉ हे आपल्या Hindu Polity या ग्रंथांत लिहितातः—ऐहिक व पारलौकिक कल्याणाकरतां पुरोहिताची जरूरी व महत्व असून क्षत्रिय वैश्य वगैरे वर्ण त्या वर्गावर श्रद्धापूर्वक विश्वास ठेवीत व कार्यें करीत. याकरतां ते त्यांना दक्षिणा देत ती एवढयाच करितां कीं त्यांचा योगक्षेम चालावा. कारण त्यांच्या संरक्षणाची व योगक्षेमाची जबाबदारी क्षत्रिय व वैश्य यांच्यावरच होती. राजा व प्रजा यांच्यांतील प्रजेच्या बाबतींतला सुरळीत संबंध ठेवण्याचें कार्य या पुरोहितवर्गावर होतें. हा वर्ग अन्यायाचें निर्मूलन करून प्रजेला उत्तम प्रकारें न्यायदान करीत असे. या वर्गाच्या न्यायी दृष्टीबद्दल पंडित जसवाल लिहितात कीं:—To this class belong the judge + + law proper and law ecclesiastics in administration tended to unite into one and unite in the hands of the Brahmin judge and the Brahmin was fairly above the infiunce of the king. Then there was the Brahmin agency which always balanced and counterpoised the estate of sword and the estate of wealth. When undue interference was feared, it was laid down that the king must abide by the opinion of the प्राड्विवाक् or minister of justice and chief judge who was a Brahmin as a rule ( p. 160 to 165 ).

अशा प्रकारें ब्राह्मण व क्षत्रिय यांचा पूर्वापार संबंध होता. तो संबंध फार वर्षेंपर्यंत राहिला. क्वचित् कारणावरून त्यांच्यांत जरी मतभेद झाला असला तरी

राष्ट्राचें संरक्षण, भारतभूचें संरक्षण या दोन्ही वर्णांनीं केलेलें आहे. ब्राह्मणांनीं आपणांला अनुकूल असे कायदे केले असें बाईजवळ एक ब्राह्मणेतर म्हणतो, परंतु कायदे करतांना राजाच्या संमतीशिवाय कायदे झालेले नाहींत, ही गोष्ट तो विसरला, किंवा बाईनेंच ब्राह्मणेतराच्या नांवानें आपली अक्कल पाघळली आहे ?

बाईनें ब्राह्मणांवर ब्राह्मणेतरांकरवीं असा एक आरोप लादविला आहे कीं ब्राह्मणांनीं आपल्या स्वार्थीपणानें आपल्याला अनुकूल असें धर्मशास्त्र व कायदे केलेले आहेत. धर्मशास्त्र व कायदे हे ब्राह्मणांनीं केले आहेत याचा विचार करण्यापूर्वीं थोडेंसें पूर्वीच्या इतिहासाकडे वळलें पाहिजे. ज्या काळीं धर्मशास्त्रें, स्मृति वगैरे कायदे अस्तित्वांत आले त्या कालची परिस्थिति व सध्यांची कायदे करण्याची परिस्थिति यांत सूक्ष्मतर अंतर आढळेल; परंतु एवढी गोष्ट मात्र खरी कीं कायदे अगर स्मृति या ज्या होतात, त्या कोणत्याही परिस्थितींत एका विशिष्ट व्यक्तीमुळें होत नाहींत, त्याला सर्व कायदेमंडळाचें मतैक्य लागत असतें. ज्या कायदे ग्रंथाबद्दल ब्राह्मणेतर नेहमीं कुरकूर करितात, ज्या कायदे ग्रंथाबद्दल ब्राह्मणांना दोष देतातात तो कायदे ग्रंथ म्हणजे **मनुस्मृति** होय.

पण ही मनुस्मृति कोणी तयार करविली व केली ? मनु हा ब्राह्मण नव्हता तर **क्षत्रिय** होता. ‘ The first law giver ’ ‘ पहिला कायदे करणारा’ असा ज्याचा सर्व जगांत गौरव केला जातो, तो मनुष्य ब्राह्मण नसून ब्राह्मणेतर होता, ही गोष्ट प्राचीन काळचा इतिहास स्पष्टपणें सांगत आहे. स्मृतिलेखनाचें कार्य ब्राह्मणांनीं केलें असलें तरी त्याला कायद्याचें स्वरूप व संमति देण्याचें प्रवर्तक कार्य–राजे–क्षत्रियच–करीत असत. स्मृति अगर कायदे जे बनतात ते कालानुसार बनत असतात. जसा काळ असेल, जशी परिस्थिति असेल, त्याप्रमाणें कायदे तयार होत असतात आणि म्हणूनच कायदे हे वारंवार निरनिराळे करावे–बदलावे–लागतात. जोंपर्यंत आर्य धर्माशीं अन्य धर्मांचा संबंध आला नव्हता तोंपर्यंत देवलस्मृति अस्तित्वांत आली नव्हती; परंतु परधर्मांचा संबंध येतांच, स्वधर्मांतील लोक परधर्मांत अडकूं लागतांच, त्यांचें परिवर्तन करण्याच्या उदात्त हेतूनें त्या वेळच्या कायदे संस्थांनीं देवलस्मृति तयार केली व करविली. हिचा उद्देश इतकाच होता कीं स्वधर्म सोडून परधर्मांत गेलेल्या लोकांना पावन करून–शुद्ध करून–स्वधर्मांत घ्यावें. कायद्यांत प्रत्येक वेळीं फेरबदल होतच असतात. जर एकदांच कायदे करून ठेविले व ते वाटेल त्या परिस्थितींत प्रजेवर

लादले तर त्यापासून राज्यसंस्था सुरक्षित राहणार नाहीं; समाजांचें उत्तम रीतीनें आचरणदृष्ट्या सुव्यवस्थित नियंत्रण होणार नाहीं.

एका न्यायसूत्रकाराचें असें म्हणणें आहे कीं '**राष्ट्राच्या कायद्यामध्यें फेरबदल होत असणें हेंच राष्ट्राच्या जिवंतपणाचें लक्षण आहे.**' आमच्या प्रत्येक स्मृतींत याप्रमाणें फेरबदल झालेला आहे. मनुस्मृति ही एकट्यानेंच केली. ब्राह्मणांनीं आपल्याला फायदेशीर व्हावी अशी तिची रचना केली असा आरोप कित्येक ब्राह्मणेतर करतात! हा आरोप कोठल्याही ब्राह्मणेतराचें नांव न घालतां बाईनें केलेला आहे. परंतु या बाबतींत तिनें जर प्रो० डौसन या विद्वानाचा Hindu Classical Dictionary हा कोष पाहिला असता तर तिला खात्रीनें त्या ब्राह्मणेतराला गप्प बसवितां आलें असतें. मनुसंहितेबद्दल या ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं 'The Manu Sanhita, the well known law book, the code of Manu.......... it bears the marks of being the production of more than one mind...........this is a collection or digest of current laws and creeds rather than a planned systematic code..........The rule and precepts it contains had probably existed as traditions long before. मनुसंहिता हें कायद्याचें पुस्तक एकापेक्षां अधिक बुद्धींनीं तयार झालेलें आहे, अशीं चिन्हें दिसतात. हें कोणीं एकानें बनविलेलें नाहीं तर त्या काळीं चालू असलेले नियम, आचार व व्यवहार यांचा निव्वळ संग्रह करून त्या संग्रहाचें सार काढून तयार केलेलें असें हें पुस्तक आहे. यांतील नियम, आचार व विधि हे पूर्वीपासून—प्राचीन—कालापासून परंपरेनें चालत आलेले आहेत.

दुसरें असें कीं लोकसभेनें मान्यता दिल्याशिवाय, राजानें मंजुरी दिल्याशिवाय, स्मृतीला कायद्याचें स्वरूप येत नाहीं. एखादा कायदा एखाद्या राजानें अरेरावीपणानें पसार केला व तो प्रजेला जुलमाचा अगर असंतोषाचा वाटला तर वैदिक राज्य पद्धतीच्या काळीं प्रजा लोकसभेमार्फत राजाला कळवीत असे. प्रजेचें म्हणणें राजानें ऐकिलें नाहीं, तर प्रजा राजाला गादीवरून काढून दुसऱ्या राजाला राज्याभिषेक करीत असे. ज्या काळीं अशी पद्धति होती त्याकाळीं जर एकाद्या जातीनें दुसऱ्या जातीवर जुलूम करण्याचे कायदे केले असते तर ते कधींच अस्तित्वांत आले नसते. हल्लींच्या काळींदेखील असें करावयाचें म्हटलें तरी देखील शक्य

नाहीं. विरोधाच्या वावटळी सुटतातच. पूर्व काळीं तर असें होणेंच अशक्य होतें. राजा हा स्मृतिकाळीं लोकसभेच्या मतानेंच चालत होता.*

ज्या काळीं स्मृति अस्तित्वांत आली त्याच्या पूर्वकाळीं देखील कोणीही कोणावर जबरदस्ती करीत नव्हते. आपल्या राष्ट्राच्या कल्याणाकरितां, उद्धाराकरितां सर्व '**माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्या**' अशा दिलजमाईनें वागत होते. समतेचें तत्व पूर्वीपासून राष्ट्रविषयभावनेंत एकसूत्रित झालेलें होतें. हा वरिष्ठ व हा कनिष्ठ असा भेदभाव नव्हता. अशा ऋग्वेदांत स्पष्ट ऋचा आहेत.

**ते अज्येष्ठा अकनिष्ठास उद्भिदोऽमध्यमास्ते महसा वितावृधुः ।**
**सु जाता जनुषा पृश्निमातरो दिवो मर्या आ नो अच्छा जिगातन ॥**

ऋग्वेद ५।५९।६

दुसरें एक विधान म्हणजे मूठभर ब्राह्मणेतरांना बऱ्याच ब्राह्मणांना दक्षिणेच्या रूपानें पोसावें लागतें. ज्या ब्राह्मणवर्गाला पोसावें लागतें तो वर्ग म्हणजे पुरोहितांचा—भिक्षुकांचा वर्ग होय. संस्कृति रक्षणाचें कार्य या वर्गाकडे असल्यामुळें व त्यांचें जीवन पूर्वीपासून याच देणगीवर चालत असल्यामुळें आजच्या परिस्थितींत या वर्गाची योग्यता न समजून इतर लोक या वर्गावर तुटून पडत असतात. हा वर्ग हिंदुस्थानांतच आहे असें नव्हे तर प्रत्येक देशांत आहे. आज या वर्गाची जी दैना आहे ती परक्या संस्कृतीच्या अंधानुकरणामुळें झालेली आहे. स्वसंस्कृतिसंरक्षण ज्यांना कःपदार्थ वाटतें अशा समाजघटकांच्या पाश्चात्याळलेल्या बुद्धीचें हें वेडगळ विधान आहे. ब्राह्मणेतर ब्राह्मणांच्या नांवानें जळफळतात, त्याचें इंगित हेंच आहे. कांहीं पाश्चात्य लेखकदेखील विवक्षित हेतूनें प्रेरित होऊनच ब्राह्मणांवर आग पाखडतात. बाईची मनोरचना त्याच वळणावर झालेली आहे. म्हणूनच तिसरा भाग ब्राह्मणांना शिव्या देण्यांत बाईनें खर्च केलेला आहे. युरोपियन लोक ब्राह्मणांची जाणून बुजून, असत्यानें व अज्ञानानें प्रेरित होऊन, कशी नालस्ती करितात याचें सुंदर विवेचन मि. सेनगुप्त यांनीं आपल्या Sources of Law and Custom in Ancient Hindoo Society, या ग्रंथांत पुढीलप्रमाणें केलेलें आहे.

---

* ही गोष्ट पुढील वेदाच्या ऋचेवरून सिद्ध होत आहे—स वि शो अनुव्यचलत् । तं सभाच समितिश्च सेनाच सुरा चानुव्यचलन् ॥ —अथर्ववेद १५।९.

" There is a tendency in some European writers to discount the claims of Brahmins and the so called Brahminism to the autiquity and unversality that are claimed for them. Brahminism, it is said, was a late growth and was imposed at a comparatively late date on the simple and secular law to which the history ideas of Smriti were foreign.........It is perfectly clear that the Brahmin and the religious men from whom they were descended were never otherwise than predominant in Aryan society.

युरोपिअन लोकांचीं असत्य विधानें आमच्या कडील बऱ्याच लोकांनीं खोडून काढलेलीं आहेत. त्यांमध्यें ब्राह्मणांपेक्षां ब्राह्मणेतर विद्वानच अधिक आहेत. कलकत्ता विश्वविद्यालयाचे व्हा. प्रिन्सिपाल कै. सर अ. मुकर्जी यांनीं अत्यंत परिश्रम पूर्वक ग्रंथ लिहून आमचा धर्म, समाजशास्त्र, राजकीय संस्था वगैरे संबंधींची पूर्वकालीं उन्नति असल्याचें सिद्ध करून निःपक्ष बुद्धीच्या पाश्चात्य विद्यावागीशांना पटवून दिलेलें आहे. मद्रासच्या कांहीं ब्राह्मणेतरांनीं देखील मुकर्जीप्रमाणेंच आमचें—ब्राह्मणांचें—श्रेष्ठत्व सर्व विश्वाला पटवून दिलेलें आहे. या विद्वानांच्या ग्रंथांवरून ब्राह्मणांच्या चातुर्याची, त्यांच्या संस्कृतिसंरक्षणार्थ केलेल्या कर्तबगारीची मनोमय साक्ष पटल्याशिवाय राहणार नाहीं.

बाईनें less than men या प्रकरणांत अस्पृश्यतेचे उत्पादक म्हणजे ब्राह्मणच होत असें सिद्ध करण्याचा द्राविडी प्राणायाम केला आहे. Behold a light या बाराव्या प्रकरणांत व पंधराव्या Why is light denied ! या प्रकरणांत ब्राह्मणांनींच अस्पृश्यांना अशिक्षित ठेविलें असे असत्य व अज्ञानमूलक आरोप करून सध्यांच्या ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाच्या बाजूला परिपुष्टता दिली आहे. अस्पृश्यतेच्या कलंकाबद्दल आम्हांला जरी अत्यंत वाईट वाटत आहे, अस्पृश्यता शक्य तितक्या लौकर गेलीच पाहिजे असें जरी आमचें प्रांजलमत आहे, तरी पण बाई अस्पृश्यत्वाच्या उत्पादकत्वाचा बादरायणी संबंध ब्राह्मणांशीं जोडीत आहे तो मात्र आम्हांस समंत नाहीं. हा मुद्दा ऐतिहासिक सत्यानें असत्य ठरलेला आहे. अस्पृश्यता कोणी उत्पन्न केली, या महत्वाच्या प्रश्नाचा उलगडा इतिहासानें केलेलाच आहे, आणि असें सिद्ध झालें आहे कीं, **ही अस्पृश्यता**

ब्राह्मणांनीं उत्पन्न केलेली नसून क्षत्रियांनींच उत्पन्न केलेली आहे. या संबंधानें अनेक ऐतिहासिक विधानें बाहेर आलेलीं आहेत. तीं थोडींच असत्य ठरणार आहेत ?

आजपर्यंतच्या कोणत्याही देशाचा इतिहास पाहिला तर हीच गोष्ट दृष्टोत्पत्तीस येत आहे कीं, मानवी प्रगतीच्या आड क्षत्रियांचा व वैश्यांचा स्वार्थच आला होता, व येत आहे. पूर्वकाळीं क्षत्रियांनीं आपल्या स्वार्थासाठीं जितका प्रलय केला तितका कोणींही केलेला नाहीं. या बाबतींत त्यांनीं ब्राह्मणांचीही किंमत ठेविलेली नाहीं. पूर्वकाळीं सर्प जातींचा ( अप-सर्प ) म्हणजे दूर हो असें ज्या जातीला म्हणतात त्या जातीचा संहार क्षत्रियांनींच केला. येथें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, त्या जातीचा-अस्पृश्य जातीचा उद्धारच ब्राह्मणांनीं केला होता. ही गोष्ट आस्तिक्य ऋषीच्या कथेवरून सिद्ध होत आहे. पूर्वकालीं व पांडवांच्या कालीं ब्राह्मण जात तापसी वृत्तीनें अरण्यांत राहात असे. त्यांच्या वसाहती तपोवनांत असत. शहरांत त्यांचा कायम संबंध येत नव्हता. क्षत्रिय लोक ब्राह्मणांना पाचारण करीत तेव्हांच ते शहरांत येत असत. क्षत्रियांचें वास्तव्य शहरांत असल्यामुळें सर्व राज्यकारभार त्यांच्या हातांत असे. यामुळें ह्याच लोकांनीं ही अस्पृश्यता आपल्या स्वार्थाकरितां उत्पन्न केली. इतिहासाची पुनरावृत्ति होत असते, असें म्हणतात. ती गोष्ट आजच्या बाईच्या अमेरिकेंत व आफ्रिकेंत चाललेल्या काळ्या गोऱ्यांच्या लढयावरून सिद्ध होत आहे. अमेरिकेंतले क्षत्रिय व वैश्य आतां काळ्या लोकांवर जुलूम करीत आहेत. गौरवर्णीय जात तेवढी सर्व पृथ्वीवर राहावी, काळ्या जातीचा निःपात व्हावा व सर्व भूमंडळावर गोऱ्या देवांचें साम्राज्य व्हावें असे प्रयत्न सध्यां चालू आहेत व पूर्वीही चालू होते. या संबंधाचीं पुराव्यादाखल अनेक पुस्तकें पाश्चात्य लेखकांनींच लिहिलेलीं आहेत. आमच्या देशांत अस्पृश्यतेचा कलंक घालवण्याचे प्रयत्न थोड्या फार प्रमाणांत सध्यां तरी चालू आहेत. परंतु पाश्चात्य देशांत खुद्द अमेरिकेंत हा वर्णद्वेषाचा वणवा इतका भयंकर पेटला आहे कीं, त्या वणव्यांत काळे लोक भाजून निघत आहेत. आफ्रिकेंत तर हिंदूंना-काळ्यांना-एशियाटिक लोकांना अस्पृश्य समजून त्यांना गोऱ्यांच्या वाहनांतून, रस्त्यांवरून, वस्तींतून, देवळांतून जाण्यायेण्याची कडक बंदी केली जात आहे. खुद्द अमे.रकेंत नीग्रोंची भयंकर परिस्थिति आहे. ही सर्व वर्णद्वेषाची विषमता-अस्पृश्यतेची आग युरोपियन क्षत्रिय व वैश्य यांनींच पसरविलेली आहे. ही जशी आजची स्थिति तशीच पूर्वींचीही स्थिति

होती. ब्राह्मणांनीं पूर्वी अस्पृश्यता उत्पन्न केलेली नाहीं. तेव्हां बाईचें असत्य विधान हिंदुस्थानांत तूर्त चालू असलेल्या लढयांना पोषक असेंच नाहीं काय ?

अस्पृश्यतेचा कलंक धुवून टाकावा म्हणून लो. टिळकांनीं प्रयत्न केले. आजकाल महात्मा गांधी, लाला लजपतराय, डॉ. कुर्तकोटी शंकराचार्य, स्वामी श्रद्धानंद व इतर श्री सयाजीराव महाराज, वि. रा. शिंदे वगैरे समाजसेवक हे प्रयत्न करीत आहेत, व केलेलेही आहेत. अस्पृश्यांना शिक्षण देण्याकरितां हिंदूलोकांनीं पराकाष्ठेचे प्रयत्न चालविलेले आहेत. अस्पृश्यांना ब्राह्मणांनीं शिक्षण दिलें नाहीं. त्यांना अज्ञानपंकांत ठेविलें असा बाई वस्तुस्थितीचा विपर्यास करून ब्राह्मणांवर आरोप करिते. परंतु या आरोपांत कांहींच अर्थ नाहीं. हल्लीं ब्राम्हणवर्गाची स्थिति किती शोचनीय आहे, हें परक्या संस्कृतीच्या प्रकाशांत आज विशदपणें सांगण्याचें कारण नाहीं. ज्या इंग्रजसरकारची बाई महति गाते त्यांनीं तरी अस्पृश्यांकरितां कितीसे प्रयत्न केले ? अस्पृश्य समाज हा इंग्रजी सत्तेचा मनापासून चाहाता आहे, असें विधान बाईनें केलेलें आहे. त्याला स्वराज्य नको असें त्याचें म्हणणें आहे, असा बाई त्या समाजाच्या नांवानें आपण होऊन डांगोरा पिटीत आहे. अस्पृश्यांना स्वराज्य नको आहे असें कोणताही अस्पृश्य आजपर्यंत बोललेला नाहीं. असा खरा प्रकार असतांना बाई करीत असलेलीं असत्य विधानें म्हणजे तिच्या विवक्षित हेतूचे अनेक पुरावेच होत. उच्च नीचतेचा भेदाभेद आमच्या संस्कृतीला केव्हांही मान्य नव्हता व नाहीं. अस्पृश्यांना जर कोणी अज्ञानपंकांत ठेवलें असेल, तर क्षत्रिय व वैश्य याच लोकांनीं. उच्चनीचतेचें विषम तत्व आमच्या मायभूमींत नाहीं. तें बाईच्या अमेरिकेंत आहे, आणि तें किती व कसें आहे याचें वर्णन महात्मा बुकर टी. वॉशिंग्टन यांनीं आपल्या 'Out from Slavery' या ग्रंथांत उत्तम प्रकारें दाखविलें आहे. निग्रोंना अमेरिकेंतल्या गोऱ्या जातीनें जितक्या अमानुषपणानें वागविलें त्याच्या एक लक्षांशदेखील आमच्या क्षत्रियानें अस्पृश्यांना वागविलें नाहीं.

ब्राह्मणांनीं अस्पृश्यांना शिक्षण दिलें नाहीं असें बाई वारंवार म्हणते. पण खुद्द बाईच्या देशांत याच बाबतींत काय परिस्थिति आहे याचा या महामायेनें विचार केला आहे काय ? नीग्रो लोकांची बुकर टी. वॉशिंग्टन पूर्वी काय स्थिति होती व आज सुधारणेचा टेंभा पाजळणाऱ्या गोऱ्या सत्तेच्या राष्ट्रांत काय स्थिति आहे, याचा बाईनें विचार करावयास नको होता काय ? कोणीही अस्पृश्यांना अज्ञानपंकांत ठेविलें असेल, पण आज शांतता व शिस्त या दोन 'शकार' विल्ह्यांवर

हिंदुस्थानावर राज्य करणाऱ्या गोऱ्या लोकांनीं तरी चालू शतकांत या लोकांकरितां काय केलें ? इंग्रज सरकारच्या नोकरशाहीनें अस्पृश्यांच्या शिक्षणाकरितां हिंदू प्रजेनें दिलेल्या पैशाचा कितीसा विनियोग केला, याचें बेंड गेल्या असेंब्लीमध्यें नुकतेंच बाहेर आलेलें आहे. त्यावरून **इंग्रज सरकारची अस्पृश्यहितैषी बुद्धि** कशी काय आहे हें कळून आलेलेंच आहे.

Behold a light या प्रकरणांत मि. मॉंटेग्यू यांच्या मद्रास अस्पृश्यसभेनें केलेल्या अभिनंदन प्रसंगांतील पुढील उतारा दिलेला आहे. "Madras presidency outcaste's Association deprecates political change and desires only to be saved from the Brahman, whose motive in seeking greater share in the Government is that of the cobra seeking the charge of a young frog. मद्रास प्रांतांतील ही अपृश्य सभा हिंदुस्थानांत होणाऱ्या राजनैतिक परिवर्तनाच्या विरुद्ध आहे. तिला ब्राह्मणांपासून आपलें रक्षण व्हावें हीच एक गोष्ट हवी आहे. ब्राह्मण लोक शासनाधिकारांत जास्त भाग घेण्याची इच्छा करीत आहेत. ही त्यांची इच्छा म्हणजे सापांनीं बेडकाचें रक्षण करण्याच्या प्रकारासारखीच आहे."

वरील उद्गार हे अस्पृश्यांनीं मनापासून काढले कीं त्यांच्या मागें दुसरी कोणती प्रेरक शक्ति होती ? ब्राह्मणांना राज्यकारभारांत शिरण्याची हौस आज कांहीं नवीन नाहीं. वेदकालापासून प्रजेच्या दृष्टीनें तिच्या हितार्थ ब्राह्मणांनीं क्षत्रियांच्यावर आपल्या ज्ञानानें व पावित्र्यानें वर्चस्व ठेवून राज्यकारभार क्षत्रियांकडून सुरळीतपणानें चालविलेलाच आहे. ब्राह्मणांना सापाची उपमा देऊन अस्पृश्यांनीं आपल्याला मंडूक म्हणवून घेणें हें कोणत्याही विचारी ब्राह्मणाला पसंत नाहीं. आजकाल चालू राजवटींत सगळेच लोक बेडूक झालेले आहेत. ही मंडूकांची मवाळवृत्ति घालविण्याकरितां व आपली सिंहवृत्ति जागृत करण्याकरितां सर्व लोक झगडत आहेत. पारतंत्र्यांत या गोष्टी व सुधारणा होत नसतात. आधीं राजकारण व नंतर समाजकारण असा हिंदुस्थानचा विशेष आहे. अस्पृश्यांना वाटत असलेली भीति निरर्थक आहे. अस्पृश्यांना जरी स्वराज्य दिलें, त्यांच्यामुळें जरी भारत माता पुन्हा स्वातंत्र्याच्या सिंहासनावर आरूढ झाली तरी त्यांत ब्राह्मणांना आनंद आहे. पुढें बाईनें प्रिन्स ऑफ वेल्सच्या आगमन प्रसंगाचें वर्णन करतांना असें लिहिलें आहे कीं अस्पृश्यांनीं युवराजांचें सुस्वागत केलें. ही गोष्ट

अत्यंत खोटी व वस्तुस्थितीचा विपर्यास करणारीच आहे. प्रिन्स ऑफ वेल्स ज्या काळीं हिंदुस्थानांत आले तो काळ म्हणजे असहकारितेच्या चैतन्ययुक्त चळवळीचा वसंत काल होय. त्या वेळीं आतां जसा सायमन कमिशनवर कडकडीत बहिष्कार घालण्यांत आला होता, तसाच त्या वेळींही घालण्यांत आला होता. महात्मा गांधींच्या जयजयकारानें तमाम हिंदुस्थान निनादित झालें होतें. प्रिन्स ऑफ वेल्सचें स्वागत केलें तें नोकरशाहीनें व 'जो हुकमी' लोकांनीं. हिंदुस्थाननें—स्वाभिमानी हिंदु राष्ट्रानें केलें नाहीं. असा प्रकार असून बाईनें अस्पृश्य व इंग्रज यांचा बादरायणी संबंध आणून त्यांत प्रिन्स ऑफ वेल्सच्या स्वागताचें घोडें पुढें दामटण्याचा अव्यापारेषु व्यापार केलेला आहे. 'Give me office or give me death' या प्रकरणांत बाईनें सुशिक्षितांच्या बेकारीवर आपली ज्ञानज्योत पाजळली आहे. या प्रकरणांत बाई लिहिते, मला एक बी. ए. झालेला इसम भेटला. तो म्हणाला कीं मी बी. ए. होऊन दोन वर्षें झालीं तरी मला अद्याप नोकरी नाही. माझा भाऊ मला खावयास देतो म्हणून माझें चाललें आहे.

दुसऱ्या एका बी. ए. झालेल्याचें उदाहरण देऊन बाईनें असें लिहिलें आहे कीं एक बी. ए. एका अमेरिकनाजवळ म्हणाला, 'मला जर नोकरी मिळाली नाहीं तर मी आत्महत्या करीन;' व त्याप्रमाणें त्या सुशिक्षित पदवीधर बेकाऱ्यानें आत्महत्या केली. या नामनिर्देशही नसलेल्या बी. ए. च्या भाषणांतील एक वाक्य घेऊन या प्रकरणाचें शीर्षक सुशोभित केलें आहे. सुशिक्षित वर्गांत बेकारी नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं. बेकारीचा रोग इंग्लंड, अमेरिकादि देशांतही आहे. तसा तो आमच्या देशांतही आहे; पण याला कारण इंग्रज सरकारची येथील सदोष शिक्षणपद्धति होय. आज ज्ञानाची जी खच्ची झाली आहे, होत आहे त्याचा दोष इंग्रज सरकारची शिक्षणनीति होय. आज जी शिक्षणपद्धति प्रचलित आहे त्या पद्धतीचें विषारी बीज लॉर्ड मेकाले यांनीं हिंदुस्थानांत लावलें. त्यावेळीं म्हणजे २ फेब्रुआरी १८३५ रोजीं शिक्षण समितीचा अहवाल लिहितांना हे लॉर्ड म्हणतात, "We must at present do our best to form a class who may be interpreters between us and the millions, whom we govern: a class of persons, Indian in blood and color but English in tastes, in opinions, in morals and in intellects" आम्हांला असे कांहीं लोक तयार केले पाहिजेत कीं जे आमच्यांत व लाखों प्रजेंत दुभाष्याचें काम करतील, हे लोक कातड्यानें हिंदु पण अंतःकरणानें

इंग्लिश असे असले पाहिजेत. या हेतूप्रमाणें हिंदुस्थानांत इंग्रजी शिक्षणाचा पाया घालण्यांत आला. हल्लींचीं विद्यालयें व महाविद्यालयें म्हणजे **नोकर तयार करण्याचे प्रचंड कारखानेच होत.** शिक्षणाचें पवित्र ध्येय जें ज्ञानसंपादन तें वरील हेतुमुळें बाजूला राहून **शिक्षणाचें ध्येय म्हणजे गुलामगिरी**, नोकरी होय असें ठराविक सांच्याचें झालें आहे. ब्रिटिश सरकारची येथील शिक्षणनीति पाहिली म्हणजे सर्व गोष्टी साहजिक कळून येतात. इंग्रजांच्या कारकीर्दींत सुशिक्षितांचें प्रमाण ८·२ असें पडतें. हें प्रमाण इतर देशांच्या मानानें किती थोडें आहे, हें पुढील स्पष्टीकरणावरून समजून येण्यासारखें आहे.

इंग्रजांच्या कारकीर्दींत उच्चशिक्षणाची बाब तर सोडूनच देऊं, परंतु प्राथमिक शिक्षणाची स्थिति पाहून देखील यांच्या शिक्षणाची नीति कळून आल्याविना राहणार नाहीं. इतर देश आणि हिंदुस्थान यांचे आंकडे व प्रमाण काय सांगत आहे तें पाहूंः—

| देश | विद्यार्थि | प्रत्येक विद्यार्थ्याला खर्च | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ अमेरिका | १६८००००० | ४·० | ८२०००००० |
| २ आस्ट्रेलिया | ७८००००० | ३·६ | ५०००००० |
| ३ स्विट्झर्लंड | ५०२००० | ३·२ | ३५००००० |
| ४ संयुक्तराज्य | ७५००००० | ३·० | ४४२००००० |
| ५ नाताळ | २६००० | ३·० | ५४४०००० |
| ६ जर्मनी | ९०००००० | २·७ | ६५०००००० |
| ७ हिंदुस्थान | ५४४७८५० | ०·२५ | ३१५०००००० |

यावर आणखी प्रकाश पाडण्याकरतां हिंदुस्थानसरकारचा शिक्षण खर्च व इतर देशांचा शिक्षण खर्च पाहिला पाहिजे. ब्रिटिश भारत ०·७७ ( सन १९२२–२३ ), संयुक्त राज्य १७·३ ( सन १९१८·१९ ), अमेरिका ३७·० ( सन १९१९–२० ).

हिंदुस्थानांतल्या लोकांनीं सुशिक्षित होतां कामा नये, असा इंग्रज राज्यकर्त्यांचा मूळपासूनचा हेतू आहे. इ. स. १९११ मध्यें कै. वा. ना. गोखले यांनीं सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचें बिल इंपीरियल कौन्सिलमध्यें मांडलें असतांना सरकारनें त्याला विरोध करून आपली हिंदुस्थानविषयक शिक्षणप्रीति (?)

अत्यंत खोटी व वस्तुस्थितीचा विपर्यास करणारीच आहे. प्रिन्स ऑफ वेल्स ज्या काळीं हिंदुस्थानांत आले तो काळ म्हणजे असहकारितेच्या चैतन्ययुक्त चळवळीचा वसंत काल होय. त्या वेळीं आतां जसा सायमन कमिशनवर कडकडीत बहिष्कार घालण्यांत आला होता, तसाच त्या वेळींही घालण्यांत आला होता. महात्मा गांधींच्या जयजयकारानें तमाम हिंदुस्थान निनादित झालें होतें. प्रिन्स ऑफ वेल्सचें स्वागत केलें तें नोकरशाहीनें व 'जो हुकमी' लोकांनीं. हिंदुस्थाननें—स्वाभिमानी हिंदु राष्ट्रानें केलें नाहीं. असा प्रकार असून बाईनें अस्पृश्य व इंग्रज यांचा बादरायणी संबंध आणून त्यांत प्रिन्स ऑफ वेल्सच्या स्वागताचें घोडें पुढें दामटण्याचा अव्यापारेषु व्यापार केलेला आहे. 'Give me office or give me death' या प्रकरणांत बाईनें सुशिक्षितांच्या बेकारीवर आपली ज्ञानज्योत पाजळली आहे. या प्रकरणांत बाई लिहिते, मला एक बी. ए. झालेला इसम भेटला. तो म्हणाला कीं मी बी. ए. होऊन दोन वर्षें झालीं तरी मला अद्याप नोकरी नाही. माझा भाऊ मला खावयास देतो म्हणून माझें चाललें आहे.

दुसऱ्या एका बी. ए. झालेल्याचें उदाहरण देऊन बाईनें असें लिहिलें आहे कीं एक बी. ए. एका अमेरिकनाजवळ म्हणाला, 'मला जर नोकरी मिळाली नाहीं तर मी आत्महत्या करीन;' व त्याप्रमाणें त्या सुशिक्षित पदवीधर बेकाऱ्यानें आत्महत्या केली. या नामनिर्देशही नसलेल्या बी. ए. च्या भाषणांतील एक वाक्य घेऊन या प्रकरणाचें शीर्षक सुशोभित केलें आहे. सुशिक्षित वर्गांत बेकारी नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं. बेकारीचा रोग इंग्लंड, अमेरिकादि देशांतही आहे. तसा तो आमच्या देशांतही आहे; पण याला कारण इंग्रज सरकारची येथील सदोष शिक्षणपद्धति होय. आज ज्ञानाची जी खच्ची झाली आहे, होत आहे त्याचा दोष इंग्रज सरकारची शिक्षणनीति होय. आज जी शिक्षणपद्धति प्रचलित आहे त्या पद्धतीचें विषारी बीज लॉर्ड मेकाले यांनीं हिंदुस्थानांत लावलें. त्यावेळीं म्हणजे २ फेब्रुआरी १८३५ रोजीं शिक्षण समितीचा अहवाल लिहितांना हे लॉर्ड म्हणतात, "We must at present do our best to form a class who may be interpreters between us and the millions, whom we govern: a class of persons, Indian in blood and color but English in tastes, in opinions, in morals and in intellects" आम्हांला असे कांहीं लोक तयार केले पाहिजेत कीं जे आमच्यांत व लाखों प्रजेंत दुभाष्याचें काम करतील, हे लोक कातड्यानें हिंदु पण अंतःकरणानें

इंग्लिश असे असले पाहिजेत. या हेतूप्रमाणें हिंदुस्थानांत इंग्रजी शिक्षणाचा पाया घालण्यांत आला. हल्लींचीं विद्यालयें व महाविद्यालयें म्हणजे **नोकर तयार करण्याचे प्रचंड कारखानेच होत.** शिक्षणाचें पवित्र ध्येय जें ज्ञानसंपादन तें वरील हेतूमुळें बाजूला राहून **शिक्षणाचें ध्येय म्हणजे गुलामगिरी**, नोकरी होय असें ठराविक सांच्याचें झालें आहे. ब्रिटिश सरकारची येथील शिक्षणनीति पाहिली म्हणजे सर्व गोष्टी साहजिक कळून येतात. इंग्रजांच्या कारकीर्दींत सुशिक्षितांचें प्रमाण ८·२ असें पडतें. हें प्रमाण इतर देशांच्या मानानें किती थोडें आहे, हें पुढील स्पष्टीकरणावरून समजून येण्यासारखें आहे.

इंग्रजांच्या कारकीर्दींत उच्चशिक्षणाची बाब तर सोडूनच देऊं, परंतु प्राथमिक शिक्षणाची स्थिति पाहून देखील यांच्या शिक्षणाची नीति कळून आल्याविना राहणार नाहीं. इतर देश आणि हिंदुस्थान यांचे आंकडे व प्रमाण काय सांगत आहे तें पाहूं:—

| देश | विद्यार्थि | प्रत्येक विद्यार्थ्याला खर्च | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ अमेरिका | १६८००००० | ४·० | ८२०००००० |
| २ आस्ट्रेलिया | ७८००००० | ३·६ | ५०००००० |
| ३ स्विट्झर्लंड | ५०२००० | ३·२ | ३५००००० |
| ४ संयुक्तराज्य | ७५००००० | ३·० | ४४२००००० |
| ५ नाताळ | २६००० | ३·० | ५४४०००० |
| ६ जर्मनी | ९०००००० | २·७ | ६५०००००० |
| ७ हिंदुस्थान | ५४४७८५० | ०·२५ | ३१५०००००० |

यावर आणखी प्रकाश पाडण्याकरतां हिंदुस्थानसरकारचा शिक्षण खर्च व इतर देशांचा शिक्षण खर्च पाहिला पाहिजे. ब्रिटिश भारत ०·७७ ( सन १९२२–२३ ), संयुक्त राज्य १७·३ ( सन १९१८·१९ ), अमेरिका ३७·० ( सन १९१९–२० ).

हिंदुस्थानांतल्या लोकांनीं सुशिक्षित होतां कामा नये, असा इंग्रज राज्यकर्त्यांचा मूळपासूनचा हेतू आहे. इ. स. १९११ मध्यें कै. वा. ना. गोखले यांनीं सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचें बिल इंपीरियल कौन्सिलमध्यें मांडलें असतांना सरकारनें त्याला विरोध करून आपली हिंदुस्थानविषयक शिक्षणप्रीति (?)

जाहीर केली आहे. हल्लीं शिक्षणखातें सोंपींव जरी करून दिलें आहे, तरी पैशाची मोठी थोरली अडचण शैक्षणिक प्रगतीच्या आड हिंदुस्थानच्या दुर्दैवानें येत आहे. जें थोडें बहुत असमाधानकारक शिक्षितांचें प्रमाण दिसत आहे, त्यांची स्थिति फारच भयंकर आहे. जेथें शिक्षणाचें ध्येय नोकरी ठरविलें गेलें आहे तेथें नोकरीकरितां शिक्षण संपादून नोकरी करितां संशोधन करण्याचा मार्ग क्रमप्राप्त होतोच. अशा स्थितींत मागणी थोडी आणि पुरवठा फार असा प्रकार झाल्यास बेकारी वाढते. बेकाऱ्यांची संख्या हिंदुस्थानांत आहे पण ती फारच थोडी व ती सुशिक्षित बेकाऱ्यांची आहे. अमेरिकेंत व इंग्लंडांत ही संख्या फारच आहे. परंतु इंग्लंड व अमेरिका या देशांतील गोरे लोक आपल्या जातभाईंना बेकारीपासून निवृत्त करून त्यांचा योगक्षेम चालावा म्हणून सरकारच्या सहाय्यानें प्रयत्न करितात आणि हिंदुस्थानांत सरकार हिंदी बेकाऱ्यांची काळजी घेत नसल्यानें जीवनकलहाची तीव्रता जाणवूं लागतांच बेकार मृत्यूचा दरबार सुशोभित करायला निराश अंतःकरणानें तत्पर होतो.

सुशिक्षित बेकाऱ्याचें चित्र रेखाटतांना बाईनें एक मूर्खपणा केला आहे आणि तो म्हणजे **सुशिक्षित बेकारी आणि स्वराज्याची चळवळ** यांचा जोडलेला बादरायणी संबंध होय. बाई लिहिते कीं, ‘ Government, they repeat, sustains the University; Government is responsible for its existence. What does it mean by accepting our fees for educating us and then not giving us the only thing we want education for! cursed be the Government! Come, let us drive it out and make places for ourselves and our friends! हें विधान बाईनें एका नोकरी न मिळाल्यामुळें निराश झालेल्या सुशिक्षित बेकाऱ्याच्या तोंडीं दडपून दिलें आहे. त्याचा सारांश असाः—नोकरशाही आपल्या जबाबदारीवर विश्वविद्यालयें चालविते. आमच्याकडून फी घेते व आम्हांला नोकरीचें शिक्षण देते, परंतु ती आम्हांला नोकऱ्या देत नाहीं. जळो ती इंग्रज नोकरशाही! तिला हद्दपार करूं या आणि सर्व अधिकाराच्या नोकऱ्या आपण मिळवूं या!

म्हणजे बाईच्या लिहिण्याचा उद्देश असा कीं, स्वराज्याची चळवळ हेच लोक करीत आहेत. हें विधान ऐकून कोणालाही बाईच्या राजकीय ज्ञानाची अक्कल (!)

कळून येईल. स्वराज्याची चळवळ अगर राजकीय स्वातंत्र्याची चळवळ नोकरी हेंच सर्वस्व मानणारे लोक करीत असतात, हा शोध बाईला फिलिपाईन बेटांत लागला कीं काय ? नोकरशाहीच्या नोकरींत समाधान मानणारे लोक स्वराज्याची चळवळ जागृतींतच काय पण सुषुप्तींतही करणार नाहींत. स्वराज्याची चळवळही नोकरी मिळविण्याची चळवळ नसून ती **हक्कसंपादनाची लढाई** आहे.

प्रारंभीं या बाईनें असा लेखी कबुली जबाब दिलेला आहे कीं, मी हें पुस्तक दूषित बुद्धीनें किंवा परप्रेरणेनें लिहिण्याचें धाडस करीत नाहीं. ‘ Why is light Denied’ या प्रकरणांत ही बाई इंग्रज सरकारची वकिली करीत असून शिक्षणाच्या बाबतींत असा आरोप करते कीं, इंग्रज सरकार हिंदुस्थानाला सुशिक्षित करायला तयार आहे; परंतु हिंदू लोकच—हिंदी जनताच—या अशिक्षितांच्या वाढत्या संख्येला कारणीभूत व दोषी आहे. अशी वकिली करतांना या वकिलीणबाईनें आपल्या अशिलानें शिक्षणोन्नतीकरितां आजतागायत काय काय केलें, याचे दाखले दिले असते तर फारच बरें झालें असतें. पण मुळांतच नाहीं तेथें पोहऱ्यांत तरी कोठून येणार ! सध्यां शैक्षणिक खर्चाकडे नजर फेकली तर असें आढळून येतें कीं सरकार सालीना प्रत्येकाच्या मागें शिक्षणाप्रीत्यर्थ फक्त चार आणे खर्च करीत आहे. स्पष्ट म्हणायचें झालें तर असेंच म्हणावें लागेल कीं, हिंदुस्थानांत इंग्रज येण्यापूर्वी हिंदुस्थानची शिक्षणाच्या बाबतींत त्या त्या कालाप्रमाणें प्रगति होती. एका इंग्रजी लेखकानें असें लिहिलें आहे कीं, ‘ इंग्रज हिंदुस्थानांत येण्यापूर्वी हिंदुस्थानांतल्या प्रत्येक खेड्यांत एक एक शाळा होती. सध्यां ब्रिटिश हिंदुस्थानांत ५ लक्ष ८८ शहरें व गांवें अशीं असून २१९१३१ शाळा आहेत. या शाळांपैकीं १६८०१३ एवढयाच प्राथमिक शिक्षणाच्या शाळा आहेत. इंग्रज सरकारची ही शैक्षणिक प्रगतीच काय ? हिंदुस्थान सुशिक्षित व्हावा म्हणून निरनिराळ्या खासगी संस्था प्रयत्न करीत आहेत. हिंदी जनता शिक्षणाला विरोध करिते हें मेयोचें म्हणणें खरें धरलें-खरें नाहींच-तर वरील शिक्षणप्रसारक मंडळें व समाज विद्यादान करण्याच्या भानगडींत पडलेच नसते. हिंदी लोकांचा जो शैक्षणिक विरोध आहे तो इंग्रज सरकारच्या सदोष व अनुत्पादक शैक्षणिक पद्धतीबद्दल आहे. असा खरा प्रकार असून बाईनें त्याचा भलताच विपर्यास केलेला आहे.

हिंदुस्थानांतल्या खेडेगांवांत शिक्षकिणी कां मिळत नाहींत, ह्याचें उत्तर देतांना बाई लिहिते कीं,—On account of social obstacles and

dangers it is practically impossible for women to teach in villages, unless they are accompanied by husbands. सामाजिक चालीरितींमुळें व भीतीमुळें कोणतीही स्त्री आपल्या पतीशिवाय खेडेगांवांत अध्यापनाचें कार्य करण्यास तयार होत नाहीं. मागच्या एका प्रकरणांत म्हणजे ‘ अविवाहित मुली ’ यांत स्त्रियांना शिक्षण दिलें जात नाहीं, असा बाई कबुली जबाब देते आणि या वेळीं भलतेंच कारण सांगून हिंदुस्थानांतल्या खेड्यांतील लोक स्त्रियांच्या बाबतींत वाईट असतात असें भासवीत आहे. हें एका अमेरिकन बाईच्या पुढील उतारा देण्यानें सिद्ध होत आहे. ‘ No Indian girl can go alone to teach in rural districts; if she does she is ruined. हिंदुस्थानांतली कोणतीही स्त्री खेड्यांत शिकवावयास जात नाहीं. जर यदाकदाचित् गेलीच तर तिचा सर्वस्वीं नाश होतो. हें असत्य विधान करून बाईनें पुन्हा आमच्या आर्यमहिलांचा अपमानच केलेला आहे. खेडेगांवांत अगोदर शाळा कितीशा आहेत ? त्यांतल्या त्यांत मुलींच्या तरी किती ? जेथें शाळांचेंच प्रमाण कमी तेथें अध्यापिकांचा प्रश्नच कसा उद्भवतो ? ज्या कांहीं अध्यापिका आमच्या शाळांतून आहेत त्यांचें पावित्र्य उत्तम आहे. परंतु बाईच्या देशांतील अध्यापिका किती अधःपतित झाल्या आहेत व होत आहेत याचा तिनें कधींतरी विचार केला आहे काय ?

याच प्रकरणांत बाईनें खेडेगांवची दुःस्थिति दाखवून असें विचारलें आहे कीं, जेथें असा प्रकार आहे तेथें ‘स्वराज्य’ ‘स्वराज्य’ असें ओरडण्यांत अर्थ काय ? बाईला हें समजावयास पाहिजे होतें कीं, हिंदुस्थान जी एकमुखानें स्वराज्याची मागणी करीत आहे ती एवढयाचकरितां कीं, कोणतीही सुधारणा करावयाची झाली तरी ती गोष्ट सत्तेशिवाय होत नाहीं. इंग्रजांनीं आपल्या जातभाईंची उन्नति केली व करीत आहेत ती सत्ता आहे म्हणूनच. बाईच्या जन्मभूमीची उन्नति झाली व होत आहे ती तिच्या भाईबदांच्या हातांत राज्यसूत्रें आहेत म्हणूनच. सर्वांगीण उन्नतीची गुरुकिल्ली म्हणजेच स्वराज्य होय. स्वराज्याशिवाय कोणतेंही राष्ट्र उन्नत होत नाहीं व झालेलेंही नाहीं, असा अखिल राष्ट्रांचा राजकीय इतिहास सांगत आहे.

बाई पुढें लिहिते—कीं, इ. स. १९२२ मध्यें स्त्रीशिक्षणाची अशी स्थिति होती. ब्रिटिश भारतांत एकंदर स्त्रीसंख्या १२३५००००० होती. त्यांत ४३९१

स्त्रिया अध्यापिकांचें शिक्षण घेत होत्या. त्यांपैकीं २०५० ख्रिश्चन जातीच्या स्त्रिया होत्या. यावरून खेडेगांवांतील अध्यापिकांच्याविषयीं वरील विधान असत्य ठरत नाहीं काय ? अशीं परस्परविरोधी विधानें बाईच्या ग्रंथांत अनेक आहेत. दाखले व पुरावे देतांना देखील सत्यापेक्षां असत्य भागच अधिक आहे. लाहोरच्या व्हिक्टोरिया गर्लस्‌ स्कूलच्या मिस्‌ बोस नांवाच्या अध्यापिकेचा बाईनें उतारा दिला आहे. त्या बाबतींत मिस्‌ बोस यांनीं असे स्पष्ट उद्गार काढले आहेत कीं, 'A great many of the things printed in inverted commas were never spoken.' माझ्या नांवावर जीं अवतरणें दिलेलीं आहेत तीं मी कधींच बोललेली नाहीं.

खेडेगांवांतले लोक इंग्रजी सत्ताप्रिय आहेत. तालुक्याचे व जिल्ह्याचे अधिकारी खेडेगांवच्या रयतेबद्दल फार काळजी घेतात. खेडेगांवांतील रयतेची हे लोक रात्रंदिवस काळजी घेत असतात. अशी पुन्हा नोकरशाहीची वकिली बाईनें केलेली आहे. नोकरशाही व इंग्रज सरकार खेडेगांवची उन्नति करीत आहे कीं आपली उन्नति करून घेत आहे, हें सध्यांच्या खेडेगांवच्या दुर्दशेवरून कोणालाही ताडतां येईल. इ. स. १८१३ मध्यें पार्लमेंटनें एक कमिटी नेमून हिंदुस्थानांत पाठविली होती. त्या कमिटीनें फक्त एवढेंच कार्य केलें कीं, 'हिंदुस्थानांत ब्रिटिश मालाची मागणी कोणत्या योगानें वाढेल.' हिंदुस्थानच्या उन्नतीची नोकरशाहीला व इंग्रज सरकारला किती काळजी आहे हें इ. स. १८७५ मधील लॉर्ड सॅलिसबरी यांच्या 'India must be bled' **हिंदुस्थानचें रक्त शोषण केलें पाहिजे** यावरून कळून येत नाहीं काय ?

महात्मा गांधींनीं हिंदुस्थानच्या तरुणांना खेड्यांतील चळवळीचा केलेला उपदेश व त्यांतील आपल्याला उपयुक्त होतील तेवढींच अवतरणें घेऊन बाईनें councel of perfection असें ठोकून दिलें आहे. व महात्माजींचे विचार आपल्याच विचारासारखे आहेत असें भासविण्याचे अश्लाघ्य प्रयत्न केले आहेत. परंतु कोठें विश्ववंद्य महात्माजींचे विचार आणि कोठें हिंदुस्थाननिंद्य अखंड कुमारिकेचे अपवित्र विचार ! खेड्यांची दुर्दशा दूर करावी, तेथील नष्ट झालेले उद्योगधंदे पुन्हा ऊर्जितावस्थेला आणावे, शेतकऱ्यांची स्थिति सुधारावी म्हणून महात्माजींनीं हिंदी तरुणांना उपदेश केला होता. देशबंधू दास यांनीं प्रचंड निधि जमवून स्वार्थत्याग करून खेड्यांचा प्रश्न सोडविण्यास सुरवात केली होती.

आधिभौतिक काळाच्या व्यापारी प्रगतींत खेडेगांवची निकृष्टावस्था झालेली असून शहरांच्या भलत्या वाढीमुळें खेडेगांव मृतप्राय झालेले आहेत. बाई म्हणते कीं, नोकरशाहीचे नोकर खेडेगांवची उन्नति करीत आहेत, परंतु खेडेगांवच्या अवनतीचें प्रमाण त्यांच्या करवीं उन्नति झाल्याचें दाखवीत नाहीं !

इंग्रज सरकारनें व नोकरशाहीनें हिंदुस्थानचें हित व उन्नति कशी व किती केली याचें विस्तृत विवरण बाईनें केलें असतें म्हणजे तिच्या विधानांची सत्यता सहजच पटली असती. परंतु इंग्रज सरकारची वकिली करून हिंदुस्थानच्या माथ्यावर दोषांचें खापर फोडणाऱ्या या बाईला एवढी साधी गोष्ट तरी कशी सुचणार !

## भाग ४ था.

चौथ्या भागाला **मि. गांधी** असें शीर्षक देऊन सुरवात केली आहे. हें शीर्षक देण्यांत याच भागांतील पुढील चार प्रकरणांत जे विषय वर्णन केले आहेत त्यांचा संबंध जोडण्याचा उपद्व्याप बाईनें केलेला आहे. हेतू असा कीं महात्मा गांधी हे अहिंसा तत्वाचे पूर्ण पुरस्कर्ते असून त्या तत्त्वाप्रमाणें हिंदुस्थानांतील लोक वागत नाहींत, हें भलत्या सलत्या विधानानें सिद्ध करण्याचा आव घातला आहे. या भागांत एकंदर सात प्रकरणें आहेत. त्यापैकीं The sin of the Salvation Army मुक्ति फौजेमुळें होणारें पाप, The sacred cow पवित्र गोमाता, The Quality of Mercy दयाधर्म, In the house of her friends गोरक्षणसंस्था. हीं प्रकरणें गोमातेसंबंधीं आहेत. Home of stark want कंगाल लोकांचा देश. The Reforms राजकीय सुधारणा. Princes of India हिंदुस्थानांतले संस्थानिक. अशी या भागाची आंखणी केलेली आहे.

महात्मा गांधींच्या साबरमतीच्या आश्रमाचें व त्यांच्या नित्य क्रमाचें, त्यांच्या स्वरूपाचें, राहणीचें वर्णन करून बाईनें महात्माजींना 'आपला अमेरिकेला काय संदेश आहे !' असा प्रश्न विचारला. महात्माजींनीं आपल्या आवडत्या चरख्याकडे बोट दाखवून असा संदेश सांगितला कीं, 'My message to America is the hum of this spinning wheel' सूत काढतांना चरख्याचा जो मंजुळ स्वर निघत आहे तोच माझा अमेरिकेला संदेश आहे. महात्माजींच्या दिव्य संदेशाचा अर्थ बाईला न समजून तिनें आपल्या विवक्षित हेतू साधनाकरतां त्याचा भलताच व आपमतलबी हेतू घेऊन आपलें भिकार चोपडें खरडलें आहे, असा बाई कबूली जबाब देते. असा कबूली जबाब देण्यांत तिचा मानभावीपणा तर स्पष्ट दिसतच आहे. परंतु तिला असें भासवावयाचें आहे कीं ज्या उच्च हेतूनें महात्माजींनीं चरखा हातांत धरून सर्व हिंदी जनतेपुढें एकच सूत्र ठेविलें, त्याप्रमाणें बाई म्हणते कीं, महात्माजींच्या सूत्राप्रमाणें निर्विकार बुद्धीनें मी हें पुस्तक लिहिलें आहे. महात्माजींचें ध्येय कोणीकडे आणि या निर्लज्ज महामायेचें हें मानभावी बोलणें कोणीकडे ! कोठें विश्वहितैषी महात्माजी आणि कोठें गौरवर्चस्वाभिलाषी ही कुमारिका ! महात्माजींनीं अमेरिकेला जो संदेश सांगितला तो

कितीतरी यथार्थ व अर्थपूर्ण असा आहे. आधिभौतिक शास्त्राच्या झटापटींत अध्यात्मिक पावित्र्याची कशी गळचेपी होते, नैसर्गिक जिवनक्रम कृत्रिम आचार-विचारांनीं कसा दुःखदायक होतो, परक्या संस्कृतीच्या दडपणाखालीं स्वसंस्कृतीची कशी अवनति होते, याची सर्व प्रकारची जाणीव जगाला व्हावी म्हणून महात्माजी आपल्या साधुवृत्तीनें, सत्यभक्तीनें व पवित्र भावनेनें प्रयत्न करीत आहेत. अशा महात्म्यावर देखील या बाईनें घाणेरडे आरोप लादून त्यांच्या पवित्र संदेशाची टर उडविली आहे. यासंबंधानें महात्माजींनीं बाईला खरमरीत उत्तर देऊन आपल्या संदेशाचा बाईनें भलताच कसा विपर्यास केला आहे, हें स्पष्ट भाषेंत सांगितलें आहे. महात्माजींचें उत्तर आम्ही **'मेयो व तिचे टीकाकार'** या प्रकरणांत दिलेलें आहे.

**'मुक्ति फौजेमुळें होणारें पाप'** या प्रकरणांत सर्व रोख असा आहे कीं सरकारनें गुरुंचराईच्या जागा ( Grazing grounds ) मुक्ति फौजेसाठीं फुकट दिल्यामुळें गुरांची चरण्याची गैरसोय होऊन त्यांची मृत्युसंख्या वाढली आहे ! सर्व जंगलें सरकारनें आपल्या ताब्यांत घेऊन गुरांची चरण्याची जागा कमी केली आहे. पूर्वीं गुरुंचराईची जागा निराळी असून त्या ठिकाणीं गुरांना मनमुराद चारा व पाणी मिळत असे; परंतु हल्लीं त्यावर कडक निर्बंध घालण्यांत आले आहेत. यामुळें गुरांची उपासमार होत असून हजारों जनावरें मरत आहेत. याला कारण सर्वस्वीं सरकारचें जंगल खातें असतांना बाईनें मुक्ति-फौजेचें घोडें पुढें दामटून सरकारच्या जंगल खात्यासंबंधानें मुग गिळले आहेत. खरें पाहिलें असतां मुक्ति फौजेच्या दिमतीला गुरुंचराईच्या जागा फारच थोड्या आहेत. गुरुंचराईच्या विस्तृत क्षेत्रांचें आकुंचीकरण सरकारनेंच केलेलें आहे. यांचा भयंकर परिणाम हिंदुस्थानच्या शेतकीला उपयोगी पडणाऱ्या जनावरांवर झालेला आहे ! जंगल खात्याविरुद्ध लोकपक्षाच्या दृष्टीनें होत असलेल्या अन्यायांच्या निराकरणाकरतां कमजास्त प्रमाणांत कायदे मंडळांतील लोकनियुक्त सभासद सारखे प्रयत्न करीत आहेत. ह्या त्यांच्या प्रयत्नाकडे मात्र बाईचें लक्ष नसतां तिनें मुक्तीफौजेची ढाल पुढें करून सरकारचें या बाबतींत सफाईनें संरक्षण करण्याचा खटोटोप केला आहे.

याच प्रकरणांत हिंदू लोक गोमातेला पवित्र मानतात, गोमूत्र प्राशन करतात, पंचगव्य घेतात, तिचें पूजनअर्चन करतात, मृत्युसमयीं तिच्या पवित्र दर्शनानें वैकुंठप्राप्ति होते, वगैरे गोष्टींचें वर्णन करून हिंदूलोक किती घाणेरडे आहेत हें

दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. पंचगव्याचा हेतू व त्याचें महत्व यांची बाईला मुळींच जाणीव नाहीं. बाईच्या मतें पंचगव्य म्हणजे अमेरिकेंत ज्याप्रमाणें गाईच्या, डुकराच्या, बकऱ्याच्या, गाढवाच्या व इतर प्राण्यांच्या मासांचा रस्सा ( Soup ) पुष्टिवर्धनार्थ पितात त्याचप्रमाणें होय ! जणूं काय पंचगव्य म्हणजे हिंदूचें अन्नच होय ! परंतु पंचगव्यप्राशन हा विधी धार्मिक असून तो पावित्र्याकरतां आहे. त्यांत ज्या पांच वस्तू असतात त्यांचे गुणधर्म वैद्यक शास्त्राच्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त असे ठरलेले आहेत.

पंचगव्य हें हिंदूंचें अन्न नाहीं, व तें फक्त विवक्षित वेळींच कांहीं धार्मिक प्रसंगीं अल्पप्रमाणांत घेण्याचा प्रघात आहे. धार्मिक दृष्टि बाजूला ठेवून गोमूत्राच्या उपयुक्ततेचा विचार करतां तें किती औषधी व जीवनोपयोगी आहे याचें विवरण आमच्या सुश्रुतादि ग्रंथांत उत्तमप्रकारें केलेलेंच आहे. याची उपयुक्तता हल्लींच्या काळीं पाश्चात्य देशांतील वैद्य-विद्याविशारदांनाही पटूं लागली आहे. इंग्लंडमध्यें बेचाळीस वर्षें राहिलेल्या एका डॉक्टरणीचें या बाबतींतील मत गोमूत्राचा औषधी उपयोग स्पष्टपणें दर्शवीत आहे. गोमूत्रांत 'अमोनिया' नामक क्षार असतो व त्यामुळें ' मलेरिया ' जातो. इतकेंच नव्हे तर यामुळें क्षयरोगासारखा असाध्य रोग बरा होतो. इ. स. १९११ मध्यें क्षयरोग्यांच्याकरितां बेडफर्ड येथें एक रुग्णालय उघडण्यांत येऊन त्यांना अमोनिया क्षार हुंगण्याकरतां देण्यांत येत असे व आहे. अमोनिया क्षार हा क्षयरोगनाशक आहे ही गोष्ट हजारों वर्षांपूर्वीं आपल्या सुश्रुत, वाग्भट, चरकादिकांच्या वैद्यकीय ग्रंथांत दिलेली आहे. अमोनिया क्षार गोमूत्रांत असल्यामुळें गोमूत्राचा समावेश पंचगव्यांत करण्यांत आला आहे. आमचे वैद्य देखील क्षयरोग्यांना बकरीच्या मूत्रांतून औषधें देतात व त्यांच्या औषधोपचारानें क्षयरोगी बरे झालेले आहेत.

इंग्लंडमध्यें अशीं कांहीं रुग्णालयें आहेत कीं, त्या रुग्णालयांत मनुष्याचें मूत्र औषध म्हणून देतात. हें देण्याचें कारण विलायती डॉक्टर असें सांगतात कीं, त्यांत एक प्रकारचा रोगनाशक क्षार असतो. असाच उपयोग चिकित्सक दृष्टीनें गोमूत्र व पंचगव्य यांचा आहे.

परंतु बाईनें त्या प्रश्नाकडे कुत्सित बुद्धीनें पाहून पवित्र गोमातेची विटंबना केलेली आहे. पुढें बाईनें एका राजाचें उदाहरण देऊन व त्यांत युरोपियनाशीं संसर्ग झाल्यामुळें गलिच्छपणा वाटून त्यांनीं स्नान केलें. हें उदाहरण देण्याचें कारण

इतकेंच कीं, जे हिंदू गोमूत्र प्राशन करतात तेच हिंदू पाश्चात्य देशांतील आमच्या जातभाईंना गलीच्छ असें समजतात! भारतीय औद्योगिक समितीचा आधार घेऊन बाई लिहिते कीं, Have the slaughter houses aroused any local feeling in the matter? कसाईखान्यामुळें स्थानिक लोकांत कांहीं खळबळ उडाली काय? असा प्रश्न एका सभासदानें एका साक्षीदाराला केला तेव्हां साक्षीदारानें पुढील उत्तर दिलें. 'They have aroused,' said the witness, 'local feelings of greed and not of indignation. I think you will find that many of the municipal members are shareholders in these yards. Brahmans and Hindus are also found shareholders.' त्यांना राग तर आला नाहींच परंतु त्यांना लोभ उत्पन्न झाला आहे. कसाईखान्याच्या बाबतींत म्युनिसिपालटींतील बरेच मेंबर हिस्सेदार आहेत व या हिस्सेदारांत बरेच ब्राह्मण व हिंदू आहेत. वरील उतारा देण्यांत बाईचा दुष्ट हेतू दिसत आहे. जे लोक गाईला पवित्र मानतात तेच लोक कसाईखान्याच्या बाबतींत हिस्सेदारीचा व्यापार करतात, असें बाईला म्हणावयाचें आहे. कसाईखान्याच्या बाबतींत मुसलमानाशिवाय कोणाचीही संमति हिंदुस्थानांत तरी दिसत नाहीं. ब्राह्मण व हिंदू यांना गोमातेचा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा वाटतो. गोवधाच्या विरुद्ध बाबतींत हिंदूंचे काय काय प्रयत्न चालले आहेत हे हल्लींच्या काळांत तरी निर्देश करण्याचें कारण नाहीं. हिंदु-मुसलमानांच्या लढ्याला हेंच कारण आहे. मुसलमानांनीं गोवध करूं नये म्हणून तमाम हिंदूंचें आग्रहाचें म्हणणें आहे. हिंदूंना गोमाता आपल्या प्राणापेक्षांही प्रिय अशी असून ती वंदनीय अशी आहे. हिंदूंच्या वेदांत गोमातेच्या संबंधीं ठिकठिकाणीं कडक अशा आज्ञा आहेत. गोमाता ही राष्ट्ररक्षक आदि जननी आहे असें अथर्व-वेदांत स्पष्ट म्हटलें आहे.

अपस्त्वं धुक्षे प्रथमा उर्वरा अपरा वशे।
तृतीयं राष्ट्रं धुक्षेऽन्नं क्षीरं वशे तम्॥

अथर्ववेद १०-१०-८

गोजननीचे राष्ट्रावर तीन प्रकारचे उपकार आहेत. गोवध करूं नये अशी यजुर्वेदांत ऋचा आहे.

गो मा हिंसीरदितीं विराजम्॥ ४२

गाईची योग्यता अत्यंत मोठी असून तिच्यासंबंधानें ऋग्वेद म्हणतो कीं,

**माता रुद्राणां दुहिता वसूनां स्वसादित्यानाम् मृतस्य नाभिः ।**
**प्र नु वोचं चिकितुषे जनाय मा गामनागामदितिं वधिष्ट ॥**

ऋग्वेद ८।१०१।१५

म्हणजे गाय ही रुद्रांची माता आहे, वसूंची दुहिता आहे, आदित्याची बहिण असून ती अमृत देणारी आहे आणि म्हणूनच अशा थोर मातेचा वध करूं नका. गाईला अघ्न्या अवध्य असें नांव दिलें आहे. त्याचा हाच अर्थ आहे कीं, गाय ही अवध्य आहे. कोणी अविचारानें व मूर्खपणानें अगर नकळत गाईचा वध करील तर वेदांत 'मृत्यवे गोघातम्' गाईचा वध करणाऱ्याला देहांत शासन करावें अशी कडक अनुज्ञा आहे. असें असतांना कोणता हिंदू कोणता ब्राह्मण कसाईखान्याला आपली संमती देईल व गांवांत कसाईखाना निर्माण झाला म्हणजे 'लोभी' होईल! बाईला मागच्या भागांप्रमाणेंच याही भागांत आपला हिंदुद्वेष उगवावयाचा आहे म्हणूनच हा उपद्व्याप तिनें या भागांत केला.

बाई पुढें लिहिते कीं हिंदू लोक गाईला फार वाईट रीतीनें वागवितात, तिला नीट चारा मिळत नाहीं. गाईला चारा न मिळण्याचें कारण हिंदुस्थानांतील शेतकीची दुर्दशा हें स्पष्ट असतांना बाई चाऱ्याच्या दुर्भिक्षाचें पाप हिंदु जनतेच्या डोक्यावर लादीत आहे. गोशाळेला कांहीं लोक मदत करतात परंतु ती मदत गोशाळेचे चालक फस्त करून गाईंना उपाशी ठेवतात असा बाई निर्लज्जपणानें गोरक्षण संस्थांवर अविचारानें शेरा मारीत आहे. गोरक्षण संस्थांचे अहवाल व त्यांची गोसेवा उत्तम प्रकारें चाललेली बाईला पाहवत नाहीं कीं काय? गोशाळेमुळें व गोरक्षणाच्या जिव्हाळयाच्या चळवळीमुळें कसाईखान्याला मंदी येत असल्यानें बाईचा जीव तिळतिळ तुटत असेल!

कसाईखान्याच्या भयंकर वाढीमुळें शेतकी उध्वस्त झाली, दुधदुभतें संपुष्टांत आलें, पौष्टिक अन्नांचा तुटवडा पडला, अशी स्थिति आज घटकेला येथें झालेली आहे.

बाई दुसरें असें विधान करते कीं, हिंदू लोक निरुपयोगी जनावरांना पोसून दरवर्षी जवळ जवळ १७ कोटी रुपयांचें नुकसान करून घेतात. हें सिद्ध करण्याकरतां बंगलोरच्या शेतकी खात्याचा इ. स. १९२४ च्या अहवालाचा आधार दिला आहे. पण हा आधार कसा चुकीचा व दिशाभूल करणारा आहे हें पुढील

आंकड्यावरून दिसून येत आहे. वरील अहवालांत असें लिहिलें आहे, कीं १ कोटी ४६ लक्ष जनावरांपैकीं फक्त साडे चोवीस लक्ष जनावरें शेतकीच्या निरुपयोगी आहेत. यावरून बाई म्हणते त्याप्रमाणें निरुपयोगी जनावरांचें प्रमाण शेंकडा पन्नास नसून फक्त सोळा आहे व जीं शेतकीच्या निरुपयोगी ठरलेलीं जनावरें तीं दुसऱ्या कामाला निरुपयोगी असतात असें नाहीं ! हें लक्षांत घेतलें म्हणजे निरुपयोगी जनावरांच्या पोषणामुळें होणाऱ्या नुकसानीचें प्रमाण १७ कोटी रुपयांचें नसून फक्त साडेतीन कोटी रुपयांचें होईल ! जीं जनावरें निरुपयोगी म्हणून गणलीं जातात तीं जनावरें सर्वस्वी निरुपयोगी तरी कशीं ठरतात ? याचें स्पष्टीकरण म्हणजे संयुक्त प्रांतीक सरकारनें इ. स. १९२१ सालीं जंगल खात्याच्या गाऱ्हाण्यांची चौकशी करण्याकरतां एक कमेटी नेमली होती. त्या कमेटींत मि. पी. वुइन्डहॅम, कमिशनर, मि. आर. जी. मॅरिअट, आणि मि. नियोगी, एम. एल. सी. असे सभासद होते. त्या कमेटीनें तपशीलवार माहिती मिळवून असें मत दिलें आहे कीं ' We have been much impressed by the stress which has been laid on the functions which cattle perform in the manuring of land and it has been shown to us that cattle even old and decrepit have their use '. या जनावरांची उपयुक्तता दाखवितांना कमेटी आपल्या अहवालाच्या चौदाव्या भागांत असें म्हणते कीं, यांच्या शेणखतापासून शेतकऱ्यांना जवळ जवळ पंधरा कोटी रुपयांचा फायदा होतो. यावरून बाईचें विधान असत्य ठरून शेतकीच्या उपयोगाला निरुपयोगी जनावरें कशीं फायदेशीर असतात, हें सिद्ध होत नाहीं काय !

असें असूनदेखील बाई म्हणते हिंदू लोक अशा निरुपयोगी जनावरांना उराशीं बाळगतात व त्यायोगानें आपलें भयंकर नुकसान करून घेतात. त्यापेक्षां असलीं जनावरें पोसण्याऐवजीं त्यांची रवानगी कसाईखान्यांत करून देऊन आपलें निरर्थक होणारें नुकसान कां भरून काढीत नाहींत ? बाईला आम्ही असा सरळ प्रश्न विचारतों कीं, बाईच्या देशांत जीं अशक्त व कर्तत्वहीन अशीं माणसें आहेत, जीं परपुष्ट आहेत, परावलंबी आहेत, वृद्ध आहेत त्यांच्या पालनपोषणाकरतां जो कोट्यावधी रुपयांचा खर्च होऊन बाईच्या राष्ट्रीय संपत्तीचें नुकसान होत आहे तें तिनें वरील लोकांची कत्तल करण्याचा उपदेश करून कां बरें भरून काढण्याचा खटाटोप केला नाहीं !

34600

बाई याच प्रकरणांत एके ठिकाणीं लिहिते कीं, हिंदुस्थानांतले लोक जनावरांवर अत्यंत अत्याचार करतात. बैलांना त्यांच्या शक्तीबाहेर ओझें ओढावें लागतें. परंतु हे लोक मुक्या जनावराकडून अतिशय कामें घेऊन त्यांना पोटाला भरपूर घालीत नाहींत. बैलाकडून दारिद्य व दुर्भिक्षामुळें जेथें शेतीचीं देखील कामें उत्तम प्रकारानें होत नाहींत तेथें इतर कामें कशीं होणार ! हिंदू लोक जनावरांवर अत्याचार करीत नाहींतच. पण घटकाभर असें गृहीत धरलें कीं, ते मुक्या जनावरांवर अत्याचार करतात. परंतु अमेरिकेंत निग्रो लोकांवर जे अनन्वित अत्याचार होतात, त्यांना जिवंतपणीं सोलून काढण्याचे 'लिंचिंग'सारखे प्रकार होतात, त्यांची वाट काय ? बाईच्या देशांत जनावरांपेक्षां देखील या निग्रो लोकांना अत्यंत अत्याचारानें वागविलें जातें. **काळया लोकांना आत्माच नाहीं.** 'Black man has no soul' हें अमेरिकेंतील गोऱ्या लोकांचें म्हणणें त्यांच्या सहृदयतेचेंच उदाहरण काय ? गुरांना पोटभर कडबा मिळत नाहीं याचें कारण आम्ही वर दिलेलेंच आहे. पूर्वी गुरांना पोटभर अन्न मिळत असे व तीं धष्ट पुष्ट असत. परंतु गुरुंचराईचें क्षेत्र इंग्रज सरकारच्या रियासतींत मर्यादित होत असल्यामुळें प्रत्येकावर कराचें ओझें भलतीकडे असह्य झाल्यामुळें हिंदुस्थानची अकिंचनावस्था कल्पनातीत झालेली आहे.

अमेरिकेंत किंवा इतर देशांत ज्याप्रमाणें पशुसंवर्धन हें आर्थिक कार्य आहे, त्यानें देशांतील शेतकी सुधारते असें समजून त्या त्या देशांतील लोक व सरकार मिळून हें कार्य करतात. परंतु हिंदुस्थानांत तसा प्रकार मुळींच नाहीं. शेतकीच्या बाबतींत देखील हीच रड आहे. इंग्रज सरकार शेतकीची उन्नति झाली पाहिजे असें मोठा आव म्हणून म्हणत असतें. परंतु 'बोलाचीच कढी बोलाचाच भात' असाच सारा प्रकार आहे. सौख्य व स्वातंत्र्य नष्ट होऊन दुःख व पारतंत्र्य प्राप्त झालेल्या हतभागी राष्ट्रांतील लोकांना जर आपत्तीच्या झंझावाताशीं, जीवनकलहाच्या तीव्रतम टक्करीशीं झगडावें लागतें तर मुक्या प्राण्यांची तशी स्थिति दिसली तर त्यांत नवल तें काय !

एकविसावें प्रकरण Home of stark want असें असून बाईनें हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासाचें प्रदर्शन करून असें म्हटलें आहे कीं, **हिंदुस्थान देश चंद्रगुप्ताच्या कालापासून इंग्रजांचें राज्य सुरू होईपर्यंत अत्यंत दरिद्री, अत्याचारी, आपसांत झगडणारा, रानटी असा होता. इंग्रज**

**येण्यापूर्वी या देशांत सर्वत्र दंगे-धोपे, लुटालूट चाललेली होती.** चंद्रगुप्ताच्या काळीं उघडपणानें स्त्रीला देखील रस्त्यानें जाणें सुरक्षित वाटत नसे. इंग्रज इतिहासकारांनीं विवक्षित हेतूनें लिहिलेले ऐतिहासिक ग्रंथ पुराव्याला घेऊन बाईनें वरील विधानें केलेलीं आहेत. म्हणजे खि. शकापूर्वी ३२२ वर्षांपासून इ. स. १८५८ पर्यंतचा इतिहास साडेसोळा पानांत दडपून आपल्या हिंदुस्थानच्या ऐतिहासिक ज्ञानाचे बारा वाजविले आहेत.

बाईचें म्हणणें किती मूर्खपणाचें व अनैतिहासिक आहे, याचें दिग्दर्शन करावयाचें झाल्यास तें इतिहासाच्या तेजस्वी प्रकाशांत केलें पाहिजे. निरनिराळ्या इतिहासकारांनीं हिंदुस्थानच्या आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, औद्योगिक बाबींचे इतिहास लिहिलेलेच आहेत. या इतिहासकारांत कित्येक इंग्रजही आहेत, कित्येक पर्शियन आहेत, फ्रेंच आहेत, पोर्तुगीज आहेत. ज्यांचा ज्यांचा हिंदुस्थानाशीं संबंध आला त्यांनीं त्यांनीं त्या त्या काळचें सूक्ष्म निरीक्षण करून भारत-मातेच्या श्रेष्ठतेचा इतिहास लिहून ठेवलेला आहे.

चंद्रगुप्ताच्या कालापासून इंग्रज व्यापाराच्या निमित्तानें हिंदुस्थानांत येईपर्यंतचा सर्व इतिहास आज जागत्या डोळ्यांनीं भारतमातेच्या श्रेष्ठतेबद्दल साक्ष देण्यास सदैव तत्परच आहे. इंग्रज लोक हिंदुस्थानांत येण्यापूर्वी हिंदुस्थान सुसंस्कृत होता कीं रानटी होता याचें उत्तर इंग्रजांचा गव्हर्नर सर थॉमस मनरोनें इ. स. १८१३ च्या हनसर्ड वादविवादाच्या वेळीं ( Hansard's Debates April 12 of 1813) पुढीलप्रमाणें दिलेलें आहे. 'If a good system of agriculture, unrivalled manufacturing skill, a capacity to produce whatever can contribute to covenience or luxury, schools established in every village, for teaching, reading, writing and arthmetic, the general practice of hospitality and charity among each other and above all a treatment of the female sex full of confidence, respect and delicacy, are among the signs which denote a civilized people, then the Hindus are not inferior to the nations of Europe; and if civilization is to become an article

of trade between the two countries, I am convinced that this country (England) will gain by the import cargo. इतकेंच काय परंतु ज्या वेळीं इंग्रज लोक अरण्यांत एखाद्या रानवटाप्रमाणें रहात होते, त्या वेळीं देखील आमच्या भारतवर्षांची सर्व बाजूंनीं उन्नति झाली होती असें इंग्लंडच्या बिलाच्या वेळीं एडमंड बर्कनें स्पष्टोद्गार काढले आहेत. 'This multitude of men (the Indian nation) does not consist of an abject and barbarous populace much less of gangs of savages; but of a people for ages civilized and cultivated, cultured by all arts of polished life while we (English men) were yet dwelling in the woods.' प्रसिद्ध अमेरिकन लेखक एच. एम. हिंडमन आपल्या Truth's about India या ग्रंथाच्या पहिल्या भागांतील पान ८ व ९ वर लिहितो कीं,

"Many hundreds of years before the coming of the English, the nations of India had been a collection of wealthy and highly civilized people, possessed of a great language, with an elaborate code of laws and social regulations, with exquisite artistic taste in architecture and decoration producing beautiful manufactures of all kinds, and endowed with religious ideas and philosophic and scientific conceptions which have greatly influenced the development of the most progressive races of the West. One of the noblest individual moralists who ever lived, Sakya Muni (Buddha) was a Hindu; the Code of Manu, dating from before the Christian Era, is still an essential study for the jurist."

वेदकालापासून इंग्रज सरकार हिंदुस्थानांत येईपर्यंत हिंदुस्थानची सर्व बाजूंनीं भरभराटच होती, याचें सुंदर विवेचन उईल्यम डिग्बी यांच्या भारतवर्षांची भर-

भराट या सुंदर ग्रंथांत दिलेली आहे. हिंदुस्थान ही सुवर्णभूमी होती असा लौकिक पोर्तुगीज, डच, इंग्रज व स्पेनचे लोक यांनीं ऐकून हिंदुस्थानचा व्यापार काबीज करण्याच्या मिषानें आपले देश सोडले व सुष्टदुष्ट उपायांनीं भारतवर्षाची दौलत लुटून आपले तळीराम गार केले. इतर राष्ट्रांनीं सुवर्णभूमीला लंका बनविली त्याच प्रमाणें इंग्रजांच्या ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थानचे उद्योगधंदे, कलाकुशलता कशी नष्ट केली, या करतां त्या वेळच्या इतिहासाकडे लक्ष दिलें पाहिजे.

वैदिक कालांत भारतवर्ष जसा गौरवाच्या व वैभवाच्या उत्तुंग शिखरावर होता तसा कोणताही देश नव्हता, असें म्हटल्यास अतिशयोक्ति मुळींच होणार नाहीं. भारताची ही स्थिति कौरव पांडवांच्या युद्धापर्यंत कायम होती; पण नंतर मात्र तें भारतवैभव कमी होऊं लागलें. महर्षी अरविंदबाबू म्हणतात कीं, भारताची थोडी थोडी अवनती होण्यास सुरवात झाली, परंतु ती अवनती भगवान् श्रीकृष्णाच्या राजनीतीनें पार पिटाळून लावली. भगवान् श्रीकृष्णाच्या वेळीं व निर्वाणानंतर भारताची उन्नति सारखी होत होती. हा उन्नतीचा अखंड प्रवाह मुसलमानांच्या सत्तेपर्यंत सारखा होता. पण जेव्हां मुसलमानांनीं आपली सत्ता हिंदुस्थानांत प्रस्थापित करण्याचा अट्टाहास केला व सत्तेला प्रारंभ केला तेव्हांपासून त्या उन्नतीला अवनतीचें पुन्हां ग्रहण लागण्यास सुरवात झाली. मुसलमानी सत्तेनें भारतवैभवावर हल्ले करण्यास सुरवात केली. इसवी सनापूर्वी सात आठशें वर्षें भारतांतील भडोच, सोपारा वगैरे ठिकाणीं परदेशच्या लोकांचा व्यापार चालत असे व त्या व्यापारापासून हिंदुस्तानास बरेंच धन मिळत असे. डॉक्टर साईस यांनीं आपल्या ग्रंथांत अनेक उदाहरणें देऊन असें सिद्ध केलें आहे कीं, ख्रिस्ती शकाच्या पूर्वी तीन हजार वर्षें हिंदुस्तान आणि असीरिया या दोन देशांत व्यापाराचीं दळणवळणें होतीं. हिंदुस्थानांतील कच्चा व पक्का माल परदेशांत जात असे व त्याच्या ऐवजीं सोनें चांदी हिंदुस्तानांत येत असे.

असीरियांतून हिंदुस्थानांत माल येत असे. परंतु त्याचें प्रमाण फारच थोडें होतें. हिंदुस्थानांतूनच बराच माल परदेशांत जात असे. प्रो. डे यानें व्यापाराचा इतिहास या ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, ख्रिस्ती शकापूर्वी बरींच वर्षें चीन व हिंदुस्थान या देशांचा व्यापार चालत होता. रोम शहरांत अद्यापही भारत वर्षांतील रत्नें व नाणीं सांपडत असल्याचें प्रो. विल्किन्सन आपल्या इतिहासांत लिहितो. हीं व आणखी अशींच किती तरी उदाहरणें आहेत कीं, त्यावरून हिंदु-

स्थानचें वैभवसाम्राज्य कसें होतें हें आढळून येतें. हिंदुस्थानानें आपल्या व्यापारकौशल्यानें जगाच्या बाजारपेठा काबीज करून अगणित संपत्ति जमा केली होती. बौद्धकालीन इतिहासाच्या अशोक रियासतींतही वरील म्हणण्याला पोषक असे बरेच दाखले सांपडतात. यावरून भारतवर्ष इंग्रजांच्या पूर्वी धनसंपन्न होता किंवा नाहीं हें आढळून येतें.

सुसंस्कृती संबंधानेंही नानाप्रकारच्या टीपणी व नोंदी सांपडतात त्यावरून इंग्रज हिंदुस्थानांत येण्यापूर्वी आमचा भारतवर्ष सुसंस्कृत होता किंवा नाहीं याचा निर्णय लागतो. भारतीय संस्कृतीसंबंधानें २० फेब्रुआरी १८८४ च्या डेली ट्रिब्यून नांवाच्या नियतकालिकांत ब्राऊन नांवाच्या लेखकानें एक सुंदर लेख लिहून आपल्या जातभाईच्या डोळयांत झणझणीत अंजन घातलें.

हा लेखक म्हणतो कीं, जर आपण पक्षभेदविरहित मनानें विचार केला तर आपणास असेंच म्हणावें लागेल कीं हिंदुस्थान हाच सर्व जगाचा साहित्य, कला व संस्कृती यांना जन्म देणारा पिता आहे. याचप्रमाणें कोट जान्स जेर्नो यानें आपल्या The Glory of the Hindus या उत्कृष्ट ग्रंथांत निव्वळ हिंदुधर्माला जन्म देणारा हा देश नसून सर्व जगाला संस्कृति देणारा गुरू आहे. धर्म, तत्वज्ञान व संस्कृति यांचें शिक्षण इतर देशांनीं हिंदुस्थानापासूनच घेतलेलें आहे. रशियाच्या नोटतीज नांवाच्या यात्रेकरूला तिबेटांत एक अत्यंत जुना ग्रंथ सांपडला होता. त्यांत येशू ख्रिस्ताचें चरित्र होतें. त्या चरित्रांत असें लिहिलें आहे कीं, येशू हा लहानपणीं घरच्या मंडळीवर रागावून घर सोडून निघाला व त्यानें जगन्नाथपुरी, काशी वगैरे क्षेत्रीं जाऊन वेदाचें अध्ययन केलें. पाली भाषेचा त्यानें अभ्यासही केला व नंतर स्वधामीं जाऊन त्यानें नव्या धर्माची स्थापना केली. हा ग्रंथ पाली भाषेंत आहे. यावरून येशूख्रिस्ताच्या धर्माचा उगमही आपल्या धर्माच्या अध्यापनाचीं फुलें होत. मॅक्समुल्लरनें तर भारतवर्षाचा गौरव अनेक ठिकाणीं केलेला आहे. इतिहासकार मि. थार्नटन्स यानें या सर्वांच्या पुढें जाऊन असें म्हटलें आहे कीं ' ग्रीस व रोम यांच्या रानटी अवस्थेच्या वेळीं हिंदुस्थान हा देश अत्यंत वैभवशाली व सुसंपन्न असा होता. जगांतल्या व्यापाराचें भरतखंड हें केंद्रस्थान होतें. उद्योगधंद्याची येथें भयंकर भरभराट होती.

इंग्रजाचे गोरे पाय हिंदुस्थानाला लागण्यापूर्वी हिंदुस्थान सर्व बाजूंनीं वैभवसंपन्न होता यांत बिलकूल संदेह नाहीं. सुवर्णभूमी म्हणून गाजला गेलेला 'स्वदेश'

आज सुवर्ण चलन असावें कीं नसावें याच्या शाब्दिक वादविवादांत काळ कंठीत असला तरी सोन्याचा धूर पूर्वीं एका काळीं इंग्रज हिंदुस्तानांत येण्यापूर्वी निघत होता !

मग येथें असा प्रश्न सहाजिक उत्पन्न होतो कीं जर भारतवर्ष इतका धनसंपन्न होता ! तर आज त्याच्या गळ्याभोंवतीं पारतंत्र्याच्या पाशाबरोबर दारिद्र्याचा भयंकर गळफांस कसा बसला ! धनिक हिंदुस्तान आज श्रीमंतीच्या बाजारपेठेंत ' लक्ष्मीला दारांतूनच नमस्कार ' करणारा कां झाला ! दिवाळींतलें 'लक्ष्मीपूजन' हा त्याला अब्रूच्या संरक्षणाचा दिवस व इभ्रतीच्या डिंडिमाचा दिन कां वाटूं लागला ? लक्ष्मीधरांच्या ललाटींची लक्ष्मी कां पुसली गेली ? हल्लींच्या हिंदुस्थानच्या ललाटीं दारिद्र्य, अकिंचनता, दुर्भिक्ष, उपासमार, हें कां लिहिलें गेलें ? एकाकाळीं लक्ष्मीशीं बागडणारा हिंद आज ' लक्ष्मी ' या नांवाला ही पारखा कसा झाला ? ही चूक कोणाची ? विधीलेखनकाराची कीं आणखी तिसऱ्या चवथ्या इसमाची ?

ज्या देशांतील जवाहीरखाना व शिल्लक मोजावयाला पांच हजार लोकांना चार महिने बसावें लागे, त्या देशांतील आजची हिंदी संपत्ती मोजायला अर्धा तासही पुरतो. पूर्वीं अन्नाची समृद्धि होती आणि आज भुकेकंगालांची समृद्धि आहे ! पूर्वीं साडेदहा आण्यांत एका माणसाला एक महिनाभर अजीर्ण होईपर्यंत अन्न मिळत असे व आज निम्मे अधिक लोक पोटाला महिना महिनाभर मिळत नाहीं म्हणून जीर्णावस्थेप्रत पोहोंचले आहेत. एका रुपायाला मिळणारे १३५ शेर गहूं आज कोठें आहेत ? तांदुळाचा भाव एक रुपयाला दोनशें दोन शेर आज आहे काय ? रुपयाचें सवा पंधरा शेर तूप सव्वा पंधरा रुपयाला शेर होण्याची वेळ आली आहे ना ? पूर्वीं अशी स्थिति नव्हती. ईस्ट इंडिया कंपनी हिंदुस्थानांत येण्यापूर्वी हिंद उत्तम स्थितींत होता.

लॉर्ड क्लाईव्हनें मुर्शिदाबादचें वर्णन करतांना म्हटलें आहे कीं, मुर्शिदाबाद शहर लंडन शहराप्रमाणें आबादी आबाद असून धनधान्याची समृद्धि आहे. फरक इतकाच कीं, एक गांव दुसऱ्यापेक्षां कमी अधिक प्रमाणांत धर्मदृष्ट्या वरिष्ठ व कनिष्ठ आहे. पूर्वींचें नुसतें वैभवच चांगलें होतें असें नाहीं, तर नीति, दानत आणि चारित्र्यहि नमुनेदार होतें. विपुल संपत्ती होती तरी देखील हिंदुस्थानवासियांनीं आपलें चारित्र्य, आपली दानत, आपली पवित्रता बिलकुल कमी केली नाहीं तर उलट वैभवाच्या वृद्धीबरोबर त्याही पौरुषीय गुणांची वृद्धि होत गेली. हिंदुस्थानच्या

इमानदारीचें व सत्यप्रियतेचें एकच उदाहरण दिलें म्हणजे पुरे. मि. हॉवेल या लेखकानें हिंदुस्थानविषयक (Tract of India) नांवाचा सुंदर लेख लिहिला आहे. त्यांत तो म्हणतो 'जर कोणा एकाद्याला दुसरी एखादी पैशाची पिशवी सांपडली, तर तो इसम शेजारच्या शिपायाला सांगून ती एक झाडाला टांगून ठेऊन जात असे.'

अशीं किती तरी उदाहरणें देण्याला इतिहास दंड थोपटून उभा आहे.

अशी पूर्वस्थिति असतांना तिचें अधःपतन कां झालें, हा प्रश्न फारच मार्मिक आहे! हा प्रश्न म्हणजे एक अजब गूढ आहे! हा प्रश्न म्हणजे इंग्रजांची इतिहासांनीं घेतलेली कबुलायत आहे. हा प्रश्न म्हणजे हिंदुस्थानची पूर्वस्थिति अधोगतीला कां गेली, याचा खुलासा आहे! या सर्वांचें उत्तर इतिहासानें केव्हांच दिलें आहे! हिंदुस्थानाला नंगा फकीर करणारें दुर्योधन-मंडळ कोण, याचेंहि उत्तर याच इतिहासानें दिलेलें आहे.

बा हिंदुस्थाना! तुझी अधोगती कां झाली? बा स्वदेशा! तुझें औद्योगिक अधःपतन कां झालें? बा भारतवर्षा! तुझी समृद्धशीलता कुणी उतरणीवर आणिली? देशश्रेष्ठा! सौख्याच्या उत्तुंग शिखरावरून दुःखाच्या भयंकर खोल गर्तेंत तुला कोणी लकटून दिलें? जगद्वंद्य पितृदेशा! तूं तरी याचें उत्तर कसें देणार! मानी पुरुष वैभवविहीन झाल्यावर तो काय सांगणार? नको! पितृदेशा, नको, असे दुःखाचे सुस्कारे टाकूं नकोस!

तुझ्या पवित्र चरणीं प्रश्नांची जाई वाहतांना आमच्या अंतःकरणाची जी स्थिती होते, तीच त्या प्रश्नांचीं उत्तरें देतांना, ते प्रश्न ऐकतांना तुझी होत असेल! पण देशसम्राटा! मनांतली ही कळकळ, अंतःकरणांतली तळमळ तुझ्याशिवाय कोणाजवळ वदावी? तुझ्या संतानांनीं पूर्व वैभव ऐकिलें, आणि वाचलें! हल्लींचीं संतानें अठराविश्वे दरिद्रस्थितींतलीं आहेत! तेव्हां—तेव्हां—काय! देशांच्या महादेशा तुझ्या हळव्या हृदयाला शीण देतच नाहीं! ज्यानें तुझें पूर्ववैभव आम्हांला सांगितलें आहे त्यालाच-त्या काळांच्या काळाला-इतिहासालाच विचारतों! इतिहास खात्रीपूर्वक आत्मविश्वासानें छातीची ढाल करून याचें उत्तर द्यायला तयारच आहे.

ईस्ट इंडीया कंपनीपूर्वी उत्कृष्ट स्थितींत, संपन्नावस्थेंत असलेल्या हिंदुस्थानाचें अधःपतन कसें झालें? या प्रश्नाला इतिहासाचें झणझणीत उत्तर आहे! तें त्यानें

केंव्हांच लिहून ठेविलें आहे ! भावी पिढी—ज्यांचे राष्ट्रसूत्रधार आपल्याला खात्रीनें केंव्हां तरी असा जबाब अधिकारानें विचारतील असें इतिहासाला माहीतच होतें कीं काय, न जाणे, पण त्यानें या प्रश्नाचें उत्तर देऊन आपलें कर्तव्यपालन केलें आहे.

कोणा एका कवीनें " चक्रवत् परिवर्तन्ते दुःखानि च सुखानि च ' असें म्हटलें आहे. हें त्याचें म्हणणें हिंदुस्थानच्या अधःपतनालाही बरोबर लागू पडतें. हिंदुस्थानसारख्या धनसंपन्न देशावर इतर राष्ट्रांचा जो डोळा होता तो निव्वळ प्रदेश अत्यंत श्रीमंत होता म्हणून होय. हिंदुस्थानच्या अधःपतनाचें मूळ ऐतिहासिक दृष्टया धनलालसा होय. परक्यांना त्याची लालसा भयंकर लागली व त्या लालसेच्या पूर्ततेकरितां त्यांनीं हिंदुस्थान देशावर आक्रमण केलें.

दारा, सिकंदर, शक, युनानी, तुर्क यांनीं हजारों मैलांवरून हिंदुस्थानावर ज्या स्वाऱ्या केल्या त्या सर्व धनलालसेला बळी पडूनच केल्या होत्या. महंमुदाची चढाई धनाकरितां, महंमद घोरीचें आक्रमण धनाकरितां, उत्तर भागांतील हक्कदार राज्याचीं सिंहासनें डळमळीत करण्यांत महंमद घोरीचा दुसरा कोणताही उद्देश नव्हता ! लंगडा तैमूर धनाच्या आशेनें प्रेरित झाला होता. अहमदशहा नादिरशहानें धुमाकूळ घातला होता तो धनाकरितां. मोंगल, पोर्तुगीज, फ्रान्सनिवासी आणि इंग्रज हे जे हिंदुस्थानांत आले तेदेखील पैशाकरितांच आले. इतिहास याला आपल्या लिखाणांची साथ देतच आहे. कोणत्याही परक्या स्वारीची हकीगत वाचतांना आपणास वरील गोष्टच त्या त्या स्वारीच्या मुळाशीं होती असें खात्रीपूर्वक आढळून आल्याशिवाय राहणार नाहीं. त्या परक्यांना जर धनाची लालसा नसती तर समृद्धशाली भारतवर्षाची दैना कधींच झाली नसती.

इतिहास वाचणाऱ्यांना ही गोष्ट तर ठाऊकच आहे कीं सोळाव्या शतकांत हिंदुस्थान ही सोन्याची खाण आहे असें समजून व्यापारी मिषानें पोर्तुगीज, डच, फ्रेंच व इंग्रज हिंदुस्थानांत आले. इंग्रजांचा पहिला हल्ला जो झाला तो ईस्टइंडिया कंपनीच्या नांवानें इतिहासांत अजरामर झाला आहे. हिंदुस्थानच्या अधःपतनाच्या इतिहासांत तर ईस्ट इंडिया कंपनी सूत्रधार व आद्यदेवता आहे. त्यावेळच्या राज्यकर्त्यांनीं हे लोक परकीय आहेत, फार लांबून आपल्या देशांत आले आहेत असें समजून उदारपणानें त्यांना आपल्या राजवटींत त्यांनीं आश्रय दिला. त्यांनीं ही

दाखविलेली सहानुभूती शेवटीं कोणत्या थराला गेली याचें चित्र तूर्त तरी आपल्या डोळ्यांपुढें आहेच. त्या वेळच्या भारतीय शासनकर्त्यांनीं दयाळुपणा दाखविला व त्याच वेळेपासून या परकीय व्यापाऱ्यांचे कपटनीतीचे डाव सुरू झाले. इंग्रज व्यापारी मिषानें जेव्हां हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांचें व्यापारी भांडवल सात लाख रुपये होतें. या सात लाख रुपयांच्या पुंजीवर या व्यापारी मंडळीनें हिंदुस्थानांत व्यापार आरंभला. प्रथमतः मुंबई, सुरत आणि मद्रास या शहरीं या मंडळीनें आपलें बस्तान बसविलें. त्यानंतर इ. स. १६८० मध्यें कंपनीनें कलकत्त्यास जमीन खरेदी केली व तेथें आपल्या व्यापाराचा अड्डा जमविला. हळू हळू मुख्य व परगांवीं व्यापारी आमीष दाखवून अंतःस्थहेतूची उभारणी करण्यांत व्यापारी मंडळी गुंतलेलीच होती. हा त्यांचा प्रयत्न इ. स. १७५७ पर्यंत चालून त्यांनीं आपली मुहूर्तमेढ प्लासीच्या लढाईनंतर रोंवली. ही मुहूर्तमेढ रोवली गेली त्याचें कारण इतिहास असें देतो कीं, हिंदुस्थानांतील आपआपसांतील कलह आणि परकीय शासनाची अनभिज्ञता हीं होत. ही मंडळी व्यापारी असल्यामुळें धनसंपादन करणें हा तर या मंडळीचा मुख्य उद्देश होताच, पण त्याबरोबर राज्य करण्याचाही उद्देश होता. आपला व्यापार सुरळीत व सुयंत्रित चालला पाहिजे, अशी पक्की खूणगांठ या व्यापारी मंडळीनें आपल्या मनाशीं बांधून ठेविली होती. त्याप्रमाणें ती मंडळी आपल्या व्यापारप्रकर्षाकरितां आटोकाट प्रयत्न करीत होती.

आपला व्यापार कसा वाढेल, हिंदुस्तानांतल्या सर्व बाजारपेठा आपल्याला कशा काबीज करतां येतील, ही चिंता–हा भयंकर व्यापार हृद्रोग–या ईस्टइंडिया मंडळीला लागला होता. या वाढत्या रोगाचें अनुमान या मंडळीनें काढलें व असें ठरविलें कीं जर आपल्याला आपला व्यापार हिंदुस्थानांत वाढवावयाचा असेल तर आपण येथील व्यापार संपुष्टांत आणण्याचा दृढोद्योग अवश्य केला पाहिजे. त्याशिवाय आपला व्यापार येथें सुयंत्रित व सुरळीत चालणार नाहीं. हिंदुस्थानांत जर आपणाला व्यापारी वर्चस्व संपादन करावयाचें असेल तर हिंदुस्थानच्या व्यापाराला नख लावलें पाहिजे. या हेतूनें प्रेरीत होऊन या मंडळीनें हिंदुस्थानचा व्यापार नष्ट करण्याचा ‘ पुण्य संकल्प ’ केला. बऱ्याच वर्षांपूर्वीं सर टॉमस मनरो यानें जी प्रतिज्ञा केली होती, ती या व्यापारी मंडळीनें पुरी केली. सर टॉमस मनरोचें भविष्य आज रॉफेलप्रमाणें तंतोतंत पटलें. सर टॉमस हा रक्ताचा इंग्रज पण बुद्धीचा जर्मन असावा असें वाटतें. इंग्रजांचा हिंदुस्तानांत विजय झाला तर हिंदुस्तानची अवनती होईल, हें त्याचें भविष्य खरें

ठरून त्याला भास्कराचार्यांच्या जवळ बसण्याचा दर्जा आज प्राप्त झालेला आहे. सर टॉमस मनरोनें आपल्या भविष्य वाणीनें असें सांगितलें आहे कीं,

"The consequence of the conquest of India by British arms would be in place of rising, to debase the whole people."

ही मनरोची भविष्यवाणी आंग्लविद्वानांना बरोबर पटली. हिंदुस्थानचा सर्वनाश इंग्रजी शासनामुळेंच झाला ही गोष्ट माजी गव्हर्नर जनरल सर जॉन शोअर यांनींहि कबूल केली आहे. ते म्हणतात, इंग्रजी शासनापासून हिंदुस्थानाला उपकाराच्या ऐवजीं अपकारच झाला. एका गव्हर्नर जनरलचें हें मत खोटें तरी कसें मानावें ? सर जॉन शोअरप्रमाणेंच इतरही आंग्ललेखकांचें असेंच म्हणणें आहे. निव्वळ सगळ्यांचेच उतारे दिल्यास हजारभर तरी होतील. पुढें दिलेल्या आणखी दोन-तीन उताऱ्यांवरून वरील भविष्याला पुष्टी मिळत आहे.

'एशिया आणि यूरोप' या नांवाचा अत्यंत उत्कृष्ट ग्रंथ मेरीडीथ या नांवाच्या लेखकानें लिहिला आहे. त्यांत त्यानें असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, आमच्या शासनामुळें भारतवासियांचें जीवन आनंदित होणार नाहीं. आम्ही येण्यापूर्वी हिंदुस्थानांतील हिंदी जीवन फारच चांगलें होतें. साहस, उत्साह, उच्च आकांक्षा हीं हिंदुस्थानांत कशा प्रकारचीं होतीं, याचें ज्ञान सर्वसाधारण इंग्रजाला समजणें अत्यंत कठीण आहे. भारतीय जीवनाची खरी परिसमाप्ति होऊन सुखाचा पदक्षेप उचलला गेला. मला विश्वासपूर्वक असें वाटतें कीं, इंग्रज हिंदुस्थानांत येण्यापूर्वी हिंदुस्थान देश आपलें जीवन आनंदांत घालवीत होता, या मेरीडी-थच्या म्हणण्याला सर हेन्री कॉटन आपल्या न्यू इंडिया ग्रंथांत तर जोरानें दुजोरा देतात. हे गृहस्थ लिहितात कीं 'भारतभूमीपासून उत्पन्न होणारा पैसा अमेरिके-च्यापेक्षां कितीतरी पटीनें अधिक होता. अशी स्थिति असतांना आज सर्व जगांत हिंदुस्थान देश दरिद्री आणि कंगाल सम्राट कसा राहिला ? हें त्याचें परिवर्तन कसें झालें ? याचें उत्तर महाशय वुईल्यम डीग्बी यांनीं आपल्या मतानें पुढीलप्रमाणें दिलेलें आहे. वुईल्यम डीग्बी याचीं कारणें देतांना लिहितात कीं,

'हिंदुस्थानच्या नशीबीं दारिद्र्य येण्याचीं जीं कांहीं कारणें आहेत त्यांत प्रामुख्यानें दोन मुख्य कारणांचा उल्लेख अवश्य केला पाहिजे. तीं कारणें म्हणजे हिंदुस्थानां-तील उद्योगधंद्यांचा नाश, आणि दुसरें हिंदुस्थानांतील धनशोषण. आम्ही ( इंग्र-

जांनीं ) हिंदुस्थानच्या उद्योगधंद्याचा नाश केला. इ. स. १८३४ ते १८६८ पर्यंतच्या कालावधींत आम्ही हिंदुस्थानांतून १० अब्ज रुपये नेले. इतकी रक्कम जर हिंदुस्थानांत राहिली असती तर शेतकऱ्यांना या रकमेचा कितीतरी उपयोग झाला असता. आजपर्यंत व्याजाचा विचार करितां ही रक्कम २५ अब्जांपर्यंत गेली असती.

यावरून इंग्रजांनीं हिंदुस्थानाचें द्रव्यशोषण करून त्याला भिकेला लावलें हें सिद्ध होत आहे.

कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, हिंदुस्थानचा व्यापार नाहींसा होण्याला मुख्य कारण म्हणजे 'यांत्रिक कला' होय. विलायतेंतील यांत्रिक कलेची चटक लागली व तिचा हिंदुस्थानांत प्रसार झाला तेव्हांच हिंदुस्थानच्या औद्योगिक अधःपतनाला सुरवात झाली. परंतु ज्या लोकांचें वरील प्रकारचें म्हणणें आहे तें सर्वस्वी खोटें आणि इतिहासाकडे दुर्लक्ष करून म्हटलें आहे. औद्योगिक अधःपतनाची मीमांसा करणाऱ्या माणसांनीं केलेलीं भलतींसलतीं विधानें इतिहासानें केव्हांच खोडून त्यांचें खंडन केलें आहे. हिंदुस्थानच्या व्यापारावर वज्राघात ज्या कारणांमुळें झाला तीं कारणें फार निराळीं असून त्यांतील कांहीं पुढें देण्यांत येत आहेत.

भारतीय कारागिरी नष्ट होण्याचीं जीं कारणें आहेत त्यांत महत्वाचें कारण म्हणजे इंग्रजी व्यापाऱ्यांची ( त्या वेळच्या ) स्वार्थपरायणता हें होय. त्या वेळच्या इंग्रजी व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानचा व्यापार बुडण्याकरितां ज्या ज्या लीला केल्या, जे जे डाव टाकले व जो जो स्वार्थीपणा केला तो पाहतां हल्लींच्या प्रत्येक हिंदवासीयाची छाती दुभंगून गेल्याशिवाय राहणार नाहीं. इंग्रज व्यापाऱ्यांनीं भारतीय कारागिरांशीं जर अमानुष वर्तन केलें नसतें तर आज हिंदुस्थानचा व्यापार असा परोपजीवी आणि परप्रकाशित केव्हांच झाला नसता.

प्रसिद्ध आंग्ल इतिहासकार मि. विल्सन यानें आपल्या Mill's History of British India मध्यें असें लिहिलें आहे कीं, इ. स. १८१३ पर्यंत हिंदुस्थानांतील रेशमी व सुती कापड इंग्लंडच्या कापड बाजारांत कमी किंमतींत विकलें जात असे. तेव्हां इंग्लंडच्या कापडाच्या व व्यापाराच्या सुरक्षितेकरितां हिंदुस्थानच्या मालावर इंग्रजांना इंग्लंडांत जबर जकात बसविणें भाग पडलें. जर असें केलें नसतें तर मँचेस्टरचे कारखाने बंद पडून हिंदुस्थानचा व्यापार भरभराटीला आला असता ! ज्या वेळीं असा कर प्रचारांत आला त्या वेळीं भारत

स्वतःच सर्व बाजूंनीं प्रतिकार करण्याच्या बाबतींत असमर्थ होता. इंग्रजांचा सत्तासूर्य उदयाचलावर येण्याचा हा काळ होता आणि हिंदुस्थानावर पारतंत्र्याची निबिड अमावास्या आपला अधिकार प्रस्थापित करण्याची खटपट करीत होती.

ईस्ट इंडिया कंपनीनें व तिच्या भागीदारांनीं आपली व्यापारी पथारी कलकत्ता, मद्रास, मुंबई, सुरत वगैरे ठिकाणीं यथेच्छ लांबपर्यंत पसरविली होती. इंग्रजी व्यापारी धन संपादन करण्यांत मित्र व शत्रू यांचा संबंध मुळींच ध्यानांत आणीत नसत. वाटेल तितका पैसा कमविणें हेंच त्यांचें लक्ष होतें. हा उपक्रम बराच काल सुरू होता. एकदां औरंगजेबाच्या कानीं या व्यापारी इंग्रजांची कागाळी आणि द्रव्यपिपासा गेली. तेव्हां त्यानें यांना मुलखांतून हांकून लावण्याचा बेत केला. क्रूर व कर्दनकाळ औरंगजेब त्या वेळीं इंग्रजी व्यापाऱ्यांच्या मागें हात धुवून लागला, त्यानें व त्याच्या सैन्यानें इंग्रज व्यापाऱ्यांना सळो का पळो करून सोडलें, मछलीपटण, विजगापट्टमच्या वखारीवर औरंगजेबच्या सैन्यानें हल्ला केला. इतका प्रकार झाल्यावर अवरंगजेबानें असें ठरविलें कीं, ‘ या व्यापाऱ्यांना बसली इतकी दहशत पुरे आहे.’ त्यानें तो नाद सोडला आणि पुन्हा ह्याच व्यापाऱ्यांना व्यापार करण्याची परवानगी दिली. औरंगजेबाच्या व्यापारी परवानगीच्या जोरावर या इंग्रज व्यापाऱ्यांनीं आपला व्यापार पूर्वीपेक्षां अधिक चांगल्या व फायदेशीर रीतीनें चालवून पूर्वीचें नुकसान भरून काढलें.

हिंदुस्थानांत प्लासीच्या युद्धानंतर इंग्रजी शक्ती वाढीला लागली. इंग्रज हळू हळू हिंदुस्थानच्या राजकारणांत ढवळाढवळ करूं लागले. मिरजाफरला यांनीं नबाबकी देववून त्याला शतकृत्य केलें. हा जो उपकार त्या लोकांनीं मिरजाफरवर केला तो निःस्वार्थी होता असें मात्र कोणीहि समजूं नये. यांतही त्या लोकांचा स्वार्थ होताच. मिरजाफरला नबाबीची “ शिक्का–कट्यार ” देण्याबाबत इंग्रजांनीं १७ लाख पौंड नगद चोपून घेतले. १७ लाख पौंड पदरांत पडतांच द्रव्यपिपासु आंग्ल व्यापाऱ्यांनीं मिरजाफरला पदच्युत करण्याचा कृतघ्नपणा केला आणि मिर कासीमवर मेहेरनजर करून त्याला तक्तनशीन केला. मिर कासिम हा नांवाचा नबाब होता. परंतु सर्व कर्तुम् अकर्तुम् सत्ता इंग्रजांच्या हातीं होती. मिरकासिमला आपल्या या चाणक्यनीतिपटु आंग्ल हितचिंतकांचीं हितकर कृत्यें मुळींच आवडलीं नाहींत. त्यानें आपल्या प्रजेचीं दुःखें दूर करण्याचा उद्योग आरंभिला.

पण या त्याच्या प्रजासेवेचें बक्षिस त्याला आंग्ल दिवाणांनीं लौकरच दिलें. मिरकासीमला राजसंन्यास देऊन मिरजाफरला गादीनशीन करण्यांत आलें. मिरजाफरला गादीवर बसविल्यावर इंग्रज व्यापारीच खरे राजकर्ते झाले. व्यापारी दृष्टी ठेऊन बंगालमध्यें इंग्रज लोक सत्तेचा आधार घेऊन धूमाकूळ घालूं लागले. मनाला वाटेल त्याप्रमाणें हे इंग्रज लोक बंगालच्या लोकांना त्रास देऊं लागले. अर्थात् हा त्रास व्यापारी दृष्टीनेंच होत होता.

इंग्रजांचा हा कारभार सिराज नबाबदौला याला मुळींच आवडेना. त्यानें इंग्रजांना मनाई करण्याचें आरंभलें. अर्थात् त्या वेळच्या लोकांना नबाबाचा नवा उत्पन्न झालेला कांटा काढून टाकावा असें वाटूं लागलें. त्यानें तत्कालीन लोकांच्या मदतीनें सिराजुद्दौलाला गादीवरून काढून त्याची नांगी ठेचून टाकली. सिराजुद्दौल्यानें जेव्हां राजसंन्यास घेतला तेव्हां त्या प्रसंगाला उद्देशून एका लेखकानें म्हटलें आहे कीं, 'ज्या वेळीं नबाबानें राज्य सोडून फकीरी पत्करली तेव्हांच हिंदुस्थानच्या लुटीला प्रारंभ झाला.' तत्कालीन इतिहासाचें अध्ययन करणाऱ्यास हें त्या लेखकाचें म्हणणें खरें आहे असें कबूल करणें भागच पडतें. इतका प्रकार झाल्यावर मिरजाफर कांहीं इंग्रज, क्लाईव, व कृष्ण आणि रामचंद्र वगैरे स्वार्थी लोक एकत्र होऊन मुर्शिदाबादेच्या खजिन्यांची हिस्सेराशी करूं लागले. कलकत्ता कौन्सिलच्या प्रत्येक मेंबराला १२ लाख ८ हजार रुपये मिळाले. क्लाइव्हनें खासगी रीतीनें ९६ लाख रुपये ठेविले होते. या धांदलींत ईस्ट इंडिया कंपनीला जवळ जवळ एक कोटी रुपये मिळाले.

या वेळच्या आंग्ल व्यापाऱ्यांची अधिक व खरी माहिती हवी असल्यास टॉरेन्सच्या 'एम्पायर इन एशिया' या पुस्तकांचें अवलोकन केलें म्हणजे पुरे.

मीरकासीमनें भारतीय व्यापारावरील कर कमी केले. त्यामुळें इंग्रजी व्यापारी अत्यंत चिडले व त्यांनीं मीरकासीमबरोबर जिद सुरू केली. याचा परिणाम लढाईंत होऊन इ. स. १७६३ त मीरकासीमचा इंग्रजांनीं पराभव केला. इतिहासतज्ञांचें या लढाईसंबंधीं असें म्हणणें आहे कीं, त्यांच्या इतिहासांत अशी अन्यायपूर्ण लढाई कधींच झाली नाहीं. यासंबंधाची माहिती इंग्रजी सरकारी कागदपत्रांत दिलेली आहे ती फारच विश्वसनीय आहे.

बंगालचे तिसरे गव्हर्नर मि. वेरल्स्टन यांनीं आपल्या View of Bengal या पुस्तकांत इंग्रजी व्यापार व कर यासंबंधानें लिहितांना असें स्पष्ट लिहिलें

स्वतःच सर्व बाजूंनीं प्रतिकार करण्याच्या बाबतींत असमर्थ होता. इंग्रजांचा सत्तासूर्य उदयाचलावर येण्याचा हा काळ होता आणि हिंदुस्थानावर पारतंत्र्याची निबिड अमावास्या आपला अधिकार प्रस्थापित करण्याची खटपट करीत होती.

ईस्ट इंडिया कंपनीनें व तिच्या भागीदारांनीं आपली व्यापारी पथारी कलकत्ता, मद्रास, मुंबई, सुरत वगैरे ठिकाणीं यथेच्छ लांबपर्यंत पसरविली होती. इंग्रजी व्यापारी धन संपादन करण्यांत मित्र व शत्रू यांचा संबंध मुळींच ध्यानांत आणीत नसत. वाटेल तितका पैसा कमविणें हेंच त्यांचें लक्ष होतें. हा उपक्रम बराच काल सुरू होता. एकदां औरंगजेबाच्या कानीं या व्यापारी इंग्रजांची कागाळी आणि द्रव्यपिपासा गेली. तेव्हां त्यानें यांना मुलखांतून हांकून लावण्याचा बेत केला. क्रूर व कर्दनकाळ औरंगजेब त्या वेळीं इंग्रजी व्यापाऱ्यांच्या मागें हात धुवून लागला, त्यानें व त्याच्या सैन्यानें इंग्रज व्यापाऱ्यांना सळो का पळो करून सोडलें, मछलीपटण, विजगापट्टमच्या वखारीवर औरंगजेबच्या सैन्यानें हल्ला केला. इतका प्रकार झाल्यावर अवरंगजेबानें असें ठरविलें कीं, ‘ या व्यापाऱ्यांना बसली इतकी दहशत पुरे आहे.’ त्यानें तो नाद सोडला आणि पुन्हा ह्याच व्यापाऱ्यांना व्यापार करण्याची परवानगी दिली. औरंगजेबाच्या व्यापारी परवानगीच्या जोरावर या इंग्रज व्यापाऱ्यांनीं आपला व्यापार पूर्वींपेक्षां अधिक चांगल्या व फायदेशीर रीतीनें चालवून पूर्वींचें नुकसान भरून काढलें.

हिंदुस्थानांत प्लासीच्या युद्धानंतर इंग्रजी शक्ती वाढीला लागली. इंग्रज हळू हळू हिंदुस्थानच्या राजकारणांत ढवळाढवळ करूं लागले. मिरजाफरला यांनीं नबाबकी देववून त्याला शतकृत्य केलें. हा जो उपकार त्या लोकांनीं मिरजाफर-वर केला तो निःस्वार्थी होता असें मात्र कोणीहि समजूं नये. यांतही त्या लोकांचा स्वार्थ होताच. मिरजाफरला नबाबीची “ शिक्का–कट्यार ” देण्याबाबत इंग्रजांनीं १७ लाख पौंड नगद चोपून घेतले. १७ लाख पौंड पदरांत पडतांच द्रव्य-पिपासु आंग्ल व्यापाऱ्यांनीं मिरजाफरला पदच्युत करण्याचा कृतघ्नपणा केला आणि मिर कासीमवर मेहेरनजर करून त्याला तक्तनशीन केला. मिर कासिम हा नांवाचा नबाब होता. परंतु सर्व कर्तुम् अकर्तुम् सत्ता इंग्रजांच्या हातीं होती. मिरकासिमला आपल्या या चाणक्यनीतिपटु आंग्ल हितचिंतकांचीं हितकर कृत्यें मुळींच आवडलीं नाहींत. त्यानें आपल्या प्रजेचीं दुःखें दूर करण्याचा उद्योग आरंभिला.

पण या त्याच्या प्रजासेवेचें बक्षिस त्याला आंग्ल दिवाणांनीं लौकरच दिलें. मिरकासीमला राजसंन्यास देऊन मिरजाफरला गादीनशीन करण्यांत आलें. मिरजाफरला गादीवर बसविल्यावर इंग्रज व्यापारीच खरे राजकर्ते झाले. व्यापारी दृष्टी ठेऊन बंगालमध्यें इंग्रज लोक सत्तेचा आधार घेऊन धूमाकूळ घालूं लागले. मनाला वाटेल त्याप्रमाणें हे इंग्रज लोक बंगालच्या लोकांना त्रास देऊं लागले. अर्थात् हा त्रास व्यापारी दृष्टीनेंच होत होता.

इंग्रजांचा हा कारभार सिराज नबाबदौला याला मुळींच आवडेना. त्यानें इंग्रजांना मनाई करण्याचें आरंभलें. अर्थात् त्या वेळच्या लोकांना नबाबाचा नवा उत्पन्न झालेला कांटा काढून टाकावा असें वाटूं लागलें. त्यानें तत्कालीन लोकांच्या मदतीनें सिराजुद्दौलाला गादीवरून काढून त्याची नांगी ठेचून टाकली. सिराजुद्दौल्यानें जेव्हां राजसंन्यास घेतला तेव्हां त्या प्रसंगाला उद्देशून एका लेखकानें म्हटलें आहे कीं, 'ज्या वेळीं नबाबानें राज्य सोडून फकीरी पत्करली तेव्हांच हिंदुस्थानच्या लुटीला प्रारंभ झाला.' तत्कालीन इतिहासाचें अध्ययन करणाऱ्यास हें त्या लेखकाचें म्हणणें खरें आहे असें कबूल करणें भागच पडतें. इतका प्रकार झाल्यावर मिरजाफर कांहीं इंग्रज, क्लाईव, व कृष्ण आणि रामचंद्र वगैरे स्वार्थी लोक एकत्र होऊन मुर्शिदाबादेच्या खजिन्यांची हिस्सेराशी करूं लागले. कलकत्ता कौन्सिलच्या प्रत्येक मेंबराला १२ लाख ८ हजार रुपये मिळाले. क्लाइव्हनें खासगी रीतीनें ९६ लाख रुपये ठेविले होते. या धांदलींत ईस्ट इंडिया कंपनीला जवळ जवळ एक कोटी रुपये मिळाले.

या वेळच्या आंग्ल व्यापाऱ्यांची अधिक व खरी माहिती हवी असल्यास टॉरेन्सच्या 'एम्पायर इन एशिया' या पुस्तकांचें अवलोकन केलें म्हणजे पुरे.

मीरकासीमनें भारतीय व्यापारावरील कर कमी केले. त्यामुळें इंग्रजी व्यापारी अत्यंत चिडले व त्यांनीं मीरकासीमबरोबर जिद सुरू केली. याचा परिणाम लढाईंत होऊन इ. स. १७६३ त मीरकासीमचा इंग्रजांनीं पराभव केला. इतिहासतज्ज्ञांचें या लढाईसंबंधीं असें म्हणणें आहे कीं, त्यांच्या इतिहासांत अशी अन्यायपूर्ण लढाई कधींच झाली नाहीं. यासंबंधाची माहिती इंग्रजी सरकारी कागदपत्रांत दिलेली आहे ती फारच विश्वसनीय आहे.

बंगालचे तिसरे गव्हर्नर मि. वेरल्स्टन यांनीं आपल्या View of Bengal या पुस्तकांत इंग्रजी व्यापार व कर यासंबंधानें लिहितांना असें स्पष्ट लिहिलें

आहे कीं, ‘ हिंदुस्थानांत इंग्रजांच्या व्यापारावरील करमाफी आणि हिंदी व्यापारावरील करप्राप्ती यामुळेंच बंगाल्यांत विदेशी व्यापार वाढला गेला. आपला व्यापार वाढविण्याकरितां इंग्रजी व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानच्या लोकांवर बरेच अत्याचार केले. याचा प्रतिकार करण्याचा नबाब कासीमनें उद्योग आरंभला, पण इंग्रज लोक त्याच्या विरुद्ध गेले. मालाची खरेदी करण्याचे हक्क इंग्रज व्यापाऱ्यांना होते. पण मध्यें कांहीं वस्तू नबाबाकरितां तिसऱ्या एका व्यापाऱ्यानें खरेदी केल्यामुळें इंग्रजांनीं–पाटण्याच्या एका गोऱ्या एजंटानें त्या व्यापाऱ्याला पकडलें. खुद्द नबाबाच्या वस्तु–खरेदीची जेथें ही स्थिति तेथें इतरांची ती काय कथा ! ’

याच प्रसंगासंबंधानें वारनहेस्टिंगनें आपल्या पत्रांत चांगलाच खुलासा केला आहे. मि. शॉस सिडेनहॅम यानें असें म्हटलें आहे कीं, ( “ English men are more apt than those of any other nation to commit violence in foreign countries. This I believe to be the case in India”. ) इतर जातींपेक्षां विदेशी लोकांवर अत्याचार करण्यांत इंग्रज सर्वांचे पुढारी आहेत. माझ्या मतें हिंदुस्थानांतही तीच स्थिती आहे. या उल्लेखावरून इंग्रजांची मनोवृत्ति कशी काय होती व असेल याचें चांगलेंच अनुमान निघतें.

याच वेळचीं मीर कासीमचीं कांहीं पत्रें आहेत. त्यापैकीं एका पत्रांत मीर कासीम म्हणजे खुद्द नबाब इंग्रज व्यापाऱ्यांच्या अत्याचारीपणाबद्दल लिहितो कीं, ‘ इंग्रज व्यापारी देशी व्यापाऱ्यांच्या घरांत जबरदस्तीनें शिरून माल घेऊन जातात. मालाची जी योग्य किंमत आहे तिचा एक चतुर्थांश फक्त ते हिंदी व्यापाऱ्यांना देतात. विलायती माल रयतेच्या गळ्यांत बांधून त्या मालाची किंमत जर एक रुपया असेल तर पांच रुपये चोपून घेण्यांत हे व्यापारी मागें पुढें पहात नाहींत. हे व्यापारी माझ्या अधिकाऱ्यांना शासनकार्य व विचारही करूं देत नाहींत. या त्यांच्या व्यापारी अन्यायामुळें देशाला मोठे वाईट दिवस आले आहेत; इतकेंच नव्हे तर माझी पंचवीस लाखांची आमदानी कमी झाली आहे. मी अद्यापपर्यंत कंपनीशीं केलेले करार पाळीत आलों आहें परंतु कंपनीचे नोकर मला नुकसानीच्या गर्तेंत लोटीत आहेत.

खुद्द मीर कासीमनें लिहिलेल्या वरील पत्रावरून इंग्रजी व्यापाऱ्यांची त्या वेळीं कशी स्थिति होती हें आढळून येईल. मीरकासीमनें लिहिलेलें पत्र एकांगीं असेल

असें आपण समजून चालूं; पण त्यावेळच्या इतर लोकांचीं–खुद्द इंग्रजांचीही–पत्रें वरील मीरकासीमच्या पत्राला पुष्टता देतात त्याची वाट कशी लावायची ! सार्जंट बेगोनें ता. २६ मे १७६२ च्या पत्रांत पुढीलप्रमाणें मजकूर लिहिलेला आहे. हा सार्जंट लिहितो कीं 'कंपनीचे नोकर आपल्याला कर्तुं अकर्तुम् असें समजून कंपनीकरतां कोणतीही वस्तु खरेदी करतांना देशी व्यापाऱ्यांच्या इच्छेविरुद्ध माल खरेदी करतात. जर एखाद्या व्यापाऱ्यांनीं माल दिला नाहीं, प्रतिकार केला तर हे कंपनीचे नोकर व्यापाऱ्याला वेताच्या काठ्यांनीं मारतात. इतकेंच नव्हे तर त्यांना जेलमध्यें पाठवून देतात. कंपनीच्या खरेदीच्या वेळीं हे कंपनीचे नोकरही आपल्याकरितां जबरदस्तीनें माल खरेदी करतात व त्याचे पैसे मुळींच देत नाहींत. या कंपनीच्या नोकरांच्या व्यापारी अत्याचारामुळें बकिरगंज जिल्हा वस्तीच्या दृष्टीनें कमी कमी होऊं लागला आहे. जर जमीनदारांनीं रयतेच्या दुःखपरिमार्जनार्थ कांहीं उपाय योजले तर त्यांच्यावर हे गोरे व्यापारी संकटें आणायला कमी करीत नाहींत. कंपनीच्या गुमास्त्यांपुढें त्यांचे खटले चालत असल्यामुळें त्यांना न्यायदानाच्याऐवजीं जबरदस्त दंड मात्र द्यावा लागतो. कंपनीच्या गुमास्त्यांच्या नोकरानें जमीनदाराचा माल नेला तर त्याच्या उलट जमीनदाराच्या नोकरावर तोहमत आणून त्यालाच शासन देण्यांत येतें.'

सार्जंटचें हें पत्र जरी संक्षिप्तपणें दिलें आहे तरी तेवढ्यावरून त्या वेळेच्या गोऱ्या व्यापाऱ्यांची मनःस्थिति व अत्याचार यावर चांगलाच प्रकाश पडतो. असे किती तरी व्यापारी अत्याचार त्या वेळीं आपल्या आवडत्या हिंदुस्थानांत घडले आहेत. त्या सर्वांचीं वर्णनें घडल्याप्रमाणें देत गेल्यास एक मोठा 'अत्याचार ग्रंथ'च होईल. तथापि इंग्रज व्यापारी हिंदु व्यापाऱ्यांवर स्वतःचा व्यापार वाढविण्याच्या उद्देशानें कसे अत्याचार करीत होते, याचें दिग्दर्शन करण्याकरितांच वरील कांहीं ठळक उदाहरणें दिलीं आहेत.

वरील व्यापारी अत्याचारांचें रोमहर्षणकारक वर्णन त्या वेळच्या एका हायकोर्ट जज्जानें आपल्या Consideration on Indian Affairs या पुस्तकांत केलें आहे. हें पुस्तक इ. स. १७७२ मध्यें लिहिलेलें आहे. यांत लेखक मि. विल्यम वोल्टसाहेब लिहितात 'आमच्या ( इंग्रजांच्या ) अत्याचारांचें वाईट फळ कोष्टी व कारागीर यांना बरेंच भोगावें लागलें. देशांतील प्रत्येक चीज इंग्रजांनीं आपल्या मुठींत ठेवली होती. कोणत्या व्यापाऱ्यांनीं किती माल तयार करावा आणि त्याची काय किंमत असावी हेंदेखील इंग्रज व्यापारी ठरवीत असत. माल

तयार करावा म्हणून इंग्रज व्यापारी हिंदु कोष्टयांना व कारागिरांना आगाऊ पैसे देत असत. ते जर त्यांनीं घेतले नाहींत तर जबरदस्तीनें त्यांच्या पदरीं बांधण्यांत येत असत. कंपनीचे नोकर कोष्टयांना व कारागिरांना मारून त्यांच्याकडून माल तयार करवीत असत. रेशमी काम करणाऱ्या कारागिरांची अशीच स्थिति होती. या अनन्वित अत्याचारामुळें कारागिरांनीं व कोष्टयांनीं आपलीं बोटें कापून टाकलीं. असें करण्याचा उद्देश इतकाच कीं, त्यांना व्यापारी इंग्रजांचा अत्याचार व जुल्म सहन होईना!

वरील उदाहरणावरून सहजच असें अनुमान करतां येईल कीं, इंग्रज व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानचा व्यापार कसा कमी केला. इतकी जरी स्थिति होती तरी पण हिंदुस्थानांतला माल परदेशांत जाऊनही त्यावर शेंकडा बराच नफा होत असे, त्यामुळें तर इंग्रज व्यापारी चिडले व हिंदी व्यापाऱ्यांमुळें आपलें नुकसान होत आहे अशी हाकाटी त्यांनीं सुरू केली. विलायतेंत हिंदुस्थानचा माल पाठवूं नये असाहि त्यांनीं प्रयत्न आरंभिला. यासंबंधीं चौकशी करण्याकरितां एक कमिशन नेमण्यांत आलें व त्या कमिशनवर सर जॉन माल्कम् आणि जॉन स्ट्राची या विद्वानांची नेमणूक झाली होती. हें कमिशन अशाकरतां नेमण्यांत आलें होतें कीं, विलायतेंतील मालाचें हिंदुस्थानांत खपण्याच्या दृष्टीनें निरीक्षण करून आंग्ल व्यापार-पोषक अशी परिस्थिति आहे किंवा नाहीं!

या कमिशनपैकीं एकानें असें उत्तर दिलें कीं, हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या मालावर तेथील लोकांचें भागतें. त्यांना परदेशीच वस्तूंची अवश्यकता दिसत नाहीं. येथें विलायती मालाचा आदर होईल असें वाटत नाहीं. सर मनरो यानेंही आपला अभिप्राय पुढीलप्रमाणें दिला आहे. हिंदुस्थानांतील माल विलायतेच्या मालापेक्षां कितीतरी पटीनें जास्त चांगला आहे. मी स्वतः 'हिंदुस्थानांत शाल वापरीत असून, अद्यापही तिला आठ वर्षें झालीं तरी ती चांगली आहे. विलायती शाल तीन वर्षांतच फाटते. खरा व स्पष्टच अभिप्राय द्यावयाचा तर तो असाच देतां येईल कीं, विलायती शाल मला जरी फुकट मिळाली तरी मी ती वापरणार नाहीं.'

विलायती लोकांचा हा स्पष्ट अभिप्राय हिंदुस्थानच्या व्यापारी स्थिती व भरभराटीवर चांगलाच प्रकाश पाडीत आहे. हिंदुस्थानची व्यापारी स्थिती त्यावरून कळून येते व त्याच बरोबर इंग्रजी व्यापाऱ्यांची स्पर्धा आणि स्वार्थहि आढळून येतोच येतो! अस्तु.

कमिशनपैकीं एका स्पष्टवक्त्यानें दिलेलें उत्तर ऐकून इंग्रजी व्यापारी निराश झाले नाहींत किंवा त्यांना ह्या उत्तराचें कांहींच वाटलें नाहीं. तर आपला व्यापार पुन्हां जोरांत वाढवावा म्हणून ते निरनिराळ्या युक्त्या प्रयुक्त्या योजूं लागले. स्वतंत्रपणानें आपला व्यापार वाढविणें त्यांना जोखमीचें वाटूं लागलें. व्यापार तर वाटेल त्या प्रकारें वाढलाच पाहिजे असा त्यांचा निर्धार होता. कमिशनचा फार्स जरी अनुकूल झाला नाहीं तरी हिंदुस्थानच्या जनतेची व्यापारी मनोवृत्ती त्यांच्या चांगलीच प्रत्ययाला आली. आंग्ल व्यापारी मंडळीनें आपल्या व्यापारी शक्तीला राजशक्तीची जोड देण्याचा विचार करून तो अंमलांतही आणला. प्रथमतः हिंदुस्थानच्या मालावर जबरदस्त कर बसविण्याचा कायदा त्यांनीं पसार करून घेतला. हिंदुस्थानचा जो कपडा विलायतेला जाईल त्यावर शेंकडा सत्तर ते ऐशीं याप्रमाणें कर द्यावा लागत असे. मलबार प्रांतांतील क्यालिकोट चिट विलायतेंत प्रथम पुष्कळच जात असे. हा माल विलायतेंत तयार झाला पाहिजे असा विचारविनिमय होऊन त्याला इ. स. १६७६ त मूर्तस्वरूप आलें. मलबारच्या क्यालिकोट चिटासारखें कापड काढण्याकरितां विलायतेंत वरील सालीं एक कारखाना काढण्यांत आला. हा कारखाना कांहीं वर्षें चांगला चालला. पण पुढें इसवी सन १७०० आणि १७६१ मध्यें पार्लमेंटमध्यें चिटाच्या कपड्याविरुद्ध एक ठराव पास करण्यांत आल्यानें ह्या प्रकारचे कपडे विलायतमध्यें कमी प्रमाणांत निघूं लागले. त्याच्याच जोडीला चिटाच्या कपड्याला वाराला तीन पेन्स असा कर लादण्यांत आला होता. विलायतेंतील कोष्ट्यांनीं या बाबतींत विनंति केल्यावर कराची दामदुप्पट करण्यांत पार्लमेंटनें अग्रेसरत्व पत्करलें. हिंदुस्थानांतील चिटाची प्रतिस्पर्धा करण्याचा व्यापार पार्लमेंटनें कराच्या जबरदस्त वाढीनें आकारांत आणला. तेव्हां अर्थातच अशा प्रकारचा माल विलायतेंतील कारखानदार काढीनासे झाले.

इ. स. १७२० मध्यें पार्लमेंटनें एक कायदा केला. तो कायदा म्हणजे हिंदुस्थानच्या व्यापारावर वज्राघातच होय. जो कोणी व्यापारी विलायतेंत हिंदुस्थानी कापड विकील त्याला २० पौंड आणि खरेदी करील त्याला पन्नास पौंड दंड ठोठावण्यांत येईल. ह्यासंबंधीं ज्यास्त माहिती ( Useful Arts and Manufactures of Great Britian P. 363 ) यांत दिलेली आहे. पार्लमेंटनें जरी असा कायदा केला होता तरी हिंदुस्थानचा माल बऱ्याच विलायती स्त्रियांनीं खरेदी करून कायदेभंगाबद्दल दंडही भरला होता. विलायतेंतील लोकांच्या आणि पार्लमेंटच्या हिंदुस्थानच्या व्यापारी धोरणावर ह्याहीपेक्षां अधिक

प्रकाश पाडतां येतो. कपड्याची बाबत जरी सोडून दिली तरी अन्य वस्तूंवरही करांचें भयंकर ओझें होतेंच. हिंदुस्थानांतील कपडाच फक्त परदेशांत जात होता असें नव्हे तर इतरही बऱ्याच व उपयुक्त वस्तु परदेशांत जात होत्या. कपड्याच्या बरोबर इतर वस्तूही परदेशच्या बाजार पेठेंत आपलें वर्चस्व ठेवीत असत. त्याही वस्तूंचें वर्चस्व परदेशी बाजारपेठेंत निदान विलायतेच्या बाजारपेठेंत नसावें म्हणून त्याही वस्तूवर जबरदस्त कर लादण्यांत आले होते. या बाबतींत विलायतच्या पार्लमेंटनें कसा काय धुडगुस घातला त्याचें अनुमान पुढील प्रमाणावरून सहजच निघेल. विलायतेंतील अधिकाऱ्यांनीं हिंदुस्थानांतील मालावर पुढील प्रमाणें कर लादले होते. पुढील प्रमाण शेंकड्याचें आहे. हिंग २३३ ते ६२२, वेलदोडे १५० ते २६६, काळे मिरे २३६ ते ४००, साखर ९४ ते ३८३, चहा ६७ ते १००, चटया ८५, चिट ३२॥, रेशीम २ ते ४ रुपये शेरामागें, कापूस मणाला १५ रुपये. येणेंप्रमाणें जबरदस्त कर लादून विलायती लोकांनीं हिंदी व्यापाराची गळचेपी केली. विलायतेंत हिंदुस्थानचा माल मुळींच खपतां कामा नये असा जोराचा प्रयत्न केल्याचीं निरनिराळीं बरींच उदाहरणें आहेत. विलायतेंतील एकाद्या व्यापाऱ्यानें जर हिंदुस्थानचा माल आणविला तर विलायतच्या बंदरांतूनच त्या मालाची रवानगी परत हिंदुस्थानांत करण्याची खबरदारी विलायतचे त्या वेळचे लोक घेण्यास कमी करीत नसत. हिंदुस्थानच्या व्यापाराला मूठमाती देण्याचा इंग्रजी लोकांचा विचार फारा दिवसांपासूनचा होता. त्या विचाराचें मूलबीज कसें आणि कोणत्या पद्धतीनें पेरलें गेलें याची माहिती वरील स्पष्टीकरणावरून वाचकांना होईलच. आंग्ल व्यापारी हिंदुस्थानांत आपला व्यापार वाढविण्याकरितां आले आणि त्याच बरोबर हिंदी व्यापाराची त्यांनीं धूळदाण करण्याचा उपक्रम केला. हिंदी व्यापार बुडविण्याकरितां आंग्ल व्यापाऱ्यांनीं चहूंकडून नाकेबंदी केली. हिंदी व्यापार विलायतेशींच चालू होता, असें नाहीं तर युरोपखंडांतील व एशियांतील बऱ्याच मोठमोठ्या देशांशींही चालू होता. हिंदुस्थानच्या मालाला परदेशांतून फारच मागणी होती. विलायतवाले हिंदी मालावर जबरदस्त 'आयात' कर लादून स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं आपला माल हिंदुस्थानच्या बाजारांत खपविण्याचा निरनिराळ्या उपायांनीं जारीनें उद्योग केला. इ. स. १७६४ मध्यें हिंदुस्थानांत १५६ पौंड सुती कपडा आला होता; पण इ. स. १८०९ मध्यें १ लाख १८ हजार ४ शें पौंड सुती कपडा आला. हिंदी व्यापाऱ्यांची अवनती सुरू झाली आणि विलायतवाल्यांची व्यापारी उन्नती उत्कर्षाला आली. विलाय-

तेचा माल हिंदुस्थानच्या छाताडावर तांडव करूं लागला. कमिशनचा वचपा अन्य मार्गानें काढल्याबद्दल विलायतवाल्यांना अत्यानंद झाला. हिंदी व्यापारी व कारागीर माल करून विकतील तर तेंही आंग्ल व्यापारी अत्याचारामुळें अशक्य होऊन बसलें. कारागिरांवर जुलूम होऊं लागला.

इ. स. १८१६ पर्यंत फक्त ईस्ट इंडिया कंपनीच व्यापार करीत होती. पण त्यानंतर विलायतेंतील इतर व्यापाऱ्यांनाही हिंदुस्थानांत व्यापार करण्याची परवानगी मिळाली. ही ' संधी ' विलायतवाल्यांना मिळतांच ईस्ट इंडिया कंपनीप्रमाणें त्यांनींही आपलें बस्तान बसवून आपल्या जातभाईंच्या पाऊलावर पाऊल ठेवून हिंदी व्यापारी व व्यापार यांच्या नरडीला नख लावण्याचा उद्योग आरंभला. विलायतवाल्यांची पोळी पिकून हिंदुस्थानच्या व्यापाराची मात्र होळी व्हावयास लागली. विलायतचे व्यापारी आपआपल्या कोठारांत विलायती माल भरूं लागले आणि त्यावर त्यांनीं आपले खिसे भरण्यास सुरवात केली. विलायती व्यापाऱ्यांचे खिसे गरम झाले आणि हिंदुस्थानच्या लोकांचे खिसे खालीं होऊं लागले ! ! !

विलायतवाले हिंदुस्थानांत आपला माल अतिशयच आणूं लागले. इ. स. १८२१ मध्यें साडेसहा कोटींचा माल ह्या व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानांत आणला. वस्तुस्थिति अशी होती कीं, हिंदुस्थानला त्या वेळीं बाहेरील कापडाची मुळींच आवश्यकता नव्हती. हिंदुस्थानांत इतका माल पैदा केला जात असे कीं, तो हिंदुस्थानवासियांना पुरून परदेशच्या लोकांनांही पुरविला जात असे. पण हिंदुस्थानचा भरभराटींत असलेला व्यापार संपुष्टांत आणण्याचा चंग बांधलेल्या आंग्ल लोकांना वाटेल त्या युक्त्याप्रयुक्त्या करून आपलें " हिंदी व्यापार—विध्वंसक ध्येय " साध्य करून घ्यावयाचें होतें आणि म्हणूनच विलायतेंतून येणाऱ्या मालावर अडीच रुपये कर बसवून खुद्द हिंदुस्थानांतल्या उपयोगाकरितां तयार केल्या जाणाऱ्या कापडावर साडेसत्रा रुपये कर लादण्यांत आला. कापडाच्या बाबतींतच इतका भयंकर कर होता असें नव्हे, तर चामड्याच्या वस्तूंवरहि शेंकडा पंधरा बसविण्यांत आला होता. साखरेवर तर कमालीचा कर होता. विलायती साखरेपेक्षां देशी साखरेवरच शेंकडा पांच अधिक कर बसविला होता. आपली साखर हिंदुस्थानांत खपावी म्हणून जावा साखरेची कायदेशीर हकालपट्टी करण्याचा उद्योग ह्या व्यापाऱ्यांनीं केल्याचा उल्लेख तत्कालिन इतिहासांत व व्यापारविषयक कागदपत्रांत हवा तितका आढळतो. सरासरी २३४ प्रकारच्या व्यापारावर जबर-

दस्त कर लादला गेला होता. हा असह्य कर लादला गेल्यामुळें तीस वर्षांत हिंदुस्थानच्या व्यापाराचा धुव्वा उडाला. इंग्रजांच्या या व्यापारी धोरणामुळें हिंदुस्थानचें आणखीही बरेंच नुकसान झालें. तें नुकसान म्हणजे अमेरिका, डेन्मार्क, स्पेन, पोर्तुगाल, मोरेशस व आशिया खंडांतील इतर राष्ट्रें यांच्याशीं असलेला व्यापारी संबंध सुटत चालला.

इ. स. १८०१ मध्यें १३६३३ कापसाच्या गांठी अमेरिकेंत गेल्याचा उल्लेख आहे. पण १८२९ मध्यें हें प्रमाण ४५८ वर आलें. डेन्मार्कमध्यें सन१८०० मध्यें १४५० गांठी गेल्या, पण १८५० मध्यें १५० वर प्रमाण आलें. पोर्तुगालमध्यें १७९९ मध्यें ६७१४ गांठी गेल्या आणि १८२५ मध्यें १००० गांठीपर्यंत मजल आली. सन १८०० मध्यें अरबस्थान, ईराण वगैरे देशांत ४ हजारांपासून सात हजारांपर्यंत गांठी जात पण १८२५ नंतर दोन हजारच गांठी जेमतेम जाऊं लागल्या. ह्या औद्योगिक अध:पतनाला इंग्रजांची व्यापारी नीतीच कारणीभूत झाली.

महंमद रजाखांच्या वेळीं बंगालमध्यें तीन कोटी बोटी आपली गुजराण उत्तम तऱ्हेनें करून दरवर्षी पंधरा कोटींचें कापड परदेशांत पाठवीत असत. पण सन १८०९ मध्यें तर तीन लाख रुपयांचा माल परदेशांत जेमतेम पाठविला जात असे.

वरीलप्रमाणें हिंदुस्थानांतील व्यापार अधोगतीला जाऊं लागला. हिंदी व्यापार डोकें वर करणार नाहीं असें जेव्हां इंग्रजी व्यापाऱ्यांना वाटलें तेव्हां त्यांनीं हिंदुस्थानांत विकला जाणाऱ्या मालावर कर माफ केला. हिंदुस्थानांत एक काळ असा होता कीं, त्या वेळीं हातसूत फारच उत्तम प्रकारचें निघत असे. ही घरगुती कला इंग्रज लोकांनीं अजिबात बुडविली; इतकेंच नव्हे तर त्यांनीं चरख्यावरहि कर बसविण्यास कमी केलें नाहीं. उत्तम प्रकारें सूत काढण्यांत हिंदुस्थानांतील स्त्री-पुरुष अत्यंत प्रवीण होते. एका लेखकानें या बाबतींत असें लिहिलें आहे कीं, इंग्रजांनीं हिंदुस्थानचा व्यापार बुडविण्याकरितां नाना उपाय म्हणजे चरख्यावर कर बसविला. या कराबद्दल व्हिक्टोरिया कालांतील हिंदुस्थान या पुस्तकाच्या १३५ पानावर फारच मजेदार माहिति दिलेली आहे.

चरख्याची माहिती व त्यावर सूत काढण्याची कला याचा इंग्रज लोकांना गंधहि नव्हता. केवळ चरख्याच्या जोरावरच हिंदुस्थानचे कोष्टी सुंदर कपडा तयार करून सर्व जगाला थक्क करूं शकतात तेव्हां या चरख्याचा नायनाट केल्याखेरीज हिंदुस्थानचा व्यापार संपुष्टांत येणार नाहीं.

वरील स्पष्टीकरणांतच चरख्यावरील कराची परंपरा आढळून येत आहे. चरख्यावरील सुंदर सुताचे सुंदर कपडे विलायतेंतील कपड्याच्या तोंडांत मारीत असत. सगळ्यांना हिंदी वस्तूंचा व कपड्यांचा मोह पडत असे, आणि याचमुळें सुखासमाधानानें आणि सरळ पद्धतीनें आपला व्यापार हिंदुस्थानांत चालणें कठीण आहे असें वाटून इंग्रज व्यापाऱ्यांनीं विध्वंसक व विरोधक धोरण स्वीकारून आपलें ध्येय सफल केलें.

विलायतच्या कोष्टयांना कपड्यांच्या किनारी कशा विणाव्या याची प्रथम मुळींच माहिती नव्हती. ही कला त्यांनीं बंगालच्या कोष्टयांपासून संपादन केली.

पूर्वी विलायती किनारीचा जो कपडा हिंदुस्थानांत येत असे तो इतका वाईट होता कीं, आपले लोक तो कपडा कधींहि हातीं धरीत नसत. इंग्रज व्यापाऱ्यांनीं हातमागाचा धंदा बुडवून हिंदी व्यापार मृत्युपंथाला लावला व त्यामुळें अनाथ हिंदूंनांहि धूळ खायला लावली. अनाथ विधवा व गरीब कुटुंबें सूत काढून त्यावर आपलें व आपल्या कुटुंबांचें पालन पोषण करीत असत. चरख्यावरील जबरदस्त करामुळें त्या गरीब बिचाऱ्या कुटुंबांचें मनस्वी नुकसान होऊन त्यांच्या करुणरुदनानें सर्व हिंदुस्थान आसेतुहिमाचल निनादून गेला.

या करुणरुदनाचा पहिला जबरदस्त तडाका प्रथम मुंबईला बसला. त्यामुळें कारखान्याचें वेड त्या वेळच्या मुंबईच्या लोकांच्या डोक्यांत शिरून या धंद्याची प्राणप्रतिष्ठा करण्याचें त्यांनीं योजिलें. मुंबईकरांचे बेत इंग्रजी व्यापाऱ्यांना समजले व त्यांना मोठेंच आश्चर्य वाटलें. नुसतें आश्चर्यच नव्हे तर भीतीही वाटली. ताबडतोब या लोकांनीं एक कायदा करविला कीं विलायतेंतून गिरण्यांची मशिनरी मागावयाची झाली तर हिंदुस्थानच्या लोकांना भयंकर कर द्यावा लागावा. पण या दटावणीचा कांहींच फायदा झाला नाहीं. पडेल तो कर देण्याचें कबूल करून लोकांनीं गिरणीला लागणारी मशीनरी मागविली व पहिली गिरण सुरू केली. गिरण्या सुरू झाल्यावर विलायतवाल्यांच्या तोंडचें पाणी पळालें. याला आळा घालण्याचे वेगवेगळे प्रयत्न विलायतवाल्यांनीं पुष्कळच केले.

इ. स. १८९६ मध्यें या विलायती व्यापाऱ्यांच्या कैवाऱ्यांनीं एक नवाच डाव टाकला. तो डाव म्हणजे विलायतच्या मालावरील जकात कमी करून देशी गिरण्यांत पैदा होणाऱ्या मालावरचा कर अधिक वाढविला. येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, ज्या देशांत जो माल उत्पन्न होत असेल त्या देशांत जकात बसत

नसे. परंतु हिंदुस्थानांत मात्र ही पद्धत प्रथम अमलांत आणण्यांत आंग्ललोकांनीं सर्वांवर ताण करून आद्यमान पटकविला. या विचित्र पद्धतीचा देशी उद्योगधंद्यावर फार भयंकर परिणाम झाला. चीन व जपानचे लोक हिंदी माल फार महाग म्हणून मागविनासे झाले. याचा दुसरा असा परिणाम झाला कीं, देशी कपड्यापेक्षां विलायती कपडा स्वस्त मिळूं लागला.

या प्रकारें हिंदुस्थानचें औद्योगिक अधःपतन इंग्रजांनीं केलें. यावरून हिंदुस्थान पूर्वीं दरिद्री नव्हता परंतु इंग्रज आल्यावरच तो दारिद्र्याच्या खोल गर्तेंत खिचपत पडला आहे, हें स्पष्ट दिसत नाहीं काय ? बेबंदशाही व आपसांतल्या लढाया या बाबतींतल्या विधानांचा विचार करतांना देखील हिंदुस्थान व इतर राष्ट्रें यांचा त्या त्या कालचा इतिहास पाहतां हिंदुस्थान प्रमाणेंच इतर राष्ट्रांत स्थिती होती. इंग्लंड फ्रान्सचे त्या त्या काळचे इतिहास याच गोष्टी दर्शवीत आहेत. स्वराष्ट्राचें परक्यांच्या आक्रमणापासून संरक्षण करणें हें राष्ट्राचें कर्तव्यच असतें. असें कर्तव्य इतर राष्ट्रांप्रमाणें हिंदुस्थाननें पराक्रमी वृत्तीनें बजावलें आहे. याची साक्ष हिंदुस्थानचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास देत आहे. युरोपच्या सोळाव्या व सत्राव्या शतकाचा इतिहास पाहतां हीच गोष्ट स्पष्टतेनें दिसत आहे. परंतु बाईला पाश्चात्य राष्ट्रांच्या इतिहासांत बेबंदशाही व लुटालूट दिसत नाहीं व हिंदुस्थानांत तेवढी दिसते हें आश्चर्य कीं तिचें इतिहासाचें गाढ अज्ञान !

बाई पुढें असें विधान करते कीं, जेव्हां दुःखी भारतमातेवर नवें निशाण Union Jack फडकू लागलें तेव्हांच तिची स्थिती सुधारली. सर्वांचें कल्याण होऊं लागलें, लोकशाहीचें वळण लागलें. भगवा झेंडा जाऊन ज्या वेळीं इंग्रजी सत्तेचें निशाण देशावर फडकूं लागलें त्या वेळेपासून आजतागायत इंग्रजी सत्तेनें हिंदुस्थानच्या कल्याणाकरतां काय काय केलें, याची तपशीलवार यादी आपल्या समर्थनार्थ बाईनें कां बरें दिली नाहीं ?

इंग्रज सरकारचें राज्य हिंदुस्थानावर आल्यापासून हिंदुस्थानचें काडीचेंही कल्याण झालें नाहीं तर उलट इंग्रज सरकारचें मात्र कल्याण झालें आहे. हिंदुस्थानच्या स्वराज्याचा अर्वाचीन इतिहास कोणी जरी वाचला तरी त्याला हें कळून येईल कीं गेल्या दीडशें वर्षांत हिंदुस्थानची उन्नती न होतां, सर्व बाजूंनीं अवनतीच झालेली आहे. बहुजनसमाजाचें कल्याण इंग्रजांनीं केलें असें बाई म्हणते. हें कल्याण त्यांनीं केलें किंवा नाहीं याबद्दल ' Education in

India' या ग्रंथांत Mr. Mayhew म्हणतो कीं, The British Government has been entirely indifferent to the social improvement of the masses. बहुजनसमाजाच्या सामाजिक सुधारणेच्या बाबतींतील इंग्रजसरकारचें जसें बेपर्वाईचें वर्तन आहे तसेंच इतर बाबतींतही आहे. राज्यकारभारांतल्या महत्त्वाच्या जागा देखील गोऱ्या लोकांना देऊन आमच्या हिंदी लोकांची लायकी असतांना तिकडे सरकारनें दुर्लक्ष केलें. याची जाणीव इ. स. १९०५ मध्यें कै. ना. गोखले यांनीं करून दिलेली आहे. त्या वेळीं ना. गोखले म्हणाले कीं, When all positions of power and of official trust and responsibility are the virtual monopoly of a class-( European ) those who are outside that class are constantly weighed down with a sense of their own inferior position, and the tallest of them have no option but to bend in order that the exigencies of the situation may be satisfied. इ. स. १९०९ मध्यें जेव्हां मोर्ले मिंटो सुधारणा अमलांत यावयाच्या होत्या त्या वेळीं देखील राज्यकारभारांतील महत्त्वाच्या जागा हिंदी लोकांना देऊं नये अशी आपापसांत वाटाघाट चाललेली होती. यासंबंधाची साक्ष मोर्ले यांच्या Recollections च्या दुसऱ्या भागावरून मिळत आहे.

'The Native member is still a fashionable stumbling block. He is at the back of all their minds even when they are talking of things that have nothing at all to do with it.' ही मनोरचना कशाचें निदर्शक आहे ? व्यापारी अधःपतनाविषयीं वर दिलेलेंच आहे. शेतकीसंबंधानें तरी कांहीं उन्नती, पण ती ही नाहीं. या बाबतींत हेन्री सेंट जॉर्ज टकर लिहितात कीं, India was thus reduced from the state of maufacturing to that of an agricultural country. इंग्रज सरकारनें हिंदी औद्योगिक अधःपतन केलें किंवा नाहीं यांची साक्ष मि. मौंट गामरी मार्टीन हे पुढीलप्रमाणें स्पष्टतेनें देत आहेत. यावरून आर्थिक दृष्टया हिंदुस्थानची या जमान्यांत किती व कशी दुर्दशा झाली हें समजून येईल. मि. मार्टीन लिहितात कीं, 'On the contrary we have done everything possible to impoverish still

further the miserable being subject to the cruel selfishness of English commerce. व्यापार हेंच आर्थिक उन्नतीचें मुख्य साधन आहे. तेव्हां जेथें व्यापारावर वज्रप्रहार घडला तेथें आर्थिक अवनती झाल्यास नवल तें काय !

इंग्रजांच्या रियासतींत जर कांहीं फायदाच झाला असेल जर कशाची समृद्धी झाली असेल तर ती अकिंचनावस्थेची—दारिद्र्याची–होय. हिंदुस्थानची शारिरीक, मानसिक, औद्योगिक, बौद्धिक, सामाजिक, शैक्षणिक अवनती सर्वत्र झालेली आहे. पूर्वींची **सुखी भारतमाता आज दुर्दैवी झाली** आहे याचें कारण हिंदुस्थानांतील इंग्रजांची राजसत्ता हेंच होय !

इंग्रजांनीं हिंदुस्थानच्या बाबतींत आपलें राजकीय धोरण कशा प्रकारचें ठेविलें होतें व आहे हें लक्षांत घेतां पूर्वींपासूनच त्यांनीं हिंदुस्थानला सर्व बाजूंनीं व दृष्टींनीं नामोहरम करण्याचा बेत केल्याचें दिसत आहे.

स्वराज्याचा पुकारा करणारे हिंदुस्थानचे राजकीय पितामह दादाभाई नौरोजी यांनीं ब्रिटिशांच्या अमलाखालील हिंदुस्थानची कशी अवस्था आहे यांचें दिग्दर्शन करणारें 'Poverty and un-British Rule in India' हें पुस्तक लिहून असें सिद्ध केलें आहे कीं, ब्रिटिश रियासतींत हिंदुस्थानांत दारिद्र्याचीच समृद्धी झालेली आहे. असें असतांना बाई निर्लज्जाप्रमाणें म्हणते कीं, पूर्वींची दुःखी भारतमाता इंग्रजांच्या अमदानींत सुखी झाली आहे. इंग्रजांच्या अमदानींत जर कोणी सुखी झालें असेल तर ते इंग्रजच; हिंदुस्थानांतली रयत नव्हे !

हिंदी रयतेकडून मिळणारा प्रचंड करभार ( Tax ) हिंदी जनतेच्या उन्नतीकरतां खर्च केला जात नसून त्याचा विनियोग कसा व कोठें केला जातो याचें विवेचन करतांना Sir George Wingate आपल्या इ. स. १८५९ मध्यें प्रसिद्ध केलेल्या 'Our financial Relations with India' या लिखाणांत लिहितात कीं......In this case they constitute no more transfer of portion of national income from one set of citizens to another, but an absolute loss and extinction of the whole amount withdrawn from the taxed country. As regards its effects on national

production, the whole amount might as well be thrown into the sea as transferred to another country, for no portion of it will return from the latter to the taxed country in any shape whatsover. Such is the nature of the tribute we have so long exacted from India.'

बाई म्हणते, इंग्रजांच्या अमदानींत लोकशाहीच्या तत्त्वाचा उदय झाला. वस्तुतः लोकशाहीच्या सत्य तत्वांचा पूर्वीचा उदयकाल मात्र नाहींसा झाला. इंग्रज हिंदुस्थानांत येण्यापूर्वी आमच्या भारतवर्षात असलेल्या लोकशाहीचा खरा पाया जी ग्रामपंचायत पद्धत तीदेखील या जमान्यांत राहिली नाहीं. ग्रामपंचायत हाच खरा लोकशाहीचा मूळ पाया होता. यासंबंधानें इंग्रजांचा प्रतिनिधी Sir Charles Metcalfe लिहितो कीं, The village communities are little republic having nearly everything they can want within themselves and almost independent of any foreign nation........This union of village communities each one forming a separate little state in itself, is in a high degree conducive to their ( Hindu ) happiness and to the enjoyment of a great portion of freedom and independence.

अशी उदात्त ग्रामपंचायत पद्धतदेखील इंग्रजांच्या अमदानींत धुळीला मिळाली आहे.

सारांश बाई म्हणते तें विधान किती असत्य व वस्तुस्थितीचा भलताच विपर्यास करणारें आहे तें कळून येतें. बाईनें प्रथम आपल्या निर्हेतुक कार्याची रणदुंदुंभी आपण होऊन वाजवून पुढें तिच्या मूळ विवक्षित हेतूचें अंतरंग वरील विधानांच्या भावनेंत स्पष्ट केलें आहे. भारतमाता पुस्तक अमेरिकन लोकांच्या माहितीकरतां लिहिलें कीं, तें हिंदुस्थानांतील ब्रिटिश राजसत्तेच्या खंबीरीकरतां लिहिलें, याची वाचकांना जाणीव झाल्याशिवाय कशी राहील !

साम्राज्यशाहीच्या पुरस्कर्त्यांनीं वेळोवेळीं हिंदुस्थानच्या बाबतींत केलेलीं अज्ञपणाचीं विधानें आणि लिहिलेलीं खोडसाळ लिखाणें बाईच्या विधानांशीं व लिखा-

णांशीं ताडून पाहतां त्यांच्यांत असत्य कां होईना पण एकवाक्यताच दिसते. यावरूनच आम्ही प्रारंभीं अनुमान केल्याप्रमाणें बाईचा विवक्षित हेतूच या लिखाणाच्या मुळाशीं आहे हें स्पष्टच होत आहे.

सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक, राजकीय बाबींचा आपल्या मूळ हेतूला पोषक अशी दृष्टी ठेवून **हिंदुस्थान स्वराज्याला नालायक आहे, स्वराज्याला तें अपात्र आहे,** हा असत्य व स्वार्थी सिद्धांत बाईला या असत्य विधानोदधीचें मंथन करून काढावयाचा आहे. बाईचा हा कुटील उद्देश आहे किंवा नाहीं हें तिच्या मागील विधानांवरून वाचकांना पटल्याशिवाय राहिलें नसेल! **'राजकीय सुधारणा'** यासंबंधानें लिहितांना या बाईनें अनेक भलतीं सलतीं विधानें केलेलीं आहेत. राजकीय सुधारणेचा जो हप्ता हिंदुस्थानच्या पदरांत पडला त्यामुळें हिंदुस्थानला बराच फायदा झाला आहे; इतकेंच नव्हे तर इंग्रजांची सत्ता कमी करून हिंदी जनतेला बऱ्याच अधिकाराच्या व जबाबदारीच्या जागा देण्यांत आल्या आहेत. या विधानांचा निरपेक्ष बुद्धीनें विचार केल्यास पुढील गोष्टी आढळून येतात. हिंदुस्थान सरकार असें ज्याला आपण म्हणतों त्यावर ब्रिटिश प्रधान मंडळ आणि भारत मंत्री यांची हुकमत असते व या हुकमतीला अगर सत्तेला ब्रिटिश पार्लमेंट व ब्रिटिश पार्लमेंटला ब्रिटिश जनता यांची हुकमत मानावी लागते. अशी ही ब्रिटिश सत्तेची सांगड आहे. ब्रिटिश लोकांना हिंदुस्थानच्या हिताबाबत किती व कशी कळकळ आहे हें पार्लमेंटचे हिंदुस्थानविषयक रिपोर्ट व त्या त्या वेळचीं भाषणें हीं लक्षांत घेतां सहजच आढळून येणार आहे. ब्रिटिश जनतेला हिंदु जनतेची मुळींच काळजी नाहीं असें अनेकवार अनेक तऱ्हेनें सिद्ध झालेलेंच आहे. इंग्रज लोकांच्या स्वार्थापुढें त्यांना हिंदुस्थानची काळजी मुळींच दिसत नाहीं. ते ज्या ज्या कांहीं गोष्टी करतात, ज्या ज्या सुधारणा करतात, जे जे हक्क दिले असें भासवितात, त्या त्या साऱ्यांत इंग्रजांचा विवक्षित हेतू असतो. इंग्रजी जनतेचें कल्याण, तिची सर्वांगीण उन्नती, तिचा आर्थिक, मानसिक, राजकीय प्रकर्ष हा इंग्रज सरकारच्या डोक्यांत सारखा घोळत असतो. हीच गोष्ट सुधारणेच्या योजनेंत प्रामुख्यानें दिसून येत आहे.

राजकीय सुधारणेच्या कायद्याप्रमाणें हिंदुस्थान सरकार हें ब्रिटिश जनतेच्याच स्वाधीन आहे. हिंदुस्थानच्या लोकमताचा त्याच्यावर बिलकूल दाब नाहीं. आमच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीला अँग्लोइंडीयन पत्रकार व सुधारणेनें हुरळून गेलेले लोक

**हिंदुस्थानी पार्लमेंटसभा** असें म्हणून त्यांत आनंद मानतात. या पार्लमेंटची स्थिति कशी काय तें पाहूं. या पार्लमेंटमध्यें मुख्य अधिकाराच्या जागा या सरकारनें आपल्या बगलबच्चांना देऊन त्या सरकारजमा केलेल्या असतात. सरकारचा पक्ष हा कोणत्याही ठिकाणीं तें सबल करून ठेवतें व तें आपल्या मताप्रमाणें बहुमत करण्याचा नेहमीं प्रयत्न करीत असतें. लोकनियुक्त सभासदाप्रमाणें या पक्षांतील आमदार खासदारांना निवडणुकीची यातायात नसते. त्यांच्यावर सरकारच्या कृपेचें छत्र कायमचेंच असते. कधीं काळीं जर सरकार पक्षाचें अल्प मत झालें, तर गव्हर्नर जनरल यांना आमच्या राजेसाहेबांप्रमाणें असलेला ' व्हेटो ' चा अधिकार गाजवून आपल्या मनाप्रमाणें वाटेल ते कायदे बनवितां येतात. राजेसाहेबांना—बादशहांना जरी असा अधिकार आहे तरी त्यांनीं त्या अधिकाराचा उपयोग एखाद्या वेळींही केलेला नाहीं. परंतु बऱ्या लाटांच्या कारकीर्दीत व्हेटोचा उपयोग झाला नाहीं असें उदाहरण क्वचितच ! बहुतेक बैठकींत व्हेटोच्या शक्तीचा उपयोग करून जनमताची पायमल्ली करण्यांत येत असते. ही गोष्ट सुधारणेचा राजकीय कायदा झाल्यापासून दृष्टोत्पत्तीस आलेली आहेच. याचा असा स्पष्ट अर्थ होत नाहीं काय, कीं सुधारणेमुळें—नव्या राजकीय हक्कदानामुळें हिंदी जनमताला, हिंदी लोकनियुक्त सभासदांना खरे हक्क मिळाले नसून ते पूर्वीप्रमाणेंच कागदोपत्रींच आहेत. वरिष्ठ कौन्सिलमध्यें सर्व प्रकारची शक्ती गव्हर्नर जनरलच्या व्हेटोमध्यें एकवटलेली आहे. या सर्टिफिकेशनच्या जोरावर बडे छोटे लाट आपल्या इच्छेनुसार, राज्यकारभार हांकीत असतात, इतकेंच नव्हे तर यापुढें त्यांना हिंदी जनमतविरोधाची काडीचीही किंमत वाटत नाहीं.

प्रांतिक सरकारच्या राज्यघटनेचा विचार करूं. नव्या सुधारणेच्या कायद्यान्वयें कांहीं खातीं इंग्रज सरकारनें आपल्याकडे राखून ठेवून कांहीं हिंदी दिवाणांच्यावर सोंपवून दिलेलीं आहेत. यावरून बाई असें विधान करते कीं, सोपीव खातीं देऊन इंग्रजांनीं हिंदी लोकांवर जबाबदारी टाकली आहे. त्यांना दिवाणांच्या जागा दिलेल्या आहेत.

प्रांतिक सरकारांत कांहीं हिंदी दिवाण आहेत ही गोष्ट खरी आहे; परंतु त्यांच्या हातीं कितीशी सत्ता आहे याचा बाईनें मुळींच विचार केलेला दिसत नाहीं.

दिवाणांच्या हक्काबद्दल मुडीमन कमेटीनें केलेला रिपार्ट बाईच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालण्यास पुरेसा आहे. जीं खातीं हिंदी दिवाणांच्या हातीं

देण्यांत आलीं त्या खात्यांच्या नाब्या तिजोरीवाल्याकडे ( Finance Member ) असल्यामुळें त्यांची कशी स्थिती झाली, ही नांवाची दिवाणगिरी कित्येक नामधारी दिवाणांनीं कां सोडली, याचा निःपक्ष बुद्धीनें विचार केल्यास हिंदी दिवाणाच्या हातांत काडीचीही सत्ता नसून ते म्हणजे Executive Councillor च्या हातांतील बाहुलीं होत. दिवाणांना स्वातंत्र्य व स्वतःचें मत असें मुळींच ठेवलेलें नाहीं. अर्थात् जी सत्ता दिली आहे असें भासविण्यांत येतें ती वरील प्रकारची आहे. या दिवाणांची हुकमत पैशावर अगर तिजोरीवर नाहीं. कार्यकारी सभासद कीं जे सभासद सरकारनेंच निवडलेले असतात अशांच्या हुकमती खालीं दिवाणांना वागणें भाग असतें. लांबून स्वतंत्र दिसणाऱ्या दिवाणाच्या दंडाला न दिसणारे असे रेशमी बंद असून त्याचीं टोकें कार्यकारी सभासदांच्या हातांत असतात. सूक्ष्मपणानें सोपीव खात्यांच्या व दिवाणांच्या सत्तेचा विचार केल्यास वरील गोष्ट चटकन लक्षांत येते. सत्तेच्या बाबतींत वरिष्ठ व कनिष्ठ कौन्सिलांची सारखीच स्थिती आहे. नव्या सुधारणेमुळें राजकीय कायद्यामुळें हिंदी जनतेला किती सत्ता प्राप्त झाली याचें अधिक विवरण करण्याचें कारणच नाहीं.

राजकीय सुधारणेमुळें हिंदुस्थानला इतर राष्ट्रांत एक **महत्त्वाचें स्थान** प्राप्त झालेलें आहे असें बाई विधान करते. हें महत्वाचें स्थान-विधान सर्व राष्ट्रीय परिषदेबद्दल ( Empire Conference ) असावें. परंतु या राष्ट्रीय परिषदेला पाठविण्यांत येणाऱ्या प्रतिनिधींवर संमतीचा शिक्का मोर्तब कोण मारतें ? हिंदी जनता कीं हिंदुस्थान सरकार ! हिंदुस्थान सरकार वरील प्रतिनिधींची आपल्या मताप्रमाणें निवड करते. हिंदी जनतेचा त्याच्याशीं कांहीं एक संबंध नसतो. प्रत्यक्ष संबंध असावा अशी जी हिंदी जनतेची आग्रहाची मागणी आहे त्याला तरी कितीशी किंमत देण्यांत आली ? वाटाण्याच्या अक्षताच ना मिळाल्या ! हिंदी जनतेची गोष्ट जरी बाजूला टाकली तरी निदान कौन्सिलमधील आमदार खासदारांच्या मतालाही किंमत दिसत नाहीं. कौन्सिलच्या सभासदांच्या मतानें त्यांच्यातील एखादा प्रतिनिधी तरी पाठविला काय ? असें जरी केलें असतें तरी त्याला महत्व आलें असतें; परंतु तेंदेखील स्थानाच्या दृष्टीनें झालेलें नाहीं. सरकार आपल्या पसंतीप्रमाणें जो प्रतिनिधी पाठवितें तो सरकारचा प्रतिनिधी, सरकार तर्फें गेलेला, सरकारच्या हिताकरतां धडपडणारा. हिंदी जनतेला त्यांत कसलें स्थान आणि कसलें महत्व !

कौन्सिल व असेंब्ली यांची गोष्ट तर राहोच परंतु कौन्सिल ऑफ स्टेट सारख्या सरकारांनींच निवडलेल्या महाजनांतून देखील एखादा प्रतिनिधी निवडण्याचें पुण्य नोकरशाहीनें संपादन केलेलें नाहीं. मग काय येथें इभ्रत आड आली कीं, हिंदुस्थानांत प्रतिनिधी व्हावयाला लायकच कोणी नाहीं ! तिन्ही ठिकाणच्या दृष्टीनें स्थान–जागा याचा विचार करतांना बाईच्या ' स्थल विधानाचा ' असत्यपणा पटल्यावांचून रहात नाहीं. सत्ता व अधिकाराच्या जागा ह्या किती व कशा प्रकारच्या राजकीय सुधारणेमुळें हिंदी जनतेला मिळाल्या आहेत व त्या दिखाऊ, बेगडी व सत्ताहीन आहेत हें आढळून येतें.

आतां हिंदू लोकांची राजकीय सुधारणेच्या कायद्यामुळें इभ्रत वाढली असें जें बाईचें असत्य विधान आहे त्याचा विचार करूं. बाई म्हणते त्याप्रमाणें जर आमची इभ्रत वाढलेली असती तर ज्या तऱ्हेनें **सायमन कमिशन** नेमण्यांत आलें त्या तऱ्हेचें तें आलें असतें काय ! जणूं काय हिंदी प्रतिनिधी म्हणजे शाळेंतील पोरें आहेत, त्यांची परीक्षा घेणें जरूर आहे. म्हणून वरील कमीशन नेमलें गेलें आहे ! हें कमीशन इभ्रत वाढविणारें नसून मानखंडना करून इभ्रतीची धूळधाण करणारें आहे.

कॉमन्स सभेंत जेव्हां हिंदुस्थानविषयक प्रश्न निघाला होता त्या वेळीं **कर्नल वेजवूड** यांनीं असें स्पष्ट बजाविलें होतें कीं, **' हिंदुस्थानला कमिशनची जरूर नसून आयर्लंडप्रमाणें एकमेकाच्या संमतीच्या सहकार्याची जरूरी आहे.'** Colonel Wedgwood truly said in the House of Commons on the Indian question, 'Not by sending out a formal commission, but entering into a treaty with India even as England has entered into an agreement with Ireland.' कमीशन म्हणजे राष्ट्राची मानखंडना होय. हिंदुस्थान सर्व बाजूंनीं स्वराज्याला लायक असतांना तें स्वराज्याला लायक आहे किंवा नाहीं, याची परीक्षा घेणें ही बाईच्या मतें इभ्रतच आहे कीं काय ! एखादा इसम लायक असून देखील त्याच्या लायकीची चौकशी करण्याकरतां एखादी कमेटी नेमणें हा निव्वळ काळाचा व बुद्धीचा अपव्ययच आहे. कमिशनकडे आशाळभूतपणानें पाहून हिंदुस्थानची स्वराज्याची लायकी सिद्ध करण्यांत इभ्रत आहे असें नाहीं. कमिशनच्या तुकड्याकडे दृष्टीक्षेप करून आशाळभूतपणानें पाहण्यांत हिंदु-

स्थानची इभ्रत नसून **पूर्ण स्वातंत्र्य मिळविण्यांतच** आमच्या राष्ट्राचा मान-मरातब व गौरव आहे. **स्वातंत्र्य हीच राष्ट्राची इभ्रत आहे.**

आमदार–खासदारांच्या बाबतींत बाईनें आपलें मत पुढीलप्रमाणें दिलें आहे. ती म्हणते कीं, इंग्रजांनीं मोठ्या उदार बुद्धीनें पण घाईनें सुधारणा दिल्या. व त्या आमदार खासदारांच्या लायकीचा विचार न करतां दिल्या गेल्या. हिंदुस्थानांत पाश्चात्य राजकीय सुधारणांची पद्धत पूर्वीपासून नसल्यानें ती पद्धत कशी काय असते याची त्यांना माहिती नसल्यानें, ती मिळतांच त्यांची स्थिति हुरळलेल्या पोराप्रमाणें झाली. म्हणजे एकादें नवीन यंत्र लहान मुलांच्या हातीं पडतांच तीं जशीं त्या यंत्राची गैरमाहितीमुळें नासधूस करतात, त्याचप्रमाणें आमच्या आमदार–खासदारांना सुधारणा कायद्याची खरी किंमत न समजल्यामुळें बेजबाबदारपणा केला. इतकेंच नव्हे तर त्यांना राजकीय सुधारणा कशा अमलांत आणाव्या ह्याचें देखील ज्ञान नाहीं.

हा असत्य आरोप करण्याचा उद्देश इतकाच असावा कीं, दिलेल्या सुधारणा अमलांत आणण्याची हिंदी जनतेंत पात्रताच नाहीं. याचा स्पष्ट अर्थ असा कीं, दिलेल्या सुधारणा राबवून घेण्याला आमचे आमदार–खासदार लायकच नाहींत. त्यांना महत्वाचे प्रश्नदेखील समजत नाहींत. सरकारला विरोध करणें हेंच यांचें कार्य असून वाटेल त्या वेळीं हे सरकारला विरोध करीत असतात. याचें कारण असें कीं, सरकारविषयीं या आमदार खासदारांचीं मतें नेहमींच संशयानें पछाडलेलीं असतात. सरकार हिंदुस्थानच्या हिताची काळजी घेतें, त्यांच्याकरतां प्रश्न व बिलें मांडतें, परंतु हे विरोध करीत असतात.

आमदार व खासदार सरकारला कां विरोध करतात ! याचें कारण देतांना बाईनें मोठी घोडचूक करून ठेवलेली आहे. ती म्हणजे आमचे आमदार–खासदार सरकारविषयीं संशयी असतात, म्हणून ते बऱ्या वाईट गोष्टींत विरोध करीत असतात. आमदार–खासदार जो विरोध करतात तो हिंदुस्थानच्या दृष्टीनें ! सरकारबद्दल संशय आहे म्हणून नव्हे. जेव्हां जेव्हां सरकार प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष करून एखादें बील मंजूर करतें, बजेट पास करतें, करांचा बोजा शिरावर लादतें, जुलमी कायदे करतें, तेव्हां तेव्हां आमदार–खासदार विरोध करतात. लोकहिताच्या दृष्टीनें प्रत्येक कौन्सिलांत विरोध होतोच होतो. पार्नेल यानें अल्स्टरच्या वेळीं विरोध केलाच होता. कौन्सिलांत विरोध हें तर देशबंधू दास यांचें अप्रतीम

तत्त्व होतें. दिलेल्या असमाधानकारक, अपुऱ्या, निराशाजनक सुधारणा राबवून घेण्याचें ठरल्यावर द्विदलराज्यपद्धतीच्या मुसक्या बांधून जबाबदार राज्यपद्धती अस्तित्वांत आणण्याकरितां देशबंधूंनीं अडथळ्याचें दिव्य अस्त्र हातीं घेतलें.

सुधारणेच्या कायद्याची रूपरेषा व सत्तेचें क्षेत्र पाहतां विरोधाशिवाय आमच्या आमदार–खासदारांना दुसरा अन्य उपायच नाहीं. सरकार जर आपल्या मताप्रमाणें व आपल्याच दृष्टीनें कायदे कौन्सिलांत कार्य करील तर तें त्याला करूं द्यावयाचें नाहीं, अशी प्रवृत्ति लोकनियुक्त आमदार–खासदारांची आहे. लोकनियुक्त प्रतिनिधी हे लोकांच्या हिताकरतां लोकांनीं निवडून दिलेले असतात, अशांनीं लोकांच्या हितावर घाला घालण्याचें कृत्य जर सरकार करूं लागलें तर स्वस्थ बसावें कीं काय ! सुधारणेच्या अपुऱ्या कायद्यांत अगोदर आमदार–खासदारांच्या मताला असावा तसा मान नाहीं, परंतु जो कांहीं थोडासा वाव आहे त्याचा उपयोग त्यांनीं केलाच पाहिजे.

जे लोक विरोध करीत नाहींत इतकेंच नव्हे तर केवळ सरकारच्या मर्जीचा मान ठेऊन ‘ सरकार बोले व मवाळ हाले’ अशी ज्या पक्षाची स्थिती व जो पक्ष सर्वस्वीं सरकारच्या वृत्तींत एकवटलेला, ज्याचा सर्वस्वीं भर अर्ज, विनंती व मागणीची सामुग्री, जें कांहीं मिळावयाचें असतें तें अर्ज, विनंति याचना यांनींच मिळेल असा ज्यांच्या हिताचा दृढ भरंवसा अशा पक्षाबद्दल बाईनें मात्र मूग गिळलेले आहेत. सरकारशीं सहकार्य करून आपल्या देशाची उन्नती होईल, त्याला स्वराज्य मिळेल, त्याची सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, शारीरिक, मानसिक सुधारणा होईल, असा ज्यांचा महामंत्र अशांनीं आपल्या प्रयत्नाची पराकाष्टा करून देखील त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांच्या पदरांत कांहीं एक पडलें नाहीं. इतकेंच नव्हेतर अशा पक्षाला–सहकार्यब्रुवांना देखील सरकार कामापुरतें हाताशीं धरून आपलें कार्य साधून घेतें. सहकारिता करून आपल्या पदरांत कांहीं एक पडत नाहीं अशी बालंबाल खात्री झाल्यावर बऱ्याच वर्षांचा अनुभव घेतल्यानंतर, त्याला असें आढळून आलें कीं भिक्षेनें स्वराज्य मिळत नाहीं, कृपेनें कार्यसिद्धी होत नाहीं. देणगीनें स्वातंत्र्याचा लाभ होत नाहीं. याचनेनें व अर्ज विनंतीनें कोणी कोणाला स्वातंत्र्य दिल्याचें अपवादात्मक उदाहरणदेखील जगाच्या इतिहासांत सांपडत नाहीं. सहकार्यापेक्षां विरोधामुळेंच क्वचित् प्रसंगीं स्वराज्याच्या मंदिराजवळ जनतेला जातां येईल. सुधारणेचा हप्ता बाई म्हणते त्याप्रमाणें एखाद्या गोऱ्या कर्णाचें दातृत्व नसून परिस्थितीचेंच प्रतिफल आहे. गेल्या महायुद्धांत

लाखों हिंदी वीरांनीं सरकारकरतां आपल्या रक्ताचा सडा घातला, विश्वसंग्रामांत सरकारला सर्वतऱ्हेनें अनुनुभूत मदत केली, त्यामुळें इतोत्तर असा एखादा युद्धाचा वणवा पेटल्यास अशीच मदत मिळावी या भावी आशेनें एक सुधारणेचा तुकडा हिंदी जनतेच्या तोंडावर फेंकला. यांत उदार हृदयाचें दातृत्व मुळींच नाहीं.

बाई आमदार खासदारांना पोर समजते; परंतु जेव्हां जेव्हां लोकहिताचा प्रश्न वरिष्ठ व कनिष्ठ कौन्सिलांत येतो तेव्हां तेव्हां सरकारचे बगलबच्चे त्या प्रश्नाची टवाळी व थट्टा करून अगदीं पोरकटपणा करतात त्याची वाट काय ? कौन्सिल-संच्या प्रश्नाला उडवाउडवीचीं उत्तरें देणाऱ्या या हिंदुस्थानच्या पार्लमेंटमधील स्थिति पाहिली म्हणजे ही हिंदुस्थानची पार्लमेंट आहे कीं नोकरशाहीची बखळ आहे हेंच समजत नाहीं. अशी वस्तुस्थिती या दोन्ही तिन्ही कौन्सिलची आहे. बाई म्हणते त्या विधानांचा व तिच्या हेतूंचा मथितार्थ म्हणजे आलेल्या कमिशनची भविष्यवाणी होय.

राजकीय सुधारणांचा भाग लिहिण्यांत अथपासून इतीपर्यंत बाईला हेंच सिद्ध करावयाचें आहे कीं, सहा वर्षांपूर्वीं दिलेल्या सुधारणांनाच हिंदुस्थान लायक नसून इंग्रज सरकारनें हिंदुस्थानची हळुहळु राजकीय उन्नति व्हावी म्हणून मोठ्या उदार अंतःकरणानें हा पहिला हप्ता दिला. परंतु त्याचा त्यांनीं कांहीं एक उपयोग करून घेतला नाहीं. अनुपयुक्त घटनेचा उपयोग बाईच्या अमेरिकेंत एखादा शास्त्री करीत असेल. परंतु हिंदुस्थानांत उपयुक्त वस्तूंचाच उपयोग केला जातो. या विभागांत केलेले आरोप व असत्य विधानें म्हणजे इंग्रज सरकारची मनमुराद स्तुती व हिंदी आमदार खासदारांची बेफाट निंदाच होय. जे हिंदी अधिकारी वरच्या अधिकारावर आहेत त्यांच्या संबंधानें देखील अत्यंत खोडसाळ विधानें बाईनें केलेलीं आहेत. दिवाण वगैरे जे आहेत त्यांच्यांत जातिनिष्ठा व जात्यभिमान प्रमाणाच्या बाहेर असून हे आपल्या नातलगांना जागा देतात ! आपल्या जातीची वर्णी लावतात. जर त्यांनीं तसें केलें नाहीं तर लोक त्यांना नांवें ठेवतात. सारांश ज्या जातीचा अधिकारी असेल त्या जातीची वर्णी त्याच्या खात्यांत लागते. असा प्रकार हिंदुस्थानांत क्वचित् ठिकाणीं होत असेल; परंतु बाई ज्या दृष्टीनें आग पाखडीत आहे ती दृष्टी मात्र त्या त्या वरिष्ठ हिंदी अधिकाऱ्यांची नसते.

नोकरीचें प्रमाण पाहतां अगर त्यांतली वर्णप्रीति पाहतां असेंच दिसून येतें कीं, अँग्लोइंडियनच अधिक प्रमाणांत दिसून येतात. नेटिव्हांना तर नोकरीची

भयंकर पंचाईतच पडते. अँग्लोइंडियन, ख्रिश्चन यांनीं तर कित्येक जागा भरून काढलेल्या आहेत. असल्या प्रकारची प्रतारणा खुद्द सरकारच्या खात्यांत व निम सरकारी रेल्वे वगैरे खात्यांतून धडधडीत प्रत्यहीं दिसून येते. दिवाण अगर वरिष्ठ हिंदी अधिकारी यांच्यावर आरोपाची आग पाखडणाऱ्या या बेजबाबदार लेखिकेला अमेरिकेप्रमाणेंच याही देशांत आणि ती देखील गोऱ्या जातींत वर्ण-द्वेषाची कशी जागती ज्योत पेटलेली आहे याकडे पाहिलें असतां कळून आलें असतें. परंतु जेथें हिंदुस्थानची व हिंदी जनतेची जाणून बुजून निंदाच करावयाची आहे तेथे सदसद्विवेक बुद्धी तरी कुठली व तारतम्यभाव तरी कसला ?

बाई पुन्हा निर्लज्जाप्रमाणें असा मूर्खपणाचा आरोप तमाम हिंदी जनतेवर करते कीं, **हिंदी जनता ही जुलूमप्रिय आहे, तिची वाढ जुलूमांतच झालेली आहे. इंग्रज हिंदुस्थानांत येण्यापूर्वी हिच्या मानेवर जुलमाचें जोखड होतें.** तेव्हां अशी ही जुलूमांत वाढलेली हिंदी जनता दुसऱ्या तिसऱ्यावर जुलूम करण्यास नेहमींच प्रवृत्त होते. इंग्रजांच्या कृपेनें मध्यमवर्ग तयार झाला व अशाच मध्यम वर्गांतून वकील, डॉक्टर, उपदेशक लोक तयार झाले. या लोकांनीं ही स्वराज्याची चळवळ चालविली. वस्तुतः स्वराज्याची चळवळ ही अखिल भारतीय चळवळ नसून ती मध्यम वर्गांतल्या मूठभर लोकांची आहे.

प्रथमतः बाईच्या 'जुलूमाची' मीमांसा करूं. इंग्रज हिंदुस्थानांत येण्यापूर्वी अगदीं वेदकालापासूनचा इतिहास पाहिला तर हिंदी जनतेनें जुलमाचा प्रतिकारच केलेला आहे. तिनें जुलूम जबरदस्ती करणाऱ्या परक्यांच्या हल्ल्यापासून आपल्या भारतवर्षाचा बचाव केला असून भारतवर्षाची सर्व बाजूंनीं भरभराट केलेली होती. जुलमाचा प्रतिकार करणें, अन्यायाची नांगी मोडणें, दुःखाचें परिमार्जन करणें, नष्ट झालेलें स्वातंत्र्य संपादन करून सर्वत्र आबादी करणें याच ध्येयानें हिंदी जनता प्रेरित होऊन तिनें आपल्या उज्ज्वल पराक्रमानें इतिहासांत अजरामरत्व संपादन केलें आहे. जेव्हां जेव्हां जुलूमी लोकांची जुलूमशाही अस्तित्वांत येऊन भारतवर्षांत धूमाकूळ घालूं लागली तेव्हां तेव्हां हिंदी जनतेनें पराक्रमीवृत्तीनें, निधड्या पोलादी छातीनें तिला धूळ चारली आहे.

रजपूतांचा इतिहास, मराठ्यांच्या बखरी चाळल्या तर हिंदी जनता जुलूमप्रिय होती, तिची वाढ जुलमांत झाली आहे हें म्हणणें किती खोटें व अज्ञानद्योतक आहे हें समजून येईल. हिंदुस्थानचाच काय पण कोणत्याही देशाचा इतिहास हेंच

सांगत असतो. सर्व राष्ट्रांच्या इतिहासाचीं पानें हीच साक्ष देत असतात. जेव्हां कोणी कोणावर, एखादें राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर, एखादी जात दुसऱ्या तिसऱ्या अन्य जातीवर जुलूम करण्यास उद्युक्त होते तेव्हां तें राष्ट्र, ती जात, तो देश अगर ती व्यक्ती सामुदायीक किंवा वैयक्तिक जुलमाच्या प्रतिकारार्थ सिद्धच झालेली असते.

जुलमाच्या जोखडाखालीं राहणारी व्यक्ती, राष्ट्र, अगर जात ही केव्हांही आपलें अस्तित्व टिकवूं अगर संभाळूं शकत नाहीं. असें दाखविणारा हिंदी जनतेच्या पराक्रमाचा इतिहास झगझगीतपणानें असतांना बाई वाटेल तसा घाणेरडा आरोप हिंदी जनतेवर व राष्ट्रावर करून आपला हिंदी द्वेष जगजाहीर करीत आहे. जुलमाचा पूर्वीप्रमाणें प्रतिकार आजच्या पारतंत्र्यावस्थेंत हिंदी जनतेला करतां येत नाहीं हें तिचें दुर्दैवच होय. तरी पण जुलमाचा प्रतिकार सर्व परिस्थितीचा विचार करून हल्लींही हिंदी जनता करीतच आहे. आणि याचकरतां हिंदी जनतेनें गेलीं चाळीस पंचेचाळीस वर्षें राष्ट्रीयमहासभेच्याद्वारें खटपट चालविलेली आहे. याच महासभेनें स्वराज्याची चळवळ धडाडीनें सुरू केली आहे. हिंदुस्थान स्वराज्याला सर्वस्वीं लायक असून बाई व तिचे जातीबंधू असें असत्य प्रलाप काढतात कीं, हिंदुस्थान स्वराज्याला लायक नसल्यानें आम्ही त्याला शिक्षण देऊन त्याची हळू हळू राजकीय उन्नती करीत आहोंत.

इंग्रजांची ही विचारसरणी आज जरी हिंदुस्थानच्या बाबतींत नवीन असली तरी या मानभावी विचारसरणीचे प्रयोग अनेक वेळां अनेक राष्ट्रांवर त्यांनीं केलेले आहेत. या मायावी मानभावीपणाच्या पाशांत बरींच राष्ट्रें सांपडलीं. इ. स. १७८६ सालीं अमेरिकेंतील देशभक्तांनीं जर चळवळ करून आपल्या मानेवरचें ब्रिटीश जूं झुगारून दिलें नसतें, तर जगाच्या अंतापर्यंत अमेरिकेच्या पांढऱ्या नशीबीं पारतंत्र्याचा तिलक लागलेलाच दिसला असता. निव्वळ मानभावीपणाच्या भुलथापांवर हुरळून जाऊन अमेरिकन वसाहतवाले कींकर्तव्यमूढ होऊन, आहे त्यांत समाधान मानून राहिले असते तर त्यांना स्वातंत्र्याचा अलभ्य लाभ कधींच झाला नसता. ही सत्य हकिगत, हा अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा इतिहास बाईला माहीत नाहीं काय ! किंवा माहीत असून जाणूनबुजून तिकडे दुर्लक्ष करून बाई 'विरोधकांना' नांवें ठेवीत आहे व स्वराज्याच्या चळवळीला हाणून पाडण्याकरतां निरर्गल प्रलाप काढीत आहे.

आज जशी हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या बाबतींत ब्रिटिशांची आकुंचित दृष्टी आहे तशीच त्यांनीं कानडा वसाहतीबद्दल ठेविली होती. कानडाच्या बाबतींत एक चूक त्यांनीं केली होती. व या चुकीचा भयंकर घोर परिणाम त्यांना भोगावा लागलेला होता. कानडाच्या चळवळीमुळें ब्रिटिशांना मनाविरुद्ध वसाहतीचें स्वराज्य देणें भाग पडलें. जपानची जी आज राष्ट्रीय उन्नति झाली आहे, जो अभ्युदय झाला आहे, व हें राष्ट्र जगांतील राष्ट्रांच्या प्रभावळींत तिसऱ्या दर्ज्याला येऊन बसलें आहे त्याला कोणत्या ब्रिटिश मायेच्या पूतानें शिक्षण देऊन स्वराज्य उपभोगावयास लायक केलें? तुर्कस्थानची प्रगति कशामुळें झाली? त्याला कोणत्या मिंटोमोर्लेनें स्वराज्याच्या सुधारणेचा हप्ता दिला! दक्षिण अमेरिकेंतल्या लहान लहान संस्थानांनीं आपली प्रगती आपणच करून आपलें स्वातंत्र्य संपादन केलें कीं त्यांना लायक करण्याच्या शाळा काढून त्याकरतां ब्रिटिशांनीं आपलें सर्वस्व खर्च केलें! दक्षिण अमेरिकेच्या मानेवर जोंपर्यंत स्पेन व पोर्तुगाल या परक्यांचें जूं होतें तोंपर्यंत त्याची कोणत्याही प्रकारें सुधारणा झालेली नव्हती!

आजचा चीन दुःखाच्या गर्तेंत कां बरें खिचपत पडला आहे? त्याला घोर निद्रेंत अफूची गोळी देऊन कोणी बरें निद्रावश केलें आहे? त्यांच्या बंदरावर व अबकारी खात्यावर कोणी बरें धाड घातली आहे? आजचा चीन परक्या अमलाखालीं दडपलेला असल्यामुळेंच हतप्रभ व मलुल झालेला आहे. परक्या सत्तेखालीं असलेल्या कोणत्याही राष्ट्राची स्थिती अशीच होत असते. चीनवर जर परक्या अमलाचें दडपण नसतें तर तें राष्ट्र आज जगाच्या आदर्श राष्ट्रांत स्थानापन्न झालें असतें. परक्यांनीं निर्दयपणें तोडलेल्या लचक्यांनीं चीनमध्यें जागृति होऊन ते खडबडून जागे झाले व त्यांनीं आपली राजकीय उन्नती करून घेण्याकरतां आटोकाट प्रयत्न चालविले आहेत.

आपल्या राष्ट्राचें भयंकर अधःपतन झालें आहे अशी जाणीव पिवळ्या चीनला होतांच त्यानें स्वातंत्र्याच्या चळवळीचा श्रीगणेशा केला. परके लोक आपल्याला स्वातंत्र्याचें–लायकीचें–पात्रतेचें शिक्षण देतील व मग शिक्षणसंपन्न होऊन आपण स्वातंत्र्याची लढत लढूं असें जर त्यांनीं ठरविलें असतें तर मरेपर्यंत त्यांची प्रगती कधीं तरी झाली असती काय? दुसऱ्यांना लायकीचें शिफारसपत्र देऊन राष्ट्राला लायक व्हावयाचें नसतें. मनगटाच्या जोरावर, राष्ट्राभिमानाच्या

दिव्य अभिमानावर सर्वस्वीं भर देऊन प्रत्येक राष्ट्राला आपली उन्नति करून घ्यावयाची असते; इतकेंच नव्हे तर तें तसें करीतही असतें. ज्या ज्या राष्ट्रांची उन्नति झालेली आहे त्या त्या राष्ट्राचे राजकीय प्रकर्षांचे उज्ज्वल इतिहास याची साक्ष देत आहेत.

अर्वाचीन प्रगतीच्या कालांत मुस्कुटदाबी ही फार दिवस टिकत नाहीं. म्हणजे कोणी कोणाला फार दिवस पारतंत्र्याच्या गर्तेत जबरदस्तीनें ठेवूं म्हटलें तर तेही फार दिवस टिकत नाहींत. याचें उदाहरण म्हणजे अमेरिकेंतले अत्यंत मागसलेले, अज्ञानी, मूळचे रहिवाशी जे नीग्रो लोक त्यांनीं देखील गुलामगिरीची शृंखला खाडकन तोडून टाकली; याचें सर्व श्रेय महात्मा बुकरटी वाशिंग्टन यांस होय. याच महात्म्यानें स्वयंसिद्धपणें आपल्या नीग्रो बंधूंची उन्नति केली. ही करण्यापूर्वी त्याला लायकीचें शिफारसपत्र परक्यांकडून मिळवावें लागलें नाहीं ! असो.

हिंदुस्थानला ब्रिटिश सत्ता स्वराज्याच्या लायकीचें शिक्षण देऊन त्याची राजकीय प्रगति करीत आहे किंवा नाहीं, याचा विचार करतां सर्वत्र निराशाच दिसते. तिचें धोरण म्हणजे हिंदुस्थान उत्तम गुलामांचाच देश रहावा असें आहे. स्वराज्याच्या लायकीच्या शिक्षणाचा निरर्थक बोलबाला करून त्याची प्रगति करण्याचें ती नुसतें ढोंग माजवीत आहे. तिची स्वराज्याच्या शिक्षणाची पद्धत म्हणजे पाण्यांत न जातां उत्तम रीतीनें पोहण्यास शिकविण्याची पद्धत होय; किंवा चालतां यावें म्हणून जन्मापासून मरेपर्यंत पांगुळगाड्याचाच आश्रय घेण्याचा अट्टाहास करून एखाद्यानें आपल्या पायावर उभे राहण्याची इच्छा प्रदर्शित करणें होय.

जगांत असें एक तत्त्व आहे कीं, अनुभवाशिवाय ज्ञान नाहीं व अनुभव घेत असतांना मनुष्य हा चुकीला पात्र असतो. चुकीनें माणूस सुधारून तो अनुभवाच्या दृष्टीनें लायक होतो. इंग्लंड जर आज एखाद्या सार्वभौम सत्तेच्या नियंत्रणाखालीं असतें, त्याच्या मानेवर जर दुसऱ्याची सत्ता असती, तर त्याची प्रगति कधीं तरी झाली असती काय ? दुसऱ्याच्या पंजाखालीं असलेल्याची केव्हांही उन्नति होत नाहीं. हाच नियम, हेंच प्रगतीचें सूत्र, सर्व ठिकाणीं, सर्व देशांत, सर्व राष्ट्रांना लागू आहे. जीं जीं राष्ट्रें आज परक्यांच्या पारतंत्र्यांत खिचपत पडलेलीं आहेत त्या त्या राष्ट्रांची प्रगति न होण्याचें कारण वरीलप्रमाणें आहे. या बाबतींत ग्लॅडस्टन साहेबांचें असें म्हणणें होतें कीं, जिंकलेल्या लोकांना जितके जितके दाबांत ठेवावे तितके तितके ते सर्व बाजूंनीं नालायक बनत जातात. यावरून

असें सिद्ध होतें कीं, नालायक बनण्याला परक्यांचा अंमल हाच कारणीभूत होत असतो. "Every year and every month that a subject people are kept under the administration of a despotic Government, renders them less fit for free institution!" हें एका राजकीय पुढाऱ्याचें म्हणणें वरील विधानांना पोषक नाहीं काय ?

एखादी परकी सत्ता दुसऱ्या एखाद्या राष्ट्रावर जास्त दिवस राहिली तर त्या राष्ट्राला स्वातंत्र्याची आठवणही होत नाहीं. इतकेंच नव्हे तर परकीय संस्थांच्या शृंखलेचे पाश त्याच्या भोंवतीं अधिक अधिक घट्ट बसतात. इंग्रजी सत्ता हिंदुस्थानाला स्वराज्याच्या दृष्टीनें लायक करीत आहे असें सांगण्यांत येतें; परंतु इंग्रजांची राजनीति पाहिली तर काय बरें दिसून येतें ? दिवसेंदिवस स्वराज्यापासून हिंदी जनतेची पिछेहाटच चालविलेली दिसते ना ? इतकेंच नव्हे तर स्वराज्याची दिरंगाईच चालविलेली आहे. या दिरंगाईचा परिणाम कसा व कोणत्या तऱ्हेनें हिंदी जनतेला भोगावा लागत आहे याचें चर्वितचर्वण करण्याची व पुनरुक्ति करण्याची आवश्यकता आहे असें आम्हांस वाटत नाहीं.

हिंदी जनतेला स्वराज्यप्रदान करण्यांत इंग्रज जी दिरंगाई दाखवीत आहेत, त्या बाबतींत त्यांचेच जातभाई काय म्हणत आहेत तें पहा. मि. बर्नार्ड हौटन या नांवाचे एक अतिप्रसिद्ध गोरे अधिकारी होऊन गेले. त्यांनीं बरींच वर्षें हिंदुस्थानांत मोठमोठ्या अधिकाराच्या जागा सुशोभित केल्या होत्या. ते म्हणतात कीं, 'हिंदुस्थानची राजकीय प्रगति हळुहळु कां चालविली आहे ? ते तर आजही आपल्या देशाचा राज्यकारभार पाहण्यास योग्य आहेत ! हिंदुस्थान हा देश कांहीं रानटी व अशिक्षितांचा, असंस्कृतांचा मागसलेला देश नाहीं. ज्या वेळीं आम्ही अत्यंत रानटी स्थितींत होतों, त्या वेळीं हिंदुस्थान उत्तुंग शिखरावर होता. त्याची सर्व बाजूंनीं उन्नति झालेली होती. स्वतंत्र राज्यपद्धतीनें हे आपला राज्यकारभार उत्तम प्रकारें पहात असत. खेडेगांवापासून तों तहत देशापर्यंत प्रत्येक ठिकाणीं सुव्यवस्थित राज्यपद्धति अमलांत होती. हिंदुस्थानांत ग्रामपंचायत म्हणून जी लोकसंस्था होती, ती तर स्वतंत्र राज्यकारभाराची मुहूर्तमेढच होती. हिंदूंचें राजनीतिशास्त्र, त्यांच्या राजकीय संस्थांचा इतिहास, त्यांच्या राजकीय पात्रतेची साक्ष पटवून देत आहे. सारांश, हिंदुस्थान हें स्वराज्याला लायक असून त्याला त्यापासून दूर ठेवणें हें इष्ट नाहीं !

स्वराज्याचे हक्क अमुक वेळांत देऊं, तमुक वेळांत देऊं असें नेहमीं हिंदी जनतेला सांगण्यांत येतें. परंतु हिंदुस्थानची आजच स्वराज्याची लायकी आहे. असें असूनदेखील हिंदी जनतेला नालायक ठरवून वारंवार तिची निराशा करण्यांत येते. वस्तुतः आजकालच्या राज्यकारभाराकडे पाहिलें तर असें आढळून येईल कीं प्रत्येक खातें हिंदी लोकच उत्तम प्रकारें चालवीत आहेत. फक्त त्यांच्या डोक्यावर एकएक गोरा सनदी नोकर आहे. समजा ते गोरे लोक बाजूला झाले तर या काळ्या लोकांना सहजच राज्य चालवितां येईल. अशी वस्तुस्थिती असून देखील इंग्रज लोक हिंदुस्थानाला स्वराज्याचें हळुहळु शिक्षणच देत आहेत. सुधारणेचा जो हप्ता दिला गेला तो म्हणजे एक निव्वळ आभास होय. अशा सुधारणेपासून स्वराज्यप्राप्ति केव्हांही होणार नाहीं.

हिंदुस्थानची स्वराज्याची लायकी कशी असावी, याबद्दल राज्यकर्ते असें म्हणत असतात कीं, आमच्यासारखे आचारविचार, रहाणी, संस्कृति, आहारविहार त्यांचे झाले पाहिजेत. पाश्चात्य संस्कृतीचे ते दासानुदास होऊन अंतर्बाह्य ते पाश्चात्य बनले पाहिजेत. ही विचारसरणी जर स्वराज्याच्या लायकीला लावली तर मात्र केव्हांही कोणत्याही स्थितींत हिंदुस्थान स्वराज्याला लायक होणार नाहीं. परक्या संस्कृतीचें अंधानुकरण करून स्वराज्य मिळविणें म्हणजे कायम पारतंत्र्यांत राहाणेंच होय. स्वराज्य अगर स्वातंत्र्य मिळवायचें असतें तें संस्कृतीच्या शिक्षणाकरतां होय. स्वतःची संस्कृति गमावून जर स्वराज्य मिळत असेल तर त्या स्वराज्याची कांहीं एक किंमत नाहीं.

हिंदुस्थानचें इंग्रजीकरण करणें अगर इंग्रजीकरणाची लालसा प्रदर्शित करणें व त्याला निःसार, निर्बल आणि स्वाभिमानशून्य बनविणें हा शुद्ध वेडगळपणा आहे. कोणतेंही राष्ट्र आपलेपणाकरतां, आपल्या धर्माकरतां, आपल्या वैशिष्ट्याकरतांच स्वातंत्र्य संपादन करीत असतें. स्वाभिमान नाहींसा होण्याच्या पंथाला लागतो, संस्कृतीच्या नरडीला नख लावण्यांत येतें, सांपत्तिक स्थिति भयप्रद होते, औद्योगिक अधःपतन होऊन सर्व राष्ट्रभर दारिद्र्याचा नंगा नाच थैमान घालतो, अशा वेळीं त्याच्या संरक्षणाकरतां स्वातंत्र्याची लढत होते. ज्या ज्या राष्ट्रांनीं स्वातंत्र्याची लढत लढून स्वातंत्र्य संपादन केलेलें आहे, त्या त्या राष्ट्रांचा उज्ज्वल इतिहास याच गोष्टीवर प्रकाश पाडीत आहे. स्वाभिमान व राष्ट्रीयभाव विकून जर स्वराज्य मिळत असेल तर असलें स्वराज्य मिळालें काय किंवा न

मिळालें काय त्याची किंमत नाहीं. याला स्वराज्य म्हणणें म्हणजे स्वराज्य या पवित्र शब्दाची विटंबना व थट्टा करणें होय. सत्व गमावून मिळविलेलें अगर मिळालेलें राज्य स्वराज्य होऊंच शकत नाहीं. दुसऱ्यांनीं कोणत्याही राष्ट्राला लायक करून तें राष्ट्र लायक होत नाहीं. राष्ट्र हें स्वतःच तयार होत असतें. असा राजकीय सिद्धान्त आहे. या बाबतींत एक राजनीतिविशारद असें स्पष्ट सांगतो कीं, 'Nations by themselves are made.' परक्याच्या शिक्षणाच्या कारखान्यांत तें तयार होत नसतें. आजपर्यंत कोठेंही असा प्रकार घडलेला नाहीं. हिंदुस्थान सर्वस्वी स्वराज्याला लायक असतांना तें अद्याप लायकच झालेलें नाहीं असें म्हणणें म्हणजे आपल्या मनाचा स्वार्थीपणा व कमकुवतपणा दाखविणें होय. हिंदुस्थानच्या पात्रतेच्या शिक्षणाबद्दल सदरलंड म्हणतात कीं, 'Educating a nation for freedom by outsiders and masters, while at the same time keeping the nation in bondage is a delusion.'

इंग्रजांकडून असा निनाद निघत असतो कीं, हिंदी जनता ही स्वराज्याला अद्याप पात्र झालेली नाहीं. परंतु स्वराज्याला सर्व बाजूंनीं हिंदुस्थान लायक आहे असें वेळोवेळीं निरनिराळ्या आंग्ल लेखकांनींच लिहिलेलें आहे. त्यांतील कांहीं अवतरणें मुद्दाम दिलीं आहेत. बाईचेंही असेंच म्हणणें आहे, तेव्हां तिलाही तिच्याच जातभाईंचें काय मत आहे हें समजलें पाहिजे.

संस्कृतीच्या उज्वलतेसंबंधानें मॅक्स मुल्लर, बर्क, कँट, इमरसन, थोरो वगैरेनीं भारतमातेचा गौरवच केला आहे. इतकेंच नव्हे तर सर्व जगांत भारतीय संस्कृती अत्यंत श्रेष्ठ असल्याचें वरील विद्यावागीशांनीं स्वयंस्फूर्तीनें आपापल्या ग्रंथांतून लिहून ठेवलें आहे. विश्वाच्या प्रभावळींत देखील भारत-मातेचें स्थान अधिक उच्च दर्जाचें असल्याबद्दल मि. हिंडमन यांनीं छातीठोकपणानें जगजाहीर केलेलें आहे. इतकेंच नव्हे तर ते असेंही म्हणतात कीं, हिंदुस्थानचा दर्जा विश्वाच्या प्रभावळींत कमी आहे असें म्हणणें म्हणजे केवळ पक्षांधताच होय. हिंदुस्थानांतील जनता सर्व जातींत कमी दर्जाची आहे काय! असा प्रश्न चर्चेला टाकून एका अमेरिकन लेखकानें असें सिद्ध केलें आहे कीं, हिंदी जनता, हिंदी राष्ट्र, भारत-माता हीं जातीच्या बाबतींत उच्च दर्जाचींच आहे. ह्या प्रश्नाचें उत्तर देतांना हा लेखक पुढीलप्रमाणें आपला अभिप्राय स्पष्टपणें सांगत आहेः—

'There are persons who conceive that to the white belongs, in virtue of inherent superiority, the inalienable right to rule over races of darker color than themselves. But facts are against them. Indians have achieved the highest distinction in the varied spheres of human activity, and by their success have refuted the charge of racial inferiority. Certain of those qualities, which we ( British ) are apt to think, rank highly, may be less in evidence among them than among ourselves: but that is merely to say that they are different from ourselves; but difference may exist alongside of perfect equality.'

बौद्धिक व साहित्यविषयक बाबतींत देखील हिंदी जनता किती श्रेष्ठ आहे याचें विवरण करतांना कलकत्ता विश्वविद्यालयाच्या व्याख्यानांत एकानें असें सांगितलें कीं, जेव्हां इंग्रज लोक थोडेसे रानटी होते त्या वेळीं हिंदी जनता बौद्धिक व साहित्यविषयक बाबतींत अग्रेसर होती. इतर कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्रापेक्षां भारत-माता उच्च दर्जाची होती. बौद्धिक उन्नति हा तर हिंदी जनतेचा विशेष आहे.

बाई असा आरोप करते कीं, हिंदुस्थानचे लोक असत्य बोलणारे आहेत. त्यांना सत्याची चाडच नाहीं. परंतु एक युरोपियन न्यायाधीश या बाबतींत असें म्हणतो कीं, 'I have had before me hundreds of cases in which a man's property, liberty or life has depended upon his telling a lie, and he has refused to tell it.' म्हणजे या न्यायाधिशापुढें असे शेंकडों खटले होते कीं, त्या खटल्यांत जर लोक खोटें बोलले असते तर त्यांचें आयुष्य, त्यांचें स्वातंत्र्य, त्यांची धनदौलत त्यांना सहजच मिळाली असती; परंतु ते लोक खोटें बोलले नाहींत. स्वार्थाकरितां खोटें बोलणें हें हिंदी जनतेचें ब्रीद नाहीं, असाच याचा मथितार्थ नाहीं काय? सत्यापुढें हिंदी जनतेला जीविताची, धनाची, दौलतीची, स्वातंत्र्याची किंमत नाहीं. सत्यप्रियतेच्या बाबतींत कर्नल स्लीमन यांनींही आपला उत्तम अभिप्राय दिलेला

आहे. सत्यतेप्रमाणें प्रामाणिकपणांतही हिंदी जनता श्रेष्ठ आहे असा अलफ्रेड वेब यांनीं आपला अभिप्राय दहाव्या राष्ट्रीय महासभेच्या वेळीं दिलेलाच आहे. नैतिक बाबतींत भारतमातेचें श्रेष्ठत्व इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षां अधिकच आहे हें ईस्ट इंडिया असोसिएशनपुढें भाषण करतांना सर लेपल ग्रिफीथ यांनीं स्पष्ट बजावलेलें आहे. भारतीय नैतिक अवस्थेबद्दल लिहितांना सर साहेब लिहितात कीं, The Hindu creed is monotheistic and of very high ethical value; and when I look back on my life in India and the thousands of good friends I have left there among all classes of the native community, when I remember those honorable, industrious, orderly, law-abiding, sober, manly men, I look over England and wonder whether there is anything in Christianity which can give a higher ethical creed than that which is now professed by the large majority of the people of India; I do not see it in London society, I do not see it in the slums of the East End, I do not see it on the London Stock Exchange.

हिंदी जनता किती विश्वासू आहे यासंबंधानें विल्सन साहेबांनीं असे उद्गार काढलेले आहेत कीं, जगांतल्या कोणत्याही लोकांपेक्षां हिंदी जनता विश्वासाला पात्र आहे. सारांश, सर्व बाजूंनीं सर्व प्रकारानें हिंदुस्थान हें स्वराज्याला योग्य आहे. बाई म्हणते कीं, हिंदुस्थान अद्याप स्वराज्याला लायक नाहीं. सुधारणांचा त्यांना उपयोग करतां येत नाहीं. ही गोष्ट आतां कोणालाही पटेल असें वाटत नाहीं. हिंदुस्थाननें पूर्वीं स्वराज्य, पातशाही उपभोगिलेली असून तें आजही सर्व बाजूंनीं लायकच आहे. बाई व तिचे पूजनीय साम्राज्यवादी यांच्या साम्राज्यशाहीनें पछाडलेल्या मेंदूला ही गोष्ट कशी पटावी! साम्राज्यशाहीनें बेहोष झालेल्या सत्तेला दुसऱ्या कोणाही राष्ट्राची लायकी पटतच नसते. सर्व जगावर आपलें आधिपत्य असावें अशी ज्यांची मनोरचना अशांना इतर राष्ट्रांचें स्वतंत्र अस्तित्वही पटत नाहीं. हिंदी जनतेनें स्वराज्याची लायकी पूर्वीच सिद्ध केलेली आहे व हल्लींची स्वराज्याची चळवळही त्याच उद्देशानें चाललेली आहे. आतां तर राष्ट्रीय

महासभेनें त्याच्याही पुढें पदक्षेप केलेला आहे. गेल्या राष्ट्रीय सभेनें स्वातंत्र्य—संपूर्ण स्वातंत्र्य हें आपलें ध्येय ठेवलेलें आहे. सुधारणेच्या योगानें जबाबदारीच्या जागा, इभ्रत व सत्ता ही हिंदी जनतेच्या हातीं दिली ती कोणत्या प्रकारची आहे याचें विवेचन झालें. आपल्या साम्राज्य लालसेचें ध्येय डोळयांपुढें ठेवून बाईनें सुधारणेच्या कायद्याचें विवेचन केलेलें असल्यानें तिच्या हातून भलतीं सलतीं विधानें झालेलीं आहेत. सुधारणेचा फायदा म्हणजे हिंदी जनतेच्या हातांत दिलेलें एक खेळणें आहे यांत संशयच नाहीं.

या भागांतील शेवटचें प्रकरण '**हिंदुस्थानांतील संस्थानिक**' असें आहे. या देशाची माहिती ज्यांना नाहीं अशा परक्या देशांतील लोकांनीं जर बाईचें भारतमाता हें पुस्तक वाचलें तर या प्रकरणांत दिलेल्या हकिगतीवरून त्यांना असें वाटेल कीं, संस्थानिक व खालसा अंमलांतील लोक हे परस्पर हातांत तरवारी घेऊन एकमेकांना मारण्याकरतां टपून बसले आहेत. अशा प्रकारचें वस्तुस्थितीचा विपर्यास करण्याच्या बुद्धीनें बाईनें जें चित्र रेखाटलें आहे त्यांत तिचा असा उद्देश आहे कीं, संस्थानिक व राजकीय चळवळ करणारे पुढारी यांच्यांत शत्रुत्व आहे. ते परस्परांना पाण्यांत पहातात. अशा स्थितींत जर स्वराज्याचा हक्क देऊन ब्रिटिश लोक बाजूला झाले तर खालसांतील लोक व संस्थानिक यांच्यांत भयंकर मारामाऱ्या होऊन रक्तपात होईल. ब्रिटिश सत्ता बाजूला होतांच संस्थानिक आपआपलीं राज्यें वाढवावयास लागतील. बाईनें दोन्ही पक्षाला नांवें ठेवूनच आपल्या असत्य विधानांची इमारत रचलेली आहे. वस्तुतः बाई म्हणते त्याप्रमाणें हिंदुस्थानांत स्थिती नाहीं.

हिंदुस्थानची राजकीय चळवळ करणाऱ्यांच्या हातांत सत्ता येतांच, ब्रिटिश लोक हिंदुस्थानांत येण्यापूर्वीं जशी अंदाधुंदीची स्थिती होती तशी झाल्यावांचून राहणार नाहीं. कारण, येथील संस्थानिकांच्या हातांत सत्ता आहे अशा वेळीं लष्करी सत्ता जर बाजूला केली तर संस्थानिक आपल्या सत्तेचा दुरुपयोग करून असेंब्ली वगैरेंना व पुढाऱ्यांना काडीचीही किंमत देणार नाहींत, असें धडधडीत खोटें विधान करतांना बाईनें अशी चलाखी केली आहे कीं, जी गोष्ट आमच्या पुढाऱ्यांच्या कधींही स्वप्नांत देखील येणार नाहीं, त्या गोष्टीचें संशयात्मक स्वरुप वाचकांपुढें ठेवण्याचा अश्लाघ्य प्रयत्न केला आहे. ब्रिटिशलोक हिंदुस्थानांतून गेले तर पुढाऱ्यांची हे संस्थानिक अत्यंत वाईट स्थिति करतील.

एका संस्थानिकांनीं बाईला असें सांगितलें कीं, ब्रिटिशलोक जोंपर्यंत येथें आहेत तोंपर्यंत आमचें व सार्वभौम बादशहांचें प्रेमाचें दळणवळण राहून त्यांचा व आमचा प्रेमसंबंध चिरकाल राहील. पण जर हे लोक निघून गेले तर आम्हां संस्थानिकांना हिंदुस्थान कसें शक्तिसंपन्न करावें हें पूर्णपणें माहीत आहे. म्हणजे आम्हांला चळवळयांची मुळींच आवश्यकता नाहीं. आमचा व त्यांचा काडीचाही संबंध राहणार नाहीं, बाईची व एका राजकीय पुढाऱ्याची मेजवानीच्या प्रसंगीं दिल्ली येथें गांठ पडली. या मेजवानीला बहुतेक बंगाली, हिंदू, सुशिक्षित लोक, वकील वगैरे लोक होते. या मेजवानीच्या वेळीं असा एक बूट निघाला कीं, समजा उद्यां जर ब्रिटिश लोक हिंदुस्थान सोडून गेले तर राज्य कोण करणार ? दुसऱ्या एक सुशिक्षितानें उत्तर दिलें कीं, आम्हीच राज्यकारभार पाहूं. बाईनें विचारलें मग तुम्ही संस्थानिकांचें काय कारणार ! उत्तर मिळालें कीं आम्ही त्यांना नाहींसे करून टाकूं ( We shall wipe them out ). हें ऐकतांच सर्वांनीं माना डोलावल्या.

हें चित्र रेखाटण्यांत बाईचा उद्देशच हा कीं, परदेशच्या लोकांना व वाचकांना असें वाटावें कीं ब्रिटिश हिंदुस्थानांतून निघून गेल्यावर हिंदुस्थानची फार भयंकर स्थिती होईल ! या प्रकरणांत एका राजाच्या तोंडीं घातलेलें जें अवतरण आहे त्याचा बाईनें विपर्यास केला आहे. तें अवतरण म्हणजे 'If the English do go three months afterwards, not a rupee or a virgin will be left in all Bengal.' हें एक राजे इ. स. १९२० मध्यें म्हणाले असें बाई म्हणते; परंतु याचा बाईनें जाणून बुजून विपर्यास केला आहे. खरी हकीगत व उद्देश फार निराळाच आहे. ज्या वेळीं लॉर्ड मोर्ले हिंदुस्थानचे सेक्रेटरी होते त्या वेळीं त्यांनीं लिहिलेलें ' जागृत हिंदुस्थान ' या पुस्तकाच्या पंचविसाव्या पानावर एक मनोरंजक हकीगत दिलेली आहे. ती हकीगत अशीः—

गेलें महायुद्ध संपल्यानंतर सर प्रतापसिंह सहज थट्टेनें म्हणाले, 'आतां लढाई संपली, मी वृद्ध झालों, माझ्या आयुष्यांतील ही शेवटचीच लढाई होय. आतां मला उर्वरीत आयुष्य पोलो खेळण्यांत घालावें लागेल.' याचा भलताच अर्थ बाईनें करून आमच्या संस्थानिकांत व खालसांतील लोकांत फूट पाडण्याचा प्रयत्न केलेला आहे. जें अवतरण बाईनें उचलून घेतलेलें आहे तें कोणत्याही संस्थानि-

कांना लागू पडणारें नाहीं. रजपूतांची व क्षत्रियांची अशी पूर्वापार पद्धत असे कीं, लढाईवर निघाल्यानंतर ते परत येईपर्यंत आपल्या घराचें व स्वतःच्या कबिल्याचें संरक्षण करण्याकरतां ते आपल्या स्त्रियांच्या हातीं तरवार देत. असा खरा प्रकार असून कोणता संस्थानिक स्त्रियांच्याबद्दल अशी बेजबाबदार भाषा बोलेल? बाईनें संस्थानिकांच्यावरही मूर्खपणाचे आरोप केलेले आहेत. अशा प्रकारें संस्थानिकांची ओळख परक्या बायकांना करून देण्यांत बाईचा विवक्षित हेतू जागजागीं दिसून येत आहे. अशा प्रकारें बाईनें आपल्या चौथ्या भागाचें लिखाण आटोपलें आहे.

संस्थानिकांच्या मनांत राजकीय पुढाऱ्यांविषयीं तिटकारा उत्पन्न करविण्याचा एक निंद्य प्रयत्नही या प्रकरणांत केलेला आहे. आमच्या कांग्रेसच्या चळवळीकडे पाहतां आमच्या सभेनें संस्थानिकांचा प्रश्न अजिबात गाळलेला आहे. आमच्या पुढाऱ्यांच्या मनांत संस्थानिकांबद्दल अत्यंत आदर आहे हें बाईनें लक्षांत ठेवावें.

# भाग ५ वा.

पांचवा भाग या चोपड्याचा शेवटचा भाग असून त्यांत पुढीलप्रमाणें प्रकरणें आहेत. या भागाला Into the North—उत्तरेकडे असें सर्वसाधारण शीर्षक दिलेलें आहे. Firebrands to straw—आग लावणारे. Sons of the Prophet मुसलमान लोक. The Holy City पवित्र क्षेत्र, बनारस. The World-Menace जगाला तापत्रय. Quacks whom we know. अर्धवट पंडित ! Psychological glimpses through the Economic lens. आर्थिक दृष्ट्या हिंदुस्थानची पाहणी. Conclusion उपसंहार.

या भागांत हिंदु-मुसलमानांच्या झगड्यासंबंधीं बाईनें लिहिलें आहे. ही म्हणते कीं, स्वराज्याचा संदेश मलबारमधील मोपल्यांच्या कानीं गेला. मोपला हे धर्मानें व जातीनें मुसलमान होते. स्वराज्याकरितां या लोकांनीं शस्त्रास्त्रें एकत्र जमविलीं. त्यांना असें वाटत होतें कीं, **स्वराज्य म्हणजे मुसलमानांचेंच राज्य.** या लोकांनीं २० आगष्ट १९२१ रोजीं हिंदूंवर जोराचा हल्ला चढविला. यांचें असें मत होतें कीं, काफिर हिंदूंना मुसलमान केलें म्हणजे मुसलमानी राज्य झालें. स्वराज्याचा इतकाच अर्थ त्यांना माहीत होता. मोपलांनीं हिंदूंचे खून केले, त्यांचा अनन्वित छळ केला. अशा स्थितींत गरीब बिचारे हिंदू मद्रासच्या आसपास भटकूं लागले. व ते आपल्यां भाईबंदांना असें सांगूं लागले कीं, जर स्वराज्य मिळालें तर सर्वांची आमच्यासारखीच अवस्था होईल.

मोपल्यांच्या हल्ल्याचें मोठ्या कळवळ्यानें वर्णन करून हिंदूंच्याबद्दल बाईला पान्हा फुटण्याचें कारण म्हणजे स्वराज्याच्या चळवळीपासून हिंदू-मुसलमानांत कसे दंगे होतात, हें बाईला ध्वनित करावयाचें आहे. या प्रसंगाचें वर्णन एका अमेरिकनानें पुढीलप्रमाणें केलेलें आहे. त्याचें वर्णन जसेंच्या तसेंच देण्यांत बाईनें मखलाशी केली आहे. तें वर्णन पुढीलप्रमाणें आहे.—I saw them in village after village, through the south and east of Madras presidency. They had been circumcised by a peculiarly painful method, and now, in many cases were suffering tortures from blood poisoning. They

were proclaiming their misery and calling on all their gods of curse Swaraj and to keep the British in the hand. सारांश, हिंदूंची अत्यंत वाईट स्थिति झाली असून ते अत्यंत करुण वाणीनें परमेश्वराजवळ अशी प्रार्थना करीत होते कीं, 'हे परमेश्वरा, स्वराज्यापासून आमचें रक्षण कर आणि ब्रिटिशांना आमच्यावर चिरंतन ठेव. जर ब्रिटिश लोक हिंदुस्थान सोडून गेले तर आमची जशी हृदयद्रावक स्थिति झालेली आहे तशी सर्वांची, सर्व आबालवृद्धांची, बायका-पोरांची होईल. आम्हांला तें स्वराज्य मुळींच नको आहे.'

मोपल्यांचें बंड हा हिंदुस्थानच्या कीर्तीला कलंक आहे यांत संशय नाहीं. परंतु त्याचा बादरायणी संबंध बाईनें स्वराज्याच्या चळवळीशीं जोडून स्वराज्याच्या सनदशीर चळवळीचें स्वरूप भडक रंगांत रेखाटून स्वराज्याच्या चळवळीवर जाणूनबुजून वज्रप्रहार केलेला आहे. मलबारांत जें मोपल्यांचें बंड झालें त्याला कारण स्वराज्याची चळवळ नसून आपापसांतील सामाजिक उच्च नीच स्थिति हें होय. बाई म्हणते त्याप्रमाणें वरील फंडाशीं महात्माजींच्या चळवळीचा काडीचाही सबंध येत नाहीं. कारण कीं, या चळवळींत याचा परिणाम शेतकरी वर्ग व मजूर यांच्यावर मलबारकडे मुळींच झालेला नाहीं. मोपल्यांच्या बंडांत मलबारकडील हिंदू धनिक जमीनदार व त्यांच्या हाताखालील मुसलमान—मोपला मजूर—जे शेतकीचें वगैरे काम करणारे होते हेच सामील होते. या जातींतील लोक अत्यंत अडाणी व रानटी असल्यानें वाटेल त्या क्षुल्लक कारणावरून त्यांना राग येतो. त्यांची मनःस्थिति अत्यंत विचित्र अशी असते. भरलेल्या दारूच्या पोत्याला जशी एखादी आगीची ठिणगी लागावी, त्याप्रमाणें त्यांचीं मनें भडकून जाण्यास क्षुल्लक रागाचें अल्पसें कारण पुरें होतें. यामुळें हिंदू धनिक जमीनदार व हे मोपले यांच्या अनेक वेळां चकमकी झाल्या. परंतु हें बंड मात्र कल्पनेच्या बाहेरील होऊन त्यांत मनस्वी प्राणहानी झाली. या सर्वांचा संबंध मिस् मेयोनें महात्मा गांधींच्या चळवळीशीं जोडण्याचा मूर्खपणा केला आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, ज्याप्रमाणें मिस् मेयोला हिंदुस्थानची मुळींच माहिती नाहीं, त्याप्रमाणें त्या मोपल्यांना महात्मा गांधींची व अल्ली बंधूंची भाषा मुळींच समजत नाहीं. महात्मा गांधींच्या सात्विक वृत्तीचा विचार करतां व त्यांच्या अहिंसातत्त्वाकडे लक्ष देतां या अहिंसेच्या प्रणेत्याकडून चिथावणीची भाषा बोलण्यांत येईल हें तर अगदीं अशक्य आहे!

मोपला आणि इतर मुसलमान यांच्यांत फार अंतर आहे. कारण इतर मुसलमान मूर्तीपूजा करीत नाहींत, त्यांना मूर्तीपूजक म्हणवून घेण्यांत अत्यंत कमिपणा वाटतो. परंतु मोपला हे मूर्तीपूजक आहेत. त्यांना मूर्तीपूजा अत्यंत आवडते. वैकम नांवाचें मलबारकडे एक प्रसिद्ध बंदर आहे, त्या ठिकाणीं ' व्यंकटअप्पा' उर्फ वैकमचा पिता ( Father of Vaikam ) याचें पुरातन मोठें मंदीर आहे. त्या देवाला हे मोपले व हिंदू दोघेही भजतात. यांची अशी दृढ समजूत आहे कीं, हा वैकमचा पिता वादळापासून व इतर समुद्रसंकटापासून आपलें रक्षण करतो. बहुतेक मोपल्यांचा धंदा दर्यावर्दीपणाचा आहे. त्यांचा संबंध समुद्राशीं नेहमीं येत असतो. मोपल्यांची वैकमच्या पित्याबद्दल किती व कशी अढळ श्रद्धा आहे याचें एक मजेदार उदाहरण एका लेखकानें दिलेलें आहे. तें म्हणजे एकदां एक वकील त्रिवेंद्रमला दलालीकरतां जात होते. अर्थात् ते जलमार्गानें जात होते. ज्या नावेंत ते बसले होते तिचा नाविक मोपला असल्यानें ती होडी वैकमच्या पित्याच्या मंदिरासमोर येतांच त्या श्रद्धावान मोपल्यानें होडी थांबविली व समुद्रकांठीं असलेल्या बापाला नमस्कार करून संकट निवारण करण्याकरतां त्याची प्रार्थना केली व त्याचा प्रसाद घेऊन वकीलालाही त्यांतील प्रसाद बळजबरीनें दिला. वेळ लागल्याबद्दल वकीलसाहेबांचें मस्तक गरम झालें व ते त्याला म्हणाले, माझा उगीच खोळंबा केला आहेस ! तेव्हां तो मोपला रागानें म्हणाला, वेंकटअप्पाच्या परवानगीशिवाय मी एकदेखील वल्हें मारलें नसतें. कारण आम्हां मोपल्यांची या परमेश्वरावर अढळ श्रद्धा आहे. मोपल्याचें अनतुभूत बंड झालें त्यावेळीं देखील देवळांचें व देवतांचें रक्षण कित्येक मोपल्यांनीं केलेलें होतें. देवतांना व पुजाऱ्यांना त्यांनीं मुळींच त्रास दिला नाहीं. त्यांना अरबी भाषेचा गंधदेखील नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील मुसलमानांप्रमाणें त्यांना कुराणही समजत नाहीं. त्यांचा एक धर्मगुरु असतो त्याला थांगल ( Thangal ) असें म्हणतात. त्याला मात्र थोडें बहुत अरबी येत असतें. हे लोक आपल्या प्रार्थना अगर नमाज मल्याळी भाषेंतच करतात. मल्याळी हीच त्यांची जन्मभाषा आहे. इतर मुसलमानांप्रमाणें यांच्यांत पडद्याची पद्धत मुळींच नाहीं. या लोकांच्या स्त्रिया पडद्यांत रहात नाहींत. मलबारच्या बाहेर असणाऱ्या इतर प्रांतांतील मुसलमानांचा त्यांच्याशीं काडीचाही संबंध येत नाहीं. इतकेंच नव्हे तर त्या अन्यप्रांतीय मुसलमानांची त्यांना मुळींच पर्वा वाटत नाहीं. मलबारांत जी यांची जात आहे तीच त्यांना माहीत. त्यांचे रोटी बेटी व्यवहार

देखील याच लोकांत होतात. जे मुसलमान लोक पूर्वकिनाऱ्यावर फार वर्षांपासून वसाहती करून राहिलेले आहेत त्यांच्यांतील मुलीशीं फक्त यांचा शरीरसंबंध होऊन लग्नं वगैरे होतात.

एखाद्या मोपल्याला जर अन्य देशांत राहून वसाहत करावीशी वाटली तर त्याची पत्नी मलबार सोडून कधींही त्याच्या बरोबर जात नाहीं. इतर मुसलमान स्त्रियांत आणि मोपल्यांच्या स्त्रियांत फार अंतर आहे. त्यांना इतर मुसलमान स्त्रियांप्रमाणें कशाचीही अपेक्षा नसते तर फक्त आपला पती दर्यावर्दीपणा करून सुखानें घरीं आला हें पाहणें म्हणजे त्यांचें वैभवसर्वस्व होय. सारांश, मोपला आणि मुसलमान यांच्यांत बरेंच अंतर आहे. ही गोष्ट वरील विवेचनावरून सिद्ध होत नाहीं काय ?

बाई मोपल्यांच्या बंडाचा बादरायणी संबंध स्वराज्याच्या चळवळीशीं जोडते; परंतु या बंडाला काय कारण झालें हें बाईनें शोधून काढावयास पाहिजे होतें. परंतु जेथें बुद्धिपुरस्सरच वड्याचें तेल वांग्यावर काढण्यांत येत आहे तेथें असा प्रकार व्हायचाच. मोपल्यांचें बंड जें झालें त्याला कारण असें घडलें कीं, जमीनदारांनीं जमिनीचे कर वाढविले व अशाच तऱ्हेचा आणखी त्यांना त्रास दिला. या मोपल्यांपैकीं बरेच लोक मेसापोटेमियाच्या लढाईवर गेलेले होते. त्यांना थोडेंबहुत लढाईचें ज्ञान होतें. त्यांनीं आपल्या मताप्रमाणें ब्रिटिश शिपायांशीं लढण्याचा प्रसंग येईल अशी समजूत करून घेऊन तयारी केली. या लोकांनीं तारा तोडल्या, रेल्वेचे रूळ उखडून टाकले, पोस्टऑफीसें जाळलीं, तेथील अधिकाऱ्यांना हाकलून दिलें व मुसलमान पोलीस शिपायांचीं डोकीं उडविलीं. गोऱ्या मळेवाल्याचा जो प्रथम बळी बंडवाल्या मोपल्यांनीं घेतला तो त्यांच्या गैरसमजूतीनें घेतला गेला. या वस्तुस्थितीचा विपर्यास करून बाई असें विधान करते कीं, याच्या खुनाशीं हिंदू जमीनदारांचाच संबंध होता. मोपल्यांनीं जेव्हां बंड पुकारलें तेव्हां त्या बंडाच्या ज्वाला सर्व मलबारभर पसरल्या. मोपल्यांनीं करूं नयेत असे अगणित व अनन्वित अत्याचार केले होते. या अत्याचारामुळें सर्व मलबारची अत्यंत कठीण अवस्था झाली. मोपले अत्यंत क्रूरतेनें जुलूम जबरदस्ती करूं लागले. या वेळीं महात्मा गांधींच्या अहिंसा तत्वाचे हिंदु जमीनदार पुरस्कर्ते सरकारच्या बाजूला जाऊन त्यांनीं या अन्यायाचा प्रतिकार केला. इतकेंच नव्हे तर सरकारला अशा वेळीं मदतही केली.

मोपल्यांचें बंड चालू असतांना महात्मा गांधी मलबारकडे जावयास निघाले. या बंडाला राजकीय कारण कोणतेंही नसल्यामुळें, व हें बंड आपापसांतील असल्यामुळें सरकारनें महात्माजींना व अली बंधूंना तिकडे जाण्याची मनाई केली हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

बाई पुढें असें विधान करते कीं, हिंदुस्थानांत हिंदुमुसलमानांची जी एकी होती ती वर वर दिसणारी अशी होती. वास्तविक पाहतां ही एकी फारच चांगली होती. केव्हांही कोणत्याही परिस्थितींत अशी एकी झालेली नव्हती. या एकीमुळें सरकारलाही भीती वाटूं लागली. महात्माजींनीं हिंदुमुसलमानांची एकी फारच चांगल्या प्रमाणांत करण्याचा प्रयत्न केला. कित्येक दिवसपर्यंत ह्या दोन प्रचंड जातींची एकी हिंदुस्थानांत दिसत होती. ब्रिटीश लोकांची अशी गर्वोक्ति होती कीं, जर आम्ही हिंदुस्थानांत नसतों तर कडवे मुसलमान व गरीब हिंदू हे हिंदुस्थानासारख्या अफाट देशांत आनंदानें नांदलेच नसते. पण जेव्हां त्यांना ही एकी दिसली, त्या वेळीं लॉर्ड रीडिंगसारख्या महान् मुत्सद्याला देखील आश्चर्य वाटलें ! व ही एकी बरी नाहीं म्हणून बेकी करण्याचे प्रयत्न ब्रिटीश मुत्सद्यांनीं केले व करविले. असल्या प्रकारची भेदनीति ब्रिटीश मुत्सद्दी नेहमींच करीत असतात. त्याप्रमाणें लॉर्ड रीडिंग यांनीं युवराजांना हिंदुस्थानांत येण्याबद्दल विनंति केली. हेतू असा कीं, अशा प्रसंगीं कांहीं तरी नवीनपणा करून या दोन शक्तींत बिघाड पाडावयाचा. ही वेळ म्हणजे असहकारितेचा उदयकाल होय. या वेळीं हिंदुस्थानांत एक प्रकारचें नवचैतन्य खेळत होतें. राजकीय चळवळी धूमधडाक्यानें चालू होत्या. सुधारणेच्या हप्त्यावर तमाम जनतेनें नापसंतीचें शिक्का मोर्तब केलें होतें. अशा उदासीन स्थितींत तमाम भारतवर्ष असतांना मुद्दाम युवराजांना इकडे बोलाविण्यांत आलें. हा एक दोन जातींच्या शक्तीच्या फाटाफूटीचा नोकरशाहीचा डाव होता. परंतु नोकरशाहीनें असें भासविलें कीं, आम्ही स्वराज्याचा हप्ता दिल्यानें हिंदुस्थान आनंदी झालेलें आहे व अशा आनंदांत युवराजाच्या आगमनानें अधिक भर पडणार आहे.

या वेळीं जो सर्व राष्ट्रानें बहिष्कार पुकारला तो युवराजांचा अपमान करण्याकरतां नव्हे; तर बऱ्या लाटांनीं हिंदुस्थानचा उपमर्द केल्यामुळेंच होय. महात्मा गांधींनीं सर्व जनतेला अशी विनंती केली. भावी बादशहाबद्दल आमच्या मनांत सर्वत्र प्रेमच आहे. पण आम्ही जो यांच्या आगमनावर बहिष्कार घालीत आहों

याचें कारण असें कीं, लॉर्ड रीडींग यांनीं हिंदुस्थानचा भयंकर अपमान केलेला आहे.

बाई पुढें असें विधान करते कीं, हिंदु-मुसलमानांत ज्या चकमकी झाल्या त्या लढाई नतरच होत. बाईचें हें विधान चुकीचें आहे. कारण जेव्हां लढाई सुरू झाली त्या वेळीं संस्थानिक व खालसा अमलांतील सर्व प्रजेनें आपलें सर्वस्व लढाई-करतां अर्पण केलेलें होतें. इतकेंच तव्हे तर आमच्या भारतीय शिपायी गड्यांनीं प्रत्येक ठिकाणच्या अघाडीवर उत्तम शौर्य गाजविलें होतें. यासंबंधानें त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंज यांनीं मोठ्या अभिमानानें म्हटलें होतें कीं, ‘ हिंदु-स्थानांतल्या गोरे व काळे लष्करी शिपायांनींच शत्रूचे हल्ले अघाडीवर थोपवून धरले. ’ या अमेरिकन बाईला कांहीं वाटो अगर ती कांहींही म्हणो तिचा आमच्या देशाशीं कांहीं एक संबंध नाहीं. पण ज्यांचा आमच्याशीं संबंध आहे त्यांनीं मात्र याबद्दल आमच्या शिपायी बहाद्दरांची तारीफच केलेली आहे. लढाईचा विसर जरी पडला असला तरी जेव्हां जेव्हां युद्धाच्या गोष्टी निघतात, त्या त्या वेळीं खऱ्या इंग्रजी गृहस्थांच्या अंतःकरणाला निरपेक्ष बुद्धीनें असेंच वाटतें कीं, हिंदु-स्थानच्या लोकांनीं आपलें सर्वस्व अर्पण करून जी युद्धाच्या वेळीं मदत केली तिची विस्मृति केव्हांही होणें शक्य नाहीं. अशी खरी स्थिति असतांना बाई मात्र वरीलप्रमाणें विधान करते. तेव्हां तिच्या या विधानाची असत्यता स्पष्टपणें कळून येत नाहीं काय !

युद्धाच्या वेळीं लोकमान्य टिळकांनीं आपली महत्वाची राजकीय चळवळ बाजूला ठेऊन सेनाभरती करतां अटोकाट प्रयत्न केलेले आहेत. त्यांनीं आपल्या सिंहगर्जनेनें तमाम महाराष्ट्रांतील मराठ्यांना लढाईवर जाण्यास प्रोत्साहन दिलें. महात्मा गांधींनीं सर्व गुजराथभर तीच चळवळ केली. आज ज्या नाभा नरेशांना वनवासांत खिचपत पडावें लागलें आहे त्यांनीं तर लढाई जाहीर होतांच सर्वांच्या अगोदर असा संदेश पाठविला कीं, माझें सर्व सैन्य, पैसा अडका, शस्त्रास्त्रें, घरें दारें, फार काय पण माझें सर्वस्व मी सरकारला या लढाईच्या वेळीं अर्पण केलें आहे. माझा हिंदुस्थानच्या नोकरशाहीशीं कांहीं क्षुल्लक गोष्टींत मतभेद असला तरी बाद-शाहाशीं व त्यांच्या घराण्याशीं माझें प्रेमाचें नातें केव्हांही कायमच आहे. नाभाच्या महाराजांप्रमाणें आमच्या देशांतील झाडून सर्व संस्थानिकांनीं व तमाम प्रजेनें या वेळीं जें कांहीं करण्यासारखें होतें तें सर्व केलें. हिंदुस्थानांतल्या शिपा-

यांनीं आपलें रक्त सांडलें, कांहीं संस्थानिकांनींहि जातीनें हजर राहून युद्धांत प्रत्यक्ष सहाय्य केलें. व युद्धनिधीला कल्पनेच्या बाहेर उदार अंतःकरणानें मदत केली. असा खरा प्रकार असतांना बाई जेव्हां वरीलप्रमाणें विधान करते तेव्हां तिच्या विपर्यस्त विधानांत किती व कशी असत्यता आहे याचें पुनःपुन्हां दिग्दर्शन करावयासच नको.

हिंदु-मुसलमान यांच्या तंट्याचें कारण देतांना बाईनें असें म्हटलें आहे कीं, याला कारण मिंटोमोर्लें सुधारणा होय. म्हणजे याला राजकीय कारणच कारणीभूत झालेलें आहे. हिंदुस्थानांत हिंदु मुसलमानांचे जे क्षुल्लक तंटे होतात ते धार्मिक स्वरूपाचे असतात, त्याचा राजकीय व सामाजिक गोष्टींशीं काडीचाही संबंध नसतो. मिंटो-मोर्लेच्या सुधारणेला जी सुरवात झाली ती इ. स. १९०९ मध्यें होय. या कालाच्या सुधारणेला Indian Council's Act. असें म्हणतात. ज्या वेळीं हा कायदा झाला त्या वेळीं त्याचा परिणाम मुसलमानांच्या मनावर भयंकर झाला. म्हणजे त्यांना यापासून एक प्रकारची भीति उत्पन्न झाली. कारण त्यांना असें वाटूं लागलें कीं, हिंदू हे संख्येनें अधिक असल्यामुळें आपल्या अल्प संख्येचें त्यांच्यापुढें कांहीं चालणार नाहीं. हें मुसलमानाचें मत बाईनेंच दिलेलें आहे. खरें पाहिलें असतां मिंटोमोर्लें यांच्या सुधारणेचा बहुजन समाजाच्या मनावर काडीचाही परिणाम झाला नाहीं. इतकेंच नव्हे तर उलट हिंदू व मुसलमान यांनीं एक दिलानें व एक जुटीनें राज्यकारभारांत अधिक सुधारणा हव्यात म्हणून एकमुखी मागणी मागण्याची चळवळ सुरू केली. या चळवळीचा असा परिणाम झाला कीं, मॉंटेग्यूचेल्म्सफर्ड सुधारणेच्या वेळीं मुस्लीमसभा व कॉंग्रेस यांनीं एक मतानें आपल्याला साम्राज्यांतर्गत पूर्ण स्वराज्य पाहिजे अशी एकमुखी मागणी केली.

मुस्लीम सभेमध्यें राजकीय विचाराचे व सामाजिक विचाराचे लोक होते. मिंटोमोर्लेच्या सुधारणेनें जर मुसलमानांना भीती उत्पन्न झाली असती तर त्यांनीं हिंदूंच्या बरोबर एकमुखानें व एकदिलानें संयुक्त मागणी केलीच नसती. मॉंटफर्ड रिपोर्टांत या मागणीला अत्यंत महत्व दिलें गेलें. परंतु त्याचा कांहीं एक उपयोग न होतां त्यावर भयंकर टीका करून ती फेटाळून लावण्याचा निर्दयपणा करण्यांत आला. बाई पुढें इ. स. १९१९ च्या बद्दल लिहिते कीं, या सालीं जी सुधारणा अमलांत आली त्या सुधारणेनें हिंदी लोकांच्या हातीं पुष्कळ सत्ता, अधिकार व

मानमरातबाच्या वरिष्ठ जागा देण्यांत आल्या. यासंबंधानें राजकीय सुधारणेच्या प्रकरणांत आम्हीं मीमांसा केलेलीच आहे. तिच्या पुनरुक्तीचें येथें कारण नाहीं.

हिंदुमुसलमानांच्या मतभेदाला जर कोठें सुरवात झाली असेल तर ती मॉंट-फर्ड रिफार्म कमीशनपासूनच होय. यावेळीं जातिगत प्रतिनिधित्व (Communal Representation) अस्तित्वांत आलें आणि याच कारणामुळें आपआपसांत वैमनस्य वाढून झगडे होऊं लागले. पूर्वीचे धार्मिक स्वरूपाचे झगडे बाजूला राहून त्याला राजकीय स्वरूप आलें. जातिगत प्रतिनिधित्व जर अस्तित्वांत आलें नसतें तर हिंदुमुसलमानांत मतभेद उत्पन्न झाला नसता व त्याचें रूपांतर हिंदु मुसलमानांच्या दंग्यांत झालें नसतें. हा मतभेद जो झाला, हिंदु मुसलमानांचे ठिकठिकाणीं जे दंगे झाले त्याला नोकरशाहीची भेदनीतीच सर्वस्वीं कारण झालेली आहे. राजकीय कारणामुळें होणारे झगडे मिटविण्याचें काम सरकारचें आहे. परंतु नोकरशाहीला भेदनीतीच्या जोरावरच हिंदुस्थानचा राज्यकारभार करावयाचा आहे.

धार्मिक झगड्यांच्या बाबतींत पाहतां अशा प्रकारचे झगडे हिंदुस्थानांतच होतात अगर झाले आहेत असें नव्हे, तर अशा प्रकारचे झगडे सर्व राष्ट्रांतही झालेले आहेत व होतही आहेत. विसाव्या शतकांत खुद्द इंग्लंडमध्यें देखील असे तंटे बखेडे झाले नव्हते काय? इ. स. १९२६ मध्यें देखील लिव्हरपूलला कॅथोलिक व प्रोटेस्टंट यांच्यांत झगडे झाले होते. इ. स. १९१० मध्यें दक्षिण वेल्सच्या लोकांनीं यहुदी लोकांवर जे हल्ले केले त्याला धार्मिक कारणच होतें ना? बारगोडव गीलफेच येथें अजूनही धार्मिक चकमकी होत आहेतच. सर्व युरोपखंडांत धार्मिक असहिष्णुता उघड्या माथ्यानें वावरतच आहे! सारांश, धार्मिक तंटे हिंदुस्थानांतच आहेत असें नसून ते सर्व ठिकाणीं कमी जास्त प्रमाणांत चालूच आहेत. तेव्हां धार्मिक तंट्याच्या नांवानें हिंदुस्थानवर जळफळण्यांत कांहींच हंशील नाहीं. हल्लीं देखील जे हिंदु–मुसलमानांत तंटेबखेडे होतात ते-देखील धार्मिक स्वरूपाचेच होत. थोड्या राजकीय स्वरूपाच्या तंट्याला वर लिहिल्याप्रमाणेंच कारण असतांना बाई त्याचें खापर हिंदूंच्या डोक्यावर फोडीत आहे. यांत तिचा हिंदु-द्वेष स्पष्टपणानें जगजाहीर होतो आहे.

पंचवीसावें प्रकरण मुसलमान जात अथवा पैगंबरची औलाद 'Sons of the Prophet' असें आहे. हें प्रकरण मुसलमानांविषयीं आहे. बाकीचीं सर्व

प्रकरणें हिंदूंबद्दल असून या एका प्रकरणांत मुसलमानांविषयीं बाईनें लिहिलेलें आहे. त्यांत ती म्हणते कीं, हे पैगंबरांचे लडके ब्रीटिश लोक हिंदुस्थानांतून केव्हां जातात याची वाट पहात बसले आहेत. ब्रीटिश गेले म्हणजे हे लोक सर्व हिंदूंना ठार मारून नामशेष करतील. या लोकांचा मुख्य आधार म्हणजे हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील प्रांत होय. सरहद्दीच्या पलीकडे अफगाणी लोकांच्या रानटी टोळ्या आहेत. हे लोक क्रूर व रानटी असतात. यांच्या जोरावर सरहद्दीपासून खालीं उतरून आपल्या जातभाईंना एकत्र करून आपलें निशाण (crescent) फडकवतील. असें त्यांनीं केलें म्हणजे दक्षिणेंतील मुसलमानांना स्फुरण चढेल व दक्षिणोत्तर मुसलमानांचा हिंदूंवर हल्ला होऊन हिंदूंची कत्तल उडेल. या झगड्यांत अफगाणच्या अमिरांचा पाठिंबा मिळेल व त्याच्या जोरावर मुसलमान वरील गोष्टी करतील असा बाईचा अभिप्राय आहे. (p. 286, Mother India)

खरोखरच जर अशी स्थिति असेल तर बाईंच्या कळवळ्याप्रमाणें हिंदूंनीं ब्रीटिश लोकांवर प्रेम करून व येथील राज्यपद्धतीवर संतुष्टच राहिलें पाहिजे व ' मुसलमान लोकांनाहि त्यांनीं कट्टे शत्रू मानलें पाहिजे. परंतु बाई म्हणते कीं, मुसलमान हे अंतःकरणापासून स्वामीभक्त आहेत. या विधानांच्या पुष्टीकरणार्थ तिनें मुसलमानी संस्थांमधून झालेल्या भाषणांचे उतारे दिलेले आहेत. त्यांना राजकीय सुधारणेची मुळींच जरूर नाहीं. इतकेंच नव्हे तर ब्रीटिश सत्ता हिंदुस्थानांत कायम रहावी असें त्यांचें मत आहे.' बाईच्या असत्य विधानांच्या कारखान्यांत सरहद्दीवरील डोंगराळ प्रदेशांतील पर्शियन कुळांतील इसम आपल्या कानांत गुजगोष्टी सांगण्याकरतां तयार केला. तो तिला भेटला व त्यानें शपथेवर सांगितलें कीं, आमचा सर्व प्रांत सुखांत, आनंदांत व चैनींत आहे. आपणांत कोणत्याही प्रकारचा फेरबद्दल होतां कामा नये. बदललेलें आयुष्य आम्हांस नको.

पुढें हा म्हणतो कीं, आम्ही दक्षिणेकडील लोकांना मनुष्यच समजत नाहीं. जर ब्रीटिश सत्ता गेली तर ताबडतोब हिंदुस्थानची दुर्दशा होईल. बंगाली व त्यांच्या जातीचे लोक नाहींसे होतील. कोणाला ही कल्पित कथा वाटेल परंतु हें तिचें सत्य विधान (!) आहे. ही बाई कल्पनातरंगांत तरंगणारी असावी किंवा असत्य विधानें करण्यांत पटाईत तरी असावी !

सरहद्दीवर राहणारे मुसलमान मुख्यत्वेंकरून टोळीटोळीनें रहातात व त्यांचा धंदा लूटमार करण्याचा असतो. अर्थात् त्यांना इंग्रजी सत्ता मनापासून नकोच

आहे. अशा तऱ्हेचीं एकाच वेळीं एकाच गोष्टीचीं उलट सुलट विधानें करण्यांत बाई भांबावून गेली आहे. वर वर वाचणाराला ही बाई सहजच फसवूं शकेल. बाईनें अशा प्रकारचीं परस्परविरुद्ध अशीं अनेक विधानें करून आपल्या मेंदूचें प्रदर्शन केलेलें आहे. तिचें सर्व पुस्तक पाहतां प्रत्येक ठिकाणीं निरनिराळीं परस्परविरुद्ध विधानें, एकाशीं दुसऱ्याचा संबंध नसलेला असा प्रकार केला आहे.

'पवित्र शहर' असें शीर्षक देऊन श्रीक्षेत्र बनारसचें वर्णन करून बाईनें त्या क्षेत्रांतील घाण उपसण्याचा उद्योग केला आहे. पवित्र क्षेत्राचें अपवित्र वर्णन करून असें भासविलें आहे कीं, 'हिंदू लोक ज्या क्षेत्राला अत्यंत पवित्र मानतात. त्या क्षेत्राची अत्यंत दुर्दशा झालेली आहे. हिंदूंची धर्मश्रद्धा अत्यंत विचित्र आहे. क्षेत्रांत अंदाधुंदी असून आरोग्यदृष्ट्या हीं क्षेत्रें फारच वाईट व गलिच्छ अशीं आहेत. आपल्या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थ बाईनें बनारसच्या सडका, दुकानें, बाजार, गंगा, देवळें व वस्ती यांचें वर्णन करून असें ध्वनित केलें आहे कीं, ज्या क्षेत्रांना हिंदू लोक पवित्र मानतात त्या क्षेत्रांत अपवित्रपणा, अमंगलपणा सर्वत्र दिसत आहे.' क्षेत्रांची जी आरोग्याच्या दृष्टीनें दुर्दशा झालेली आहे ती सरकारच्या आरोग्यखात्याच्या दुर्लक्षामुळें. त्याच्याशीं हिंदूंच्या धार्मिक श्रद्धेचा कांहीं एक संबंध नाहीं. पूर्वीं श्रीक्षेत्र काशी फारच उत्तम क्षेत्र होतें. त्याच क्षेत्रांत ज्या बाजूला गोऱ्या लोकांची वस्ती आहे त्या बाजूचें आरोग्य पाहिलें व जुन्या क्षेत्रांतील वस्तीकडे पाहिलें म्हणजे ही तफावत दिसते. क्षेत्राचें आरोग्य सरकारच्या आरोग्यखात्याला सुधारतां येत नाहीं काय ?

बनारससारख्या पवित्र क्षेत्राचें वर्णन करण्यांत बाईचा दुसरा तिसरा कांहीं एक उद्देश नसून तिला असें दाखवावयाचें आहे कीं, हिंदू लोकांचे आचारविचार, रीतीरिवाज, रहाणी वगैरे गलिच्छ आहे. या बाबतींत प्रथम भागांत बाईच्या असत्य विधानांची पूर्णपणें हजेरी घेतलेलीच आहे.

सत्ताविसावें प्रकरण 'The World Menace' जगाला तापत्रय असें आहे. या प्रकरणांत बाईनें असें लिहिलें आहे कीं, हिंदुस्थान हें सर्व संसर्गजन्य रोगाचें माहेरघर आहे. या रोगाचा संसर्ग अमेरिकेलाही पोहोंचलेला आहे. बाई म्हणते कीं, अंतरराष्ट्रीय आरोग्य खात्यांत काम करणाऱ्या एका अमेरिकननें मला असें सांगितलें कीं,—बाईनें या अमेरिकन गृहस्थाचें नांव दिलेलें नाहीं—

'Whenever India's real conditions become known all the civilized countries of the world will turn to the League of Nations and demand protection against her.' म्हणजे सर्व जगाला जर हिंदुस्थानची खरी स्थिति माहीत झाली तर सर्व देश राष्ट्रसंघाकडे अशी मागणी करतील कीं, आमचें भारतवर्षापासून संरक्षण करा.

संसर्गजन्य रोगाची वाढ हिंदुस्थानपेक्षां युरोपखंडांत फार आहे हें बाईला ठाऊक नाहीं कीं काय? या रोगाचें बीज हिंदुस्थानांत मुळींच नव्हतें. युरोपीयन लोकांनींच आपल्या देशांतील ही आपली आवडती ठेव हिंदुस्थानांत आणली. हा रोग फिरंग रोग म्हणून प्रसिद्ध आहे. आमच्या वैद्यक ग्रंथांत—चरक, सुश्रुत इत्यादि ग्रंथांत या रोगाची मुळींच चर्चा केलेली नाहीं. हा रोग जर पूर्वीपासून आमच्या देशांत असता तर त्याची चर्चा, त्याचें निदान टिपण आमच्या ग्रंथांतून अवश्य असावयास पाहिजे होतें. ज्या अर्थीं तशा रोगांची चर्चा आमच्या ग्रंथांत नाहीं त्या अर्थीं तो रोग आमच्या देशांतील नसून बाहेरचाच आहे. भावप्रकाश नांवाचा जो अगदीं अलीकडील संस्कृत ग्रंथ आहे त्यांत यासंबंधीं विचार आहे. इतकेंच नव्हे तर भावप्रकाशकारांनीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, हा रोग फिरंग्यांपासून व त्यांच्या स्त्रियांपासून हिंदुस्थानांत आलेला आहे. भावप्रकाशांत यासंबंधीं पुढील श्लोक आहे.—

**'गंधरोगः फिरंगोयं जायते देहिनां ध्रुवम् ।**
**फिरंगिणोऽङ्गसंसर्गात्फिरंगिण्याः प्रसंगतः ॥'**

अर्थात् हा गंधरोग फिरंगी मनुष्याच्या संसर्गापासून व त्यांच्या देशांतील स्त्रियांपासून उत्पन्न होतो. या रोगासंबंधानें वैद्यकीय ज्ञानकोशांत स्पष्ट म्हटलें आहे कीं, इ. स. १४९४ मध्यें कोलंबसाच्या नाविकानें प्रथम हा रोग अमेरिकेंत आणला व त्याचा प्रसार संपूर्ण युरोपांत झाला. त्या वेळीं असा काळ होता कीं युरोपांतील लोक जेथें जेथें जात असत तेथें तेथें या रोगाचा फैलाव प्रमाणाच्या बाहेर होत असे. याचें प्रमाण इतकें वाढलें कीं, सिव्हिलिझेशनला, सिफिलीझेशन असें दुसरें व सार्थ नांव देण्यांत आलें. यासंबंधानें हेविलाक एलीस यानें आपल्या ग्रंथांत फारच चांगलें वर्णन केलेलें आहे. ज्या फिरंग्यांनीं हा रोग आणला त्यांच्यापासून हिंदुस्थानचें रक्षण करा अशीच मागणी हिंदुस्थाननें राष्ट्रसंघापाशीं केली

पाहिजे. भारतवर्ष हा सर्व जगाला तापदायक अगर भयंकर नसून युरोप अमेरिका हींच राष्ट्रें भारताला त्रासदायक व तापदायक आहेत.

चरक व सुश्रुत या ग्रंथांत फिरंगरोग, प्लेग, कॉलरा, डेंगू, इन्फ्ल्युएन्झा वगैरे रोगांची मुळींच चिकित्सा केलेली नाहीं. याचें कारण असें कीं, हे रोग आमच्या देशांत केव्हांही नव्हते. यांचें आगमन परदेशवासीयांच्या आगमनामुळेंच झालें आहे. तेव्हां मेयोला अगर तिच्या अमेरिकन आरोग्यखात्यांतील आरोग्यपंडिताला हिंदुस्थानापासून सर्व राष्ट्रांचें संरक्षण करा असें सांगण्याचें अगर विनंती करण्याचें कारणच नाहीं. या रोगाचें बीज अद्यापही युरोपियन राष्ट्रांत किती आहे हें तिकडचे आरोग्यखात्याचे अहवाल पाहतां कळून येणारच आहे. शाळेंतल्या मुलांमुलींपासून तों तहत बुढया बुद्धकापर्यंत या रोगांनीं तिकडच्या लोकांना पछाडलेलें आहे. इतकेच नव्हे तर अनेक वेळां असल्या प्रकारचे रोग झालेले बहाद्दर तिकडे अनेक आहेत. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका हे देश म्हणजे वरील रोगांचीं आगरेंच होत.

बाई हिंदुस्थानांत रोग कां होतात याची मीमांसा करतांना असें सांगते कीं, हिंदूलोकांचा असा समज आहे कीं, रोग जे होतात ते भूताखेतांपासून होतात. हें असत्य विधान करण्याचें कारण असें कीं, हिंदुस्थानांतील लोक भूताखेतांवर विश्वास ठेवतात. भूताखेतांवर विश्वास ठेवणें म्हणजे शुद्ध रानटीपणा होय. पुढारलेले लोक भूताखेतांवर विश्वास ठेवीत नाहींत.

भूताखेतांची लीला युरोप–अमेरिका खंडांत वाढलेली आहे याची बाईला खबर नसावी हें आश्चर्यच होय. हिंदुस्थानांत अगदीं अशिक्षित लोकांत वरील प्रकारचा समज आहे; परंतु तो अगदीं थोड्याशा प्रमाणांत आहे किंबहुना नाहीं म्हटलें तरी चालेल. परंतु युरोप–अमेरिका या देशांसारख्या पुढारलेल्या देशांत देखील हा समज दृढ आहे इतकेंच नव्हे तर याकरतां लंडनमध्यें Society for Psychical Research परान्वेषण-समिति या नांवाची एक संस्था प्रो. वुईल्यम क्रुस यानें स्थापन केलेली आहे. या परिषदेचा भूताखेतांवर व मृतांच्या संभाषणावर पूर्ण विश्वास आहे. आमच्या इकडील सुशिक्षित वर्गाचा असल्या गोष्टींवर मुळींच विश्वास नाहीं. परंतु पाश्चात्य देशांतील लोकांना हें अलीकडेच नव्या प्रकारचें वेड लागलेलें आहे. भारतवर्षांत भूताखेतांवर विश्वास ठेवणाऱ्यांना अशिक्षित व रानटी म्हणतात तर सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांत अशा भूतप्रिय लोकांना बुद्धि-

वान् व संशोधक मानण्यांत येतें ! थिऑसफीकल सोसायटी—जिच्या सदस्यांची संख्या युरोप अमेरिकेंत अधिक आहे अशा—संस्थेचा व तिच्या बऱ्याच सभाःसदांचा भूतप्रेतांवर कल्पनातीत विश्वास आहे.

अर्धवट पंडित 'Quacks whom we know' असें शीर्षक देऊन बाईनें आमच्या वैद्यांची व आर्यवैद्यकाची कुटाळकी करून त्याची मानखंडना केलेली आहे. चरक, सुश्रुत, शार्ङ्गधर, निघंटु वगैरे जे आमचे वैद्यकीय ग्रंथ आहेत त्या ग्रंथांबद्दल पाश्चात्य पंडितांनींही प्रशंसा केलेली आहे. युरोपीयन पंडितांना ज्या वेळीं वैद्यकशास्त्र म्हणजे काय याची माहिती नव्हती, अशा वेळीं पूर्ण शोध करून आमच्या पंडितांनीं वैद्यक शास्त्र तयार केलें आहे. त्यांतील पाठ, औषध योजना, रोगचिकित्सा शास्त्र ह्यांची आंग्ल वैद्यकाशीं तुलना केल्यास आमचेंच आर्य वैद्यक सर्व बाजूंनीं व सर्व दृष्टींनीं श्रेष्ठ ठरल्यावांचून राहणार नाहीं. आंग्ल वैद्यकाचा जन्म आमच्या सुश्रुत व चरक यांच्यापासूनच झालेला आहे, असा मोठमोठ्या वैद्य पंडितांनीं कबूलीजबाब दिलेला आहे.

आर्यवैद्यकाची प्रशंसा करतांना मद्रासचे माजी लाटसाहेब लॉर्ड एमथील म्हणतात कीं, I am not sure whether it is generally known that the science of medicine originated in India, but this is the case, and the science was first exported from India to Arabia and thence to Europe. वैद्यक शास्त्राची उन्नति भारतवर्षांतच प्रथम झाली असून त्याच्यापासून अरबांनीं ती शिकून घेतली. सर डब्लू. हंटर यांनीं तर असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, आर्यवैद्यक हें अगदीं स्वतन्त्र असून तें आर्यांच्या बुद्धिमत्तेचें उत्कृष्ट द्योतकच आहे. इ. स. ९६० मध्यें बगदादच्या खलीफानें आर्यांच्या चरक व सुश्रुत या वैद्यक ग्रंथांवरून आरबी भाषेंत एक ग्रंथ लिहिला. सत्राव्या शतकापर्यंत सर्व युरोपखंडांतील लोक याच अरबी ग्रंथाच्या आधारें वैद्यकी चालवीत असत. यावरून आमच्या वैद्यकाचें प्राचीनत्व व श्रेष्ठत्व सिद्ध होत नाहीं काय ?

अरबांनीं चरक सुश्रुतांचें भाषांतर केल्यावर एका ग्रीक विद्वानानें अरबीवरून लॅटीन भाषेंत त्याचा सुंदर अनुवाद केला. कोलब्रूक नांवाचा एक विद्वान् म्हणतो कीं, अरब लोकांनीं चरक या शब्दाचा सरक, सुश्रुतचा सुस्रद, निदानचा बदान, अष्टांगांचा असंकर असा अपभ्रंश केलेला आहे. आयुर्वेदासंबंधीं बीबर नांवाचा

पाश्चात्य पंडित म्हणतो कीं, शस्त्रविद्येंतदेखील हे लोक फारच प्रवीण होते. आजच्या पाश्चात्त्यांनीं नवा म्हणून शोध लावला आहे तो शोध आर्यांनीं भारत-भूमींत हजारों वर्षांपूर्वी लावलेला होता. इतकेंच नव्हे तर सर्जरींत देखील त्यांची कल्पनातीत प्रगति झालेली होती. 'In surgery too, the Indians seem to have attained a special proficiency, and in this department European surgeon might, perhaps, even at the present day, still learns something from them as indeed they have already borrowed from them the operation of rhinoplasty.' म्हणजे शस्त्रक्रियेंत देखील भारतवासीयांनीं कल्पनेच्या बाहेर यश संपादन केलें होतें. आमच्या युरोपियन पंडितांनीं अद्यापही त्यांच्या या सर्जरीपासून बरेंच शिकावयाचें आहे. इतकी त्यांच्या वैद्यकशास्त्राची व शस्त्रक्रियेची थोरवी आहे.' वरील दोघां विद्वानांप्रमाणेंच मिस मैनींग नांवाच्या विदुषीनें देखील आपलें प्रामाणिक व सत्य मत पुढीलप्रमाणें दिलेलें आहे. 'The surgical instruments of the Hindus were sufficiently sharp indeed as to be capable of dividing a hair longitudinally.' आर्यांची शस्त्रक्रिया करावयाचीं शस्त्रें इतकीं तेजस्वी असतात कीं, केसदेखील त्यानें सहज उभा कापतां येतो. अशा प्रकारें सर्व बाजूनीं आर्यांचें वैद्यक श्रेष्ठतेला पोंहचलेलें होतें.

विन्सेंट स्मिथ लिहितात कीं, युरोप खंडांत दहाव्या शतकांत पहिलें रुग्णालय उघडण्यांत आलें. त्या वेळीं आर्यवैद्यकाचीच औषधें देण्यांत येत होतीं. या वेळीं पाश्चात्य वैद्यकाचा शोध देखील लागला नव्हता. चंद्रगुप्ताच्या काळीं ठिकठिकाणीं आर्यवैद्यकाच्या शाखा असून प्रत्येक रुग्णालयांत आर्यवैद्यकाचाच उपयोग केला जात असे. चिनी प्रवासी फॅहियान यानें आपल्या हिंदुस्थानच्या प्रवासवृत्तांत यासंबंधानें गौरवोद्गार काढलेले आहेत. गरीबांना तर सर्वत्र ठिकाणीं अशीं औषधें फुकट देण्यांत येत असत. अशा प्रकारें आर्यवैद्यकाची श्रेष्ठता असून बाई त्या वैद्यकाला व वैद्यांना अर्धवट पंडीत म्हणते. याचा उद्देश असा कीं, आर्यवैद्यकाची इतर लोक ज्याप्रमाणें निंदा करतात व ॲलोपथीची स्तुति करतात त्यांची पाठ बाईला थोपटावयाची होती. ब्रीटिश सत्तेखालीं आर्यवैद्यकाला राजाश्रय नसल्यामुळें व नवीन पद्धतीचीं पाश्चात्य वैद्यकशिक्षणविद्यालयें स्थापन झाल्यामुळें आमच्या आर्यवैद्यकाची स्थिती अत्यंत खालावलेली आहे.

तरी पण आमचे आयुर्वेदाभिमानी त्याला हर प्रयत्नानें जिवंत ठेवीत आहेत. अखिल भारतवर्षीय वैद्यकसभा गेलीं कांहीं वर्षें याच करतां सारखा प्रयत्न करीत आहे. पाश्चात्य वैद्यांना जें ज्ञान असतें त्याच्यापेक्षां आमच्या वैद्यांना, प्राणाचार्यांना अधिक ज्ञान असतें. डॉक्टरच्या औषधाला कंटाळून निराश झालेला रोगी देशी औषधें घेऊन बरा होतो अशीं अनेक उदाहरणें घडलेलीं आहेत. पाश्चात्यांच्या अंधानुकरणानें अंध झालेल्यांना जरी आयुर्वेदाची श्रेष्ठता कळत नसली तरी आयुर्वेद हा वेदाइतकाच प्राचीन व उपयुक्त आहे हें नाकबूल करून भागणार नाहीं.

शेवटचें प्रकरण आर्थिक दृष्टया हिंदुस्थानची पाहणी व नंतर उपसंहार असें आहे. हिंदुस्थानची आर्थिक पाहणी करतांना बाईनें भलत्याच गोष्टींची चर्चा केलेली आहे. आजकाल हिंदुस्थानची आर्थिक स्थिति कशी काय आहे, हें सर्वांना कळून चुकलेलें आहे. एका काळीं संपन्नावस्थेंत असलेली भारतमाता आज आर्थिक कलहाच्या तीव्र पाशांत अडकलेली आहे. तिची आर्थिक स्थिति असमाधानकारक असून तिचें प्रत्येकीं उत्पन्न जितकें कमी आहे तितकें कोणत्याही राष्ट्राचें नाहीं. जीं दुसरीं राष्ट्रं इतर राष्ट्रांच्या पंजाखालीं आहेत. तींदेखील हिंदुस्थानपेक्षां आर्थिक बाबतींत चांगल्या स्थितींत आहेत. येथें दारिद्र्य आपलें उग्र स्वरूप पसरून नंगा नाच घालीत आहे. आर्थिक पहाणी करण्यासारखी हिंदुस्थानची समाधानकारक आर्थिक स्थितीच नाहीं. येथील अर्धी अधिक प्रजा अन्नाच्या अभावीं मृत्युपंथाला लागत आहे. हिंदुस्थानची पूर्वीं कशी सुस्थिति होती व त्यानंतर कशी स्थिति झाली याचें विवेचन मागील भागांत केलेलेंच आहे. त्यावरून हिंदुस्थान कसा आर्थिक बाबतींत अधःपतित झाला आहे हें समजून येईल. या बिकट आर्थिक परिस्थितीला ब्रिटिश रियासत कारणीभूत असून बाई ती गोष्ट मोठ्या शिताफीनें नाकबूल करीत आहे.

हिंदुस्थानचे उद्योगधंदे बुडाले, कलाकौशल्य धुळीला गेलें, शेतकी उद्योगधंदे मृत्युपंथाला लागले, व्यापार परक्यांच्या हातीं गेला व हिंदुस्थानचे लोक दलाली करून व्यापाराचे दलाल बनले, हिंदुस्थानची उत्पादनशक्ति सर्वस्वी कमी होऊं लागली, यामुळें सांपत्तिक दर्जा अर्थात् कमी झाला. देशाची आर्थिक परिस्थिति बिघडली म्हणजे दारिद्र्याचो बेसुमार वाढ होते. असा प्रकार हिंदुस्थानांत झाल्यामुळें भिकारी वर्ग प्रमाणाच्या बाहेर वाढला. बाई साधू बैराग्यांचे नांवानें हाकाटी

पिटीत आहे; परंतु दिवसेंदिवस ही संख्या वाढीला लागत आहे याचा तिनें विचार केलेलाच नाहीं.

परदेशांत भिकाऱ्यांची सोय लावली जाते, त्यांच्याकरतां एक स्वतंत्र कायदा झालेला आहे. परंतु येथें खुद्द इंग्रजसरकारची अशी स्थिति आहे कीं, तें गरीबांच्याकडे तर राहोच पण मध्यम वर्गाकडे देखील पहात नाहीं. गेल्या दीडशें वर्षांचा इतिहास हीच गोष्ट स्पष्टपणें पटवून देत आहे. ईस्ट इंडिया कंपनीपासून तहत आजपर्यंत हिंदुस्थानवर राज्य करणाऱ्या लोकांची दूषित राज्यपद्धत या भारतमातेच्या दुर्दैवाला कारणीभूत झालेली आहे. एके काळीं सौख्याच्या शिखरावर आरूढ झालेली राजराजेश्वरी आज दुर्दैवाच्या, दारिद्र्याच्या घोर गर्तेत खिचपत पडलेली आहे. सारांश हिंदुस्थान हें हिंदी जनतेचें राष्ट्र, हिंदी लोकांची जन्मभूमी, हें हिंदी जनतेचें निवासस्थान पण तें इंग्रजांचें झालें आहे. पूर्वीची सुवर्णभूमी आज सुवर्णाच्या अभावीं लंकेची पार्वती झालेली आहे. स्वावलंबन जाऊन तिच्या नशिबीं परावलंबनाचा अपशकुनी तिलक लागला आहे.

अशा प्रकारें भारतमातेची असहाय्य, केवीलवाणी स्थिति झालेली असल्यानें राष्ट्रीय भक्तांनीं-तिच्या सुपुत्रांनीं ती स्थिति घालवून तिला स्वातंत्र्य संपादन करून देण्याकरतां स्वराज्याची-स्वातंत्र्याची चळवळ आरंभली. पण ही चळवळ साम्राज्य सत्ताभिलाषी स्वार्थी लोकांना न आवडून ती चळवळ प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें हाणून पाडण्याकरतां त्यांचे निरनिराळे डाव सुरू झाले. अशाच डावांपैकीं '**भारतमाता**' हें पुस्तक होय. **भारतमातेची श्रेष्ठता** सर्व विश्वानें अति प्राचीन काळापासून वाखाणलेली असून देखील साम्राज्यशाहीच्या मदिरेनें धुंद झालेल्यांना ती पटेनाशी होऊन तिची मानखंडना करण्याकरतां, तिचें कनिष्ठत्व सर्व गोऱ्या लोकांना दाखविण्याकरतां बाईकडून भिकार चोपडें लिहविण्यांत आलें. एखाद्या मूर्ख व बेजबाबदार बाईनें जगद्वंद्य परमपूज्य भारतमातेवर कितीही तोंडसुख घेतलें तरी भारतमातेचें श्रेष्ठत्व केव्हांही कमी होणार नाहीं. आमच्या हिंदी जनतेनें आपल्या मातेचें असलेलें श्रेष्ठत्व सर्व जगाला पुन्हां एक वार पटवून देण्याकरतां आरंभलेली स्वातंत्र्याची चळवळ धडाडीनें करून भारतमातेचा जयजयकार केला पाहिजे. पारतंत्र्यांत पडलेली विश्वजननी सोडवून तिला स्वातंत्र्याच्या उज्वल सिंहासनावर बसविल्याशिवाय राष्ट्रानें स्वस्थ बसतां कामा नये. योग्य त्या उपायानें हिंदुस्थाननें स्वातंत्र्य मिळवून मेयोसारख्या बेज-

बाबदार अमेरिकन पोरीच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातलें पाहिजे. हिंदी जनता खडबडून जागी झालेली आहे, तिनें एक मुखानें स्वातंत्र्याची मागणी केलेलीच आहे. आतां फक्त धडाडीनें कार्य करून स्वातंत्र्य संपादन केलें पाहिजे. आम्हांला अशी खात्री वाटते, आमची अशी निश्चिती आहे कीं आमचे राष्ट्रबंधू व राष्ट्रभगिनी स्वातंत्र्य संपादन केल्याशिवाय राहणार नाहींत. साम्राज्यशाहीच्या सत्ताभिलाषाला झणझणीत उत्तर द्यावयाचें असेल, तर प्रत्येक हिंद पुत्रानें व हिंद भगिनीनें ' मी माझा देश स्वतंत्र करीन ' अशी दृढ प्रतिज्ञा करून राष्ट्रसेवेच्या उज्वल क्षेत्रांत पदक्षेप केला पाहिजे. मतभेद बाजूला ठेऊन हातांत हात घालून राष्ट्राभिमानानें प्रेरित होऊन कार्यप्रवृत्त झाल्यास स्वातंत्र्य मिळावयास क्षणाचाही विलंब लागणार नाहीं. भारतमातेचे डोळे तिच्या लेंकरांकडे लागले आहेत. हिंदी बंधूहो आपण तिची निराशा करणार काय ? छे, छे ! असें कधींही होणार नाहीं. तिची परदास्यांतून मुक्तता केल्याशिवाय कोणताही हिंद पुत्र अगर हिंद कन्यका स्वस्थ बसणार नाहीं. स्वातंत्र्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो आम्ही मिळवणारच ! भारतमातेचें श्रेष्ठत्व पुन्हां एकवार अखिल विश्वाला पटवून देणें हेंच आजच्या उदयोन्मुख भारतवर्षाचें परमपवित्र कर्तव्य आहे आणि तें कर्तव्य उत्साहानें, जोमानें, धडाडीनें, निःस्वार्थ बुद्धीनें बजवावयास अखिल भारतवर्ष तयार आहे. भारतमातेचा आशीर्वाद या कामीं सर्वांना यशप्राप्ती करून देईल.

**वंदे मातरम्.**

# आजकालची अमेरिका.

मिस् मेयोनें भारतमातेसंबंधीं आपल्या भिकार चोपड्यांत हिंदुस्थानाबाबत केलेल्या असत्य व खोडसाळ विधानांचें खंडन गेल्या पांच भागांत केलेलेंच आहे. आतां या स्वतंत्र प्रकरणांत खुद्द बाईच्या मातृभूमींत काय काय प्रकार चालतात, तेथील स्त्रियांचें नैतिक अधःपतन कसें झालें आहे व होत आहे, तिकडच्या लग्नसंस्थांचें कसें दिवाळें निघून त्यांतील पावित्र्य नष्ट होण्याच्या मार्गाला लागलेलें आहे, स्त्रीपुरुषांचे कसे अनन्वित अत्याचार चालू आहेत, यांचें संक्षिप्त विवेचन सर्व साधारण वाचकांकरतां देत आहोंत. त्यावरून **भारतमाते**पेक्षां **आजकालची अमेरिका किती कनिष्ठ** आहे हें समजून येईल.

## अमेरिकेंतील वेश्याव्यवसाय.

अमेरिकेची रहिवाशी सुप्रसिद्ध ' मदर इंडिया ' या पुस्तकाची लेखिका मिस मेयो हिनें आपल्या पुस्तकांत हिंदूंच्या अनीतीसंबंधानें जागोजागीं निंद्य व खोटी टवाळी केली आहे. अशा स्थितींत खुद्द तिच्याच जन्मभूमींत चाललेल्या अनीतीच्या हैदोसाकडे लक्ष जाणें साहजिकच आहे. अमेरिका हें सर्व जगांत सुधारलेलें पहिल्या प्रतीचें राष्ट्र आहे. तेव्हां अशा देशांत नीतिसंबंधीं विशेषच कडक नियम असतील असें आमच्यासारख्यांना तरी वाटणें साहजिकच होय. पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, सुधारणेंत अग्रभागीं मिरवणाऱ्या अमेरिका देशांत हिंदुस्थानसारख्या मागसलेल्या देशापेक्षां कितीतरी पटीनें अनीति धुमाकूळ घालीत आहे असें आढळून आल्याखेरीज राहणार नाहीं. याचीं अनेक उदाहरणें देतां येतील. तूर्त अमेरिकेंतील वेश्यागृहें व कुंटणखाने यांसंबंधीं थोडक्यांत माहिती देण्याचें योजलें आहे. खालीं दिलेली माहिती ही सन १९१२ सालच्या स्थितीची दर्शक असली तरी आजही या स्थितींत फारसा फरक पडलेला नाहीं.

ज्या घराचे मांडणींत एक मोठा दिवाणखाना व सभोंवार बारक्या बारक्या खोल्या असतात, अशीं घरें वेश्याव्यवसायासाठीं घेतलीं जातात. अशाच घरांना ' कुंटणखाने ' असेंहि म्हणण्याची पद्धत आहे. हे कुंटणखाने वरच्या मजल्यावर असतात व खालच्या म्हणजे तळमजल्यांत कायदेशीर समजला जाणारा कोणता

तरी धंदा चालत असतो. असे कुंटणखाने पुष्कळ असतात व या कुंटणखान्यांत जाणाऱ्या गिऱ्हाइकांच्या सोईसाठीं त्या ठिकाणचे दरही ठरवून ठेवलेले असतात. एखाद्या कुंटणखान्याचा दर पन्नास सेंट असतो, एखाद्याचा एक डॉलर असतो तर एखाद्याचा पांच तर एखाद्याचा दहा असतो. कुंटणखान्यांत जाणारे लोक आपापल्या दर्जाच्या कुंटणखान्यांत जातात. म्हणजे ज्याला अधिक पैसा खर्च करण्याची ऐपत नसते, तो ज्या ठिकाणीं थोडेच पैसे पडतात त्या कुंटणखान्यांत जातो व ज्याला पैशाची तूट नसते अथवा किंमत नसते, तो दहा डॉलर किंवा त्याहूनही अधिक पैसे ज्या ठिकाणीं द्यावे लागतात, अशा कुंटणखान्याला आश्रय देतो. ज्या कुंटणखान्यांत जाण्याचा दर अतिशय कमी असतो तो कुंटणखाना गलिच्छ व घाणेरड्या हवेंत असल्यानें मनुष्यास त्या ठिकाणीं रहाणें अपायकारक असतें. अशा गरीब कुंटणखान्यांतील खोल्या गलिच्छ असतात. त्यांत ठिकठिकाणीं कचरा पडलेला, वरून माती गळत असलेली व खिडक्या फार बारीक असतात. जास्त दराच्या कुंटणखान्यांतील व्यवस्था बरी असते. कुंटणखान्याचा मालक नेहमीं एकटाच असतो असें नाहीं. भागीनेंही चालविलेले आढळून येतात. असा अनीतिमय व्यापार करावयाचा ठरविला म्हणजे अगोदर सोयीस्कर असें घर पहाणें हें त्यांचें पहिलें काम असतें. घर मिळाल्यानंतर वेश्याव्यवसाय अथवा कुंटणखाना चालविण्यासाठीं त्या व्यापारांत तरबेज असलेली बाई पैदा करावी लागते. या बाईला ठराविक पगार किंवा उत्पन्नांतील कांहीं टक्के देण्याचें मालक कबूल करतात. अशा बायका पूर्वीच्या वेश्याकुलांतीलच असतात. अशा मुख्य बाईच्या कर्तबगारीवरच कुंटणखाना फायद्यांत चालणें ही गोष्ट अवलंबून असते. ही बाई रात्रीं किती पैसे मिळाले याचा हिशोब मालकांना दुसऱ्या दिवशीं सकाळीं देते.

या मुख्य बाईच्या मदतीसाठीं अनेक नोकर चाकर असतात. कुंटणखान्यांत रहाणाऱ्या मुलींची संख्या जितकी अधिक असेल तितकी नोकर लोकांचीही संख्या अधिक असते. कुंटणखाना फायद्यांत चालणें हें या बाईच्या कर्तबगारीवर जितकें अवलंबून आहे, तितकेंच सदर कुंटणखान्यांत असलेल्या मुलींच्या सौंदर्यावरही अवलंबून असतें. ह्या मुली तरुण व देखण्या असतात. मुख्य बाई जर हुशार व माहितगार असली तर अशा देखण्या मुली ती मिळविते. कुंटणखान्यासाठीं मिळवावयाच्या मुली जशा तरुण व आकर्षक असल्या पाहिजेत तशा त्या बोलण्यांत गोड व मोहिनी पाडण्यांत पटाईत असाव्या लागतात.

कुंटणखान्यांतील तरुण स्त्रियांत 'स्टार्स' अशा नांवानें संबोधल्या जाणाऱ्या कांहीं तरुणी असतात. ह्या स्टार्स नेहमींच कुंटणखान्यांत राहतात असें नव्हे,

तर इतर धंद्यांत जसे कॅन्व्हासर्स इकडे तिकडे हिंडून गिऱ्हाईक जमवतात, त्याप्रमाणें ह्या स्टार्स बाहेर हिंडून आपल्यासाठीं गिऱ्हाईक जमवितांना अनेक वेळां उघडकीस आलें आहे. ह्या तरुणीच्या मागें अनेक पुरुष लागलेले असतात व त्या स्त्रिया ज्या कुंटणखान्यांत नोकरी करतात, त्या कुंटणखान्यांत तिच्या प्रेमांतले हे उल्लू जावयास चुकत नाहींत. याचा अर्थ असा कीं 'स्टार्स' समजल्या जाणाऱ्या स्त्रियांची गिऱ्हाईकी ठरलेली असते. कोणत्या मुलीनें एका रात्रींत किती पैसे मिळविले, याचा हिशोब फार चोख ठेवण्यांत येतो. कुंटणखान्यांत असणाऱ्या प्रत्येक मुलीला तिच्या नांवाचें एक कार्ड देण्यांत येतें. तिनें गिऱ्हाईक पटविलें कीं ती मुलगी मुख्य बाईजवळ कार्ड देते व ती त्या कार्डावर पंचानें एक भोंक पाडून तें कार्ड मुलीला ताबडतोब परत देते. मुलगी एका रात्रींत जितकीं गिऱ्हाइकें मिळवील तितकीं भोकें त्या कार्डावर असतात व शेवटीं तीं भोकें मोजून मुलीचा हिशेब चुकविण्यांत येतो. एक मुलगी एका दिवसांत जास्तींत जास्त तीस गिऱ्हाईकें मिळविते. एका मुलीचा एकेका दिवसांत तीस पुरुषांशीं शरीरसंबंध झाल्यास ती मुलगी लवकर निरुपयोगी होण्याचा संभव असतो. यासाठीं मुलीच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्यांत येतें. कुंटणखान्यांतील मुलगी रोगी आहे किंवा काय, याबद्दल तिच्याजवळ जाणारें गिऱ्हाईक चौकशी केल्याखेरीज रहात नाहीं. अनेक पुरुषांशीं व्यवहार केल्यानें स्त्रियांना रोग जडतात व ते संसर्गजन्य असल्यानें एकाचा दुसऱ्याला व दुसऱ्याचा तिसऱ्याला अशा रीतीनें त्याचा फैलाव होण्यास वेळ लागत नाहीं. यासाठीं प्रत्येक गिऱ्हाईक जिच्याकडे जावयाचें ती तरुणी रोगरहित आहे किंवा नाहीं हें अगोदर जाणून घेण्याची फार दक्षता बाळगितें. गिऱ्हाईकाच्या खात्रीसाठीं कुंटणखान्यांतील प्रत्येक स्त्रीजवळ निरोगी असल्याबद्दल डॉक्टरचें सर्टिफिकेट असतें. आपण निरोगी असल्याबद्दल डॉक्टरचा दाखला घेण्यास जो खर्च येतो तो कुंटणखान्यांतील मुलीलाच देणें भाग पडतें. कारण ती जर कुंटणखान्यांत रहावयास नालायक झाली तर तिला हांकलून देण्यांत येतें.

पण निरोगी असल्याबद्दलचें डॉक्टरचें सर्टिफिकेट मिळविण्यांतही प्रामाणिकपणा असतोच असें नाहीं. डॉक्टर घाईघाईनें येतो व जातो. कोठून तरी समक्ष तपासून सर्टिफिकेट दिलें असा शेरा मारण्याइतकी त्यांची धांदल असते.

मुलीकडून मिळणाऱ्या डॉक्टरांच्या फीतही या मुख्य बाईचें कमिशन असतें, ही एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. प्रत्येक तपासणीबद्दल डॉक्टरला एक

डॉलर फी देण्यांत येते. या डॉक्टरांचा एक स्पेशल वर्गच तिकडे आहे असें म्हटलें तरी चालेल. त्यांची प्रॅक्टिस फार असते. या डॉक्टर्सपैकीं कांहीं तर प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें वेश्याव्यवसायच करीत असतात. या डॉक्टर वर्गांपैकीं बरेच डॉक्टर स्थानिक चळवळींत प्रामुख्यानें भाग घेतात, व त्यांपैकीं ज्यांचा जास्त लौकिक असतो, त्यांची प्रॅक्टिस जास्त असते. कारण ते स्थानिक चळवळींत भाग घेत असल्यानें कुंटणखान्याच्या मालकांवर वेळीं अवेळीं येणाऱ्या आपदा नाहींशा होण्यास त्यांची बरीच मदत झाल्याखेरीज रहात नाहीं.

अशा डॉक्टरांच्या सहीचीं सर्टिफिकिटें कुचकामाचीं असतात. केवळ येणाऱ्या गिऱ्हाइकांच्या समाधानासाठींच हीं सर्टिफिकिटें दिलेलीं व मिळविलेलीं असतात. याचा अर्थ असा कीं, कुंटणखान्यांतली मुलगी रोगी असली तरी निरोगी असल्याबद्दल तिला दाखला देण्यास हे डॉक्टर लोक मुळींच कमी करीत नाहींत. साधारणपणें कुंटगखान्यांतील मुलींपैकीं शेंकडा नव्याण्णव रोगानें गांजलेल्या असतात. मुलगी अगदींच कामांतून गेली, तिच्याकडून धंदा होणें शक्य नाहीं असें अनुभवाला आलें, कीं कुंटणखान्याचे मालक त्या मुलीला क्षणाचाही विलंब न लावतां हांकलून देतात.

कुंटणखाना उत्तम प्रकारें चालणें हें मुख्य बाईच्या कर्तबगारीवर अवलंबून असतें हें वर सांगितलेंच आहे. गिऱ्हाईक मिळविणें हें तिचें मुख्य काम असतें. ही मुख्य बाई वेश्याव्यवसायांत अनेक वर्षें मुरलेली असल्यानें तिच्या अनेक पुरुषांशीं ओळखी असतात. तिच्याजवळ कुंटणखान्यांत येणाऱ्या लोकांच्या पत्रांचें टांचण असतें. कुंटणखान्यांत एकादी नवी व खुबसुरत मुलगी आली म्हणजे ही बया आपल्या परिचितांना पोस्ट कार्डनें कळविते व प्रत्येक दिवशीं नव्या तरुणीच्या पाठीमागें लागणारे बाहेरख्याली लोक बाईचें पत्र गेल्यावर सवडीप्रमाणें एकादे दिवशीं कुंटणखान्यास आश्रय देऊन जातात. या बाईजवळ ज्या लोकांचे पत्ते असतात त्या लोकांत कारकून, खलाशी व व्यापारी यांचा बराच भरणा असतो.

गिऱ्हाईकी मिळविण्यास कुंटणखान्याचे मालक निरनिराळे देशचे लोक मुद्दाम ठेवतात. ज्या गल्लींत कुंटणखाना असेल त्याच्या दोन्ही टोकाला हे नोकर असतात. गिऱ्हाईक येत आहे असें पहातांच कुंटणखान्याच्या समोरच फिरत असलेल्या आपल्या साथीदारांना अगोदर ते वर्दी देतात. त्यांना वर्दी पोंचली कीं, गिऱ्हाईकाचे जवळ जाऊन बोलत बोलत ते आपल्या कुंटणखान्याजवळ येतात. कुंट-

णखान्याजवळ गिऱ्हाईक आलें कीं त्यांना आकर्षित करण्याची व गोड बोलून आंत आणण्याची कामगिरी कुंटणखान्याच्या दारावर असलेल्या मुलीची असते. गिऱ्हाईक आंत आल्यावर पुढल्या सर्व गोष्टी अथवा बोलाचाली करण्याचें काम मुलींकडे असतें. ह्या पगारी नोकराचें दुसरें काम म्हणजे बाहेरख्यालीसाठीं भटकणाऱ्या उल्लूंना आपल्याच मालकांच्या कुंटणखान्यांत आणून सोडण्याचें असतें. आपलें गिऱ्हाईक दुसऱ्या कुंटणखान्यांत जाणार नाहीं इकडे या लोकांचें फार बारीक लक्ष असतें.

शिवाय असेंही असतें कीं, हे पगारी लोक हेअर कटिंग सलून, नाटकगृहें, सर्कशीच्या जागा, सार्वजनिक बागा इत्यादि ठिकाणीं आपल्या मालाची म्हणजे कुंटणखान्यांतील मुलींची प्रसिद्धी करीत असतात. कोणती मुलगी किती तरुण आहे व कशी दिसते, याचीं वर्णनें ऐकलीं म्हणजे उल्लू लोक रात्रीं येण्याचें ठरवून त्यांच्या मार्फत काम करून बाहेर पडतात. गिरण्या व कारखाने यांतील मजूरवर्ग कामावरून सुटण्याचे वेळीं हे कुंटणखान्याचे नोकर दारावर उभे राहून गिऱ्हाइकें मिळविण्यासाठीं शक्य तितकी मेहनत घेण्यांत आंगचोरपणा केव्हांच करीत नाहींत. त्यांच्या या कामगिरीबद्दल त्यांना आठवड्यास बारा डॉलर्सपर्यंत वेतन मिळतें. शिवाय बक्षिस म्हणून होणारी किफायत वेगळी. कुंटणखान्यांतील ह्या नोकरवर्गांत सर्व दुर्गुण भरलेले असतात. ह्या कुंटणखान्यांतील नोकरवर्गांत जास्तींत जास्त गिऱ्हाइकी मिळविण्याची चढाओढ चालते. एका दिवसांत एक मनुष्य साठ पांसष्ट गिऱ्हाइकें मिळवूं शकतो. कुंटणखान्याला गिऱ्हाइकी मिळवून देण्यास मोटार ड्रायव्हर्स यांचीहि चांगली मदत होते.

या कुंटणखान्यांत जाणाऱ्या गिऱ्हाइकांची संख्याही अतिशय असते. कुंटणखान्याच्या दिवाणखान्याच्या दारापुढें एक लांकडी बांक असतें. त्या बांकावर इतकी गर्दी असते कीं, जागेच्या अभावीं पाळी येण्याची वाट पहात बऱ्याच गिऱ्हाइकांना उभें रहावें लागतें आणि यात्रेंत देवदर्शनाला ज्याप्रमाणें एकेकट्याला सोडण्याचा प्रसंग येतो, त्याप्रमाणें एक बाहेर आला कीं, नंबरवारीनें इतरांना जाऊं देतात. हे कुंटणखाने अथवा वेश्यागृहें अतिशय घाणेरडीं असतात व त्यांचा दरही फार कमी असतो; पण कांहीं धनिकांच्या सोईसाठीं एका वेळेस पंचवीस किंवा त्याहूनही अधिक पैसे ज्यांना द्यावे लागतात अशाही कांहीं वेश्या आहेत. या दराच्या मुलींचें आरोग्य चांगलें असतें व

 व्यवहार करण्यांत तरुणांना धास्तीही बाळगावी लागत नाहीं. या वेश्या

तरुण तर असतातच, पण त्यांच्या आंगीं नाजुकपणाही बराच असतो. त्यांच्या निजावयाच्या खोल्या व बसावयाचे दिवाणखाने उत्तम शृंगारलेले असतात व त्यांचे पोषाख स्वच्छ नीटनेटके असून आंगावर मौल्यवान दागिने असतात. या कुंटणखान्यांतून दारू मिळण्याचीही सोय केलेली असते.

अनीतीचा व्यापार जसा वेश्यागृहें व कुंटणखाने यांमध्यें चालतो, त्याप्रमाणें त्यांच्या जवळच्या वस्तींतही त्याचा बराच प्रसार झालेला असतो. एका घरांत दोन तीन कुटुंबें एकत्र रहातात; फक्त त्यांचें जेवण वेगवेगळें होतें. बाकी बसावयाचे दिवाणखाने, संडास, गॅलऱ्या इत्यादि सार्वत्रिक असतात. त्यांचें निजणें बसणें एकाच खोलींत असतें. या खोल्यांत बहिण भाऊ, बापलेक एकमेकांजवळ निजतात. पाहुणे मंडळी अथवा नात्यागोत्याचे सोयरे धायरे यांच्या देखत नागडें उघडें निजण्यांत आणि स्त्रीपुरुषांनीं एकमेकांकडे मिस्किलपणें पहाण्यांत त्यांच्या मनाला मुळींच लाज वाटत नाहीं. या ठिकाणीं व्यवहार करण्याचे दर वेश्यागृह अथवा कुंटणखाने यांच्या इतकेच असतात. कुंटणखान्यापेक्षां अशा ठिकाणीं दारूचा अधिक खप होतो. या कुटुंबवत्सल वेश्यागृहांत वेळप्रसंगीं कामापुरत्या बाहेरच्या म्हणजे कुटुंबांतून रहाणाऱ्या मुलींना आयत्या वेळीं टेलिफोननें बोलविण्यांत येतें व तिचें आणि गिऱ्हाईकाचें काम आटपल्यावर मुलगी खिशांत पैसे घालून आपल्या घरीं परत जाते.

तात्पर्य असें कीं, अमेरिकेसारख्या पहिल्या प्रतीच्या सुधारलेल्या राष्ट्रांत चाललेला वेश्याव्यवसाय हिंदुस्थानांत चाललेल्या वेश्याव्यवसायापेक्षां अधिक घातुक व तेजीचा आहे हें वरील गोष्टीवरून सिद्ध होईल. किंबहुना हिंदुस्थानापेक्षां अमेरिकाच या बाबतींत अधिक पापी ठरते असेंही म्हणावयास हरकत नाहीं व ही गोष्ट वेळ आल्यास यांपेक्षांही सविस्तर व साधार सिद्ध होण्यासारखी आहे. वेश्याव्यवसायांत पडलेल्या हिंदुस्थानांतील बायका अशिक्षित व कलाहीन असतात. त्यांना नीति अनीतीचें फारसें महत्व वाटत नाहीं. शिवाय कुलाच्या दृष्टीनें पाहिलें तर त्या थोर कुलांतल्या नसतात. त्यांचे आईबाप त्यांच्याप्रमाणें अल्लड व अशिक्षित असतात. शिवाय वेश्याव्यवसायांत पडणाऱ्या मुलीचें प्रमाण हजारामागें एकही असेल असें वाटत नाहीं. पण अमेरिकेंत पाहिलें तर अशिक्षित वेश्यांची संख्या अत्यल्प असते. शिवाय त्यांचा केवळ वेश्याव्यवसायच असतो असें नाहीं, तर त्या दुकानांत किंवा अन्यत्र नोकरीही करतात. कांहीं नर्स अस-

तात, कांहीं घरगुती कामें करणाऱ्या असतात; इतकेंच नव्हे तर नाट्यकला, नृत्यकला, गायनकला इत्यादि गुण अंगीं असून केवळ कामवासनेसाठीं त्या वेश्या बनतात. त्यांचे आईबाप सुशिक्षित असून त्यांपैकीं कांहीं डॉक्टर, वकील, श्रीमंत व्यापारी, शेटसावकारही असल्याचें दिसून येतें.

वेश्याव्यवसायांत खालच्या वर्गाच्याच स्त्रिया पडतात असें नसून मोठमोठ्या कुलशीलाच्याही स्त्रिया पडतात. यासंबंधानें निरनिराळ्या तपासनिसांनीं बहुत परिश्रमानें माहिती गोळा केलेली आहे. सर्व जगापेक्षां मेयोच्या मातृभूमींत वरील प्रकारचा अनीतीचा व्यापार कल्पनेच्या बाहेर वाढलेला आहे, हें पुढील कोष्टकावरून सहजच कळून येईल. इ० स० १९०० सालीं या धंद्यांत पुढील प्रमाणें निरनिराळ्या व्यवसायांतील तरुणी होत्या.

| | |
|---|---|
| ( १ ) हॉटेलमधील परिचारिका. | ९४७८९ |
| ( २ ) कारखान्यांतील उमेदवारिणी. | ३६४५८ |
| ( ३ ) शिंप्याच्या दुकानांत काम करणाऱ्या. | ३४३०६ |
| ( ४ ) दुकानांतून माल विकणाऱ्या. | २०५७८ |
| ( ५ ) परटाच्या दुकानांतील मोलकरणी. | १५०८५ |
| ( ६ ) घर कामें करणाऱ्या. | १५८४५ |

अशा व आणखी इतर मिळून एकंदर ३२९४८९ स्त्रिया या धंद्यांत खिचपत पडलेल्या होत्या. या स्त्रिया निरनिराळ्या ठिकाणीं नोकरी करून शिवाय वरील धंदा करून पैसे मिळवीत असत. यांना भयंकर प्राप्ति होत असे. एकट्या बेडफोर्डचें प्रमाण दिलें म्हणजे त्यावरून अमेरिकेंतील ठिकठिकाणच्या वेश्याव्यवसायाची कल्पना येईल. अमेरिकेच्या लोकसंख्येचा विचार करतांना वरील व्यवसाय करणाऱ्यांचें प्रमाण पुढीलप्रमाणें पडतें.

### धंदा करणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण.

| | | |
|---|---|---|
| ( १ ) स्थानिक गोरे | २७४१५०४ | १५८६ |
| ( २ ) अमेरिकेच्या बाहेरील गोरे. | १९२७७२० | ६६४ |
| ( ३ ) निग्रो. | ९१७०२ | ११३ |
| ( ४ ) इतर. | ५९५७ | ० |

हें प्रमाण एका विवक्षित गांवाचेंच आहे. त्या शिवाय रस्त्यावर उभें राहून महिनेवार धंदा करणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण पुढीलप्रमाणें दिलेलें आहे. हें देखील

दुसऱ्या एका गांवांतील असून त्यांचें नांव Manhattan असें आहे. या गांवाचें पुढील प्रमाण आहे.

| | | |
|---|---|---|
| ( १ ) | २४ जानेवारी ते २४ फेब्रुवारी. | ४८२ |
| ( २ ) | २४ फेब्रुवारी ते २४ मार्च | ४९२ |
| ( ३ ) | २४ मार्च ते २४ एप्रिल. | ४९० |
| ( ४ ) | २४ एप्रिल ते २४ मे. | ८८३ |
| ( ५ ) | २४ मे ते २४ जून | १२०३ |
| ( ६ ) | २४ जून ते २४ जुलै | ६९६ |
| ( ७ ) | २४ जुलै ते १ सप्टेंबर | १०४८ |
| ( ८ ) | १ सप्टेंबर ते १ अक्टोबर | ४५१ |
| ( ९ ) | १ अक्टोबर ते १ नव्हेंबर | ७३८ |
| ( १० ) | १ नव्हेंबर ते १५ नव्हेंबर | २७६ |
| | | एकंदर ६७५९. |

यांपैकीं पोलीसकडे १५९६ चाच रिपोर्ट झाला. पुढील आंकड्यांवरून ज्या ज्या ठिकाणीं यांचे कुंटणखाने अगर उघड दुकानें आहेत, तेथील उत्पन्नाचें प्रमाण पुढीलप्रमाणें आहे. एका विभागांत १५ घरें आहेत. त्या विभागांत येणाऱ्यांची संख्या ३६००, ३२००, ४००० अशी होती. या करतां त्या लोकांचे पैसे ५१०० डॉलर म्हणजे २५५०० रुपये खर्च झाले. यामुळें भयंकर रोग होत असून त्या रोगाचें प्रमाण एका अहवालांत पुढीलप्रमाणें दिलेलें आहे.

इ. स. १९११ सालीं न्यूयॉर्क शहरांतील सत्रा दवाखान्यांत प्रजनन रोगांपासून पछाडलेल्या ५२२७२२ लोकांना औषधोपचार करण्यांत आले. दुसऱ्या एका गांवच्या दवाखान्यांत ५३८० रोग्यांना औषधोपचार केला. या रोग्यांत स्त्रीपुरुषांच्या वयाचें प्रमाण असें होतें कीं, सोळा ते वीस वर्षांच्या वयांत ७९६ पुरुष व ३९६ स्त्रिया होत्या. २१ ते २५ वयाच्या ११८२ पुरुष व ४७५ स्त्रिया होत्या. दुसऱ्या एका दवाखान्यांत याच रोगानें पछाडलेले पुढील लोक होते. अविवाहित ६४०, विवाहित २९५०, विधूर ७५ हें पुरुषवर्गाचें प्रमाण झालें. आतां स्त्रीवर्गाचें प्रमाण पाहूं. अविवाहित ५९६, विवाहित ८०२, विधवा ९० होत्या.

अशा प्रकारचे कितीतरी उतारे देतां येतील. सर्वच उतारे देत गेलों अगर अमेरिकेंतील वेश्याव्यवसायासंबंधीं लिहिलें तर तो एक हजार पानांचा ग्रंथच होईल. खुद्द बाईच्या देशांत वरील प्रकारचा सांवळा गोंधळ चालत असून ती हिंदुस्थानवर विषारी फूत्कार टाकीत आहे! अमेरिकेच्या वरील भयंकर परिस्थितीकडे पाहिलें म्हणजे तेथें कुमारिकांचें, तरुणतरुणींचें कसें नैतिक अधःपतन झालें आहे हें दिसून येईल.

---

## वैवाहिक स्थिति व घटस्फोट.

अमेरिकेंतील लग्नसंस्थेची दिवसेंदिवस अवनती होत आहे. या अवनतीची मीमांसा करण्याकरतां कित्येक समाजसुधारक व समाजसेवक सिद्ध होऊन त्यांनीं या अवनतीचें संशोधनकार्य धडाक्यानें सुरू केलेलें आहे. देश सुधारणेच्या उत्तुंग शिखरावर आरोहण करीत असतांना एका बाजूला आधिभौतिक उन्नति व दुसऱ्या बाजूला पावित्र्याचें अधःपतन अशीं दोन चित्रें अमेरिकेंत दिसत आहेत. अमेरिकेंतील लग्नें अयशस्वी होतात. या बाबतींत एका विदुषीनें फारच सुंदर पुस्तक लिहिलेलें आहे. तिनें आपल्या ग्रंथांत सर्व बाजूंनीं सव परिस्थिति लक्षांत आणून या प्रश्नावर चांगलाच प्रकाश पाडला आहे. समाजशास्त्री, धर्मोपदेशक, विद्वान लोक याच प्रश्नाची चर्चा करीत आहेत. लग्नासारखी पवित्र संस्था आज अपवित्र व वाममार्गी होत चाललेली पाहून या समाजशास्त्र्यांना अत्यंत वाईट वाटत आहे. कित्येकांनीं या लग्नसंस्थेच्या अधःपतनाचीं आपापल्या दृष्टीनें निरनिराळीं कारणें शोधून काढलेलीं आहेत. कोणी हल्लींच्या शिक्षणपद्धतीला दोष देत आहेत तर कोणी स्त्रीदाक्षिण्याला नांवें ठेवीत आहेत. कोणी स्त्रियांचें पुरुषीकरणच याला कारण आहे असें म्हणत आहेत. कित्येक जण या बाबतींत असें म्हणत आहेत कीं ‘ स्त्री-वैयक्तित्व ’ या अधःपतनाला कारणीभूत होत आहे. कोणत्याही कारणानें असो पण अमेरिकेंत घटस्फोटाची इतकी तेजी आहे कीं, अशी तेजी दुसरी कोठेंही नाहीं. या घटस्फोटाच्या वाढत्या रोगानें आजकाल अमेरिकेला पुरें पछाडलेलें आहे.

या भयंकर रोगापासून अमेरिकेची कशी मुक्तता होईल, या रोगाचें मूळ उपटून टाकून अमेरिका इतर बाबींप्रमाणें या बाबींतही कशी सुधारेल, हीच एक तळमळ अमेरिकेंतील—मिस मेयोच्या मदर अमेरिकेंतील—मंडळीला लागलेली आहे आणि

म्हणूनच तिकडचे लोक भडक रंगांत ‘Alarming Growth of the Divorce Evil’ अशीं शीर्षकें देऊन धोक्याची सूचना देत आहेत. यासंबंधानें रेव्हरेंड थॉम्सली ग्नोकरी या धर्मोपदेशकानें एक सुंदर लेख फारा दिवसांपूर्वीं ‘In Hearsts Chicago American’ या मथळ्याखालीं लिहिलेला होता. त्या लेखांत घटस्फोटाच्या भयंकर स्वरूपाचें वर्णन दिलेलें आहे. त्यावरून अमेरिकेंत घटस्फोटाची कशी तेजी आहे हें वाचकांना कळून येईल.

पाश्चात्य देशांत घटस्फोटाची सुरवात ख्रिस्ती शकापूर्वीं २५४ व्या वर्षांत झाली. ही सुरवात जुन्या रोम शहरांत झाली. टायबर जातीच्या लोकांत या घटस्फोटाचें जनन झालें व हा रोग हळूहळू चहूंकडे पसरूं लागला.

अमेरिकेंत गेल्या चाळीस वर्षांत काडीमोडीचे खटले ५००००० होऊन काडीमोडीला कायदेशीर संमति देण्यांत आली. सर्व अमेरिकाखंडांत काडीमोडीचें प्रमाण इ. १८७० पासून सर्व जगापेक्षां चढणीला लागलेलें आहे. एका बाजूला जग व दुसऱ्या बाजूला अमेरिका असें काडीमोडीचें युद्ध लागलेलें आहे व या युद्धांत अमेरिकाच विजयी झालेली आहे. इ. स. १८७० मध्यें शेंकडा ३·५ शुभमंगलांचा शेवट घटस्फोटांत झाला. इ. १८८१ मध्यें हें प्रमाण शेंकडा ४·८ पडलें. इ. १८९० मध्यें ६·२ पडलें. इ. १९०० मध्यें शेंकडा ८ पडलें व हल्लीं तें प्रमाण जोरानें वाढत आहे. सेंट लुई येथील एका न्यायाधिशानें अर्ध्या दिवसांत ६२ घटस्फोटांचा निकाल देऊन पतीपत्नींना मोकळें केलें व न्यूयॉर्क शहरांत ४५० मिनिटांत ७३ जोडप्यांना काडी मोडून दिली. म्हणजे एक एक खटला सहा सहा मिनिटेंच चालला. अमेरिकेंतील सर्वच ठिकाणचे खटल्यांचे आंकडे लक्षांत घेऊन एका आंकडेशास्त्रज्ञानें असें सिद्ध केलें आहे कीं, शेंकडा वीस ते पंचवीस लग्नें अयशस्वी होत असतात. हाच लेखक असें म्हणतो कीं, अमेरिका आजकाल घटफोटाची प्रचंड गिरणी झालेली आहे. हे घटस्फोट तारेनें, टेलीफोननेंही होऊं लागले आहेत. आणि याचमुळें कित्येक अमेरिकन विनोदी लेखक अमेरिकन लग्नाची टवाळी करूं लागले आहेत. या वाढत्या घटस्फोटामुळेंच एका न्यायाधीशानें आश्चर्योद्गार काढले आहेत. तो म्हणतो जर एखादी स्त्री आपल्या नवऱ्याशीं राहण्यास यत्किंचित् कारणामुळें असंतुष्ट झाली तर ती ताबडतोब मागचा पुढचा विचार न करतां काडी मोडण्यास तयार होऊन कोर्टाकडे त्वरित धांव घेते. या घटस्फोटाच्या परवानगीमुळें वैवाहिक सौख्य व पावित्र्य नष्ट होत चाललें आहे. कायद्याचा जरी

तसा हेतू नसला तरी आजकाल त्याचा परिणाम गृहस्थितीवर व कौटुंबिक प्रणालीवर होत आहे. हल्लीं अमेरिकेंत लग्नाबाबत व घटस्फोटाबाबत जे कायदे आहेत त्यांचें स्वरूप म्हणजे पतिपत्नीच्या विभक्तीकरणाचा त्वरित व सुलभ मार्ग होय. शिगाकोच्या एका न्यायाधिशानें असे उद्गार काढले आहेत कीं, हल्लींचे लग्न व घटस्फोटविषयक कायदे हे खाजगी व सार्वजनिक अनीतीला पोषक असे आहेत. इतकेंच नव्हे तर हे कायदे म्हणजे कायदेशीर वेश्यावृत्ति होय ( The law of marriage and divorce as it prevails here is nothing less than legalized concubinage ). असा अभिप्राय देऊन न्यायाधीश मजकूर असें म्हणतात कीं, ज्यायोगानें घटस्फोट सुलभ न होतां कौटुंबिक सौख्याला स्त्रीपुरुष मुकणार नाहींत, अशी दुरुस्ती कायद्यांत केल्याशिवाय नैतिक दृष्टीनें तो समाधानकारक होणार नाहीं. दुसरे एक न्यायाधीश म्हणतात कीं घटस्फोट ही एक आपत्ति आहे. ही एक दुर्गति आहे. यामुळें राष्ट्राचें भयंकर अधःपतन होत आहे. यामुळें लग्न म्हणजे एक प्रकारचा फार्स होत चाललेला आहे. या बाबतींत कॉंग्रेसनें पुढाकार घेऊन लग्न ही पवित्र संस्था आहे हें लक्षांत ठेवून चळवळ करावी व सध्यांचे लग्न व घटस्फोटसंबंधीं कायदे अवश्य दुरुस्त करावे. आपल्याला राष्ट्र म्हणून पुढें यावयाचें असेल तर ही घटस्फोटाची वाईट चाल बंद केलीच पाहिजे.

कित्येक समाजशास्त्री देखील या पद्धतीच्या विरुद्ध आहेत. कोणत्याही सुशिक्षित मनाला काडीमोडीची–घटस्फोटाची कल्पना आवडणार नाहीं. मोठमोठ्या शहरांतील कौटुंबिक जीवन या घटस्फोटामुळें धुळीला मिळालें आहे व मिळत आहे. हीच पद्धत कायम राहील तर त्याचा परिणाम राष्ट्राच्या शरीरसंपत्तीवर झाल्याशिवाय राहणार नाहीं. या घटस्फोटामुळें वैवाहिक पावित्र्य नष्ट होत असतें, हें अनेक उदाहरणें देऊन सिद्ध करून देतां येईल, असें एका तत्त्ववेत्त्याचें म्हणणें आहे. ज्या ज्या पतिपत्नींनीं काडी मोडून घटस्फोट करून विभक्तपणा पत्करला आहे त्यांचें पावित्र्य नष्टच झालेलें आहे अशी नैतिक इतिहास साक्ष देत आहे.

कोणाही पत्नीला घटस्फोटाच्या कल्पनेनें स्पर्श केला कीं तिची अवनति सुरू झालीच म्हणून समजावें.

हल्लीं अमेरिकेंत वाढलेलें घटस्फोटाचें प्रमाण जर कमी होणार नाहीं, तर अमेरिकेचें राष्ट्रीयत्व राहणार नाहीं. या घटस्फोटामुळेंच सामाजिक, नैतिक, आर्थिक दृष्ट्या भयंकर परिणाम अमेरिकेला भोगावा लागेल.

ज्या मिस मेयोस हिंदुस्थानांत हिंदूंच्या संस्थांत व चालीरीतींत घाण दिसते, त्याच मेयोला आपल्या देशांतील हें लग्नसंस्थेचें अधःपतन दिसत नाहीं काय ? आजकाल अमेरिकेंतील लग्नसंस्था म्हणजे बाजारचा सौदा झालेला आहे आणि म्हणूनच अमेरिकेचे समाजशास्त्री या बाबतींत खडबडून जागे होऊन घटस्फोटाच्या उग्र स्वरूपावर वज्रप्रहार करूं लागले आहेत.

---

# कुमारिकांचें अधःपतन.

राष्ट्रसंघाच्या बैठकीपुढें 'व्हाईट स्लेव्ह ट्रॅफिक'चा दुसरा रिपोर्ट मागेंच वादविवादाकरतां आलेला आहे. या रिपोर्टावरून असें स्पष्ट आढळून आलें कीं, हिंदुस्थानपेक्षां परदेशांतच अनीतीचा व्यापार अतिशय चालू आहे. हा व्यापार बंद व्हावा व याला कायदेशीर आळा घालावा असे जोराचे प्रयत्न परदेशांत चालू आहेत. हा व्यापार विशेषतः अमेरिकेंतच फार मोठ्या प्रमाणांत चालत असतो. यासंबंधानें जे कागदपत्र प्रसिद्ध झाले आहेत ते तर अंगावर शहारे आणणारेच आहेत, यांत शंका नाहीं. शाळेंतल्या मुली, दुकानांतले स्त्रीनोकर, टेलिफोन गर्लस्, मास्तरणी, सुंदर दिसणाऱ्या तरुण मुली आपल्या जाळ्यांत अडकवून त्यांची विक्री करून हा निंद्य व्यवसाय करणारे दलाल आपला तळीराम गार करून घेत असतात. याला नियंत्रण घालण्याचा अमेरिकेंत जरी प्रयत्न चालू आहे तरी अद्याप हें प्रमाण व्हावें तसें कमी झालेलें नाहीं. भूलथापा देऊन, नाना तऱ्हेचीं आमिषें दाखवून सुंदर अविवाहित तरुणींना पळवून नेण्याचा सपाटा तिकडच्या बदमाषांनीं चालविलेला आहे. 'व्हाईट स्लेव्ह ट्रॅफिक' हें एक प्रचंड रहस्य आहे. अमेरिकेच्या संस्कृतीला ही एक काळीमा आणणारी गोष्ट आहे असें सर्व परदेशी समाज पुढाऱ्यांचें म्हणणें आहे. याला आळा घालण्याचा प्रयत्न पोलिसखातें, न्यायाधीश, समाजसेवक व ख्रिस्ती धर्मांचे प्रचारक करीत आहेत. या लोकांनीं आपापले अनुभव एकत्र करून ते प्रसिद्ध केले आहेत व अमेरिकेंत चालत असलेल्या अनीतीच्या व्यापारावर प्रकाश पाडण्यास ते फारच उपयुक्त आहेत यांत शंका नाहीं. हिंदुस्थानच्या नांवानें पांचजन्य करणाऱ्या मिस मेयोच्या कानांत तिच्या भगिनींची बदफैली सांगितलीच पाहिजे. ही हकीकत तिच्याच जातभाईंनीं लिहिलेली आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आम्ही त्याच हकिगतीचा अनुवाद

करीत आहोंत. हा व्यापार दिवसेंदिवस वाढीला लागलेला पाहून अमेरिकन लोकांचे डोळे उघडले आणि या प्रश्नाचा निकाल लावून ही वाईट पद्धत आपल्या समाजांतून अजिबात घालवून टाकावी असें त्यांनीं ठरविलें. ज्या ज्या मुली या अनीतीच्या पिंजऱ्यांत अडकल्या, त्या त्या मुलींनीं आपल्या कैफियती प्रसिद्ध केलेल्या आहेत. अशाच कैफियतींत एक मुलगी लिहिते कीं, "मी माझ्या आजोबाबरोबर रहात होतें. माझें नांव ॲनी असून आमच्या घरची अत्यंत गरीबी होती. मी जेव्हां साधारण समजूतदार झालें, तेव्हां प्रपंच चालवावा—निदान प्रपंचाला हातभार लावावा म्हणून मी एके ठिकाणीं नोकरी पत्करली. मी सहज एक वर्तमानपत्र चाळीत असतां माझी नजर एक घरकामाकरतां मोलकरीण पाहिजे या जाहिरातीवर गेली. आजोबांना मी ती जाहीरात दाखविली. त्यांनीं त्या पत्त्यावर पत्रव्यवहार करून आपल्या मनाचें समाधान करून घेतल्यावर मला नोकरीवर धाडण्याचें निश्चित केलें. मी ज्यांच्याकडे नोकरीवर रहाणार होतें त्यांनीं मला असें पत्र लिहिलें कीं, तूं मला व्हिक्टोरिया स्टेशनवर भेट म्हणजे मग मी तुला माझ्या घरीं घेऊन जाईन. त्या इसमाच्या पत्रावर विश्वास ठेऊन मी ठरलेल्या वेळीं वरील जागीं गेलें व त्यांची वाट पाहिली. ठरल्याप्रमाणें त्यांची नजर माझ्यावर पडली. मी घरगुती कामें करूं लागलें. माझी मालकीण फार चांगली होती. ती मला रोज रात्रौ दहा वाजतां सोडीत असे. तोंपर्यंत तिच्या घरांतलीं सर्व कृत्यें मला पुरत असत. मी अशा रीतीनें त्या घरांत राहिल्यावर मला असें आढळून आलें कीं मी ज्या घरांत नोकरीला राहिलें आहें तें घर नसून कुंटणखाना आहे. मालकिणीनें माझ्यावर मोहिनी पसरविण्याचा प्रारंभ केला. ती म्हणूं लागली कीं, 'ॲनी, तूं मोलकरीण होण्यास खरोखरच लायक नाहींस. दुर्दैवानें तूं हा पेशा पत्करला आहेस. खरें पाहिलें असतां तूं एकाद्या सुशील गृहस्थाची गृहलक्ष्मी होण्यास लायक आहेस.' मला मालकिणीचें कारस्थान समजलें नाहीं. वारंवार ती मला असाच उपदेश करी. पण मी तिच्या त्या उपदेशाकडे जाणून बुजूनच कानाडोळा करीत असें. एकदां असें झालें कीं, मी व माझी मालकीण या दोघीच घरीं होतों. तेव्हां ती मला म्हणाली, 'सुंदर ॲनी, मीदेखील तुझ्यासारखीच या घरांत प्रथम मोलकरीण होतें. पण मी गृहलक्ष्मी होऊन माझ्या अंकावर शिशूदेखील खेळूं लागला आहे. पूर्वींपेक्षां मी आतां खरोखरच सुखी आहें. जन्मभर मोलकरीण राहण्यापेक्षां आजन्म गृहलक्ष्मी रहाणेंच अधिक हितावह आहे. माझ्या घरीं अशा कितीतरी तरुण मुली आल्या व मोलकरणीचा पेशा सोडून त्या आतां

आनंदानें नांदत आहेत.' मी या गोष्टीचा मनाशीं विचार करूं लागलें व मोलकरीण रहाण्यापेक्षां गृहलक्ष्मी होणें चांगलें असें ठरवून मी मालकिणीच्या बेताला संमति दिली. माझा कबूली जबाब घेतल्यावर माझ्या मालकिणीनें मला सुंदर रीतीनें नटवून आपल्याबरोबर बाहेर नेलें. मीही आतां गृहलक्ष्मी होणार म्हणून मनोराज्य करूं लागलें. मला माझ्या मालकिणीनें मोटारमध्यें घालून एका ठिकाणीं नेलें. मोटार बंद होती त्यामुळें मी कोणत्या रस्त्यानें व कोठें जात आहें हें मुळींच समजलें नाहीं. एका घरांत गेल्यावर तिनें मला एका खोलींत नेऊन बसविलें. खोलींत मी एकटीच होतें. बाहेर काय प्रकार झाला हें मला माहीत नाहीं पण मी बसलें होतें तेथें एक तरुण आला व त्यानें माझा हात धरला. त्याच्या वृत्तीवरून मला असें कळून आलें कीं, याची वाईट नजर आपल्यावर आहे. मी तेथें एकटीच होतें. त्यानें मला भ्रष्ट केली. मी एकसारखी रडत होतें. पुढें मी कशीतरी त्या घराच्या बाहेर पडलें. पण मालकीण कोठें दिसेना. मी अशा स्थितींत काय करावें हें देखील मला समजेना ! हो ना करतां करतां मला एका मिशनरी होमची आठवण झाली व त्याबरोबर मी त्या होमचा तपास करूं लागलें. मोठ्या प्रयासानें मला ती जागा सांपडली. घराजवळ आलें तों दार बंद होतें. सकाळपर्यंत मी तेथें राहिलें. नंतर होमचे चालक मला भेटले. मी त्यांना सर्व हकीगत सांगितली. त्यांनीं मला आश्वासन दिलें व नंतर मी तेथेंच कायम रहाण्याचें ठरविलें. अशी माझ्या अधःपतनाची करुण कहाणी आहे."

---

## अमेरिकन तरुणींना धोक्याची सूचना.

अमेरिकेमध्यें कुमारिका व तरुणी यांना फुसलावून तिकडचे बदमाष लोक जेव्हां त्यांचें अधःपतन करूं लागले तेव्हां या प्रश्नाची जोरानें मीमांसा सुरू झाली. ठिकठिकाणीं समित्या स्थापन झाल्या. घरगुती बायका बाहेर भटकूं लागल्या. हा प्रकार जर असाच चालला तर अमेरिकेच्या नांवाला कलंक लागेल व सर्व स्वतंत्र व परतंत्र राष्ट्रें अमेरिकेच्या तोंडावर थुंकल्याशिवाय राहणार नाहींत असें तिकडच्या खऱ्या समाजसेवकांस वाटून त्यांनीं या गोष्टीला आळा घालण्याचे नाना प्रयत्न केले, व्याख्यानें झोडलीं, चोपडीं खरडलीं, वर्तमानपत्राचे स्तंभ आडवले, मारे धूमधडाका केला, पण त्यांच्या प्रयत्नाला जरी यावें तसें यश आलें नाहीं

तरी पण बरेंच यश आलें व त्यांच्या धडाडीमुळें बऱ्याच राष्ट्रांचें लक्ष या प्रश्नाकडे लागलें. ही चळवळ जेव्हां अमेरिकेंत सुरू झाली तेव्हां एका विद्वानानें अमेरिकन तरुणींच्या कानांत हळूच 'नकार' सांगून त्यांना या धोक्यापासून वांचविण्याची पराकाष्ठा केली. ही धोक्याची सूचना फार मजेदार असून हे नकार म्हणजे बहकलेल्या पोरींच्या उन्मादवायूवर सूतशेखराची मात्राच होय.

पहिला नकार सांगतांना हा लेखक म्हणतो, मुलींनो, अमेरिकन तरुणींनो, आपला मनोविकार बहकूं देऊं नका. बहकलेल्या स्थितींत निजधाम सोडून परद्वार गांठूं नका. जग हें विस्तृत व फार भयंकर आहे. या जगांत नानातऱ्हेचे पिंजरे आहेत. तेव्हां जर तुम्हीं अशा स्थितींत बाहेर पडलांत तर कोणत्याही पिंजऱ्यांत 'मैना' होऊन राहण्याची तुमच्यावर पाळी येईल. मग त्या पिंजऱ्यांतून एकही पोपट तुम्हांला सोडवायला येणार नाहीं. म्हणून होतां होईलतों एकट्या दुकटीनें घर सोडूं नका.

एकाद्या तरुणानें तुम्हांला आमंत्रण केलें, मोटार हांकण्याचा 'चान्स' दिला, मेजवानीला किंवा क्लबांत टेनीस खेळायला बोलावलें तरी बोलावणाराचा व तुमच्या घरांतील माणसांचा परिचय नसेल, त्याच्या शीलाची तुम्हांला माहिती नसेल तर जाऊं नका. गेलांत तर तुमच्यावर काय काय प्रसंग येतील याचा नियम नाहीं.

एखादा तरुण तुमच्याशीं लघळपणा करायला येईल तर त्याला तसें करण्याची परवानगी देऊं नका. कारण सौंदर्य हें सद्गुणांनींच संभाळावें लागतें.

चांगले दिसणारे, मिठास बोलणारे, फॅशनेबल राहणारे तरुण, शीलानें उज्वल असतातच असें समजून आपली दिशाभूल करून घेऊं नका. जर का अशी दिशाभूल झाली तर मात्र तुमची स्थिति काय होईल हें सांगतां येणार नाहीं.

नोकरीला चटावलेल्या तरुणीनें ज्या ठिकाणीं तिला नोकरीला जावयाचें असेल तें ठिकाण चांगलें आहे, सुरक्षित आहे, दगाफटक्याचें नाहीं अशी खात्री करून घेतल्याशिवाय नोकरीला जाऊं नये.

परक्या तरुणांवर एकदम विश्वास टाकूं नका. तुमच्या चांगल्या परिचयाच्या इसमानें त्याच्यासंबंधीं तुम्हाला हमी दिल्यानंतरच त्याचा विचार करा.

मद्य व कैफाचे पदार्थ यांचें सेवन करूं नका. तुम्हांला त्याचा आग्रह करून कित्येक पापी तुमच्या अब्रूवर दरोडे घालतात हें विसरूं नका.

आगगाडींतून रात्रीच्या वेळीं एकटी दुकटीनें प्रवास करूं नका. अनोळखी माणसाला आपण कोठें जात आहों हें सांगूं नका.

ज्यायोगानें तुमच्याकडे पापी लोकांची नजर लागेल असे पोषाख करूं नका.

फॅशनेबल ड्रेस केल्यानें एका तरुणीवर कसा भयंकर प्रसंग आला व त्या खटल्यांत न्यायाधिशानें 'पोषाखामुळेंच या तरुणीवर असा प्रसंग आला' हे काढलेले उद्गार ध्यानांत धरा व भडक पोषाख करूं नका.

नृत्यस्थळीं आपल्या पूर्ण परिचयाचा पुरुष असल्याशिवाय दुसऱ्याबरोबर नाचूं बागडूं नका.

आपल्या शीलाचे आपणच रक्षक आहोंत हें सुंदर तत्व कोणत्याही वेळीं विसरूं नका.

अब्रू आणि पावित्र्य यालाच जगांत जास्त किंमत आहे, हें व्यवहारसूत्र विसरूं नका.

सिनेमा, नाटकें, सर्कसी पहावयास जातांना भलत्या सलत्याबरोबर जात जाऊं नका.

शाळेचें निमित्त करून दुसऱ्या तिसऱ्या ठिकाणीं जाऊन बसूं नका.

अपरचित तरुणांना पाहून हंसूं नका किंवा त्याच्याकडे पाहूं नका.

तुम्ही ज्या ठिकाणीं नोकरी करीत असाल, त्या ठिकाणच्या तरुणांशीं फाजील सलगी करूं नका.

मालक व मॅनेजर यांच्याशीं कामापुरतेंच बोलत जा. जास्त लघळपणा करीत जाऊं नका.

टेलीफोनवर नोकरी करतांना खाजगी कामाकरतां टेलीफोनशीं दळणवळण ठेऊं नका.

शेजारची मेरी फॅशनेबल रहात आहे म्हणून आपणही तिचें अनुकरण करावें असा विचार मनांत आणूं नका.

भलत्याच मार्गानें जाऊन आपल्यावर संकटें ओढवून घेऊं नका.

# अमेरिकेचें नैतिक दिवाळें.

मेयोनें आपल्या समाजांतील घाण दृष्टीआड करून आमच्या समाजावर निष्कारण कोरडे ओढले आहेत व सामाजिक पापांचा डांगोरा पिटवून हिंदु समाजाचा अत्यंत अपमान तिनें केला आहे. साम्राज्याच्या राक्षसी व अघोर तृष्णेनें तडफडणारी मेयो आमच्या समाजावर जरी जळफळत असली तरी तिनें आपल्या समाजांतील भयंकर पापांच्या राशींकडे कानाडोळा करणें बरें नाहीं. स्वतःचा समाज पापाच्या भयंकर खोल गर्तेंत दिवसेंदिवस अधिकाधिक खिचपत पडत असूनसुद्धां तो तेवढा सुसंस्कृत, पुढारलेला, नमुनेदार आणि प्रगतिप्रिय व दुसरा कोणताही समाज असंस्कृत, मागासलेला, अनुदार, भडकलेला आणि पुराणप्रिय अशा प्रकारचीं विधानें तिनें आपल्या पुस्तकांत बेधडक केलेलीं आहेत. मुख्य गोष्ट ही आहे कीं या राक्षसी मेयोनें आमच्या आया बहिणींची आपल्या पुस्तकांत भरपूर नालस्ती केली आहे. आंतील मजकूर विषारी असून तो द्वेषबुद्धीनें व हिंदूंच्या हिंदुस्थानाचें वाटोळें करावें म्हणून लिहिला आहे आणि सर्वांत तिरस्करणीय गोष्ट म्हटली म्हणजे या अशा गलिच्छ ग्रंथाला आम्हां हिंदवासीयांना पूज्य अशी सुजला सुफला, भगवती हिंद माता हें नांव देऊन त्या गोऱ्या मायेनें आमच्या मातृदेवतेची भयंकर विटंबना केली आहे. दुसऱ्यांच्या डोळ्यांत भसकन बोटें खुपसणाऱ्या या महामायेला तिच्या समाजांत काय काय अनन्वित सामाजिक अत्याचार चालले आहेत हें कसें दिसत नाहीं! पण तें सर्व तिला माहीत असूनही तिकडे तिनें मुद्दाम आपले घारे डोळे वळविले नाहींत. स्वतःच्या समाजांत हरघडी चाललेल्या अनीतीच्या व्यापाराकडे मेयोनें लक्ष दिलें तर तिला खात्रीनें असें आढळून येईल कीं, हिंदुस्थानांतील स्त्रिया युरोपखंडांतील स्त्रियांपेक्षां लाख पटीनें श्रेष्ठ दर्जाच्या आहेत. पण एवढी अक्कलहुषारी या बेछूट महामायेला सुचणार कशी! युरोपखंडांत आपल्या भगिनींची काय विटंबना होत आहे हें मेयोनें लक्षपूर्वक–लक्षपूर्वक तरी कशाला–वर वर जरी पाहिलें तरीदेखील आमचें म्हणणें तिला सहजच पटेल. आतां कदाचित् दुराग्रहानें ती तसें कबूल करणार नाहीं. परंतु जेथें राष्ट्रसंघाच्या चव्हाट्यावर व्हाईट स्लेव्ह ट्रॅफिकचा रिपोर्ट शंखध्वनी करीत आहे तेथें या मेयोच्या दुराग्रहाला कोण बरें विचारणार? युरोपखंडांत गोऱ्या तरुणींचा अनीतीचा धंदा कसा वाढत चालला आहे याची माहिती राष्ट्रसंघापुढें आलेली असून तीवरून पाश्चात्य समाज किती सुधारलेला आहे हें कोणाच्याही चटकन

ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. सभ्यतेच्या पडद्याआड असभ्य समाजालाही लांच्छन आणणारा असा अनीतीचा सांवळा गोंधळ युरोपखंडांत सर्वत्र कसा चालला आहे याची अंधुक कल्पना राष्ट्रसंघाचा पुढील रिपोर्ट आमच्या वाचकांना करून देईल. कांहीं टांचणें आम्ही मुद्दाम आमच्या वाचकांकरतां पुढें उद्धृत करीत आहोंत. त्यावरून सुधारणेंत अग्रेसरत्व मिळविलेल्या युरोप खंडांतील देशांत सभ्यतेच्या पांघरुणाखालीं गोऱ्या मुलींचा भरणा वेश्या वर्गांत कसा केला जातो याची कल्पना येते. तिकडच्या कांहीं लोकांचा हा एक धनवान होण्याचा सभ्यव्यवसायच होऊन बसलेला आहे. हा व्यापार दिवसेंदिवस कमालीचा वाढत असून त्याला आळा घालण्याचा राष्ट्रसंघाचा पवित्र उद्देश आहे. युरोपखंडांतील राष्ट्रांची सर्व बाजूनें सुधारणा व्हावी म्हणून चंग बांधून विजार सावरून बसलेला राष्ट्रसंघ सर्व युरोपखंडाची सुधारणा केव्हां व कशी करील ती करो, पण आज मात्र सुधारणेच्या नांवाखालीं गोऱ्या मुलींच्या अनैतिक व्यापाराचा रिपोर्ट या संघापुढें विचाराकरतां आलेला आहे. युरोपांतील फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, ग्रीस, अमेरिका, मेक्सिको वगैरे पुढारलेल्या देशांत तनुविक्रयाचें महापातक गोऱ्या मुलींकडून कित्येक गौरवर्णीय समाजकंटक करवीत आहेत.

---

## अत्याचारी अमेरिका.

अमेरिकेंतील बरेच वर्तमानपत्रकार असें रडगाणें गात असतात कीं आशिया खंडांतून आपल्या देशांत येणाऱ्या लोकांनीं फारच धुमाकूळ माजविलेला आहे. हे आशिया खंडांतील लोक म्हणजे अमेरिकेवर एक प्रकारची भयंकर आपत्ति होय. अमेरिकन लोकांनीं या आशिया खंडांतील भुतांपासून आपल्या देशाचें संरक्षण करावें. आशिया खंडांतील लोक अत्याचारी, असभ्य व पतित आहेत; ते आपल्या देशांत आले, त्यांचा आपल्या लोकांशीं सहवास झाला तर आपले लोक पतित होतील; तेव्हां या लोकांपासून सावध रहा.

वरील इषारा किंवा धोक्याची सूचना देणारे अमेरिकन वर्तमानपत्रकर्ते आपल्या जातभाईंना इषारा देतात; पण खुद्द अमेरिकेंत पापाची पराकाष्ठा कशी चढत्या प्रमाणांत आहे हें ते विसरतात. अमेरिकेंत अत्याचाराचें प्रमाण कसें वाढत चाललेलें आहे, हें पुढें दिलेल्या गोष्टीवरून वाचकांना कळून येईल. पैशाचिक प्रेमविषयक पापाच्या अपवित्र कथा अमेरिकेच्या वर्तमानपत्रांतून रोज प्रसिद्ध होत

असतात. एका स्त्रीनें आपल्या नवऱ्याला विष देऊन त्याचा प्राण घेतला. प्राण घेण्याचें कारण असें कीं, तिच्या नवऱ्यानें आपल्या आयुष्याचा विमा उतरला होता, त्यांत अशी एक अट होती कीं जर सहजासहजीं तो मेला तर पत्नीला पंधरा हजार रुपये मिळावे व मुद्दाम त्याचा कोणी खून करील व तो मरेल तर पत्नीला ३० हजार रुपये मिळावे. या अटीचा फायदा घेण्याकरतां पत्नीनें—मिस् मेयोच्या देशभगिनीनें—आपल्या पतीचा खून केला व विम्याचे तीस हजार रुपये मिळविले.

दुसरी एक अशी हकिगत प्रसिद्ध झालेली आहे तीवरून शिशुसंगोपनाची अमेरिकेंत काय स्थिति आहे हें कळून येतें. एका अमेरिकन मातेनें आपल्या पंधरा दिवसांच्या मुलाला तो अतिशय रडत असल्यामुळें वस्तऱ्यानें छाटून टाकलें या अमेरिकन बालहत्यारी माता मेयोला श्रेष्ठ वाटतात काय ?

---

## अत्याचारी विद्यार्थी.

विद्यार्थ्यांच्या बाबतींतही हाच प्रकार आढळून येतो. एकदां चिकागो विश्वविद्यालयांतील दोघां श्रीमंत विद्यार्थ्यांचा विचारविनिमय झाला. विचार होतां होतां असें ठरलें कीं आपण कांहीं तरी घोर पातक करावें. दोघांचें संगनमत होऊन ते अत्याचारप्रवृत्त झाले. दोघे मोटारमध्यें बसले. मोटार भररस्त्यांतून चालली होती. वाटेंत एका सुंदर मुलाला त्यांनीं मोटारमध्यें घातलें व दूरवर नेऊन हातोड्यांनीं त्याला ठार मारून त्याचें मृत शरीर नाल्यांत फेंकून दिलें व ते परत आले. ओहियो या गांवांतही असाच एक अमानुष प्रकार घडला. तो प्रकार म्हणजे असा कीं, एका आईनें आपल्या सहा आठवडे वयाच्या लहान मुलाला एका टबांत घालून तें चुलीवर ठेवलें व त्याच्या खालीं खूप विस्तव पेटवून उकळणाऱ्या पाण्याच्या योगानें ठार मारलें. एका बँकेंत जाऊन दोघां स्त्रियांनीं पिस्तुलाच्या साहाय्यानें बँकेवरील पहारेकऱ्यांना मारून बँक लुटली. ज्याप्रमाणें स्त्रिया अत्याचारी आहेत त्याचप्रमाणें अमेरिकेंतील पुरुषदेखील भयंकर अत्याचार करतात. न्यूयॉर्क शहरीं एका इसमानें आपल्याबरोबर नांदत नाहीं म्हणून बायकोला जबरदस्तीनें एका विहिरीपर्यंत ओढीत नेलें. पण ती जेव्हां आरडा ओरड करूं लागली तेव्हां त्यानें तिला उचलून भट्टींत टाकलें व लगेच भट्टीचा दरवाजा लावून घेऊन तो बाहेर उभा राहिला. आंतून ती बिचारी सारखी किंचाळत

होती. पण त्या नवऱ्याच्या मनाला काडीभरही दया आली नाहीं. असे प्रकार वरचेवर होऊं लागले तेव्हां त्याच शहरांतील प्रसिद्ध न्यायाधीश मि. आलफ्रेड टेली यानें असे उद्गार काढले कीं, हल्लीं अमेरिकेंत पापाची व अत्याचाराची पराकाष्ठा झालेली आहे. बंदुकांचा व पिस्तुलांचा इतका सुळसुळाट झाला आहे कीं तंबाकूचे पाइप त्यांच्यापुढें कांहींच नाहींत. चिकागो हें शहर सर्व जगांतील शहरांत दुसरें आहे. पण या शहरांत इतर कोणत्याही शहरापेक्षां अधिक हत्या होतात. इ. स. १९२६ सालांत एकट्या याच शहरांत ३४७ हत्या झाल्या व इ. स. १९२४ मध्यें २७० झाल्या. यावरून असें म्हणावें लागतें कीं, चिकागो ही पापांची व हत्यांची राजधानी झालेली आहे. गेल्या २५ वर्षांत हा प्रकार थोडा होता परंतु हल्लीं पापाचें तुफान सर्व अमेरिकेभर उठलेलें आहे. डॉक्टर फ्रेडरीक हाम्पेन यांचा असा अभिप्राय आहे कीं, गेल्या चोवीस वर्षांपेक्षां हल्लीं हत्येचें प्रमाण दुप्पट दिसून येत आहे. नुकत्याच संपलेल्या महायुद्धांत चाळीस हजार अमेरिकन मेले. परंतु युद्धानंतर १९२५ सालाअखेर ४० हजारांपेक्षां जास्त हत्याच झालेल्या आहेत. दर वर्षीं अमेरिकेंत अकरा हजार पाशवी अत्याचार होतात. गेल्या पंधरा वर्षांत हत्या फारच झाल्या आहेत व त्यांचें प्रमाण १०० त ८० असें पडलेलें आहे. जपान, ग्रेट ब्रिटन, आयर्लंड, हॉलंड, स्वित्झरलंड, नॉर्वे या देशांत हें प्रमाण लाखांत तीन ते सात असें पडतें.

डॉक्टर हाम्पेन यांनीं आपला या बाबत असा स्पष्ट अभिप्राय दिलेला आहे कीं, आज असा काळ आला आहे कीं अमेरिका सुरक्षित राहील किंवा नाहीं हेंच सांगणें कठीण आहे ! हत्या करण्याकडे दिवसेंदिवस येथील स्त्रीपुरुषांची अक्कल खर्च होऊं लागलेली आहे. देशशासनाचा भार ज्यांच्यावर आहे असे लोक या बाबतीचा करावा तसा विचारच करीत नाहींत! सुसंस्कृत अमेरिकेवर—मेयोच्या मदर अमेरिकेवर—वरील डॉक्टरनीं दिलेलें ' इंजेक्शन ' म्हणजे पाशवी रोगाची केलेली स्तुतीच कीं काय ? प्रेसचा रिपोर्ट वाचतां आढळून येतें कीं, फक्त मोटारमुळेंच प्रति दिवशीं, प्रत्येक ताशीं, दोनपेक्षां अधिक माणसें मृत्युमुखीं पडतात. इ. स. १९२३ चा रिपोर्ट असें सांगतो कीं एक लाख मृत्यूपैकीं मोटारमुळें १४८ असें मृत्यूचें प्रमाण पडलेलें आहे. अमेरिकेंतील १६८ शहरांत एक लाखाला १९.२४ असें हें प्रमाण पडलेलें आहे. म्हणजे इ. स. १९२४ सालीं मोटारमुळें १७८०० लोक मरण पावले. न्यूयार्क शहरीं दरवर्षीं ३००, शिकागोमध्यें २५० याप्रमाणें मुलें याचमुळें मृत्यूमुखीं पडतात. असें भयंकर मृत्यूचें

प्रमाण आधाराला घेऊन ‘ नेशन ’ पत्रानें अमेरिकेला असा सवाल विचारला कीं, जर तुर्क लोकांनीं अमेरिकन सात हजार मुलांची कत्तल केली असती तर अमेरिकन लोकांना काय वाटलें असतें ? दरोडे व चोऱ्या यांचें प्रमाणदेखील कल्पनेच्या बाहेर गेलेलें आहे. मुलें व मुली हातांत पिस्तुलें घेऊन चोऱ्या व दरोडे घालतांना प्रत्यहीं दिसतात. धांवत्या गाडीची लुटालूट म्हणजे त्यांच्या हातचा मळ होय. यामुळें पोस्टल खात्यानें आपली रात्रीची मेल दोन वर्षांपूर्वी बंद केलेली आहे. बोस्टनसारख्या शहरांत व अन्यत्र पोष्ट ऑफिसवर यामुळें संगिनींचे पहारे ठेवावे लागले. याबाबतींत विल्यम बर्न असें म्हणतात कीं, या चोरीमुळें दर वर्षीं ३० कोटी डॉलरचें नुकसान होत आहे. अमेरिकन बँकर्स असोशिएशननें असें जाहीर केलें आहे कीं, आमच्या नोकरांत सुमारें पांचशें लोक चोर होते. त्यांच्यामुळें आमच्या बँकांना ३६७३४६७ डॉलर नुकसान आलें आहे. यावरून अमेरिकेंतील स्त्रीपुरुषांची मानसिक अवनति किती झाली आहे हें नाहीं का स्पष्ट दिसत ? अमेरिकेच्या तुरुंगांत दरसाल दोन ते तीन लाख कैदी असतात. कित्येक पाषाणहृदयी अमेरिकन लोकांना लिंचिंग (Lynching) चें वेडच लागलेलें आहे. नाटकें पहाणें, सिनेमा पहाणें, क्रिकेट खेळणें, वाटेल तेव्हां वाटेल त्या स्त्रीनें पुरुषाशीं काडी मोड करणें, याप्रमाणें निग्रो लोकांची जिवंतपणीं कातडी काढून त्यांना जाळणें अमेरिकन लोकांचा–आजच्या सुधारक अमेरिकेंतील नीतिज्ञ (!) गोऱ्या लोकांचा आवडता खेळ होऊन बसला आहे. हा शोक इतका वाढला आहे कीं इ. स. १९२० ते १९२४ या कालांत २३४ निग्रोंना या लोकांनीं जिवंत जाळलें आहे. चेट्टुगानामधील ‘ डेली टाईम्सनें ’ याची रोमहर्षणकारक हकीकत दिलेली आहे. ती हकीकत पुढीलप्रमाणें आहे. तोंडावर बुरखा घालून बारा अमेरिकन पुरुषांनीं एका निग्रोला अतिशय सतावून स्टेशनपासून दोन फर्लांग दूर नेलें व त्याला झाडाला बांधून जाळून टाकलें. हा प्रकार पाहण्याकरतां आनंदी वृत्तींत दोन तीन हजार लोक मुद्दाम जमले होते.

तापलेल्या लोखंडी सांडसानें त्याच्या शरिराला ठिकठिकाणीं भोंसकण्यांत आलें. अशा क्रूर प्रकारानें अमेरिकन लोकांनीं त्या निग्रोला जिवंत जाळलें. एवढयावरच ते थांबले नाहींत तर या गोऱ्या अमेरिकन लोकांनीं जास्त प्रमाणांत हत्या कराव्या म्हणून एक संघटित संस्था स्थापन केलेली असून त्या संस्थेचें नांव क्लू–क्लक्स–क्लॅन ( Klu–Klux–Klan ) असें ठेवलेलें आहे. या

संस्थेचा असा उद्देश आहे कीं श्वेतांग जातीचें प्रभुत्व सर्व जगावर ठेवायचें. काळे लोक ठेवावयाचे नाहींत. जेथें जेथें काळा माणूस दिसेल तेथें तेथें त्याला बंदुकीची गोळी घालून ठार मारावयाचें. या संस्थेचें पुढारीपण मिस मेयोच्या एका देशभगिनीकडे आहे. हिचें नांव इलिजाबेथ टायलर असें आहे. हिच्या अध्यक्षतेखालीं सर्व क्रूर कर्मे होत असतात. या संस्थेंत अमेरिकेंतील बहुतेक छोटे बडे अधिकारी गुपचूपपणें सामील झालेले आहेत असें म्हणतात. या संस्थेचे एकंदर पांच लाख सभासद असून त्यांतील स्त्री सभासदांची संख्या दीड लाखापेक्षां अधिक आहे. सुधारलेल्या मेयोच्या जन्मभूमींत दिवसा ढवळ्या असले प्रकार चालत असतांना श्रेष्ठ असलेल्या भारतमातेवर असत्य आरोप लादणाऱ्या या महामायेनें अमेरिकन मातेची लाडकी प्रजा कशी पशू कोटीला जात आहे व त्यांच्या मानसिक वृत्तीला पापाच्या—अत्याचाराच्या—भूतानें कसें पछाडलें आहे तें कां अवलोकूं नये ?

अमेरिकेंतील वरील अगणित अत्याचार सुधारलेल्या संस्कृतीचेच द्योतक आहेत काय ?

---

## युरोपमधील वेश्याबाजार.

फॅशनचा पुरस्कार करणारा फ्रान्स या बाबतींत कमालीचा पुढारलेला आहे. वेश्यांचा व्यापार या देशांत धूमधडाक्यानें चालू असून कोव्यवधी धनिक या व्यापारांत पडलेले आहेत. या गलिच्छ व्यापारांत फ्रान्सच्या निरनिराळ्या धनिकांचें तीन कोटी पौंड भांडवल अडकलेलें आहे. एकट्या पॅरीस शहरांत सत्रा हजार वेश्यागृहें कायदेशीरपणानें परवानगी घेऊन स्थापन झालेलीं आहेत. या प्रत्येक घरांत कमींत कमी तीस तरुणी असतात. या हिशोबावरून पाहतां एकट्या पॅरीस शहरांत लायसेन्स होल्डर अशा पांच लाख दहा हजार वेश्या आहेत. याशिवाय गुप्तपणानें व्यभिचार करणाऱ्या छेलछबेल्या निराळ्याच आहेत. ब्रूसेल्स नामक छोट्याशा गांवीं देखील सात हजार वेश्यागृहें आहेत. एकंदर सर्व फ्रान्स देशांत साडेसात लक्ष वेश्या असल्याचें फ्रान्सच्या सरकारी दप्तरांत नमूद आहे. या सर्व वेश्यांना सरकारमार्फत डॉक्टरकडून प्रमाणपत्र दिलें जातें. हें पत्र लायसेन्स बरोबर देण्याचा फ्रान्समध्यें रिवाज आहे. फ्रान्सप्रमाणेंच दक्षिण अमेरिकेंत देखील हा व्यापार कमी आहे असें नाहीं. बुचनोरीस नांवाच्या गांवांत वीस हजार वेश्या आहेत. या ठिकाणच्या पांच सहा लाख गोऱ्या पोरी या धंद्यांत

आहेत. याचप्रमाणें डिजेनेरो, मोंटे विडीयो, मॅक्सिको, पनामा वगैरे शहरांत हा अनीतीचा बाजार तेजीनें चालला आहे. युरोप खंडांत या धंद्याची मुख्य बाजारपेठ म्हणजे फ्रान्स होय. वेश्यांच्या व्यापाराचें व गोऱ्या मुलींच्या व्यापाराचें केंद्रस्थान म्हणजे पॅरीस होय. हा व्यापार या शहरीं मोठ्या प्रमाणांत चालत असतो. याकरतां स्वतंत्र कचेऱ्या, पगारी दलाल वगैरे माणसें नेमलीं जातात. फक्त याचकरतां हीं ऑफिसें आहेत असें मात्र जाहीर केलेलें नसतें. गुप्तपणें हा सर्व व्यवहार नाटक, सिनेमा वगैरेंच्या एजन्सीच्या भपकेदार नांवाखालीं चाललेला असतो. यांच्याकरतां मोटारी, टेलीफोन वगैरे सर्व जय्यत तयारी असते. या व्यापाराच्या शाखा प्रत्येक राजधानीच्या शहरीं उघडण्यांत आलेल्या आहेत. परंतु या सर्वांचीं सूत्रें पॅरिसच्या दलालांच्या हातीं असतात. इ. स. १९२६ मध्यें जर्मनीची राजधानी जें बर्लिन शहर त्या बर्लिन शहरांत याच निंद्य व्यापाराकरतां ७५००० मुली गोळा करण्यांत आल्या. या मुली लालूच दाखवून, मोह दाखवून किंवा भुलथापा देऊन मिळविण्यांत आल्या होत्या. या अनीतीच्या धंद्यांत या मुलींची किंमत त्यांच्या सौंदर्यावरून ठरली जाते. अशी मुलगी २०० रुपयांपासून तीन हजार रुपयांपर्यंत विकली जाते. अशा रीतीनें हा व्यापार चाललेला आहे. हा व्यापार तिकडे कसा चालतो याबद्दल या रिपोर्टांत खालीं दिल्याप्रमाणें माहिती दिलेली आहे.

पोलंडच्या सरहद्दीवर एकदां ह्याच व्यापारी गोष्टींचा स्फोट झाला. एका मोटार लॉरींत पांच सहा मुली मूर्च्छितावस्थेंत आढळल्या. डॉक्टरनें तपासाअंतीं असें सांगितलें कीं 'या मुलींना गुंगीचें औषध देण्यांत आलें असावें.' या मुलींना गुंगीचें औषध देऊन मोटारमध्यें घालून दूरवर नेण्यांत येतें व तेथें वेश्याव्यसायाकरितां खरेदी विक्री होते. असा दुसरा स्फोट फ्लोरिडोमध्यें झाला होता. सुमारें ८०।९० मुली बोटींत एकत्र सांपडल्या. त्यांना फुसलावून दक्षिण अमेरिकेंत घेऊन चाललेला एक मध्यस्थ पशू त्याच बोटीवर होता. अमेरिकन सरकारनें या गोष्टीची बारकाईनें चौकशी केली. त्यांत असें आढळून आलें कीं मेक्सिकोपर्यंत अशा मुलींना मूर्छित करून नेण्यांत येतें. उद्देश असा असतो कीं ठराविक स्थळीं जाऊन पोंचेपर्यंत कांहीं व्यत्यय अगर घोंटाळा होऊं नये. अशा रीतीनें हे दलाल गोऱ्या गोमट्या अल्लड तरुणींना आपल्या जाळ्यांत अडकवितात व त्या अशा रीतीनें जाळ्यांत अडकल्या कीं त्यांच्यावर यथेच्छ पैसा मिळवून गब्बर होतात. या प्रकाराशिवाय आणखीही हे मध्यस्थ दुसरा एक डाव ह्याच धंद्याला पोषक म्हणून उघडपणें खेळत असतात

तो डाव म्हणजे लग्नाचा होय. निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन हे मध्यस्थ जवान मुलीशीं लग्न लावतात व लग्न लावलेली पत्नी वरील ठिकाणीं निर्लज्जाप्रमाणें विकतात. निरनिराळ्या प्रांतांतील तरुण फॅशनेबलपणानें उसन्या श्रीमंतीची ऐट आणून मुलींना फसवतात व मेक्सिको शहरीं जाऊन तेथें मन मानेल ते पैसे मागून पत्नीची विक्री करतात. या 'माला'ला मेक्सिकोच्या बाजारांत अतिशयच मागणी असते. सुंदर मुली मेक्सिकोंत येतात केव्हां आणि आपण झडप घालतों केव्हां अशा आशाळभूतपणानें हे दलाल उत्सुक असतात. हे दलाल अशा स्त्रीला तीनशें पौंड देऊन विकत घेतात व विकत घेतलेली स्त्री निंद्य धंद्याकरतां जबर नफा घेऊन विकण्यांत येते. तिकडील बऱ्याच तरुणांचा हा एक व्यापारच होऊन बसला आहे. या व्यापारावर बरेच लोक लक्षाधीश झाले आहेत. मेक्सिकोचे दलाल मुलींना खरेदी करून दक्षिण अमेरिकेंत पाठवितात. असा हा अनीतीचा व्यापार युरोप खंडांतील सुधारलेल्या देशांत चाललेला आहे. चौकशी कमेटींत बऱ्याच गोष्टी बाहेर आलेल्या आहेत. पनामा व ग्रीस या ठिकाणच्या लोकांनीं या प्रश्नाचीं उत्तरें देण्याचें टाळलें आहे. असें म्हणतात कीं वरील दोन्ही ठिकाणीं सरकारी अंमलदारदेखील ह्या भानगडींमध्यें असतात. ग्रीस व पनामा या ठिकाणीं जो गलिच्छ धंदा चालतो तो मात्र फारच चमत्कारिक आहे. खेडेगांवांत जाऊन या धंद्याचे दलाल सुंदर मुलगी दिसली कीं पोलीसकडून तिला गिरफदार करवून नेतात व अंधार कोठडींत ठेवतात व याच कैदखान्यांतून गुप्त मार्गानें पॅरिसला अशा हुंड्या पटविल्या जातात. पनामांत याकरतां एक स्वतंत्र बाजारपेठच आहे. अशा प्रकारें युरोप खंडांत निर्लज्जपणानें गोऱ्या मुलींचा व्यापार ( व्हाईट स्लेव्ह ट्रॅफिक ) चालू आहे. व्यापारी लोकांची परदेशांत एक मोठी टोळी असून तिचा व्यापार सुरळीतपणें व बिनहरकत असा चाललेला आहे. या व्यापाराकरतां निरनिराळ्या ठिकाणीं एजंट नेमण्यांत आलेले असून कुशल मध्यस्थ आपल्या डावपेचांनीं सुंदर आणि भोळ्या मुलींचे गळे अनीतीच्या तरवारीनें चिरीत असतात. सुधारलेल्या युरोपखंडांत अशा प्रकारचा अत्यंत गलिच्छ असा व्यापार चाललेला आहे. अशा रीतीनें पावित्र्याच्या दृष्टीनें युरोपियन समाजाचें पूर्ण अधःपतन झालें असतांना मेयोसारखी मायाविनी तिकडे डोळेझांक करून अत्यंत पवित्र अशा आर्य महिलांना निरर्थक व द्वेषबुद्धीनें दूषणें देत आहे. येन केन प्रकारानें हिंदूंना नामोहरम करण्याचा या कैदाशिणीचा अत्यंत निंद्य असा उद्योग आहे. आमचा पुरातन हिंदुसमाज अशा कोल्हेकुईनें कमी दर्जाचा केव्हांही ठरणार नाहीं.

# मिस् मेयो व तिचे टीकाकार.

## १ महात्मा गांधी.

मिस मेयो जें कांहीं लिहील तें हजारों अमेरिकनांच्या डोळ्यांखालून जाईल आणि आम्ही हिंदुस्थानांतील लोक जें कांहीं लिहूं ते धड शंभर अमेरिकनांच्याहि नजरेस पडणार नाहीं, ही गोष्ट तीस माहीत असल्यामुळें ती या गोष्टीचा शक्य तो फायदा पदरांत पाडून घेत आहे. तिचें म्हणणें खोडून काढण्याकरितां दुसऱ्यांनीं जे लेख लिहिले असतील किंवा भाषणें केलीं असतील त्यांतून चुकीचे उतारे देणें, अर्धवट उतारे देणें किंवा अर्थाचा विपर्यास होईल अशा रीतीनें ते देणें या गोष्टी करण्यास आपणांस पूर्ण मोकळीक आहे असें तीस वाटत आहे. ‘ लिबर्टी ’ पत्रांत तिनें प्रसिद्ध केलेल्या आपल्या लेखांत माझ्या नांवाचा पुन्हां उल्लेख केला आहे, व तिच्या ‘ मदर इंडिया ’ संबंधाचा माझा लेख खोटा ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. कांहीं सुविचारसंपन्न अमेरिकन गृहस्थ माझ्या लेखास मान देत असल्यामुळें माझ्या लेखाचा त्यांच्या मनावर परिणाम होईल ही भीति पडून तीस असें करणें भाग पडलें असावें असें मला वाटतें. माझ्या ‘ सेक्रेटरी ’चा जो उल्लेख तिनें केला आहे तो गैरमाहितगार वाचकांस फसविण्याची एक प्रकारची चलाखीच आहे. माझ्यापाशीं दोन सेक्रेटरी असतात, हें वाक्य खोडण्याच्या माझ्या प्रयत्नापासून जर कांहीं अनुमान करतां येत असेल तर तें हेंच कीं, मिस् मेयो हिनें सत्याचा बुद्धिपुरःसर विपर्यास केलेला नसला तरी तिनें जें कांहीं लिहिलें तें निष्काळजीपणें लिहिलें खास; पण सेक्रेटरीचें तिनें जें वर्णन केलें आहे त्यावरून माझ्याजवळ नेहेमीं दोन सेक्रेटरी असतात असाच वाचकांचा समज होण्यासारखा आहे. माझा म्हणून तिनें जो संदेश प्रसिद्ध केला आहे तो मीच दिला होता, या विधानास ती धरून बसली आहे. यावरून सत्य कसें तरी दडपून टाकण्याचा गुन्हा तिच्याकडून होत असल्याचें सिद्ध होत आहे. तिच्या व माझ्या दरम्यान झालेल्या मुलाखतीची दुरुस्त झालेली नक्कल माझ्यापाशीं नसेल असें तिला वाटलें असावें, असें दिसतें. पण तिनें लिहून ठेवलेल्या टिपणाची एक प्रत माझ्याकडे आहे, हें तिचें दुर्दैव होय.

चरख्याचा जो ‘ घुं ’ ‘ घुं ’ असा आवाज निघतो त्यास उद्देशून केलेल्या विधानांचा पूर्ण उतारा पुढीलप्रमाणें आहे:—

‘ अमेरिकेस माझा संदेश म्हणजे फक्त चरख्याचा ‘ घुं’ ‘ घुं ’ असा निघणारा आवाज होय. अमेरिकेहून जीं पत्रें मला येतात किंवा तिकडील वृत्तपत्रांतील जे उतारे कोणीतरी माझ्याकडे पाठवितात, त्यांजवरून असें दिसून येतें कीं, अनत्याचारी असहकारितेपासून होणाऱ्या परिणामाविषयीं कित्येकांची वाजवीहून अधिक कल्पना आहे. उलट या पद्धतीस कांहीं कमी लेखीत असून यासंबंधाच्या चळवळींत पडलेल्या लोकांवर वाटेल तसले आरोप करीत आहेत. या किंवा त्या कोणत्याच बाजूनें अतिशयोक्ति करूं नका. कांहीं कळकळ वाटत असलेले अमेरिकन गृहस्थ जर या चळवळीचा शांतपणें आणि निःपक्षपात बुद्धीनें अभ्यास करतील तरच युनायटेड स्टेट्सला या चळवळीची थोडीबहुत माहिती होणें शक्य आहे.

मी ह्या चळवळीचा प्रवर्तक जरी आहें, तरीही ही चळवळ अलौकिक आहे असें मला वाटतें. मला सांगावयाचें आहे तें हेंच कीं, आमची सारी चळवळ चरख्यांत एकवटली आहे. तींतील साऱ्या गुंतागुंतीचाहि चरख्यावरून बोध होईल. चरखा हा मला बंदुकीच्या दारूप्रमाणें आहे. स्वावलंबी कसें होतां येईल ही गोष्ट तो हिंदुस्थानांतील लाखों लोकांस शिकवितो आणि त्यांच्या हृदयांत आशा उत्पन्न करतो. त्यांच्या मनांत खरी जागृति उत्पन्न झाली कीं, पुनः स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं त्यांना बोट उगारण्याचेंहि कारण नाहीं. दुसऱ्याची नागवणूक करण्याच्या वृत्तिऐवजीं दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची वृत्ति उत्पन्न करावी, हाच चरख्याचा संदेश आहे. दुसऱ्याची नागवणूक करण्याचें लक्षण पाश्चात्यांत प्रमुखत्वानें दिसून येतें. या वृत्तीचें अनुकरण माझ्या देशबंधूंनीं करावें, अशी माझी बिलकूल इच्छा नाहीं.’

वरील उताऱ्यापैकीं फक्त पहिलें वाक्य मिस मेयो हिनें दिलें असून त्याजवरील माझी महत्वाची टीका तिनें दिलेली नाहीं. यावरून माझा उपहास करण्यासाठींच तिनें तें दिलें असावें. सर्व पारिग्राफ वाचला असतां माझा संदेश व उद्देश स्पष्ट होत आहे व तो समजण्यासारखाहि आहे. मी प्रवासांत असतांना तिच्या बुकावरील माझा लेख लिहिला. माझ्यापाशीं त्या वेळीं जर वरील टिपणें असतीं तर त्यांतून मीं उतारे दिले असते व माझा लेख मग अधिकच जोरदार झाला असता. पण माझा तो लेख खोडून काढण्यासाठीं मिस मेयो हिनें प्रयत्न

चालविला आहे. त्यांत देण्यांत आलेला माझा संदेश आणि वरील उताऱ्यांतील माझा संदेश निरनिराळे नाहींत, असेंच दिसून येईल.

लेखाकरतां तिनें जो विषय घेतला आहे त्यास तिनेंच 'किरकोळ वाक्-छल' असें म्हटलें आहे. पण त्यांतहि तिला यश आलेलें नाहीं, हेंच सिद्ध होत आहे. आणि जर कदाचित् माझ्या स्मरणशक्तीमुळें कांहीं तरी चूक झाली असती तरीहि माझ्या तर्कशुद्ध उत्तराला तिच्याकडून प्रत्युत्तर मिळालें, असें झालेंच नसतें. तिच्या प्रत्युत्तरानें त्यास कांहीं बाधा होत नाहीं. तिला मुद्दा असा कांहींच पुढें आणतां येण्याजोगा नसल्यामुळें एखाद्या लटपट्या वकिलाचें अनुकरण करण्याचा तिनें प्रयत्न केला आहे. प्रतिपक्षाला पेंचांत धरण्यासारखें त्याच्या उत्तरांत कांहीं न सांपडल्यास वकील न डगमगणाऱ्या विरुद्ध पक्षाच्या साक्षीदारास आपल्या आठवणींतून कांहीं तरी गोष्टी सांगावयास लावतो. असल्या गोष्टी खऱ्या नसल्याचें दाखवितां येईल अशा भरंवशानें तो हें करितो. मला दुःखानें म्हणावें लागतें कीं, 'लिबर्टी'त लिहिलेल्या लेखावरून मिस् मेयो ही विश्वसनीय लेखिका नाहीं असेंच सिद्ध होत असून शिवाय खऱ्याखोट्याची चाड नसलेली व बिनदिक्कत कांहींतरी लिहिणारी ती एक बाई आहे असेंहि सिद्ध होत आहे.

---

## २ रे. डॉ. मॅकनिकल.

मिस् मेयोचें पुस्तक म्हणजे अंधारांत चांचपडणें होय; पण असें असूनही त्या बाईच्या लिहिण्यांत आत्मविश्वास भरपूर आहे. कोणत्याही देशाची खरी माहिती मिळविण्याचा हा मार्ग नव्हे. मिस् मेयोच्या पुस्तकावरून वाचणाऱ्याच्या मनांत खोट्यानाट्या कल्पनांचा ठसा उमटतो.

* * * *

ह्या बाईनें हिंदी राजकीय पुढाऱ्यांना "खोडसाळ मुलें" म्हटलें आहे. परंतु हिनें कधीं ना. गोखल्यांचें नांव ऐकिलें होतें किंवा नाहीं ह्याबद्दल शंका वाटते. ह्या बाईनें मुंबई इलाख्याचा मुळींसुद्धां विचार केलेला दिसत नाहीं. स्त्रीपुरुष संबंधाचा विचार करीत असतां बंगाल इलाखा आणि स्पृश्यास्पृश्यतेचा विचार करीत असतां मद्रास इलाखा, हे दोनच इलाखे फक्त तिच्या डोळ्यांपुढें होते. अशा प्रकारची दृष्टी ठेविली असतां सत्य कधींही सांपडत नसतें. आपल्या पुस्तकाच्या ३६३ पानांत तिनें असें भासविण्याचा कितीही प्रयत्न केला तरी

विश्वासु मित्रानें दाखविलेलें कटु सत्य हें नव्हे. अशा पुस्तकानें राष्ट्राराष्ट्रांतील हितसंबंध बिघडतात. अशा भावनेनें हिंदुस्थानचा उद्धार करण्याचा आव आणणाऱ्या कोणासही आमच्याकडून सहाय्य मिळणार नाहीं. हिंदुस्थान म्हणजे जगावर आलेलें संकट असें आम्हांला बिलकूल वाटत नाहीं. उलट हिंदुस्थान हें सुखाचें आगर असल्यामुळें जगानें त्याची उपेक्षा करून चालणार नाहीं.

---

## ३ डॉ. पी. जी. ब्रिज.

### सेंटपॉल कॉलेज, कलकत्ता.

दुःख, घाण, अवनति ह्यांचें मिस् मेयोनें आपल्या पुस्तकांत प्रदर्शन उघडलें आहे.

लहानपणींच लग्न झालेल्या मुली, विधवा–कुमारी, क्षयी विद्यार्थी आणि बेकार व असमाधानी पदवीधर इत्यादिकांनीं हिंदुस्थान देश अगदीं भरून गेला आहे. थोडक्यांत हिंदुस्थान देश हा महारोगानें पिडून गेलेला असून हा देश म्हणजे जगावर आलेलें संकटच आहे, असें प्रत्येकास वाटूं लागेल असें मिस् मेयोचें म्हणणें आहे.

अशा प्रकारें काढलेलें घाणेरडें चित्र हिंदुस्थानांत प्रवास करूं इच्छिणाराच्या हातीं देणें किती धोक्याचें आहे, हें सर्वांच्या ताबडतोब लक्षांत येईल.

राजकीय दृष्टया विवेचन करण्याच्या मोहामुळें तिची दृष्टि सदोष झाली असून शिक्षणांत सुधारणा करण्यासाठीं सुचविलेले उपाय हास्यास्पद आहेत.

पाश्चिमात्य देशांस ह्या पुस्तकाचा लवकर विसर पडावा अशी माझी इच्छा आहे.

---

## ४ लेडी सिंथिया मोसले. (लंडन)

हिंदी समाजाची जी अवनति झाली आहे त्या अवनतीची सुधारणा व्हावी असा मिस् मेयोचा हेतु होता असें मला वाटत नाहीं. असा तिचा हेतु असता तर तिनें निराळ्या प्रकारचें पुस्तक लिहिलें असतें. हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्याची तरफदारी करण्याचा तिचा प्रयत्न आहे. प्रथम त्याबद्दल आपलें मत चांगलें नव्हतें पण तेथें गेल्यावर आपलें मत बदललें असें ती म्हणते. पण तिच्या म्हणण्यावरून असें सहज दिसून येतें कीं तिची दृष्टि प्रथमपासून दूषित झाली असून तिला मिळालेल्या माहितीचा तिनें दुरुपयोग केला आहे.

यासाठींच माझा तुम्हाला असा प्रश्न आहे कीं, त्या अफाट देशाची संपूर्ण आणि विश्वसनीय माहिती मिळविण्यासाठीं फक्त इस्पितळांत जाऊन तेथील रिपोर्ट वाचून भागेल का ? तिनें गोळा केलेला पुरावा अशाच प्रकारचा आहे; आणि त्यांत मौज ही आहे कीं तो सर्व पुरावा ह्या शतकांतील नसून मागल्या शतकांतला आहे. इस्पितळांतील रिपोर्टांच्या आधारानें निंदाव्यंजक पुस्तक लिहितां येईल, पण त्यांवरून सर्व देशाची माहिती मिळतेच असें नाहीं, हें माझ्याप्रमाणें तुम्हींही जाणतां.

ह्या पुस्तकाला उत्तर म्हणून कोणी तरी अमेरिका व इंग्लंड त्या देशांबद्दल नाहीं नाहीं त्या नालस्त्यांनीं भरलेलें पुस्तक लिहूं शकेल आणि त्यामुळें ह्या देशांच्या भावना दुखावल्या जाऊन अमेरिका व इंग्लंड ह्या दोन्ही देशांचें अपरिमित नुकसान होईल. हिंदुस्थानविषयक असलें घाणेरडें पुस्तक लिहिते वेळीं मिस् मेयोनें ही जाणीव मनांत बाळगू नये होती काय ?

---

## ५ डॉ. आर. पी. परांजपे.

अशा तऱ्हेचें—किंवा याहीपेक्षां अधिक विघातक पुस्तक कोणत्याही देशाबद्दल लिहितां येईल. हिंदुस्थान म्हणजे स्वर्ग, त्यांत कोणत्याही प्रकारच्या वाईट गोष्टी नाहींत असें माझें म्हणणें नाहीं. इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानांतही कांहीं वाईट गोष्टी आहेत आणि हिंदुस्थानाबद्दल ज्यांना अंतःकरणापासून कळकळ वाटते ते ह्या वाईट गोष्टी नाहींशा करण्याचा आपल्याकडून शक्य तितका प्रयत्न करीत आहेत.

* * *

येतांना मिस् मेयोच्या डोळ्याला कावीळ झाली होती आणि जातांना तर ती सर्वस्वी अंध झाली होती.

ह्या पुस्तकामुळें हिंदुस्थानचे अंतःकरणास चरका बसला आहे, एवढेंच नव्हे तर मी इतकें म्हणण्यास तयार आहे कीं त्यायोगें सर्व राष्ट्रांचें काळीजही करपून गेलें आहे. राष्ट्राराष्ट्रांत शांतता आणि स्नेह वाढविण्याचा राष्ट्रसंघ प्रयत्न करीत आहे. पण अशा पुस्तकानें वैमनस्य व द्वेष उत्पन्न झाल्याविना राहणार नाहीं. हिंदुस्थानचे मनांत ह्या पुस्तकाचे योगानें अमेरिकेबद्दल तेढ उत्पन्न होईल. तेव्हां असल्या पुस्तकांचा शांतता व एकी प्रस्थापित करण्याच्या कामीं काडीइतकाही उपयोग होणार नाहीं. म्हणून अशा विघातक ग्रंथकर्त्रीचे ठिकठिकाणीं चांगले कान

उपटले गेलेच पाहिजेत! अशा लेखकांना प्रोत्साहन मिळाल्यास हिंदुस्थानची धडगत नाहीं, हें प्रत्येकानें पक्कें ध्यानांत ठेवावें.

---

## ६ लाला लजपतराय.

हिंदुस्थानांतील संस्थानिक ह्या मथळ्याखालीं मिस् मेयो म्हणते कीं 'हिंदुस्थानांतील माझ्या एका मित्रानें मला एक लहानशी मेजवानी दिली. त्या मेजवानीचा हेतु स्वराज्यवादी मुत्सद्यांचीं कांहीं मतें माझ्या कानावर पडावींत हा होता.'

ब्रिटिश सत्ता नाहींशी झाल्यावर तुम्ही हिंदी संस्थानिकांची काय वासलात लावणार आहांत असा एक प्रश्न मिस् मेयोनें त्या मुत्सद्यांना केला. 'आम्ही सर्व संस्थानें नाहींशीं करून टाकूं' असें एकानें उत्तर दिलें व बाकीच्यांनीं मान डोलावून त्या उत्तराला आपली संमति दर्शविली. या हकीकतीची सत्यता पटवून घेण्यास श्रीयुत लाला लजपतराय यांना बराच त्रास पडला. मुंबई क्रॉनिकलचे १२ आक्टोबरचे अंकांत ते म्हणतातः—

अशा प्रकारच्या 'मेजवान्या' देणें शक्य असलेल्या किंवा मेजवानीस हजर रहाणें शक्य असलेल्या लोकांकडे केलेल्या चौकशी अंतीं असें कळून आलें कीं, असोअसोसिएट प्रेसचे के. सी. रॉय यांनीं एक मेजवानी दिली होती व त्या प्रसंगीं बऱ्याच हिंदी सद्गृहस्थांना आमंत्रण दिलें गेलें होतें. त्या प्रसंगीं के. सी. रॉयचे असिस्टंट मि. सेन हेच फक्त बंगाली गृहस्थ हजर होते. त्या प्रसंगीं प्रसिद्ध झालेल्या हकीकतीबद्दल जें कांहीं मिस् मेयोनें लिहिलें आहे तें अगदीं सपशेल खोटें आहे, असें मि. के. सी. रॉय यांनीं मला खात्रीपूर्वक सांगितलें आहे.

ह्या मेजवानीच्या प्रसंगाबद्दल जर मिस् मेयो लिहीत नसेल तर ज्या मेजवानीच्या प्रसंगाबद्दल तिनें लिहिलें आहे ती मेजवानी कोणी दिली होती त्या गृहस्थाचें नांव मिस् मेयोनें प्रसिद्ध करावें हें इष्ट आहे. मिसेस् के. सी. रॉयकडून आलेलें एक पत्र खालीं देत आहें. तें वाचकांना बऱ्याच अंशीं उपयुक्त वाटेल.

मिसेस् के. सी. रॉय आपल्या पत्रांत म्हणतातः—'आपण केलेल्या चौकशीबद्दल मी फार आभारी आहें. मिस् मेयो येथें कांहीं दिवस होती. तिच्या मुक्कामांत आम्हीं तिला मेडन हॉटेल, दिल्ली येथें एक मेजवानी दिली. ती आमच्याकडे आली तेव्हां तिच्याजवळ मोठमोठ्या लोकांचीं बरींच पत्रें होतीं. मेजवानीस फक्त दोन बंगाली गृहस्थ होते. एक माझे यजमान व दुसरे मि. सेन. बाकीचे

सर्व इतर लोक होते. त्यांपैकीं प्रमुख असे मि. जिना व मि. चेट्टी हे होते. त्या वेळीं वादाचा मुख्य प्रश्न म्हणजे हिंदुस्थानास सनदशीर रीतीनें आपली वाढ, आपला दर्जा व आपली जातीविषयक ऐक्यता कशी घडवून आणतां येईल हा होता. हिंदी संस्थानिकांबद्दल कांहीं वादविवाद निघाला होता, हें मला तरी आठवत नाहीं. त्यांना नामशेष करून टाकावेत अशाबद्दल एक शब्दही कोणी उच्चारला नाहीं, याबद्दल मी खात्री देऊं शकतें.'

वरील गोष्टीवरून मिस मेयो हिजला सत्यप्रियतेची किती आवड होती हें उघड दिसून येत आहे !

---

## ७ रेव्ह. एच. ए. पॉवेल

हे " इंडियन वुइटनेस " लखनौ या पत्रांत लिहितात—

मिस मेयोच्या " भारत माता " नांवाच्या पुस्तकाच्या १३५ व १३३ या पानांत मिस् मेयोनें लाहोरच्या व्हिक्टोरिआ स्कूलची हकीकत दिली आहे. त्या हकीकतीमध्यें त्या शाळेच्या प्रिंसिपॉल मिस बोस् यांचीं म्हणून कांहीं विधानें अवतरण चिन्हांत दिलेलीं आहेत. मी त्या बाईची भेट घेतली तेव्हां मिस् मेयोनें अवतरण चिन्हांत दिलेल्या विधानांपैकीं कित्येक विधानें त्या बाईच्या तोंडून निघालींच नव्हतीं असें मला आढळून आलें. शिवाय मिस् बोस ह्या बाई हिंदी ख्रिस्ती कुटुंबाच्या तिसऱ्या पिढींत जन्मल्या, ही माहितीदेखील खरी नाहीं. १३२ पानावरील तिसऱ्या पॅरिग्राफमधील अस्पृश्य मुलींच्या विषयीं केलेलीं विधानें बरोबर नसून तीं विधानें बाईच्या तोंडून कधींच निघालीं नव्हतीं. १३४ पानांत मिस् मेयो म्हणते बायकांना शिकवीत असतांना पुरुष पंडितांना पडद्याआड बसून त्यांना शिकवावें लागतें. परंतु मिस् बोस यांनीं मला असें सांगितलें कीं हिंदू मुलींना संस्कृत शिकवीत असतांना पडद्याचा कधींही उपयोग करीत नाहीं. १३८ पानावरील तिसऱ्या प्यार्‍यांत शाळेच्या हेतूबद्दल जे उद्गार काढले आहेत ते धडधडीत चुकीचे आहेत.

'हिंदी बायकांना शिवणकला म्हणजे काय हें बहुतेक माहीत नव्हतें.' अशा-प्रकारच्या धडधडीत खोट्या विधानाला मिस् बोस् ह्या उत्तर देतांना म्हणाल्या कीं हिंदी बायकांना शिवणकलेची पूर्णपणें माहिती आहे.

१३४ पानांत खालीलप्रमाणें एक धडधडीत काल्पनिक खोटें विधान ठोकून दिलें आहे.

' हिंदी स्त्रिया आपल्या हातानें स्वयंपाक कधींही करीत नाहींत. त्या बायका हें काम घाणेरड्या चाकर माणसांकडून करून घेतात. त्यामुळें पुष्कळशा रोगांचा प्रादुर्भाव होऊन मृत्युसंख्येची वाढ झपाट्यानें होत आहे. ' ह्या विधानास उत्तर देतांना मिस् बोस ह्या म्हणतात, ' प्रत्येक वर्गाच्या कुटुंबांतील स्त्रिया हाताखालीं चाकर माणसें असतांना देखील स्वयंपाक हातानेंच करतात आणि उच्च घराण्यांतील चाकर माणसें कधींही घाणेरडीं नसतात. '

वरील विधानांबद्दल मला प्रत्यक्ष रीतीनें चौकशी करतां आल्यामुळें तीं विधानें मी विस्तारानें दिलीं आहेत. यावरून मिस् मेयोच्या पुस्तकांत खोट्या विधानांचा भरणा किती असेल याची वाचकांस कल्पना होईल.

समाप्त.

REFBK-0003570

3400